
डॉ. मनोहर सुखाडे
पुरुषवाद
आणि
साहित्य

ई साहित्य प्रतिष्ठान



सादर करत आहे

पुरुषवाद आणि साहित्य

(शोध-ग्रंथ)

डॉ. मनोहर झगडू सुरवाडे

पुरुषवाद आणि साहित्य (शोध-ग्रंथ)
डॉ. मनोहर झगडू सुरवाडे
पत्ता : धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर
फोन : 8793918134
ईमेल: msurwade09@gmail.com

ISBN Number : 978-93-345-3446-7

मुखपृष्ठ : (एआय सहाय्य)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते (दंड व तुरुंगवास).

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : ७ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. ८००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- डॉ. मनोहर झगडू सुरवाडे – 8793918134

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखक परिचय

१. नाव : **डॉ. मनोहर झगडू सुरवाडे**

२. व्यवसाय (नोकरी) : प्राध्यापक,विभागप्रमुख व उपप्राचार्य

३. पत्ता : धनाजी नाना महाविद्यालय,फैजपूर जि. जळगाव,४२५५०३

: वैशाली नगर,फैजपूर जि. जळगाव,

४. मोबाइल : 8793918134

५. ई-मेल : msurwade09@gmail.com

- **सामाजिक व शैक्षणिक कार्य**

१. पीएचडी : मराठवाड्यातील कथाकारांचे प्रादेशिक वेगळेपण, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, २००३

२. संशोधन प्रकल्प

२.१ - समकालीन दलित कथेतील सामाजिक जाणिवा, यु. जी. सी.

पुणे विभाग,२००४

२.२ - भटक्या विमुक्ततांच्या मराठी साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास, यु. जी. सी., नवी दिल्ली,२०१४

३. शोधनिबंध

३.१-समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : अक्षरवैदर्भी, ऑक्टो- नोंव्हे २०१०

३.२-दलितेतर लेखकांच्या कथांमधील दलित जीवनदर्श, अस्मिता-दर्श, एमेजू,२०१०

३.३-मराठवाड्याच्या कथांतील आशयसूत्रे : अनुबंध, एप्रिल, २०११

३.४-आदिवाशी काव्यातील सामाजिक आणि वाङ्मयीन जाणिवा : अक्षरवैदर्भी, मे, २०११

३.५-मराठवाड्याच्या कथांतील दुष्काळविषयक आशयसूत्रे : आत्मप्रत्यय,ऑक्टो – डिसे २०११

३.६-संत साहित्यातील दुष्काळाचे संदर्भ : पंचधारा,ऑक्टो-डिसे, २०११

३.७-आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचारदर्शन : अस्मितादर्श, २०१२

३.८-स्त्रियांचे सक्षमीकरण आणि त्यांचे अधिकार : प्लाटीनम, एप्रिल २०१२

३.९-दलित चळवळ आणि आत्मकथन: एक अनुबंध : आधार , सप्टे २०१२

३.१०-साहित्यातील गांधीविचार : अक्षरवैदर्भी, नोव्हें २०१२

३.११-उन्नती चौधरी लिखित 'स्त्रीत्त्वाची सूत्रे' : स्त्रीस्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा शोध घेणारा नाविन्यपूर्ण काव्याविष्कार,

अक्षरवैदर्भी दिवाळी विशेषांक, २०२४

३.१२-नव्वदोत्तर ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा : दारापूर, २०११

३.१३-डिजिटल तंत्रज्ञान : भारतीय ज्ञान प्रणालीच्या परंपरेतील उत्तर-आधुनिक स्रोत, धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, राज्यस्तरीय चर्चा सत्र, भारतीय ज्ञानप्रणाली, जानेवारी २०२६

३.१४-नकला : पारंपरिक लोककलाप्रकार व समाजप्रबोधनाचे सशक्त माध्यम,

३.१५-पुरुष वाद संकल्पना आणि स्वरूप, आर डी नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स, १६ जानेवारी २०२६

३.१६-सर्जनशीलता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, विज्ञान कला आणि वाणिज्य महाविद्यालय कोपरगाव, एक दिवशीय आंतरराष्ट्रीय ई कॉन्फरन्स,१८ फेब्रुवारी २०२६

३.१७-कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सर्जनशील साहित्या निर्मिती, समाजभूषण गणपतराव काळभोर कॉलेज लोणी भोकर, ७. मार्च २०२६

३.१८-साहित्य अकादमी पुरस्कृत मराठी लेखिकांचे साहित्यातील योगदान,समाज श्री प्रशांत दादा हिरे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, नामपुर जिल्हा नाशिक दोन दिवसीय राष्ट्रीय सेमिनार,१३-१४, मार्च २०२६

३.१९-साहित्य अकादमी पुरस्कृत निवडक कादंबऱ्यांमधील मानवी मूल्ये, एन. डी. महाविद्यालय, मलकापूर-पेरीड,ह्यूमन व्हॅल्यू

अँड लिटरेचर,२८ फेब्रुवारी, २०२६

४. राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोधनिबंध सादर : २१

५. संपादित पुस्तकातील लेख

५.१-राघववेळ आणि तणकट या कादंबऱ्यातील ग्रामीणता : ग्रंथवेद, २०१२

५.२-स्वातंत्र्यपूर्वकालीन मराठी कादंबरीतील मानवतावादी दृष्टिकोन: मराठी साहित्यातील मानवतावाद, अथर्व प्रकाशन,जळगाव २०१२

५.३-समकालीन दलित कथेतील आंबेडकरी विचार : १९८० नंतरचे मराठी साहित्य, ----२०१२

५.४-गावरंग माणदेशी माणसांची बदलती जीवनशैली :कृष्णाक्षर, २०१५

५.५- लोकमान्य टिळक यांच्या लेखनातील दुष्काळविषयक संदर्भ आणि दृष्टिकोन : मराठी साहित्य आणि आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन, २०१६

५.६-१९७५ नंतरच्या मराठी नाटकातील आशय आणि पात्रचित्रणास पूरक ठरलेल्या भौतिक घटकांचे अन्वयार्थ : १९७५ नंतरचे मराठी नाटक आशय आणि रचना, --- २०१७

६ - प्रकाशित पुस्तके

- **कवितासंग्रह**

१- षटकार : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

२- पुरुषनामा : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

३- तो-ती-ते : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

४-पुरुषाच्या व्यथा : प्राइम प्रकाशन,जळगाव,२०२५

५- बाप : नाण्याच्या दोन बाजू, : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

- **कथासंग्रह**

१. खूळ : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

२. शापित : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२५

- **कादंबरी**

१. जन्मपत्र : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

२. बाप : द ग्रेट हिरो, ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

- **गद्य**

१. डिजिटल युगातील माणूस : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

- **संपादन**

१. नकलाकर दिलीप अलोणे गौरवग्रंथ : आगामी,२०२५

- **साहित्य : समीक्षा व संशोधनपर ग्रंथ**

१-समकालीन दलित कथा : हार्मिस प्रकाशन, पुणे , २००८

२-१९८० नंतरची ग्रामीण कथा : बळीवंश प्रकाशन, नांदेड, २०१०

३-साठोत्तरी साहित्य प्रवाह: विविधता आणि वेगळेपण : सुगम प्रकाशन,अमरावती, २०१२

४-स्वातंत्र्यपूर्व मराठी साहित्यातील सामाजिक संदर्भ : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

५-ग्रामीण समाज व कथा साहित्य:सुगम प्रकाशन,अमरावती,२०१२

६-आदिवासी साहित्य प्रवाह : सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

७-दलित आत्मकथा आणि कथा :सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

८-ग्रामीण साहित्यप्रकार : स्वरूप आणि चिकित्सा, सुगम प्रकाशन, अमरावती, २०१२

९-मराठी ग्रामीण कथा – लेखिकांचे योगदान : स्वरूप प्रकाशन,

औरंगाबाद,२०१३

१०- उन्नती चौधरी लिखित-'साहित्य आणि समाजशास्त्रीय संशोधन' (सहलेखक) : प्रशांत पब्लिकेशन, जळगाव २०२३

११- पुरुषवाद आणि साहित्य : ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,२०२६

७. पीएच.डी. मार्गदर्शक : कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

८. संशोधन विद्यार्थी : १३ विद्यार्थ्यांना Ph.D. प्राप्त

९. विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. प्रबंधांचे बहिस्थ परीक्षक

१०. सामाजिक प्रबोधनपर व शैक्षणिक व्याख्याने

११. जळगाव विद्यापीठस्तरीय विविध समित्यांवर शैक्षणिक कार्य

१२. सामाजिक उपक्रम

१२.१- श्री सुनीळ सामंत, ई-साहित्य प्रतिष्ठान ठाणे,यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन आमच्या मराठी विभागामार्फत दोन वर्षापासून जळगाव जिल्ह्यातील हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना मोबाईलवर ई-साहित्य वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी 'ई-साहित्य वाचन अभियान' उपक्रम राबविले जात आहेत.

१२.२- 'विद्यार्थी अधिकारी प्रोत्साहन उपक्रम'

१३. पुरस्कार -

१-महाकवी वामनदादा कर्डक राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

२-भीमरत्न पुरस्कार,सम्राट फाउंडेशन,सावदा,जळगाव

३-१९८० नंतरची ग्रामीण कथा या शोधग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार

४-आदर्श शिक्षक पुरस्कार, युनियन बँक ऑफ इंडिया

५-लोकमत एक्सलंट टिचर अवॉर्ड, जळगाव,२०२५

६. विद्याभूषण, वार्ता फाउंडेशन वार्ताहर संघ,फैजपूर, २०२६

*** *** ***

सामाजिक धारणा आणि स्त्रीकडून झालेल्या मानसिक, भावनिक आणि शारीरिक अत्याचाराला बळी पडलेल्या पीडित पुरुषांना - - - - -

मनोगत

जागतिक पातळीवर स्त्रियांना सामाजिक धारणा, रूढी, प्रथा आणि बंधनातून मुक्त करण्यासाठी त्यांच्या स्वातंत्र्य व समान हक्काचा जागर केला गेला. परिणामी जागतिक साहित्यात स्त्रीवादी साहित्यप्रवाहाने स्त्रीच्या अनुभवविश्वाला, तिच्या अस्मितेला आणि तिच्या प्रश्नांना हेतुपूर्वक शब्दबद्ध केले आणि केले जात आहे. या प्रवाहामुळे स्त्रीच्या प्रश्नांविषयी व्यापक सामाजिक आणि साहित्यिक जाणीव निर्माण झाली; परंतु समाजातील बदलत्या परिस्थितीत पुरुषाच्या भावविश्वाचा, त्याच्या मानसिक संघर्षाचा, सामाजिक भूमिकेचा आणि प्रश्नांचा अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला दिसतो. ही उणीव लक्षात घेऊन प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे. 'पुरुषवाद आणि साहित्य' म्हणून पुरुषनामा, तो-ती-ते, पुरुषाच्या व्यथा, बाप : नाण्याच्या दोन बाजू, जन्मपत्र आणि बाप: द ग्रेट हिरो, या साहित्यकृतींचे विश्लेषण केलेले आहे. "ChatGPT आणि Gemini ही सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठी उपलब्ध (publicly accessible) कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित संवादात्मक साधने (AI chatbots) आहेत." याच्या माध्यमातून स्त्रीवादाच्या तुलनेत 'पुरुषवाद' (Masculinism) हे साहित्य म्हणून निर्मितीच्या बाबतीत प्रामुख्याने अधिकार (Rights), कायदे (Laws), आणि पुरुषांच्या सामाजिक समस्या (Men's Issues) याभोवतीच केंद्रित राहिले आहे. असे आढळून आलेले आहे. तेव्हा 'पुरुषवाद' (Masculinism) साहित्य चळवळ आहे का? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर खालीलप्रमाणे आले आहे,

'पुरुषवाद (Masculinism) साहित्यचळवळ आहे का?'

संक्षिप्त उत्तर : मुख्य प्रवाहातील साहित्यशास्त्रात (Literary Studies) पुरुषवादाला स्त्रीवादाप्रमाणे स्वतंत्र, प्रस्थापित साहित्यचळवळ (Literary Movement) म्हणून सामान्यतः मान्यता मिळालेली नाही.

विश्लेषण : स्त्रीवादाने सामाजिक चळवळीबरोबरच स्वतंत्र साहित्यप्रवाह, साहित्यसिद्धांत (Feminist Literary Theory) आणि स्त्रीवादी समीक्षाशास्त्र (Feminist Literary Criticism) विकसित केले. स्त्रियांच्या अनुभवविश्वावर आधारित कविता, कादंबऱ्या, आत्मकथने, नाटके आणि समीक्षेची समृद्ध परंपरा निर्माण झाली. त्यामुळे स्त्रीवाद हा सामाजिक चळवळ आणि साहित्यचळवळ या दोन्ही स्वरूपांत अभ्यासला जातो. याउलट Masculinism किंवा Men's Rights Movement यांचा विकास मुख्यतः सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय प्रश्नांच्या संदर्भात झाला. पुरुषांचे हक्क, कौटुंबिक कायदे, पालकत्व, घटस्फोट, मानसिक आरोग्य, आत्महत्या, खोटे गुन्हे, सामाजिक अपेक्षा इत्यादी विषय या विचारप्रवाहाच्या केंद्रस्थानी राहिले. या प्रवाहाने साहित्यनिर्मितीवर काही प्रमाणात प्रभाव टाकला असला, तरी त्यातून स्त्रीवादाप्रमाणे स्वतंत्र साहित्यसिद्धांत, समीक्षापद्धती किंवा व्यापक साहित्यचळवळ विकसित झाल्याचे मुख्य प्रवाहातील साहित्यशास्त्र मानत नाही. मात्र याचा अर्थ पुरुषवादी साहित्य अस्तित्वात नाही, असा होत नाही. विविध भाषांमध्ये पुरुषांच्या अनुभवविश्व, भावनिक संघर्ष, पितृत्व, सामाजिक अपेक्षा आणि पुरुषत्वाच्या संकल्पनांवर आधारित साहित्यकृती निर्माण झाल्या आहेत.

मात्र या साहित्यकृतींनी मिळून स्वतंत्र आणि सर्वमान्य साहित्यचळवळ निर्माण केली आहे, असे म्हणणे शैक्षणिकदृष्ट्या अचूक ठरणार नाही.

संशोधनात्मक निष्कर्ष : पुरुषवाद (Masculinism) हा मुख्यतः सामाजिक-वैचारिक आणि हक्ककेंद्री विचारप्रवाह मानला जातो. त्याचा साहित्यावर प्रभाव दिसून येतो; परंतु स्त्रीवादाप्रमाणे स्वतंत्र, प्रस्थापित आणि व्यापक मान्यता प्राप्त साहित्यचळवळ म्हणून त्याची नोंद मुख्य प्रवाहातील साहित्यशास्त्रात सामान्यतः आढळत नाही.**"** अशी ही एआयकडून गुगलवर माहिती मिळालेली आहे.

'पुरुषवाद आणि साहित्य' हा ग्रंथ गुगलवरील माहिती, एआय आणि इतर शैक्षणिक साहित्य तसेच संदर्भ साधने वापरून हा सैद्धांतिक शोध-ग्रंथ तयार केलेला आहे. त्याचे मुख्य दोन कारणे होती. कोरोना काळात 'पत्नीकडून पतीची झालेली घुसमट व त्याची हतबलता' आणि दुसरे म्हणजे 'त्याच काळात पुरुष हक्क चळवळींच्या बातम्या' यांमुळे हा विषय डोक्यात घर करून होता. त्यातून ही सर्व साहित्यनिर्मिती झालेली आहे. हा अभिनव ग्रंथ साकार करून त्याला अंतिम रूप प्राप्त होण्यासाठी पाच-सहा वर्ष लागलेली आहेत. कारण त्याची संकल्पना व त्याचे आतील मुद्दे सहज जुळत नव्हते.

या ग्रंथातील 'पुरुषवाद' ही संकल्पना कोणत्याही प्रकारे स्त्रीवादाला विरोध करणारी किंवा पुरुषश्रेष्ठत्वाचा पुरस्कार करणारी नाही. उलट स्त्री-पुरुष समानता, परस्पर आदर, संवाद, सहजीवन आणि मानवी

प्रतिष्ठा या मूल्यांच्या आधारावर पुरुषाच्या अनुभवविश्वाचा चिकित्सक अभ्यास करण्याचा हा प्रयत्न आहे.

त्याचे असे झाले की, कोरोना काळात लॉकडाऊनमुळे घरात थांबावे लागले. त्यावेळी पती आणि पत्नी यांचा चोवीस तासातील सहवास एकमेकांचे उणेदुणे हुडकून काढण्यास पुरेसा ठरला. त्यातून कौटुंबिक हिंसाचार घडत गेले. याबाबत स्त्रियांवर अधिक अत्याचार झाले, असे जागतिक आकडेवारी दर्शवित असली, तरी स्वतःचे दुःख बोलून न दाखविणाऱ्या पुरुषाची शारिरीक, मानसिक व भावनिक घुसमट कोणी लक्षात घेतलेली नाही आणि त्याने ती कोणाला सांगितलीही नाही. त्यामुळे मित्रमंडळी, स्वानुभव आणि समाजमाध्यमांवरील बातम्या, हे पाहता, केवळ स्त्रीवर अत्याचार होत नाही, तर पुरुषांवरही होतात. त्याची कारणे अनेक असतात, हे लक्षात आले. तेव्हापासून मराठी साहित्यात स्त्रीवाद आहे तर पुरुषावादही तयार होऊ शकतो. हे जाणवले आणि विचारमंथन सुरु झाले.

त्या काळात घराबाहेर पडू न शकणाऱ्या मध्यमवर्गीय नोकरदार पुरुषालाही भावना आहेत, मानसिक वेदना आहेत, सामाजिक अपेक्षांचे ओझे आहे, नातेसंबंधांतील गुंतागुंत आहे आणि सतत बदलणाऱ्या सामाजिक वास्तवाशी संघर्ष करावा लागतो, याचा विचार कोणी करत असल्याचे दिसून आले नाही. त्याच्याकडे केवळ 'तो जबाबदार पुरुष आहे आणि त्याने जे काय जबाबदारीची कामे करायची, ती करावी आणि कुटूंब व समाज सुरक्षित ठेवायचे. ही समाजाची अपेक्षा वाटत होती. त्याच्या मनाचा विचार फारसे कोणी करत नव्हते. त्यात आतले आणि बाहेरचेही

होते. अशावेळी 'पुरुषवाद' ही संकल्पना डोक्यात शिरली आणि आज ती या ग्रंथरूपाने साकार होत आहे. त्यानिमित्ताने आलेल्या अनुभवांना साहित्याच्या माध्यमातून समजून घेणे, हा या ग्रंथाचा मूलभूत उद्देश आहे.

या पुस्तकात प्रातिनिधिक स्वरुपात जागतिक साहित्य आणि मराठीतील विविध साहित्यप्रवाहांमधील पुरुषप्रतिमांचा परिचय करून देण्यात आला आहे. युरोप, पाश्चिमात्य आणि भारतीय साहित्य तसेच ग्रामीण, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त आणि नागरी/महानगरीय साहित्यप्रवाहांतील पुरुषप्रतिमांचे सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक स्वरूप अभ्यासताना प्रत्येक साहित्यप्रवाहाने पुरुषाचे वेगळे वास्तव उलगडले आहे, हे स्पष्ट होते. याचबरोबर पुरुषनामा, तो-ती-ते, पुरुषाच्या व्यथा, बाप : नाण्याच्या दोन बाजू, जन्मपत्र आणि बाप: द ग्रेट हिरो, या साहित्यकृतींच्या माध्यमातून समकालीन मराठी साहित्यातील पुरुषवादी विचारांची स्वतंत्र मांडणी करण्यात आलेली आहे.

कोणत्याही लिंगाच्या बाजूने पूर्वग्रह न ठेवता साहित्यकृतींचे वस्तुनिष्ठ, चिकित्सक आणि संशोधनाधारित विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या ग्रंथातील 'पुरुषवाद' हा संघर्षाचा नव्हे, तर संवादाचा; वर्चस्वाचा नव्हे, तर समतेचा; अधिकाराचा नव्हे, तर जबाबदारीचा आहे. तसेच विभाजनाचा नव्हे, तर सहजीवनाचा विचार मांडणारा आहे. हा ग्रंथ संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक आणि मराठी साहित्याचा अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे. या ग्रंथाच्या निर्मितीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व अभ्यासक, मित्रपरिवार आणि कुटुंबीयांविषयी मी मनःपूर्वक कृतज्ञता

व्यक्त करतो. या ग्रंथातील काही मर्यादा असू शकतात; त्या वाचकांनी समजून घेऊन विधायक सूचना कराव्यात, ही नम्र अपेक्षा. आणि श्री सुनीळ सामंत आणि त्यांची ई-साहित्य प्रतिष्ठानची टीम, याचे विशेष आभार मानतो.

डॉ. मनोहर सुरवाडे

*** *** ***

अनुक्रमणिका

भाग-१ : स्त्री आणि पुरुष

अ - स्त्री-पुरुष जैविक भेद आणि लिंगभाव

१. स्त्री-पुरुष जैविक भेद आणि लिंगभाव

• स्त्रीची शरीररचना

• पुरुषाची शरीररचना

२. पुरुष आणि स्त्री शरीररचनेतील साम्य आणि भेद

३.स्त्री-पुरुष प्रजनन, फलन आणि लिंगनिश्चिती

४.स्त्री-पुरुष सामाजिक भेद आणि लिंगभाव

५.स्त्री-पुरुष : लिंगभाव आणि सामाजिक दृष्टिकोन

६.लिंगभाव समानता

७.लिंग(Sex) आणि लिंगभाव(Gender) यांतील सामाजिक भिन्नता

ब-मानवाच्या सहजप्रवृत्ती आणि स्त्री-पुरुष स्वभाव-गुण

१. मानवाच्या सहजप्रवृत्ती

२. स्त्रीचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

३. पुरुषाचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

क – स्त्री-पुरुष नातेसंबंध

१.नातेसंबंधाची संकल्पना

२.स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे स्वरूप

३.स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे प्रकार

४.नातेसंबंधातील मानसशास्त्रीय पैलू

५.नातेसंबंधातील संवादाचे महत्त्व

६.विश्वास, आदर आणि समर्पण

७.आधुनिक काळातील स्त्री-पुरुष नातेसंबंध

८.सोशल मीडियाचा प्रभाव

९.भारतीय समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंध

१०.स्त्री-पुरुष समानता आणि नातेसंबंध

११.नातेसंबंधातील समस्या आणि आव्हाने

१२.निरोगी नातेसंबंधासाठी आवश्यक घटक

१३.स्त्री-पुरुष नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी उपाय

भाग – २ : स्त्रीवाद आणि साहित्य

अ - पितृसत्ता व स्त्रीचे दुय्यम स्थान

ब. स्त्रीवाद : संकल्पना व स्वरूप

१.पाश्चात्त्य तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

२.भारतीय तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

३.मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी केलेल्या स्त्रीवादाच्या व्याख्या

४.स्त्रीवादाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये

क - स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

१.पाश्चात्त्य स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

२.भारतातील स्त्रीवादी चळवळ व भूमिका

३.१९६० नंतर भारतातील स्त्रीवादी चळवळ

४.महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची भूमिका

ड - स्त्रीवादी साहित्य

१.पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्य

२.भारतीय स्त्रीवादी साहित्य

३.मराठीतील स्त्रीवादी साहित्य

भाग-३ : पुरुषहक्क चळवळ, पुरुषवाद आणि साहित्य

अ. पितृसत्ताक समाजात पुरुषाचे स्थान

ब. स्त्रियांकडून पुरुषांवर होणारे अन्याय-अत्याचार

क. पुरुषवादी-पुरुषहक्क चळवळ

ड. पुरुषवाद : संकल्पना, स्वरूप आणि भूमिका

इ. पाश्च्यात व भारतीय साहित्यातील पुरुषप्रतिमा

फ. मराठी साहित्यातील पुरुषप्रतिमा

ज. पुरुषवादी दृष्टिकोण आणि साहित्यनिर्मिती

- **संदर्भस्त्रोत**

*** *** ***

भाग-१ : स्त्री आणि पुरुष

अ - स्त्री-पुरुष जैविक भेद आणि लिंगभाव

१. स्त्री-पुरुष जैविक भेद आणि लिंगभाव

• स्त्रीची शरीररचना

• पुरुषाची शरीररचना

२.पुरुष आणि स्त्री शरीररचनेतील साम्य आणि भेद

३.स्त्री-पुरुष प्रजनन, फलन आणि लिंगनिश्चिती

४.स्त्री-पुरुष सामाजिक भेद आणि लिंगभाव

५.स्त्री-पुरुष : लिंगभाव आणि सामाजिक दृष्टिकोन

६.लिंगभाव समानता

७.लिंग(Sex) आणि लिंगभाव (Gender) यांतील सामाजिक भिन्नता

ब – मानवाच्या सहजप्रवृत्ती आणि स्त्री-पुरुष स्वभाव-गुण

१. मानवाच्या सहजप्रवृत्ती

२. स्त्रीचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

३. पुरुषाचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

क – स्त्री-पुरुष नातेसंबंध

१.नातेसंबंधाची संकल्पना

२. स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे स्वरूप

३.स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे प्रकार

४.नातेसंबंधातील मानसशास्त्रीय पैलू

५.नातेसंबंधातील संवादाचे महत्त्व

६.विश्वास, आदर आणि समर्पण

७.आधुनिक काळातील स्त्री-पुरुष नातेसंबंध

८.सोशल मीडियाचा प्रभाव

९.भारतीय समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंध

१०.स्त्री-पुरुष समानता आणि नातेसंबंध

११.नातेसंबंधातील समस्या आणि आव्हाने

१२.निरोगी नातेसंबंधासाठी आवश्यक घटक

१३. स्त्री-पुरुष नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी उपाय

*** *** ***

अ - स्त्री-पुरुष जैविक भेद आणि लिंगभाव

स्त्री आणि पुरुष हे प्रथम इतर प्राण्यांप्रमाणे जैविक घटक असून, नैसर्गिकरित्या त्यांना मानवप्राणी म्हणून संबोधले जाते. ते नर व मादी म्हणून शारीरिकदृष्ट्या भिन्न आहेत. यात लिंग, प्रजनन, हार्मोन्स आणि जैविक कार्य यांत फरक आहे. ते जन्मतः शरीरातील गुणधर्मांवर आधारित असून, स्त्री किंवा पुरुष हे जैविक लिंग गुणसूत्रे (Chromosomes), प्रजनन अवयव (Reproductive Organs) आणि हार्मोन्स (Hormones) या गोष्टींवर ठरते. स्त्रीच्या शरीरात XX गुणसूत्रे, तर पुरुषामध्ये XY गुणसूत्रे असतात. मानवी शरीरात त्याच्या २३ जोड्या असतात. गर्भधारणेच्या वेळी पुरुषाचे शुक्राणू स्त्रीच्या अंडाणूसोबत मिळाले, तर गर्भधारणा होते. मात्र, मुलगा की मुलगी अशी गर्भाची लिंगनिश्चिती स्त्री-पुरुष यांना करता येत नाही. कारण लिंगनिर्धारण हे नैसर्गिक असून ते XX आणि XY या गुणसूत्रांच्या जोडीवर अवलंबून असते. मुलगा की मुलगी हे त्यावरून ठरते. हा लिंगभेद जैविक किंवा नैसर्गिक ठरतो.

१- स्त्री पुरुष जैविक-भेद

मानवी समाजाची रचना स्त्री आणि पुरुष या दोन प्रमुख जैविक लिंगांवर आधारित आहे. स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये अनेक बाबतींत साम्य असले तरी त्यांच्या शरीररचना, प्रजनन संस्था, संप्रेरके (हार्मोन्स), गुणसूत्रे आणि शारीरिक कार्यपद्धती यांमध्ये काही जैविक भेद आढळतात. हे भेद निसर्गनिर्मित असून प्रामुख्याने प्रजनन प्रक्रिया आणि शारीरिक विकासाशी संबंधित असतात. या जैविक वैशिष्ट्यांमुळे स्त्री आणि पुरुष यांच्या

शारीरिक क्षमता, वाढीचा वेग, संप्रेरकांचे कार्य तसेच काही आरोग्यविषयक बाबींमध्ये फरक दिसून येतो. मात्र हे जैविक भेद व्यक्तीच्या बुद्धिमत्ता, क्षमता किंवा सामाजिक मूल्य ठरवत नाहीत. त्यामुळे स्त्री-पुरुष जैविक भेदांचा अभ्यास वैज्ञानिक दृष्टिकोनातून करून त्यामागील नैसर्गिक कारणे समजून घेणे आवश्यक आहे.

• स्त्रीची शरीररचना

स्त्रीलिंग ही केवळ सामाजिक संकल्पना नसून ती आनुवंशिक, जैविक, हार्मोनल आणि प्रजननदृष्ट्या महत्त्वाची प्रणाली आहे; म्हणून मानवी जीवनाच्या सातत्यासाठी स्त्रीची भूमिका ही मूलभूत ठरते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून ज्या व्यक्तीमध्ये XX गुणसूत्रे (Chromosomes) असतात, त्या व्यक्तीला जैविकदृष्ट्या स्त्री मानले जाते. स्त्रीच्या श्रोणीप्रदेशात (Pelvic Cavity), म्हणजे कंबरेच्या खाली, पोटाच्या खालच्या भागात, दोन्ही पायांच्या मधोमध उदराच्या पोकळीत, गर्भाशय (Uterus), अंडाशय (Ovaries), फलोपियन ट्यूब (Fallopian Tubes) आणि मूत्राशय (Urinary Bladder) हे अवयव असतात. त्यामुळे त्या व्यक्तीला जैविकदृष्ट्या स्त्री म्हणतात.

स्त्रीच्या ठिकाणी असलेले Ovaries, म्हणजे अंडाशय, हे स्त्रीच्या प्रजनन संस्थेतील अत्यंत महत्त्वाचे अवयव असून स्त्रीच्या शरीरात साधारणपणे दोन अंडाशय असतात. ते अंडाणू स्त्री हार्मोन्स तयार करतात. प्रजनन प्रक्रियेत त्यांची महत्त्वाची भूमिका असते. स्त्री किशोरावस्थेत, वयात आल्यानंतर दर महिन्याला एक अंडाणू विकसित होते. मासिक

पाळीच्या चक्रात साधारण १४ व्या दिवशी अंडाणू बाहेर पडते. त्याचबरोबर अंडाशय इस्ट्रोजेन (Estrogen) आणि प्रोजेस्टेरॉन (Progesterone) हे महत्त्वाचे हार्मोन्स तयार करतात. इस्ट्रोजेनमुळे स्त्रीसदृश शरीररचना निर्माण होते. स्तनांची वाढ होते. मासिक पाळी नियंत्रित राहते. हाडे मजबूत राहतात. प्रोजेस्टेरॉनमुळे गर्भधारणेस मदत तर होतेच; तसेच गर्भ टिकवून ठेवणे आणि गर्भाशयाची तयारी करणे यासाठी त्याचे कार्य महत्त्वाचे ठरते.

स्त्रीच्या अंडाशयातून परिपक्व अंडाणू बाहेर पडल्यानंतर पुरुषाचा शुक्राणू अंडाणूला भेटला, तर फलन (Fertilization) होऊन गर्भधारणा सुरू होते. जर फलन झाले नाही, तर हार्मोन्सचे प्रमाण कमी होते, गर्भाशयाचे आवरण बाहेर पडते आणि मासिक पाळी येते. स्त्रीच्या शरीरातील हे चक्र विशिष्ट वयापर्यंत चालूच असते. साधारणतः ४५–५० वर्षांनंतर स्त्रीला रजोनिवृत्ती (Menopause) होते. त्यावेळी अंडाशय अंडाणू तयार करणे थांबवतात. हार्मोन्सचे प्रमाण कमी होते. अर्थातच स्त्रीच्या शरीरातील अंडाशय हे प्रजनन, हार्मोन संतुलन, मासिक पाळी आणि गर्भधारणा यांसाठी अत्यंत महत्त्वाचे अवयव आहे. ते स्त्रीच्या संपूर्ण आरोग्यावर मोठा प्रभाव टाकतात. पुरुषाच्या ठिकाणी अशा काही गोष्टी नसतात. त्यामुळे तो स्त्रीपेक्षा जैविकदृष्ट्या वेगळा ठरतो. स्त्रीची शरीररचनाही पुरुषापेक्षा वेगळी असते.

स्त्रीची शरीररचना मुख्यतः दोन भागांत विभागली जाते. पहिल्या भागात मोठी ओष्ठे ही बाहेरील त्वचेच्या घड्या असून संरक्षणाचे काम करतात. लहान ओष्ठे या आतील नाजूक घड्या असतात. भगांकुर हा स्त्रीच्या जननेंद्रियाचा अतिशय संवेदनशील भाग असून तो लैंगिक

आनंदाशी संबंधित असतो. योनीमुख हे योनीचे प्रवेशद्वार आणि मूत्रमार्गाचे उघडणे ही बाह्य जननेंद्रिये असून त्यांना एकत्रितपणे वल्वा (Vulva) म्हणतात. याचबरोबर गर्भाशय हे बाळाच्या वाढीचे प्रमुख स्थान असते. योनी ही गर्भाशयाला बाहेरील भागाशी जोडणारी नळी असते. मासिक पाळी, संभोग आणि प्रसूतीमध्ये तिची महत्त्वाची भूमिका असते. अंडाशय या दोन लहान ग्रंथी असून त्या अंडी तसेच इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन हे हार्मोन्स निर्माण करतात. फलोपियन नलिका या अंडाशयातून अंडे गर्भाशयापर्यंत नेतात. गर्भधारणा सहसा याच ठिकाणी सुरू होते. स्तन हे दूध निर्मितीसाठी महत्त्वाचे अवयव असून प्रसूतीनंतर बाळाला स्तनपान करण्यासाठी त्यांचा उपयोग होतो. अशी ही स्त्रीची अंतर्गत जननेंद्रिये आहेत. अशाप्रकारे स्त्रीची जैविक रचना शारीरिक आणि प्रजननाशी संबंधित असल्याचे दिसून येते.

संभोगादरम्यान जर पुरुषाच्या शुक्राणूंचा स्त्रीच्या अंड्याशी संपर्क आला, तर शुक्राणू अंड्यामध्ये प्रवेश करून त्याच्याशी एकरूप होतात आणि त्याचे फलन करतात. हे फलन सहसा अंडवाहिनीमध्ये होते; परंतु ते गर्भाशयातही होऊ शकते. त्यानंतर युग्मज (Zygote) स्वतःला गर्भाशयाच्या भिंतीमध्ये स्थापित करतो, जिथे भ्रूणजनन आणि आकारजनन या प्रक्रिया सुरू होतात. गर्भाशयाच्या बाहेर जगण्यासाठी पुरेसा विकास झाल्यावर गर्भाशयग्रीवा प्रसरण पावते आणि गर्भाशयाच्या आकुंचनामुळे गर्भ जन्ममार्गातून (योनीमार्गातून) बाहेर ढकलला जातो. स्त्री अर्भकाच्या जन्मापासूनच स्त्रीबीजे तयार झालेली असतात आणि ती शुक्राणूंपेक्षा आकाराने मोठी असतात. साधारणपणे दर महिन्याला अंडजनन या प्रक्रियेद्वारे एक स्त्रीबीज परिपक्व होते आणि फलनाच्या

अपेक्षेने ते अंडाशयातून फलोपियन नलिकेमध्ये पाठवले जाते. जर फलन झाले नाही, तर ते स्त्रीबीज मासिक पाळीद्वारे शरीराबाहेर टाकले जाते.

एकूणच शरीररचनाशास्त्रानुसार स्त्रीच्या प्रजनन संस्थेत अंतर्गत आणि बाह्य असे दोन प्रकारचे अवयव असतात. अंतर्गत प्रजनन अवयवांमध्ये योनी, गर्भाशय, गर्भाशयग्रीवा, फलोपियन नलिका (अंडवाहिन्या) आणि अंडाशय यांचा समावेश होतो. बाह्य जननेंद्रियांमध्ये जननेंद्रियावरील मांसल भाग, योनीची बाह्य फट, बाहेरील व आतील त्वचेच्या घड्या, ओलावा निर्माण करणाऱ्या ग्रंथी आणि स्पर्शसंवेदनांसाठी महत्त्वाचा असलेला क्लिटोरिस यांचा समावेश होतो. ही प्रजनन संस्था केवळ स्त्रीमध्ये आढळते आणि पुरुषामध्ये नसते. स्त्रीच्या शरीरात बीजांडनिर्मिती, मासिक पाळी, गर्भधारणा, गर्भाची वाढ आणि बाळाचा जन्म यांसारख्या महत्त्वाच्या जैविक प्रक्रिया या संस्थेमुळे पार पडतात. त्यामुळे स्त्रीची प्रजनन संस्था ही तिच्या शरीरातील अत्यंत महत्त्वाची आणि वैशिष्ट्यपूर्ण जैविक व्यवस्था मानली जाते.

- **पुरुषाची शरीररचना**

पुरुषाची शरीररचना ही विविध संस्था व अवयवांच्या समन्वयातून बनलेली अत्यंत गुंतागुंतीची व कार्यक्षम व्यवस्था आहे. प्रत्येक संस्था शरीराच्या आरोग्यासाठी आणि जीवनक्रियांसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. पुरुषाच्या शरीराची बाह्य संरचना त्वचा, स्नायू व शरीराचे प्रमाण, चेहरा, मान, छाती, हात व पाय अशी असून स्त्रीलाही हेच अवयव असतात; मात्र दिसण्यात फरक असतो. याशिवाय कवटी, बरगड्या, मणक्याचा

कणा, हात-पायांची हाडे आणि श्रोणी, अशी पुरुषाच्या शरीरातील हाडांची रचना म्हणजे अस्थिसंस्था होय. शरीरातील प्रमुख स्नायू, त्यांचे कार्य तसेच हात, पाय, छाती व पोटातील स्नायूंची रचना या स्नायुसंस्थेचा भाग आहेत. स्नायू शरीराला शक्ती आणि हालचाल देतात. सक्षमतेच्या प्रमाणात स्त्री व पुरुष यांच्यात काही फरक असला, तरी स्नायुसंस्था दोघांमध्येही कार्यरत असते. हृदयाची रचना, रक्तवाहिन्या, धमन्या, शिरा आणि रक्ताभिसरण व्यवस्था स्त्रीमध्येही असते. रक्ताभिसरण संस्था तसेच श्वसनसंस्था, ही प्रणाली दोघांमध्येही सारख्याच प्रकारे कार्य करते. तोंड, अन्ननलिका, जठर, यकृत आणि आतडी यांच्या साहाय्याने अन्नपचनाची प्रक्रिया स्त्री व पुरुष दोघांमध्येही होते. मेंदू, मज्जारज्जू आणि चेतातंतू यांपासून बनलेली मज्जासंस्था शरीराचे नियंत्रण आणि संदेशवहन करण्याचे कार्य करते. ही संस्थाही दोघांमध्ये असते. मात्र, स्त्री आणि पुरुष यांच्यातील मुख्य फरक प्रजनन संस्थेमध्ये आढळतो.

पुरुषाच्या प्रजनन संस्थेत लिंग, वृषण, शुक्रवाहिन्या, प्रोस्टेट ग्रंथी आणि मूत्रमार्ग यांचा समावेश होतो. ही रचना स्त्रीच्या प्रजनन संस्थेपेक्षा वेगळी आहे. शुक्राणूंची निर्मिती, वीर्यनिर्मिती आणि प्रजनन प्रक्रिया ही तिची प्रमुख कार्ये आहेत. पुरुषाचे वृषण हे दोन अंडाकृती अवयव असून ते शरीराच्या बाहेर असलेल्या अंडकोशात असतात. ते शुक्राणू आणि टेस्टोस्टेरॉन हे हार्मोन तयार करतात. दाढी-मिशीची वाढ, आवाज जाड होणे, स्नायूंची वाढ आणि लैंगिक परिपक्वता यांसाठी टेस्टोस्टेरॉन हे महत्त्वाचे हार्मोन आहे.

पुरुषामध्ये अंडकोश ही त्वचेची पिशवीसारखी रचना असते. ती वृषणांचे संरक्षण करते आणि शुक्राणूंच्या निर्मितीसाठी आवश्यक तापमान नियंत्रित ठेवते. एपिडिडायमिस (Epididymis) ही वृषणाच्या मागील बाजूस असलेली वेटोळ्यासारखी नळी असून येथे शुक्राणू परिपक्व होतात व साठवले जातात. एपिडिडायमिसमधून शुक्राणूंना पुढे नेणारी नळी म्हणजे शुक्राणूवाहिनी होय. ती शुक्राणूंना मूत्रमार्गापर्यंत पोहोचवते. वीर्यकोश या ग्रंथी शुक्राणूंना ऊर्जा देणारा द्रव तयार करतात. या द्रवात फ्रक्टोज ही साखर असते. हा द्रव वीर्याचा मोठा भाग बनवतो. प्रोस्टेट ग्रंथी ही मूत्राशयाखाली असलेली ग्रंथी असून ती वीर्यामध्ये क्षारीय द्रव मिसळते. हा द्रव शुक्राणूंना संरक्षण देतो आणि त्यांच्या हालचालीस मदत करतो. बल्बोयूरेथ्रल ग्रंथी चिकट द्रव तयार करते. मूत्रमार्गातील आम्लता कमी करते. शुक्राणूंचे संरक्षण करते. मूत्रमार्ग म्हणजे मूत्र व वीर्य बाहेर नेणारी एक नळी असते. पुरुषांमध्ये मूत्र व प्रजनन दोन्ही कार्यासाठी ती वापरली जाते. लिंग बाह्य प्रजनन अवयव असून वीर्य स्त्रीच्या शरीरात पोहोचवण्याचे कार्य करते. मूत्र विसर्जनासाठीही उपयोग होतो.

शुक्राणू निर्मिती प्रक्रिया शुक्रजनक पेशी, प्राथमिक शुक्रपेशी, द्वितीयक शुक्रपेशी, शुक्रकणिका आणि शुक्राणू अशा क्रमाने पुरुषाच्या वृषणात होते. तेथे लाखो शुक्राणू सतत तयार होतात. प्रत्येक शुक्राणूमध्ये डोके, मध्यभाग व शेपटी असते. स्त्रीच्या अंडपेशीशी संयोग करून गर्भधारणा घडवणे हे शुक्राणूचे कार्य असते. शुक्राणू आणि विविध ग्रंथींचे द्रव म्हणजे वीर्य, हा महत्वाचा घटक पुरुषामध्ये असतो. त्याच्यामुळे शुक्राणूंना पोषण आणि संरक्षणविषयी हालचाल मिळते. एकूणच शुक्राणू निर्मिती, टेस्टोस्टेरॉन हार्मोन निर्माण, शुक्राणूंचे साठवण व वहन अशा

पद्धतीने प्रजनन प्रक्रिया पूर्ण करणे, पुरुष लैंगिक वैशिष्ट्ये विकसित करणे, हे पुरुष प्रजनन संस्थेची महत्त्वाची कार्ये आहेत. ती स्त्रीप्रजननपेक्षा भिन्न आहेत.

अशाप्रकारे स्त्री आणि पुरुष यांच्या जैविक रचनेचा अभ्यास केल्यानंतर त्यातील साम्य आणि भेद आढळून आलेले आहे. शारिरीक दृष्टीने दोघांमध्ये बरीच समानता आढळत असली तरी प्रजनन संस्थेच्या बाबतीत मात्र भिन्नता आहे. त्यासाठी त्यांच्यात नैसर्गिकरीतीने भिन्न अवयवाची निर्मिती झालेली आहे. त्याबाबत समाजाने लींगभावभेद निर्माण केलेला आहे.

२- पुरुष आणि स्त्री शरीररचनेतील साम्य आणि भेद

पुरुष आणि स्त्री यांच्या शरीरात बहुतेक अवयव व मूलभूत शरीरक्रिया समान असतातमात्र . प्रजनन अवयव, श्रोणीची रचना, स्नायूंचे प्रमाण आणि काही द्वितीयक लैंगिक लक्षणे यांमध्ये फरक आढळतो.

अ - पुरुष आणि स्त्री शरीररचनेतील साम्य

क्र.	घटक	पुरुष	स्त्री	साम्य
१	शरीराची रचना	कणखर स्नायूयुक्त	शरीर तुलनेने मृदू व चरबीचे प्रमाण अधिक	दोघांकडे हाडे, स्नायू व अवयव असतात

२	उंची	सरासरी अधिक उंच	सरासरी कमी उंच	दोघांची वाढ हार्मोन्सवर अवलंबून
३	वजन	स्नायूंमुळे वजन अधिक	चरबीमुळे वजन वेगळ्या प्रकारे वितरित	दोघांचे वजन आहार व जीवनशैलीवर अवलंबून
४	हाडांची रचना	खांदे रुंद	श्रोणी Pelvis) रुंद	२०६ हाडांची अस्थीसंस्था
५	स्नायू	स्नायूंची ताकद अधिक	स्नायू तुलनेने कमी विकसित	स्नायू हालचालीस मदत करतात.
६	त्वचा	जाड व खडबडीत	मऊ व पातळ	त्वचा शरीराचे संरक्षण करते.
७	आवाज	घोगरा व जाड	बारीक व मधुर	स्वरयंत्र दोघांकडेही असते.
८	हार्मोन्स	टेस्टोस्टेरॉन अधिक	इस्ट्रोजेन व प्रोजेस्टेरॉन अधिक	अंतःस्रावी संस्था दोघांमध्येही असते.

९	प्रजनन अवयव	वृषण, लिंग	गर्भाशय, अंडाशय, योनी	प्रजनन संस्था दोघांमध्येही असते.
१०	प्रजनन पेशी	शुक्राणू तयार होतात	अंडपेशी तयार होतात	संततीनिर्मितीच्या प्रक्रियेत सहभाग असतो.
११	छाती	सपाट	स्तन विकसित	हृदय व फुप्फुसे दोघांमध्येही असतात.
१२	रक्ताभिसरण	हृदयाचे कार्य समान	हृदयाचे कार्य समान	रक्ताभिसरण संस्था सारखी असते.
१३	श्वसनक्रिया	फुप्फुसांद्वारे श्वसन	फुप्फुसांद्वारे श्वसन	श्वसनसंस्था समान असते.
१४	मेंदू व मज्जासंस्था	कार्यपद्धती समान	कार्यपद्धती समान	विचार, स्मरण आणि नियंत्रण दोघांमध्येही असते.
१५	आयुर्मान	तुलनेने कमी	तुलनेने जास्त	आरोग्यावर जीवनशैलीचा प्रभाव असतो.

ब- स्त्री आणि पुरुष यांच्या शरीररचनेतील प्रमुख भेद

क्र.	वैशिष्ट्य	पुरुष	स्त्री
१	जनन अवयव	वृषण, लिंग	अंडाशय योनी ,गर्भाशय ,
२	गुणसूत्रे	XY	XX
३	शरीररचना	उंच, स्नायूंची अधिक वाढ	तुलनेने कमी उंची, चरबीचे प्रमाण अधिक
४	खांदे व कंबर	खांदे रुंद, कंबर अरुंद	खांदे अरुंद, कंबर रुंद
५	केसांची वाढ	दाढी मिशा-येतात, शरीरावर केस अधिक	दाढीमिशा नसतात-, शरीरावर केस तुलनेने कमी
६	स्तन	विकसित नसतात	विकसित असतात दूध) (निर्मितीसाठी
७	हार्मोन्स	टेस्टोस्टेरॉन अधिक	इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन अधिक
८	प्रजनन क्षमता	शुक्राणू निर्माण करतात	अंडपेशी निर्माण करतात व गर्भधारणा करू शकतात
९	श्रोणी	अरुंद	रुंद (प्रसूतीसाठी अनुकूल)

अशाप्रकारे स्त्री आणि पुरुष यांच्या शरीररचनेत अनेक साम्य-भेद आढळतात. दोघांच्या शरीरातील हृदय, मेंदू, फुफ्फुसे, मूत्रपिंडे,

पचनसंस्था, रक्ताभिसरण संस्था यांसारख्या मूलभूत जैविक व्यवस्था सारख्याच असतात. मात्र, प्रजनन संस्था, संप्रेरके (हार्मोन्स), स्नायूंची रचना, शरीराची ठेवण आणि काही शारीरिक वैशिष्ट्यांमध्ये महत्त्वाचे फरक दिसून येतात. हे भेद प्रामुख्याने प्रजननाशी संबंधित जैविक कार्ये आणि संप्रेरकांच्या परिणामांमुळे निर्माण होतात. स्त्री आणि पुरुष यांच्या शरीररचनेतील प्रमुख भेद पुढीलप्रमाणे आहेत. हे भेद नैसर्गिक असून त्याकडे नंतर लिंगाभावदृष्टीने पाहिले गेले आहे.

३- स्त्री-पुरुष प्रजनन, फलन आणि लिंगनिश्चिती

स्त्री-पुरुष प्रजनन, फलन आणि लिंगनिश्चिती ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. मानवी जीवनाची निरंतरता टिकवून ठेवण्यासाठी प्रजनन ही प्रक्रिया अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येक सजीव आपल्या सारख्याच नवीन सजीवाला जन्म देतो. मानवामध्ये ही प्रक्रिया स्त्री आणि पुरुष यांच्या प्रजनन संस्थांद्वारे पार पडते. पुरुषाच्या शरीरात वृषण हे मुख्य प्रजनन अवयव असतात. येथे शुक्राणू तयार होतात. तसेच टेस्टोस्टेरॉन हा हार्मोन निर्माण होतो. शुक्राणूंना वीर्यद्रवामध्ये मिसळून स्त्रीच्या शरीरात पाठवले जाते. स्त्रीमध्ये अंडाशय हे मुख्य प्रजनन अवयव असतात. येथे अंडाणू तयार होतात. दर महिन्याला एक परिपक्व अंडाणू अंडवाहिनीत सोडले जाते. स्त्रीचे गर्भाशय हे गर्भाच्या वाढीसाठी सुरक्षित स्थान असते. तेथे फलन प्रक्रिया घडून आल्यावर शुक्राणू आणि अंडाणू यांचा संयोग होतो. ही प्रक्रिया साधारणपणे अंडवाहिनीत घडते. फलनानंतर युग्मज तयार होतो आणि त्यापासून भ्रूणाची निर्मिती होते. पुढे हा भ्रूण गर्भाशयात वाढत जाऊन बाळ तयार होते.

बाळाचे लिंग गुणसूत्रांद्वारे ठरते. स्त्रीमध्ये XX, तर पुरुषामध्ये XY अशी लिंगगुणसूत्रे असतात. स्त्रीच्या अंडाणूमध्ये नेहमी X गुणसूत्र असते, तर शुक्राणूमध्ये X किंवा Y गुणसूत्र असू शकते. जर X गुणसूत्र असलेला शुक्राणू अंडाणूसोबत संयोग करेल, तर XX तयार होऊन मुलगी जन्माला येते आणि Y गुणसूत्र असलेला शुक्राणू अंडाणूसोबत संयोग करेल, तर XY तयार होऊन मुलगा जन्माला येतो. अर्थातच X + X → XX (मुलगी) आणि X + Y → XY (मुलगा) यावरून हे स्पष्ट होते की, बाळाचे लिंग हे पुरुषाच्या शुक्राणूमधील X किंवा Y गुणसूत्रावर अवलंबून असते. त्यामध्ये आतापर्यंत विज्ञानाला बदल करता आलेला नाही. त्यामुळे मुलगा किंवा मुलगी होणे हे केवळ पुरुषाच्या गुणसूत्रांवर अवलंबून असते; म्हणूनच मुलीच जन्माला आल्या म्हणून स्त्रीला दोषी ठरविता येत नाही. तसेच मुलगा व्हावा म्हणून कोणतीही शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध उपाययोजना उपलब्ध नाही. कारण स्त्री आणि पुरुष यांच्यातील गुणसूत्रे, हार्मोन्स, प्रजनन अवयव आणि लैंगिक प्रजनन प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे.

४- स्त्री-पुरुष सामाजिक भेद आणि लिंगभाव

जगातील विविध समाजांमध्ये लिंगभेदात्मक पूर्वग्रहांमुळे महिलांच्या शरीरांवर दीर्घकाळ नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. महिलांच्या शरीराचे नैतिकीकरण हा विचार त्यामागे आहे; म्हणून महिलांच्या वर्तनाबाबत अधिक नैतिक निकष लावले जातात. अमेरिकेतील ८०५ सहभागी व्यक्तींवर करण्यात आलेल्या अभ्यासामध्ये असे आढळून आले की, "लोक महिलांच्या शरीरावरील स्वायत्ततेबद्दल (Bodily Autonomy) मत व्यक्त करताना पुरुषांच्या तुलनेत अधिक प्रमाणात

नैतिकतेचा आधार घेतात." पुरुषांच्या तुलनेत महिलांकडे लोक वेगळ्या नजरेने पाहतात, असे संशोधकांना आढळले. मात्र, शरीरस्वातंत्र्याशी संबंध नसलेल्या वर्तनांमध्ये असा फरक दिसून आला नाही. या संशोधनातून असे सूचित झाले की, समाज महिलांच्या शरीराकडे पुरुषांच्या तुलनेत अधिक 'नैतिक' चौकटीतून पाहतो. त्यामुळे महिलांच्या शरीरावरील नियंत्रण, निर्बंध किंवा सामाजिक दबाव यांना समर्थन मिळू शकते. ही मानसिकता आजही जगभर मोठ्या प्रमाणात टिकून आहे.

स्त्रियांना त्यांच्या शरीरावर पूर्ण स्वायत्तता मिळण्यास पूर्वीपासून अनेकदा नकार दिला गेला आहे. स्त्रियांना शुद्ध; परंतु कमकुवत मानले जाते आणि त्यांना पुरुषांच्या संरक्षणाची गरज आहे, असे गृहित धरले जाते. हा सौम्य स्वरूपाचा लैंगिक भेदभाव मानला आहे. स्त्रियांना कधी पवित्र, संयमी आणि म्हणून नैतिकदृष्ट्या चांगल्या, तर कधी उच्छृंखल, आकर्षक आणि म्हणून नैतिकदृष्ट्या वाईट मानले जाते. पुरुषांप्रमाणे वागण्याचे किंवा समान स्वातंत्र्य उपभोगण्याचे अधिकार त्यांना अनेकदा दिले जात नाहीत.

५- स्त्री-पुरुष : लिंगभाव आणि सामाजिक दृष्टिकोन

लिंगभावाच्या दृष्टिकोनातून इंग्रजी भाषेतील Gender आणि मराठी भाषेतील लिंगभाव या संकल्पनांचा अभ्यास केला जातो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून स्त्री आणि पुरुष यांची व्याख्या करताना सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भांचा विचार केला जातो. समाजातील स्त्री आणि पुरुष यांचे स्थान, भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चित केल्या जातात. त्यामुळे Gender म्हणजे व्यक्तीची सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक

ओळख असे समजले जाते. ही ओळख केवळ जन्मतः निश्चित झालेल्या जैविक लिंगावर आधारित नसून, व्यक्ती स्वतःला कसे ओळखते आणि समाज तिच्याकडे कसा पाहतो, यावरही अवलंबून असते. अर्थात, लिंगभाव ही संकल्पना समाजशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र आणि मानवाधिकार या सर्व क्षेत्रांमध्ये अत्यंत महत्त्वाची मानली जाते. लिंग (Sex) आणि लिंगभाव (Gender) या दोन संकल्पना परस्परांपेक्षा भिन्न आहेत. लिंग म्हणजे जैविक भिन्नता, तर लिंगभाव म्हणजे समाजाने स्त्री आणि पुरुष यांच्याविषयी निर्माण केलेल्या भूमिका, अपेक्षा, मूल्ये आणि वर्तनपद्धती होय. समाजातील स्त्री-पुरुष समानता, शिक्षण, रोजगार, राजकारण आणि सामाजिक न्याय या सर्व बाबींवर लिंगभावाचा प्रभाव दिसून येतो. आजच्या आधुनिक काळात स्त्री-पुरुष समानतेची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असली, तरीही समाजात अजूनही लिंगभेद, असमानता आणि रूढीवादी विचार आढळतात. त्यामुळे अलीकडे लिंगभाव समानतेविषयी चर्चा, कृतीसत्रे आणि कायदे करण्यात आले आहेत. त्यातून लिंग (Sex) आणि लिंगभाव (Gender) यांतील फरक स्पष्ट करून समाजात जागृती निर्माण करण्यात आली आहे.

स्त्री-पुरुष यांच्यात नैसर्गिकरीत्या शरीररचना, शरीराचा आकार, देहधर्म आणि त्या अनुषंगाने स्वभाववैशिष्ट्ये यांमध्ये फरक असतो. "जीवशास्त्रीयदृष्ट्या स्त्री-पुरुष यांच्यातील फरकास लिंगभेद (Sex Differences) आणि समाजरचित स्त्री-पुरुष यांच्यातील भेदास लिंगभावभेद (Gender Differences) असे संबोधले जाते." लिंग ही संकल्पना पूर्णपणे जीवशास्त्रावर आधारित आहे. स्त्री-पुरुष यांच्यातील

शारीरिक वेगळेपणा त्यातून दर्शविला जातो. तर स्त्री-पुरुष यांच्याविषयी समाजाने निर्माण केलेल्या भिन्न भूमिका, अपेक्षा आणि वर्तनपद्धतींसाठी लिंगभाव (Gender) ही संकल्पना वापरली जाते. "जागतिक आरोग्य संघटनेनुसार (WHO), सामाजिक रचनेवर आधारित स्त्री-पुरुष यांच्या भूमिका, वर्तन, कृत्ये आणि स्वाभाविक गुण यांमधून निर्माण झालेल्या भेदास लिंगभाव असे म्हणतात." अर्थात, लिंगभाव म्हणजे सामाजिक रचनेवर आधारित स्त्री-पुरुष यांच्यातील भेद असून त्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत-

१. लिंगभाव सामाजिक आंतरक्रियेतून निश्चित होतो.

२. लिंगभाव कुटुंब, समवयस्क गट, समाज आणि सांस्कृतिक मूल्यांच्या

प्रभावातून घडतो.

३. लिंगभाव स्थिर नसून काळानुसार बदलू शकतो.

४. लिंगभाव व्यक्तीच्या ओळखीशी संबंधित विविध प्रश्न आणि आव्हाने निर्माण करू शकतो.

५. स्त्री आणि पुरुष हे लिंग वर्गीकरण आहे, तर स्त्रीत्व आणि पुरुषत्व (Masculinity/Femininity) हे लिंगभाव (Gender) वर्गीकरण आहे.

"लिंग (Sex) ही संज्ञा स्त्री किंवा पुरुष यांच्यासंदर्भात वापरली जाते. सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या पुल्लिंग आणि स्त्रीलिंग यांना

जोडलेले विशिष्ट गुणधर्म म्हणजे लिंगभाव होय." जैविक अर्थाने लिंग ही संज्ञा पुरुषाचे जननेंद्रिय आणि स्त्रीचे जननेंद्रिय यांशी संबंधित असते. शाळा, महाविद्यालय, कार्यालय किंवा इतर प्रशासकीय फॉर्म भरताना स्त्री किंवा पुरुष हे स्पष्ट करण्यासाठी लिंग (Sex) हा शब्द वापरला जातो. सर्वसाधारणपणे सेक्स हा शब्द समागम किंवा संभोग या अर्थानेही वापरला जातो. एकूणच, लिंग (Sex) आणि लिंगभाव (Gender) यांतील फरक वरील विवेचनातून स्पष्ट होतो.

पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये कुटूंब आणि समाजामध्ये पुरुषांचे वर्चस्व असते. नियंत्रण, ताकद, क्षमता आणि स्पर्धात्मकता या गुणांच्या आधारे त्यांची ओळख निर्माण केली जाते. विकासाच्या अनेक प्रक्रियांमध्ये पुरुषाला केंद्रस्थानी मानले जाते आणि समाजाचा नियंत्रक म्हणून त्याची भूमिका अधोरेखित केली जाते. या संदर्भात मर्दानीपणा हे विशेषण वापरले जाते. निसर्गतः पुरुषांची शरीरयष्टी मजबूत, कणखर आणि दणकट असल्यामुळे ते अधिक शारीरिक श्रमाची कामे करतात, या कारणांवरून त्यांच्याशी मर्दानीपणाची संकल्पना जोडली जाते. तसे स्त्रीच्या बाबतीत बोलले जात नाही. उलट शरीररचनेचा मुद्दा पुढे करून स्त्रीला समाजात दुय्यम स्थान देण्यात आले आणि स्त्री-पुरुष भेद निर्माण करण्यात आला.

जन्माला आलेल्या बाळाच्या जननेंद्रियावरून त्याचे लिंग निश्चित केले जाते. मुलगा किंवा मुलगी यानुसार त्यांच्याविषयी वेगवेगळ्या भूमिका, गुणदोष आणि अपेक्षा समाजात निर्माण केल्या जातात. म्हणजेच जन्मापासूनच दोघांसाठी वेगवेगळ्या कृती निश्चित केल्या जातात. प्रत्येक समाज नर आणि मादी यांना हळूहळू स्त्री आणि पुरुष म्हणून घडवितो.

स्त्रीत्व आणि पुरुषत्व (बाईपणा आणि पुरुषपणा) या वेगळ्या भूमिका, गुण, हक्क, जबाबदाऱ्या, अपेक्षा आणि वर्तनपद्धती यांच्या माध्यमातून विकसित केले जातात. लिंग हे जैविक घटकांवर आधारित असते; परंतु स्त्री आणि पुरुष यांच्या लिंगभावाशी संबंधित अस्मिता मानसिक, सामाजिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटकांद्वारे घडत असतात. आजपर्यंत परंपरेने समाज त्यांच्याकडे त्याच दृष्टीने पाहत आलेला आहे.

स्त्री-पुरुष यांच्याकडे केवळ जैविक दृष्टिकोनातून न पाहता सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहिल्यामुळे त्यांच्यामध्ये लिंगभावभेद निर्माण झाला आहे. लिंग हे स्थिर असून सर्वत्र सारखे असते; ते बदलता येत नाही. मात्र, लिंगभाव काळानुसार बदलत गेलेला आहे. लिंग हे जैविक आणि नैसर्गिक असते; परंतु समाजाने स्त्री-पुरुष यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या वेगवेगळ्या प्रकारे विभागून त्यांच्याविषयी भिन्न सामाजिक अपेक्षा निर्माण केलेल्या असल्याने जन्मापासूनच त्यांच्यावर लिंगभावात्मक संस्कार केले जातात.

"मुलाने शूर, धाडसी आणि कर्तबगार असावे,असे सांगितले जाते, तर मुलींनी प्रेमळ, लाजाळू आणि घरगुती असावे," असे शिकवले जाते. प्रत्यक्षात मुलींच्या शरीरात असे कोणतेही जैविक वैशिष्ट्य नसते की, ज्यामुळे त्या मुलांप्रमाणे कपडे घालू शकत नाहीत, झाडावर चढू शकत नाहीत किंवा सायकल चालवू शकत नाहीत, असे मानले जायचे; पण आज त्या सामाजिक धारणा स्त्रियांनी चुकीच्या ठरविल्या आहेत. त्याचप्रमाणे मुलगाही घरातील स्वयंपाक, साफसफाई किंवा इतर घरकामात मदत करू शकत नाही, असे त्याच्या शरीररचनेत काहीही नसते, असे मानले जायचे;

पण आज पुरुष ती कामेही करू लागलेली आहेत. म्हणजे मुलाने अमुकच केले पाहिजे किंवा मुलीने तमुकच केले पाहिजे असे जे भेद निर्माण केले जातात, ते समाजनिर्मित असतात. म्हणजेच लिंगभाव हा नैसर्गिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचा आहे. समाजाने केलेली श्रमविभागणी हे त्याचे एक प्रमुख उदाहरण आहे. मात्र त्याकडे पाहण्याचे दृष्टिकोन बदलत गेलेले दिसतात.

आधीपासून स्त्रियांना कनिष्ठ दर्जा आणि दुय्यम स्थान देऊन स्त्री-पुरुषांमध्ये विषमता निर्माण करण्यात आली. पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांना हिंसा, अन्याय आणि अत्याचारांना सामोरे जावे लागले. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संस्थांमध्ये त्यांना मर्यादित अधिकार मिळाले. त्यांचे आर्थिक आणि सामाजिक शोषण करण्यात आले. याउलट पुरुषांना या संस्थांमध्ये अधिक संधी, अधिकार आणि रोजगार उपलब्ध झाले. स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी तयार करण्यात आलेल्या वेगवेगळ्या नियमांचा स्त्रियांच्या भवितव्यावर परिणाम झाला. त्यांची वेशभूषा वेगळी व निश्चित करण्यात आली. त्यांच्या स्वभावाची विशिष्ट गुणवैशिष्ट्ये ठरविण्यात आली. त्यामुळे स्त्रिया काळजी घेणाऱ्या, कोमल स्वभावाच्या आणि आज्ञाधारक असतात, तर पुरुष बळकट, आत्मविश्वासपूर्ण, स्पर्धात्मक आणि ताठर असतात, अशी प्रतिमा समाजात निर्माण करण्यात आली.

"पुरुष हा कुटुंबप्रमुख, मुख्य कमावता, मालमत्तेचा मालक आणि मालमत्तेसंबंधी निर्णय घेणारा मानला जातो. पुरुषाने मुख्यतः व्यापार, उद्योग, राजकारण, धर्मकारण व व्यवसाय या क्षेत्रांत कार्यरत असावे, अशी

अपेक्षा असते. तर या उलट स्त्रीने मुलांना जन्म द्यावा, त्यांचा योग्य सांभाळ करावा, त्यांच्यावर योग्य संस्कार करावेत, घरातील आबालवृद्ध व आजारी व्यक्तींची मनोभावे सेवा करावी आणि घरातील इतर कामे चोखपणे करावीत, असे मानले जाते." या समजुतीमुळे आजही अनेक ठिकाणी मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवून त्यांच्या लग्नाची घाई केली जाते किंवा शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही त्यांनी नोकरी करण्यापेक्षा घर सांभाळावे, यावर भर दिला जातो. म्हणजेच स्त्री आणि पुरुष यांच्या भूमिकांविषयी आजही समाजात वेगवेगळ्या धारणा आहेत. त्यामुळे स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू लिंगभावाच्या दृष्टिकोनातून पाहिले जातात. त्यांचे मानसिक स्वास्थ्य आणि त्यांच्यातील सुरक्षिततेची भावना टिकून राहण्यासाठी योग्य लिंगसंवेदनशीलता आवश्यक मानली जाते.

वास्तविक गुणसूत्रांमुळे 'मुलगा कमजोर' किंवा 'मुलगी कमजोर' असे ठरत नाही. मुलगा (XY) आणि मुलगी (XX) या दोघांमध्येही वेगवेगळ्या प्रकारची शारीरिक व मानसिक क्षमता असू शकते. याची जाणीव समाज अनेकदा ठेवत नाही. स्त्रियांना दुर्बल, तर पुरुषांना सबळ मानले जाते आणि जोखमीची कामे प्रामुख्याने पुरुषांकडे सोपविली जातात. काही बाबतीत पुरुषांमध्ये स्नायूंची ताकद अधिक असू शकते; तर काही बाबतीत स्त्रियांची सहनशक्ती, रोगप्रतिकारक क्षमता किंवा सरासरी आयुर्मान अधिक असल्याचे दिसून येते. पुरुषांमध्ये काही विशिष्ट व्याधींचे प्रमाण अधिक असून त्यांचा मृत्यूदरही तुलनेने जास्त असतो. तसेच ते काही संसर्गजन्य रोगांना अधिक बळी पडतात. यामागे काही जैविक व आनुवंशिक घटक कारणीभूत असतात.

पुरुषांना सामाजिक आणि सांस्कृतिक श्रेष्ठत्व मिळाल्यामुळे स्त्रिया सक्षम असूनही अनेकदा पुरुषांच्या मागे राहिलेल्या दिसतात. समाजाने पुरुषाला सक्रिय, तर स्त्रीला निष्क्रिय मानले. स्त्रीला दुर्बल ठरवून पुरुषाला श्रेष्ठत्व बहाल केले. पुरुषाचा जन्मच स्त्रियांवर सत्ता गाजविण्यासाठी झाला आहे, असे समाज गृहीत धरून चालत आला. त्यांची नावे, कामे, पोशाख, वागणूक, व्यवहार आणि त्यांच्यावर केले जाणारे संस्कार, या सर्व बाबींमध्ये समाजाने विषमता निर्माण केली. त्या अनुषंगाने समाजाचा सदस्य म्हणून त्यांचे सामाजीकरण केले जाते. त्यामुळे लिंगभाव समानतेला वाव मिळत नाही. "लिंगभावाचे धडे शिकविणाऱ्या सामाजीकरणाच्या या विशिष्ट प्रक्रियेलाच 'लिंगभावीकरण' किंवा 'लिंगभावाची शिकवण' असे म्हटले जाते. या सामाजिक प्रक्रियेतून मुलांमध्ये पुरुषत्व आणि मुलींमध्ये स्त्रीत्व घडविले जाते. या प्रक्रियेशी संबंधित वर्तन, मूल्ये आणि भूमिका त्या आत्मसात करीत जातात." अशा प्रकारे वेगवेगळ्या पद्धतीने त्यांची जडणघडण केली जाते. त्यांच्या कृती आणि उपक्रमही भिन्न ठेवले जातात. त्यानुसार स्री-पुरुष स्वतः ते आचरण करतात.

मुलांना लहानपणापासून त्यांच्या शारीरिक वैशिष्ट्यांची जाणीव करून दिली जाते. पुरुषाचे सामर्थ्य, तर स्त्रीचे सौंदर्य यांची प्रतिमा त्यांच्या मनावर बिंबविली जाते. "घरातील आणि घराबाहेरील कामांची विभागणी, खेळणी आणि इतर आवडीनिवडी यांच्या बाबतीत भेद केला जातो. शब्द आणि भाषाही वेगवेगळ्या पद्धतीने शिकविली जाते. त्यातून स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी अशा प्रतिमा निर्माण केल्या जातात. त्यांच्या कृती आणि उपक्रमांबाबत लैंगिक विभाजन केले जाते. त्यांचा वावरही वेगवेगळ्या ठिकाणी असतो." मुलगा आणि मुलगी यांच्यात निर्माण होणाऱ्या या

भिन्नतेस शिक्षणपद्धती, समाज आणि कुटुंबाकडून मिळणारी वागणूक मोठ्या प्रमाणात कारणीभूत असते.

स्त्रीच्या बाबतीत तिचे शरीर, निसर्ग, प्रकृती आणि भावना या खाजगी मानल्या जातात; तर पुरुषाच्या बाबतीत मन, बुद्धी, संस्कृती आणि विचार हे सार्वजनिक मानले जातात. "स्त्रिया या निसर्गाप्रमाणे शरीरकेंद्री असून प्रजननाचे कार्य करतात; तर पुरुष विवेकशील, विचारशील आणि कृतिशील असतात. ते निसर्गावर संस्कार करून त्याचे संस्कृतीत रूपांतर करतात. त्यामुळे पुरुष निसर्गापेक्षा श्रेष्ठ असून निसर्गाला आपल्या इच्छेनुसार घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे," अशी धारणा मांडली जाते. अर्थात, या दृष्टिकोनातून स्त्रीला गौण आणि दुय्यम स्थान देऊन पुरुषाला श्रेष्ठत्व बहाल करण्यात आलेले दिसते. आधुनिक काळात स्त्रीच्या क्षमता लक्षात घेऊन तिलाही पुरूषांइतके समान स्थान संधी देण्यात आल्याने त्यांनी त्यांची उर्जा दाखवून दिलेली आहे.

याचबरोबर स्थळांचेही लिंगभावीकरण करण्यात आलेले आहे. दारूची दुकाने, चहाच्या टपऱ्या, चित्रपटगृहे, चौक, रस्त्यांवरील कोपरे, तमाशा आणि इतर मनोरंजनाची ठिकाणे ही पुरुषांची ठिकाणे मानली जातात; तर स्वयंपाकघर आणि पाणवठा ही स्त्रियांची ठिकाणे मानली जातात. सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांचा वावर अनेकदा मर्यादित ठेवला जातो. करमणुकीची साधनेही त्यांना तुलनेने कमी उपलब्ध होतात. पुरुषांचे स्वतंत्र अड्डे असतात. वस्तूंच्या बाबतीतही लिंगभेद केला जातो. भाषेच्या वापरातही स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी वेगवेगळे शब्द वापरले जातात. सार्वजनिक क्षेत्रात आणि नोकऱ्यांमध्ये पुरुषांचे वर्चस्व असल्याचे दिसून

येते. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे पुरुषांचे प्रभुत्व निर्माण झालेले असल्यामुळे समाजामध्ये स्त्रियांबाबत भेदभाव, दुर्लक्ष, अपमान, नियंत्रण, शोषण आणि पिळवणूक अशा अनेक घटना घडतात. अलीकडच्या काळात या परिस्थितीत काही प्रमाणात बदल होऊन स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळत असल्याचे दिसून येते.

सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक संस्थात्मक क्षेत्रांमध्ये पुरुषांचे नियंत्रण असल्याचे आढळते. "पुरुषसत्ता ही जशी एक सामाजिक संरचना आहे, तशीच ती एक विचारप्रणाली आणि मूल्यव्यवस्थाही आहे. त्यानुसार पुरुष श्रेष्ठ मानले जातात. धर्माने पुरुषसत्ताक विचारप्रणाली निर्माण करण्यात आणि ती टिकवून ठेवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. 'ईव्हची निर्मिती ॲडमच्या बरगडीतून झाली' किंवा 'देवाने स्वतःच्या प्रतिमेमध्ये पुरुषाची निर्मिती केली' अशा कथांच्या माध्यमातून पुरुषांच्या श्रेष्ठत्वाचा प्रचार केला जातो." अशावेळी स्त्री-समानता आणि स्त्री-सक्षमीकरणाच्या चळवळींमुळे या कल्पनांना छेद दिला जात आहे. स्त्री ही पुरुषाइतकीच कणखर असल्याची अनेक उदाहरणे पुढे येत आहेत आणि स्त्रियांना पूर्वी पुरुषांची मानली जाणारी अनेक कामेही सोपविली जात आहेत. स्त्रियांमध्ये आत्मविश्वास वाढल्यामुळे त्यांनी विविध क्षेत्रांत स्वतःची क्षमता सिद्ध केली आहे.

स्त्रियांच्या श्रमशक्ती, उत्पादन, प्रजनन, लैंगिकता, संपत्ती, आर्थिक संसाधने आणि सांस्कृतिक घटक यांसंबंधीचे निर्णय अनेक समाजांमध्ये पुरुषांकडून घेतले जातात. स्त्रियांना या बाबतीत स्वतंत्र स्थान किंवा निर्णयस्वातंत्र्य दिले जात नाही. हे चित्र जगातील अनेक समाजांमध्ये

आढळते. कारण समाज लिंगभावाच्या आधारे स्त्री-पुरुषांमधील संबंध निश्चित करीत असतो. "लिंगभावात्मक संबंध ही संकल्पना स्त्री-पुरुषांतील सत्तासंबंधांशी संबंधित असून तिचा प्रत्यय विविध कल्पना, प्रथा आणि प्रतिरूपांच्या विस्तृत पटातून येतो. उदाहरणार्थ, स्त्री-पुरुषांतील श्रमविभाजन, भूमिका आणि संसाधनांचे वाटप यांमधून हे संबंध स्पष्ट होतात. स्त्री-पुरुषांच्या क्षमता, इच्छा, व्यक्तिमत्त्वातील गुण आणि वर्तनपद्धती या लिंगभावात्मक संबंधांमुळे निश्चित केल्या जातात. लिंगभावात्मक संबंध धारणा, तत्त्वप्रणाली आणि सामाजिक व्यवहार यांच्या माध्यमातून घडतात आणि त्यांना घडवितात. समाजातील जात, वर्ग, वंश इत्यादी सामाजिक संरचनांच्या साहाय्याने या मूल्यांची आणि विचारांची अंमलबजावणी होत असते", अशाप्रकारे लिंगभावात्मक संबंध हे शरीरनिर्धारित नसून स्थल-कालपरत्वे बदलणारे आणि समाजनिर्मित असतात.

लिंगभावात्मक संबंध हे गतिशील तसेच अनेकदा असमान असतात. त्यामध्ये सलोखा, स्नेह आणि सामाजिक सहभाग असला, तरी अनेकदा या संबंधांना आव्हानही दिले जाते. कारण या संबंधांमध्ये सत्ता आणि वर्चस्वाची प्रवृत्ती प्रकट होत असते. पुरुषप्रधान व्यवस्थेत ही सत्ता प्रामुख्याने पुरुषांच्या हाती केंद्रित झालेली दिसते. पुरुष स्त्रियांवर प्रभुत्व गाजवतात आणि कुटूंब तसेच समाजातील निर्णयप्रक्रियेवर त्यांचे नियंत्रण असते. "पुरुष म्हणजे मुख्य पीक, आणि आजच्या जगात तर नगदी पीक!", अशी उपमा दिली जाते. म्हणजे कुटूंब व समाजाच्या दृष्टीने स्त्रीपेक्षा पुरुषाची उपयोगिता अधिक मानली जाते. त्यामुळे धार्मिक कायदे, संपत्ती आणि वारसाहक्क यांसारख्या बाबींमध्ये पुरुषांना अधिक झुकते माप

देण्यात आले आहे. परिणामी, कुटुंबातील स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने लादली जातात.

याउलट, कष्टकरी आणि श्रमिक कुटुंबांतील स्त्रियांना तुलनेने अधिक स्वातंत्र्य लाभलेले दिसते. कारण त्या घराबाहेर पडून अर्थार्जन करतात. मात्र अनेक समाजांमध्ये जबाबदाऱ्यांचे समान वाटप नसते. स्त्री ही गृहिणी, तर पुरुष हा कुटुंबाचा कमावता, अशी भूमिका निश्चित केली जाते. स्त्री घरात राहून घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणार आणि पुरुष शाळा, महाविद्यालय किंवा विद्यापीठात जाऊन ज्ञान व कौशल्य प्राप्त करणार, अशी सामाजिक विभागणी करण्यात आली होती. नंतर त्यात स्त्रियांनी प्रवेश केल्यामुळे त्या विभागणीला छेद दिला गेला. त्यामुळे समाजाने हेतुपुरस्सर पुरुषांवर सोपविलेल्या कठीण जबाबदाऱ्या आणि स्त्रियांना घरगुती भूमिकांमध्ये घालून दिलेल्या मर्यादा, हे सूत्र बदलले.

मानसशास्त्रज्ञ आणि लैंगिकता अभ्यासक जॉन मनी (John Money) यांनी १९५०च्या दशकात लिंगभूमिका आणि लिंगओळख या संकल्पना स्पष्टपणे मांडल्या. त्यांच्या मते, "एखादी व्यक्ती स्त्री किंवा पुरुष म्हणून कशी वागते, बोलते, कपडे घालते किंवा समाजात स्वतःची भूमिका कशी पार पाडते, हे केवळ जैविक लिंगावर अवलंबून नसते; तर समाज, संस्कृती, कुटूंब आणि संगोपन यांचा त्यावर मोठा प्रभाव असतो." त्यांच्या मते, लिंगभूमिका म्हणजे समाजाने स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी निश्चित केलेल्या भूमिका, अपेक्षा आणि वर्तनपद्धती होय. उदाहरणार्थ, मुलांनी धाडसी, मजबूत आणि नेतृत्व करणारे असावे, तर मुलींनी शांत, नम्र आणि घरकाम करणाऱ्या असावे, अशी अपेक्षा केली जाते. या भूमिका जन्मतः

नैसर्गिक नसतात; त्या समाजाकडून शिकवल्या जातात. त्यामुळे एका समाजातील स्त्री-पुरुषांच्या भूमिका दुसऱ्या समाजात वेगळ्या असू शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाला लहानपणापासून खेळण्याच्या गाड्या, मैदानी खेळ आणि बाह्य उपक्रमांसाठी प्रोत्साहन दिले गेले, तर तो स्वतःला तथाकथित 'पुरुषी' भूमिकेशी जोडतो. त्याचप्रमाणे मुलींना बाहुल्या, स्वयंपाकाचे खेळ आणि घरगुती कामांकडे प्रोत्साहन दिले गेले, तर त्या तथाकथित 'स्त्रीसुलभ' भूमिका स्वीकारतात. अशाप्रकारे लिंग आणि लिंगभाव यांतील मूलभूत फरक स्पष्ट केला आहे.

सिमोन द बोव्हा (Simone de Beauvoir) यांनी त्यांच्या द सेकंड सेक्स या पुस्तकामध्ये स्त्रियांची सामाजिक स्थिती, पुरुषप्रधान व्यवस्था आणि लिंगभेद यांचे सखोल विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, "स्त्री जन्मतः नसते, तर बनवली जाते." या विधानातून त्यांनी स्त्रीत्व ही केवळ जैविक बाब नसून सामाजिक निर्मिती असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, “समाज, संस्कृती, परंपरा आणि संगोपन यांच्या माध्यमातून स्त्रीची भूमिका घडविली जाते. मुलींना लहानपणापासून विशिष्ट वर्तन, पोशाख, जबाबदाऱ्या आणि मर्यादा शिकविल्या जातात. त्यामुळे 'स्त्री' ही सामाजिक निर्मिती आहे”, असे त्या प्रतिपादन करतात.

पुरुषप्रधान समाजव्यवस्था ही पुरुषकेंद्री आहे. या व्यवस्थेत पुरुषाला श्रेष्ठ आणि केंद्रस्थानी मानले जाते, तर स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. समाजातील नियम, कायदे आणि सांस्कृतिक मूल्ये बहुतेक वेळा पुरुषांच्या हिताच्या दृष्टीने घडविली गेली आहेत. त्यांनी स्त्रीला The Other म्हणजेच 'दुसरी' किंवा 'दुय्यम व्यक्ती' असे संबोधले आहे. स्त्रिया

आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून असल्यामुळे त्यांचे शोषण होते. शिक्षण आणि रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे त्यांना स्वातंत्र्य मिळत नाही. त्यामुळे महिलांना शिक्षण, रोजगार आणि आर्थिक स्वावलंबन प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यांनी पारंपरिक विवाहसंस्थेवरही टीका केली. त्यांच्या मते, समाज स्त्रियांना प्रामुख्याने पत्नी आणि आई या भूमिकांमध्ये मर्यादित ठेवतो आणि घरकाम व बालसंगोपन ही केवळ स्त्रीची जबाबदारी मानतो.

"स्त्रियांना स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची संधी मिळाली पाहिजे. स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान स्वातंत्र्य, समान संधी आणि समान अधिकार मिळाले पाहिजेत. स्त्रिया स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम असाव्यात आणि समाजाने लिंगाधारित भेदभाव दूर केला पाहिजे." त्यांच्या या विचारांमुळे स्त्री-पुरुष समानतेविषयी समाजात जागरूकता वाढली. जगभरातील महिलांच्या हक्कांच्या चळवळींना नवी प्रेरणा मिळाली. परिणामी अनेक देशांमध्ये लिंगभाव समानतेवर अधिक भर देण्यात आला आणि त्यासंबंधी विविध सामाजिक चळवळी, धोरणे तसेच कायदे विकसित करण्यात आले.

६ लिंगभाव समानता

लिंगभाव समानता म्हणजे स्त्री आणि पुरुष यांना समाजात समान हक्क, समान संधी, समान प्रतिष्ठा आणि समान वागणूक मिळणे होय. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये समानतेला अत्यंत महत्त्व दिले जाते. भारतीय संविधानानेही सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार प्रदान केला आहे. तरीदेखील आजही समाजात महिलांबाबत विविध प्रकारचे भेदभाव

होतांना दिसतात. शिक्षण, रोजगार, राजकारण, आरोग्य, वेतन आणि सामाजिक स्थान या क्षेत्रांत स्त्रिया अनेकदा मागे राहिलेल्या दिसतात. त्यामुळे लिंगभाव समानतेचा प्रश्न सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.

लिंगभाव समानता म्हणजे केवळ स्त्री आणि पुरुष समान आहेत, असे म्हणणे नव्हे; तर दोघांनाही समान संधी, अधिकार आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीला लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव न करता समान वागणूक देणे हीच खरी समानता होय. समानतेच्या संकल्पनेमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, मालमत्तेचे हक्क आणि निर्णयप्रक्रियेमधील सहभाग यांचा समावेश होतो. या दृष्टीने लिंगभाव समानता प्रस्थापित करण्यासाठी समाजात विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. शैक्षणिक अभ्यासक्रम, स्त्री संघटना, महिला विकास कार्यक्रम, शासकीय योजना, प्रशिक्षण कार्यशाळा आणि जनजागृती मोहिमा यांच्या माध्यमातून स्त्री-पुरुषांमधील भेदभाव कमी करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यात बरेच यश मिळून स्त्रियांना पुरुषांबरोबर समान संधी मिळत गेलेली आहे. अनेक क्षेत्रात त्यांनी त्यांचे वर्चस्व स्थापित केलेले दिसूनही येते. तरीही स्त्रीबाबत दुय्यमत्त्वाची भावना कमी झालेली दिसत नाही.

भारतीय समाजात प्राचीन काळापासून पितृसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आहे. ही "पितृसत्ता म्हणजे पुरुषांचे नियंत्रण असलेली अशी सामाजिक व्यवस्था, ज्यामध्ये स्त्रियांना पुरुषांच्या प्रभुत्वाखाली राहावे लागते. 'पितृसत्ता' या संकल्पनेत समाजात सत्ता कोणाच्या हाती आहे

आणि तिचे पुनर्वाटप कशा प्रकारे झाले पाहिजे, हे स्पष्ट होते." या व्यवस्थेमुळे महिलांना दुय्यम स्थान देण्यात आल्याने मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव अनेक कुटुंबांमध्ये आजही दिसून येतो. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते, तर मुलींना घरगुती कामांपुरते मर्यादित ठेवले जाते. बालविवाह, हुंडाप्रथा, स्त्रीभ्रूणहत्या आणि महिलांवरील अत्याचार या समस्या आजही विविध स्वरूपांत अस्तित्वात आहेत.

श्रमविभागणी, लिंगभावात्मक श्रेणीबद्धता, स्त्री-पुरुषांच्या जबाबदाऱ्या, कार्यक्षेत्रे आणि सत्तासंबंध यांच्या आधारे समाजात विषमता निर्माण करण्यात आली. समाजनिर्मित लिंगभावसंबंधांमुळे ही विषमता अधिक दृढ झाली आणि त्यातून स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त झाले. कालांतराने या परिस्थितीत बदल होत गेले आणि स्त्रिया अधिक सक्षम बनू लागल्या. आज अनेक क्षेत्रांत त्यांनी नेतृत्व स्वीकारण्याची क्षमता आणि आत्मविश्वास विकसित केला आहे. त्यामुळे नैसर्गिकदृष्ट्या स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये श्रेष्ठ-कनिष्ठ असा कोणताही भेद नसतो, हे सिद्ध झाले. मात्र समाजाने त्यांच्या दरम्यान कृत्रिम दरी निर्माण केली आहे. सामाजिक गुणधर्म, भूमिका आणि अपेक्षा यांमध्ये असमानता निर्माण करून ती दीर्घकाळ टिकवून ठेवण्यात आली. ही असमानता दूर करण्यासाठी विविध स्त्री संघटना, महिला परिषद आणि सामाजिक संस्थांनी सातत्याने प्रयत्न केले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक महिला संघटना कार्यरत झाल्या. त्यांनी कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेविषयक हक्कांसाठी आंदोलने व जनजागृती करून स्त्रियांना समाजात समान स्थान मिळावे, यासाठी कार्य केले. मात्र "आजही समाजामध्ये लिंगभाव पक्षपात मोठ्या प्रमाणात आढळतो. मुलगा रडू

लागला तर त्याला 'भेकड' म्हटले जाते, तर मुलगी क्रिकेट खेळू लागली तर तिला 'टॉमबॉय' असे संबोधले जाते." यावरून लिंगभावात्मक पूर्वग्रह आजही समाजात अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

आई-वडील लहानपणापासूनच मुला-मुलींच्या आवडीनिवडी, वर्तन आणि भूमिकांविषयी विशिष्ट अपेक्षा निर्माण करतात. त्यामुळे लिंगभावात्मक पक्षपात बालपणापासूनच त्यांच्या मनावर बिंबविला जातो. कुटूंब आणि समाजाकडून त्यांचे खाणे-पिणे, राहणीमान, वेशभूषा आणि कामांची विभागणी निश्चित केली जाते. समाजामध्ये याविषयी पूर्वग्रह आणि रूढ समजुती आधीपासूनच अस्तित्वात असतात. त्यामुळे सामाजीकरणाच्या प्रक्रियेत मुलगा आणि मुलगी स्वतःविषयी वेगवेगळ्या संकल्पना स्वीकारतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही मानसिकता आणि वर्तनपद्धती संक्रमित होत राहते. आई-वडील, कुटुंब, चालीरीती आणि परंपरा यांच्या माध्यमातून मुलांशी सातत्याने संवाद साधला जातो. या प्रक्रियेत मुलींना मानसिकदृष्ट्या दुय्यम समजण्याची प्रवृत्ती विकसित होते. त्यामुळे लिंगभाव समानतेस बाधा निर्माण होते.

“लिंगभाव ओळख ही एक गुंतागुंतीची संकल्पना आहे. ती अंशतः शरीरशास्त्रावर, अंशतः व्यक्तीच्या मानसिकतेवर, तसेच संस्कृती आणि परंपरेवर अवलंबून असते. त्यामुळे ती समाजनिर्मित संकल्पना मानली जाते.” ही सतत विकसित होणारी प्रक्रिया असून व्यक्ती आणि समाज दोघेही तिच्या निर्मितीत सक्रिय भूमिका बजावतात. समाज स्त्री आणि पुरुष यांच्या कृती, भूमिका आणि जबाबदाऱ्या पूर्वनिश्चित करतो. या भूमिकांना कोणताही अपरिहार्य जीवशास्त्रीय आधार नसतो; परंतु धर्म,

अर्थव्यवस्था, शिक्षण आणि राजकारण यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून त्यांमध्ये भेद निर्माण करून अनेक क्षेत्रांवरील नियंत्रण पुरुषांच्या हाती केंद्रित केले जाते. यामुळे लिंगभेद अधिक दृढ होतो. हा भेद दूर करण्यासाठी १९९७ नंतर भारतामध्ये महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला. महिलांना कुटुंबात आणि समाजात त्यांचे अधिकार मुक्तपणे वापरता यावेत तसेच पुरुषांबरोबर सर्व क्षेत्रांत समानतेने वावरता यावे, यासाठी विविध शासकीय धोरणे आणि कार्यक्रम राबविण्यात आले. याच पार्श्वभूमीवर २००१–२००२ हे वर्ष 'स्त्री सक्षमीकरण वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले. निर्णय घेणे, नियंत्रण करणे, संघटन करणे, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम राबविणे, जनसंपर्क करणे आणि आर्थिक व्यवहार हाताळणे, अशा विविध क्षमता स्त्रियांमध्ये विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्यांची आत्मनिर्भरता, स्वावलंबन आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांवर विशेष भर देण्यात आला. स्त्रियांना सर्व क्षेत्रांमध्ये योग्य प्रमाणात सहभागी करून घेण्याचे धोरण स्वीकारण्यात आले. त्यासाठी १९९२ मध्ये कृतीकार्यक्रम आखण्यात आला. स्त्रियांची सकारात्मक स्व-प्रतिमा घडविण्यावर भर देण्यात आला. त्यांच्यामध्ये आवश्यक क्षमता आणि नेतृत्वगुण विकसित करून पुरुषांइतकेच सामाजिक स्थान प्राप्त व्हावे, यासाठी प्रयत्न करण्यात आले. आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि नेतृत्वक्षमता विकसित करण्यासाठी त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

स्त्रियांचे दिसणे, बसणे, उभे राहणे, चालणे, बोलणे, भाषेचा वापर करणे, स्वतःची मते व कल्पना मांडणे, संवाद साधणे, खंबीरपणे सहभागी होणे, भावनांचे योग्य प्रकटीकरण करणे तसेच सार्वजनिक क्षेत्रात

आत्मविश्वासाने वावरणे, याबाबतीत पूर्वीच्या रूढ प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्त्रियांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय आणि सामाजिक सबलीकरण सुलभ करण्यावर भर देण्यात आला. त्यातून लिंगभाव समानतेवर आधारित समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले. सामाजिक आणि राष्ट्रीय विकासासाठी स्त्री आणि पुरुष यांच्यातील समान अंगभूत मूल्यांना महत्त्व देण्यात आले. त्यांना समान हक्क आणि समान जबाबदाऱ्या देण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार शिक्षण, व्यवसाय आणि जीवनपद्धती निवडण्याचे स्वातंत्र्य असावे, असा विचार पुढे आला. त्यात बरेच यश मिळाले. तरीही सांस्कृतिक दृष्टिकोन, पोशाखाविषयीचे पूर्वग्रह, महिलांविरुद्ध वाढणारा हिंसाचार आणि लिंगभेदात्मक मानसिकता या गोष्टी लिंगभाव समानतेस अडथळा ठरत आहेत.

स्त्री आणि पुरुष यांनी परस्परांना पूरक ठरून समाजाच्या विकासात योगदान द्यावे, ही भूमिका समाजाला दीर्घकाळ स्वीकारता आली नाही. वास्तविक, "स्त्रियांनी स्वातंत्र्यासाठी सातत्याने दिलेल्या संघर्षातूनच लिंगभाव अभ्यासाचा उदय झालेला दिसून येतो." स्त्रीसुधारणा चळवळी, स्त्री शिक्षण आणि १९१७ मध्ये स्थापन झालेली भारतीय महिला संघटना या चळवळींनी स्त्रियांच्या स्वातंत्र्य, शिक्षण आणि राजकीय हक्कांसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. या संस्थेच्या स्थापनेत ॲनी बेझंट यांचा महत्त्वाचा सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर काळात त्याचे प्रत्यक्ष फलस्वरूप परिणाम दिसून आले.

"१९८० च्या दशकात भारतातील स्त्रीवादी चळवळ सैद्धांतिक साहित्यनिर्मिती आणि दृकश्राव्य माध्यमांपासून आरोग्य, शिक्षण, रोजगार प्रशिक्षण, झोपडपट्टी विकास आणि कामगार संघटनांपर्यंत विविध कार्यक्षेत्रांत विस्तारत गेली. प्रसारमाध्यमांतील लिंगभेदी दृष्टिकोनाला आव्हान देण्यासाठी पथनाट्य, गाणी, प्रदर्शने आणि नियतकालिके यांसारख्या पर्यायी माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. याच काळात स्त्री-अभ्यासाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले. स्त्रीवादी सैद्धांतिक ज्ञाननिर्मितीची आवश्यकता आणि त्याविषयीची आवड वाढल्यामुळे अनेक विद्यापीठांमध्ये स्त्री-अभ्यास केंद्रे सुरू करण्यात आली." स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे प्रश्न, त्यांचे संरक्षण, सक्षमीकरण, संघटनात्मक कार्य आणि समाजातील योगदान या विषयांचा अभ्यास अधिक व्यापक झाला. त्यातून लिंगभाव अभ्यास ही स्वतंत्र ज्ञानशाखा विकसित झाली. या ज्ञानशाखेत 'जेंडर बजेट' आणि 'जेंडर ऑडिट' या संकल्पनांचाही समावेश करण्यात आला. या अभ्यासामध्ये स्त्रीबरोबरच पुरुषांचाही अभ्यास केला जातो. लिंगभाव रचनेचे विश्लेषण करून सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये समानता प्रस्थापित करण्यावर भर दिला जातो.

लिंगभाव (Gender) ही सामाजीकरणाची आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे समाज मुलगा आणि मुलगी यांच्याकडून कोणत्या प्रकारच्या भूमिका, जबाबदाऱ्या, वर्तन आणि मूल्यांची अपेक्षा करतो, याची जाणीव त्यांना होत जाते. जन्मतः मुलगा किंवा मुलगी हा जैविक भेद (Sex) असतो; परंतु 'मुलांनी कसे वागावे?' किंवा 'मुलींनी कसे वागावे?' या अपेक्षा समाज आणि संस्कृती घडवितात. यालाच लिंगभाव सामाजीकरण असे म्हणतात.

भारतीय समाजात लिंगभाव सामाजीकरणाची सुरुवात प्रामुख्याने कुटुंबातून होते. आई-वडील, आजी-आजोबा आणि इतर कुटुंबीय मुलांना त्यांच्या वागण्या-बोलण्याबाबत, कपडे, खेळ, जबाबदाऱ्या आणि शिस्त यांविषयी मार्गदर्शन करतात. मुले मोठ्यांचे निरीक्षण करून त्यांचे अनुकरण करतात. कोणते वर्तन योग्य मानले जाते आणि कोणते अयोग्य मानले जाते, याची जाणीव त्यांना कुटुंबातूनच होते. पुढे शाळा, मित्रपरिवार, माध्यमे, धार्मिक-सांस्कृतिक परंपरा आणि समाजातील विविध संस्था या प्रक्रियेला अधिक बळकटी देतात. लिंगभावाची जाणीव झाल्यानंतर व्यक्ती समाजाच्या अपेक्षांनुसार स्वतःच्या भूमिका आणि वर्तनामध्ये बदल करत जाते. त्यामुळे लिंगभाव सामाजीकरण ही केवळ बालपणापुरती मर्यादित प्रक्रिया नसून ती आयुष्यभर सुरू राहते. शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, कुटुंब, सामाजिक संबंध, सार्वजनिक जीवन, राजकारण आणि पर्यावरण अशा विविध क्षेत्रांमध्ये या प्रक्रियेचा प्रभाव दिसून येतो.

अशाप्रकारे लिंगभाव म्हणजे समाजाने स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी निश्चित केलेल्या भूमिका, जबाबदाऱ्या, अपेक्षा आणि वर्तनपद्धती होय. लिंगभाव हा केवळ स्त्रीपुरुषांच्या जैविक फरकांवर आधारित नसून-, तो समाजातील रूढी, परंपरा, संस्कृती, शिक्षण आणि सामाजिक मूल्यांमधून निर्माण होतोत्यामुळे लिंगभावाशी संबंधित भूमिका समाज ., संस्कृती, काळ आणि परिस्थितीनुसार बदलत असतात. जसे ,घरकाम, मुलांची काळजी आणि कुटुंबाची जबाबदारी ही केवळ स्त्रियांचीच कामे आहेत**, तर**

उत्पन्न मिळवणे व बाहेरील कामे करणे ही पुरुषांचीच जबाबदारी आहे, अशी पारंपरिक अपेक्षा अनेक समाजांमध्ये दिसून येते मात्र आधुनिक . पुरुष दोघेही शिक्षण-काळात स्त्री, नोकरी, व्यवसाय, घरकाम आणि कुटुंबाची जबाबदारी समानपणे पार पाडताना दिसतात .स्त्री आणि पुरुष यांच्या लिंगभावाशी संबंधित प्रमुख फरक पुढीलप्रमाणे दर्शविता येतील.

७- लिंग (Sex) आणि लिंगभाव (Gender) यांतील सामाजिक भिन्नतेची उदाहरणे

मुद्दा	स्त्री लिंगभाव	पुरुष लिंगभाव
जैविक ओळख	स्त्री शरीररचना, प्रजनन क्षमता	पुरुष शरीररचना, प्रजनन क्षमता
सामाजिक भूमिका	काळजी घेणे, घरकामाशी जोडले जाते	कमावता, संरक्षणकर्ता म्हणून पाहिले जाते
भावनिक अभिव्यक्ती	भावना व्यक्त करण्यास प्रोत्साहन	भावना दडपण्याची अपेक्षा

शिक्षणातील संधी	काही ठिकाणी मर्यादा किंवा भेदभाव	तुलनेने अधिक संधी
रोजगार	कमी वेतन, काही क्षेत्रांत कमी प्रतिनिधित्व	अधिक रोजगाराच्या संधी व नेतृत्वपदे
निर्णयक्षमता	कुटुंबात कमी अधिकार असण्याची शक्यता	कुटुंब व समाजात अधिक अधिकार
पोशाखाविषयी अपेक्षा	पारंपरिक व मर्यादित अपेक्षा	तुलनेने अधिक स्वातंत्र्य
सुरक्षिततेचे प्रश्न	छेडछाड, हिंसाचाराचा धोका अधिक	तुलनेने कमी धोके
सामाजिक स्वातंत्र्य	बाहेर जाणे व वागणुकीवर अधिक निर्बंध	तुलनेने अधिक सामाजिक स्वातंत्र्य

सांस्कृतिक प्रतिमा	कोमल, सहनशील अशी प्रतिमा	धाडसी, मजबूत अशी प्रतिमा

अशाप्रकारे स्त्री आणि पुरुष यांच्यातील जैविक, सामाजिक आणि सांस्कृतिक भिन्नता तसेच समाजाच्या अपेक्षा स्पष्ट होतात. स्त्रियांना अनेकदा काळजी घेणे, घरकाम, मर्यादित स्वातंत्र्य आणि सुरक्षिततेच्या प्रश्नांशी जोडले जाते; तर पुरुषांना कमावते, मजबूत आणि निर्णयक्षम म्हणून पाहिले जाते. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक अधिकारांच्या बाबतीत पुरुषांना तुलनेने अधिक संधी मिळालेल्या दिसतात. तसेच भावना व्यक्त करण्याबाबतही स्त्री आणि पुरुष यांच्याकडून समाज वेगवेगळ्या अपेक्षा ठेवतो. एकूणच हा तक्ता समाजातील लिंगाधारित असमानता आणि पारंपरिक भूमिकांचे चित्र स्पष्ट करतो. म्हणजे बऱ्याच प्रमाणात समाजाची धारणा अजून सनातन स्वरुपाची दिसून येते. विशेषतः समाजरचनेत स्त्री आणि पुरुष यांच्या भूमिका दीर्घकाळ जैविक भिन्नतेपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक संकेतांच्या आधारे निश्चित केल्या गेल्या आहेत. या प्रक्रियेत स्त्री-पुरुषांमध्ये लिंगाधारित असमानता निर्माण झाली. पुरुषाला कुटुंबाचा प्रमुख, कमावता, निर्णयकर्ता, संरक्षक आणि अधिकारसंपन्न व्यक्ती म्हणून स्थान देण्यात आले; तर स्त्रीला गृहिणी, संगोपनकर्ती, सेवाभावी आणि आज्ञाधारक अशी भूमिका बहाल करण्यात आली. या पारंपरिक भूमिकांमुळे स्त्रीला शिक्षण, रोजगार, संपत्ती, निर्णयप्रक्रिया आणि सार्वजनिक जीवनात मर्यादित संधी मिळाल्या, तर

पुरुषावर आर्थिक जबाबदारी, कुटुंबाचा भार, भावनांवर नियंत्रण आणि सतत सक्षम राहण्याची अपेक्षा लादली गेली.

*** *** ***

ब - मानवाच्या सहजप्रवृत्ती आणि स्त्री-पुरुष स्वभाव-गुण

मानव म्हटला की जैविक रचनेनुसार नर आणि मादी, म्हणजे सामाजिक दृष्टिकोनातून स्त्री आणि पुरुष, असे मानले जाते. त्यांचा स्वभाव आणि गुणवैशिष्ट्ये ही केवळ प्राकृतिकतेपेक्षा सामाजिक व सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात अधिक घडलेली असतात. मात्र मानवी जीवनात विविध प्रकारच्या सहजप्रवृत्ती कार्यरत असल्याने त्यांमधून व्यक्तीच्या भावना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यक्त होत असतात. त्यामुळे सहजप्रवृत्ती, नैसर्गिक वृत्ती आणि भावभावना यांबाबतीत स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये बरेच साम्य आढळते.

१. मानवाच्या सहजप्रवृत्ती

सहजप्रवृत्ती सिद्धांतानुसार माणूस आणि प्राण्यांच्या काही वर्तनांची मुळे जन्मजात अंगभूत प्रवृत्तींमध्ये असतात. आधुनिक संशोधनानुसार या प्रवृत्ती अस्तित्वात असल्या, तरी त्यांच्यावर पर्यावरण आणि अनुभव यांचाही प्रभाव पडतो. सर्व माणसांमध्ये काही मूलभूत सहजप्रवृत्ती

असतात. त्याचप्रमाणे स्त्री आणि पुरुष यांच्या गुणवैशिष्ट्यांविषयी समाजात काही ठराविक अपेक्षाही निर्माण झालेल्या असतात.

सहजप्रवृत्ती म्हणजे जन्मतः प्राप्त झालेली नैसर्गिक प्रेरणा किंवा वर्तन होय. कोणतीही गोष्ट शिकविली नसतांनाही जी कृती आपोआप घडते, तिला सहजप्रवृत्ती असे म्हणतात. ही प्रवृत्ती मानव आणि प्राणी या दोघांमध्येही आढळते. मानवामध्ये अन्न मिळविणे, स्वतःचे संरक्षण करणे, प्रेम व माया व्यक्त करणे आणि कुटुंब निर्माण करणे, अशा अनेक सहजप्रवृत्ती असतात. मानवेतर प्राण्यांमध्ये या प्रवृत्ती अधिक स्पष्टपणे दिसून येतात. मानव आणि प्राणी यांच्या सहजप्रवृत्तींमध्ये काही समानता असली, तरी मानवाकडे विचारशक्ती, बुद्धिमत्ता आणि संस्कार असल्यामुळे तो त्याच्या प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवू शकतो. प्राणी मुख्यतः नैसर्गिक प्रवृत्तीवर अवलंबून असतात; तर मानव विवेकाचा वापर करून योग्य-अयोग्य ठरवू शकतो.

मानवाच्या प्रवृत्ती नियंत्रित करण्यासाठी विवेक, संस्कार, शिक्षण आणि आत्मसंयम यांची महत्त्वाची भूमिका असते. विचारशक्तीमुळे तो आपल्या भावना आणि इच्छांवर नियंत्रण ठेवू शकतो. चांगले शिक्षण आणि नैतिक मूल्ये व्यक्तीला योग्य-अयोग्य समजण्यास मदत करतात. राग, लोभ, भीती किंवा वाईट सवयी यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आत्मसंयम आवश्यक असतो. कोणती कृती योग्य आणि कोणती अयोग्य, याचा विचार करून मानव निर्णय घेतो. समाजातील नियम आणि कायदे त्याच्या वर्तनाला मर्यादा घालतात. तसेच चांगल्या व्यक्तींच्या सहवासामुळे वर्तनावर सकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे मानव आपल्या

सहजप्रवृत्तींचा योग्य दिशेने उपयोग करू शकतो आणि समाजात संतुलित जीवन जगू शकतो. मात्र व्यक्तीचा स्वभाव आणि गुणवैशिष्ट्ये यांमुळे सहजप्रवृत्तींना वेगळे वळणही मिळू शकते. त्यातून मानवी जीवनात संघर्ष निर्माण होतात.

१. विमोचन प्रवृत्ती – भीती : भीती ही माणसाची नैसर्गिक भावना आहे. एखादी धोकादायक, त्रासदायक किंवा अप्रिय परिस्थिती निर्माण झाली की, त्यापासून दूर जाण्याची किंवा ती टाळण्याची प्रवृत्ती व्यक्तीमध्ये निर्माण होते. धोक्यापासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी ही प्रवृत्ती कार्य करते. भीती वाटल्यावर व्यक्ती पळून जाणे, लपणे, टाळणे किंवा सुरक्षित ठिकाणी जाणे, अशा प्रकारचे वर्तन करते.

स्त्री-पुरुषांच्या संदर्भात विचार केला, तर पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांमध्ये भीतीची भावना अधिक दिसून येते. मात्र, ती त्यांच्या जन्मजात कमकुवतपणाचे लक्षण मानता येत नाही. लहानपणापासून मुलींना अधिक सावध राहण्याचे, धोके टाळण्याचे आणि सुरक्षिततेची काळजी घेण्याचे शिक्षण दिले जाते. त्यांच्यावर काही विशिष्ट सामाजिक संस्कारही केले जातात. त्यामुळे भीतीची अभिव्यक्ती त्या अधिक स्पष्टपणे व्यक्त करतात. समाजातील छेडछाड, हिंसा आणि असुरक्षिततेच्या अनुभवांमुळे स्त्रियांमध्ये सुरक्षिततेविषयीची चिंता अधिक असू शकते. अनेक संशोधनांनुसार स्त्रिया आपल्या भावना अधिक तीव्रतेने व्यक्त करतात. त्यामुळे त्यांच्यात भीती उघडपणे दिसून येते. हार्मोन्स आणि शरीररचनेतील काही जैविक घटकांमुळे तणाव आणि भीतीची प्रतिक्रिया वेगळी असू शकते. याशिवाय स्त्रियांनी मृदू आणि संयमी राहावे, अशी समाजाची

अपेक्षा असल्यामुळे त्या अनेकदा स्वतःच्या सहजप्रवृत्ती व्यक्त करण्यास संकोच करतात.

पुरुषांमध्येही भीती असते; मात्र ते ती अनेकदा उघडपणे व्यक्त करत नाहीत. कारण 'पुरुष धाडसी असावा' अशी मुलाच्या लहानपणापासून समाज आणि कुटुंबाकडून अपेक्षा करतो आणि तसे त्याला शिकवितो. त्यामुळे अनेक पुरुष भीती लपविण्याचा प्रयत्न करतात. अपयश, जबाबदाऱ्या, आर्थिक अडचणी किंवा प्रतिष्ठा गमावण्याची भीती त्यांच्यामध्ये अधिक आढळते. त्यामुळे भीती व्यक्त करण्याऐवजी ते राग, शांतता किंवा आक्रमक वर्तनातून प्रतिक्रिया देतात. समाजाच्या दबावामुळे ते भावना उघडपणे व्यक्त करण्याचे टाळतात. अर्थात, स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही भीती असते; मात्र तिची अभिव्यक्ती आणि सामाजिक संदर्भ वेगवेगळे असतात. तो लिंगभाव समानतेचा अभाव असतो.

२. युद्ध प्रवृत्ती – राग : राग ही नैसर्गिक सहजप्रवृत्ती स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही आढळते; मात्र तिची अभिव्यक्ती, तीव्रता आणि सामाजिक स्वरूप वेगवेगळे असू शकते. उदाहरणार्थ, स्त्रिया अनेकदा अप्रत्यक्ष किंवा भावनिक स्वरूपात राग व्यक्त करतात, तर पुरुष त्यांचा राग थेट आणि उघडपणे व्यक्त करतात. राग आल्यावर स्त्रिया रुसणे, शांत राहणे किंवा भावना व्यक्त करणे, अशाप्रकारे प्रतिक्रिया देतात; तर पुरुष ओरडणे, आक्रमक बोलणे किंवा संतापजनक कृती करणे, अशाप्रकारे प्रतिक्रिया व्यक्त करतात. स्त्रियांना नातेसंबंध आणि भावनिक बाबींमुळे राग येण्याची शक्यता अधिक असते, तर पुरुषांना स्पर्धा, अपमान किंवा अधिकाराशी संबंधित प्रसंगांमुळे राग येतो. स्त्रिया तुलनेने अधिक संयम राखतात, तर

पुरुषांमध्ये उतावळेपणा अधिक दिसून येऊ शकतो. स्त्रियांनी मृदू वर्तन करावे, अशी अपेक्षा समाज करतो; तर पुरुषांनी धाडसी आणि कठोर असावे, अशी अपेक्षा ठेवतो. त्यामुळे राग व्यक्त करण्याच्या पद्धती, संयम आणि प्रतिक्रिया यांमध्ये स्त्री आणि पुरुष यांच्यात काही फरक दिसून येतात. या फरकांवर सामाजिक अपेक्षा आणि संस्कारांचा प्रभावही मोठ्या प्रमाणात असतो.

३. जुगुप्सा प्रवृत्ती – तिटकारा : जुगुप्सा म्हणजे घृणा किंवा तिटकारा. एखादी गोष्ट अस्वच्छ, अयोग्य, धोकादायक किंवा नैतिकदृष्ट्या चुकीची वाटल्यावर निर्माण होणारी मानसिक प्रतिक्रिया म्हणजे जुगुप्सा होय. स्त्री आणि पुरुष यांच्या वर्तनामध्ये या प्रवृत्तीची अभिव्यक्ती काही प्रमाणात भिन्न दिसते. मात्र, हे सर्वसाधारण निरीक्षण असून प्रत्येक व्यक्तीला ते लागू होईलच असे नाही. स्त्रियांमध्ये शारीरिक स्वच्छतेबाबत अधिक संवेदनशीलता आढळते. घाण, दुर्गंधी, खराब अन्न किंवा अस्वच्छ वातावरण यांबद्दल त्या अधिक तीव्र प्रतिक्रिया देऊ शकतात. ही प्रतिक्रिया आरोग्य आणि संसर्ग टाळण्याच्या प्रवृत्तीशी संबंधित असते. तसेच अपमान, फसवणूक, अश्लील किंवा अनैतिक वर्तन यांबद्दलही त्या भावनिक तिटकारा अधिक व्यक्त करू शकतात. नातेसंबंधांतील विश्वासभंगावर त्यांची प्रतिक्रिया अधिक तीव्र असते. त्यामुळे भावनिक आणि सामाजिक संवेदनशीलता त्यांच्यामध्ये अधिक दिसून येते. चेहऱ्यावरील भाव, शब्दांतील नाराजी, संबंधित व्यक्तीपासून दूर राहणे किंवा अप्रत्यक्ष निषेध व्यक्त करणे, अशाप्रकारे स्त्रिया आपली प्रतिक्रिया व्यक्त करतात. ही त्यांची तिटकारा व्यक्त करण्याची एक सामान्य पद्धत मानली जाते. म्हणून स्त्रीला समजून घ्यावे लागते, असे म्हटले जाते.

४. वात्सल्य प्रवृत्ती-मृदुभाव : वात्सल्य प्रवृत्ती म्हणजे प्रेम, जिव्हाळा, संरक्षणाची भावना, काळजी घेण्याची वृत्ती आणि मृदुभाव म्हणजे कोमल, सहानुभूतीपूर्ण, सौम्य भावनिक वर्तन. याबाबत स्त्री-पुरुषांमध्ये काही सामान्य फरक दिसून येतात; मात्र हे सर्वांनाच लागू पडतात असे नाही. तरीही आपल्याला त्यांच्या वागण्याचा अंदाज येऊ शकतो. स्त्रीमध्ये भावनिक अभिव्यक्ती अधिक असते. ती प्रेम, काळजी, सहानुभूती उघडपणे व्यक्त करते. मुलं, कुटुंब, मित्र यांच्याशी जिव्हाळ्याने संवाद साधते. म्हणजे स्त्रियांमध्ये वात्सल्य व मृदुभाव अधिक असतो. आजारी व्यक्तीची सेवा, मुलांची काळजी, भावनिक आधार देणे याकडे अधिक ओढ आणि नातेसंबंध टिकवण्यावर भर. ही संगोपनाची वृत्ती असते. दुसऱ्यांच्या भावना पटकन ओळखणे. दुःख, वेदना किंवा तणाव पाहून मृदू प्रतिक्रिया देणे, अशी संवेदनशीलता जास्त असते. बोलण्यात कोमलता, संयम, समजूतदारपणा व सौम्यता अधिक दिसते.

पुरुषाच्या ठिकाणचे वात्सल्य कृतीतून व्यक्त होते. संरक्षण देणे, जबाबदारी उचलणे, आर्थिक किंवा व्यावहारिक मदत करणे, या गोष्टी तो करतो. भावना कमी आणि कृती जास्त दाखवतो. असेही त्याच्या भावना व्यक्त करण्याचे प्रमाण कमीच असते. मृदुभाव अप्रत्यक्ष पद्धतीने दिसतो. कुटुंब किंवा प्रिय व्यक्तींच्या सुरक्षिततेसाठी तो संरक्षणात्मक भूमिका घेतो. संकटात धैर्य दाखवणे हे त्याच्या वात्सल्याचे रूप असू शकते. काही पुरुष प्रेम किंवा काळजीबाबत कमी बोलतात, पण कृतीतून जास्त दाखवतात. अशाप्रकारे स्त्री-पुरुष दोघांमध्ये फरक असण्याचे काही कारणे आहे. त्यात हार्मोन्स आणि पालकत्वाशी संबंधित नैसर्गिक प्रवृत्ती. हे जैविक घटक कारण ठरतात. सामाजिक संस्कार मुलींना कोमल आणि भावनिक, मुलांना

धैर्यवान व कठोर राहण्याचे शिक्षण दिले जाते. संस्कृती व अनुभव शिक्षण, वातावरण, कुटुंब यानुसार हे बदलते. आजच्या काळात स्त्री-पुरुष दोघांमध्येही वात्सल्य आणि मृदुभाव मोठ्या प्रमाणात आढळतात. अनेक पुरुष अत्यंत भावनिक व प्रेमळ असतात, तर अनेक स्त्रिया कठोर आणि व्यवहारकुशल असू शकतात. त्यामुळे हे फरक सामान्य प्रवृत्ती म्हणून पाहिले जातात. त्याला कोणते मानसशास्त्रीय कसोटी लावली गेली नाही.

५. याचना प्रवृत्ती-आर्तभाव : अंतःकरणातून उमटलेली एक तीव्र हाक, व्याकुळता किंवा तळमळ असते. जेव्हा मन एखाद्या दुःखाने, अभावाने, विरहाने, भीतीने किंवा परम अपेक्षेने भरून जाते, तेव्हा मदत, आधार, प्रेम किंवा कृपा यांची प्रामाणिक याचना केली जाते. त्या भावनेला आर्तभाव म्हणतात. ती भावना खरी असते. त्यावेळी अहंकार कमी होतो आणि अंतर्मन उघडे पडते. यात असहायता असू शकते, पण त्याचबरोबर प्रामाणिक समर्पणही असते. हा भाव केवळ दुःखातूनच नाही, तर तीव्र प्रेम, भक्ती किंवा विरहातूनही निर्माण होतो. याचना किंवा आर्तभाव ही मानवी भावनांची सहज अभिव्यक्ती असून स्त्री आणि पुरुष यांच्या प्रकटीकरणात काही भेद दिसतात, पण हे भेद पूर्णतः जैविक नसून सामाजिक संस्कार, भावनिक शिक्षण आणि वैयक्तिक स्वभाव यांमुळेही घडतात. स्त्रीची भावनिक अभिव्यक्ती सामान्यतः अधिक उघडी आणि संबंधप्रधान असते. ती याचना करतांना शब्द, अश्रू, ममत्व, समर्पण किंवा मौन यांद्वारे भावना व्यक्त करू शकते. तिच्या आर्ततेत जोडून ठेवण्याची आणि संबंध वाचवण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसते. प्रेम, वात्सल्य, सुरक्षितता किंवा स्वीकार यांची अपेक्षा तिच्या याचनामध्ये सूक्ष्मपणे व्यक्त होते. बऱ्याचदा स्त्रीचा आर्तभाव भावनिक संप्रेषणात्मक असतो.

पुरुषाला लहानपणापासून भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे संस्कार अधिक दिले जातात. त्यामुळे त्याची याचना अनेकदा थेट शब्दांत न दिसता कृतीत, रागात, मौनात किंवा संघर्षात व्यक्त होऊ शकते. पुरुषाचा आर्तभाव स्वाभिमान आणि असहायता न दाखवण्याची वृत्ती यांच्यात अडकलेला असतो. तो मदतीची किंवा प्रेमाची गरज अप्रत्यक्षपणे व्यक्त करतो. पुरुषाचा आर्तभाव अनेकदा आतल्या संघर्षात्मक स्वरूपात प्रकट होतो. एकूणच यांविषयी सार्वत्रिक किंवा निश्चित नियम नाहीत. अनेक पुरुष अत्यंत भावनिक आणि उघडे असतात, तर अनेक स्त्रिया भावनांबाबत संयमी किंवा अलिप्त असू शकतात. संस्कृती, अनुभव, व्यक्तिमत्त्व आणि जीवनस्थिती यांचा प्रभाव मोठा असतो. स्त्री-पुरुष दोघांच्याही याचनामध्ये शेवटी एक समान मानवी गरज दडलेली असते. कारण स्वीकार, प्रेम आणि आधार, याची गरज दोघांनाही असते. त्याची याचना कशी करायची, हा त्यांच्या स्वभावाचा भाग असतो.

६. संभोग प्रवृत्ती – कामभाव : स्त्री आणि पुरुष यांच्या कामभावना, संभोग प्रवृत्ती किंवा लैंगिक आकर्षणात काही जैविक, मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद आढळतात. मात्र हे भेद सर्वांवर तंतोतंत लागू होतात असे नाही. त्याबाबत प्रत्येक व्यक्तीची प्रवृत्ती वेगळी असू शकते. स्त्रियांची कामभावना, लैंगिक प्रवृत्ती आणि मानसिकता एकसारखी नसते. ती व्यक्तिनिहाय, संस्कार, शरीररचना, नातेसंबंध, भावनिक सुरक्षितता, आरोग्य, हार्मोन्स आणि जीवनानुभव यांवर अवलंबून असते; पण काही सामान्य पैलू समजून घेता येतात. अनेक स्त्रियांसाठी भावनिक जवळीक, विश्वास, आदर आणि सुरक्षितता हे लैंगिक आकर्षणाशी जोडलेले असतात. प्रेम, संवाद, समजून घेणे आणि मानसिक जोड निर्माण

झाली तर कामभावना अधिक सहज व्यक्त होऊ शकते. इथे हे भावनिक घटक महत्त्वाचे असतात.

पुरुषांप्रमाणेच स्त्रियांमध्येही लैंगिक इच्छा नैसर्गिक असते, पण ती अनेकदा भावनिक वातावरण, ताणतणाव, नात्यातील समाधान, आत्मविश्वास, शरीराविषयीची भावना आणि हार्मोनल बदल यांच्यामुळे प्रभावित होते. त्यामुळे ती भावना केवळ शारीरिक ठरत नाही. त्या व्यक्त होण्याची पद्धत वेगळी असू शकते. काही स्त्रिया आपली इच्छा स्पष्टपणे व्यक्त करतात, तर काही अधिक संकोची असू शकतात. समाजातील संस्कार, लाज, भीती किंवा न्याय केला जाईल, अशा विचारांचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे स्त्रीची कामभावना ती प्रकट करू शकत नाही. याशिवाय स्त्रियांमध्ये विविध प्रकारची मानसिकता असू शकते. जसे, तीव्र कामेच्छा असू शकते, मध्यम किंवा कमी इच्छा असू शकते, काहींना रोमँटिक जवळीक अधिक महत्त्वाची वाटू शकते, तर काही स्त्रिया लैंगिकतेकडे अधिक मोकळेपणाने पाहतात. तर बऱ्याच स्त्रियांना त्या गोष्टी नकोशा वाटतात. हा एक जीवनविषयक दृष्टिकोनाच्या विविधतेचा भाग आहे.

स्त्रीच्या कामभावनेवर हार्मोन्स आणि जीवनाच्या टप्प्यांचा प्रभावही पडतो. मासिक पाळीचं चक्र, गर्भधारणा, प्रसूतीनंतरचा काळ, रजोनिवृत्ती, औषधे किंवा मानसिक आरोग्य यामुळे कामभावनेत बदल होऊ शकतात. तसेच लैंगिकतेबद्दल आदर, संमती, संवाद आणि परस्पर समज अत्यंत महत्त्वाची आहेत. कोणत्याही नात्यात दोघांच्या भावना आणि मर्यादा महत्त्वाच्या असतात. पुरुषाची कामभावना किंवा संभोग याकडे पाहण्याची

प्रवृत्ती आणि मानसिकता ही एकसारखी नसते. ती व्यक्तीच्या स्वभाव, संस्कार, भावनिक अनुभव, नातेसंबंध, वय, हार्मोन्स, आत्मविश्वास आणि सामाजिक वातावरण यांवर अवलंबून असते. पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन हार्मोनमुळे लैंगिक इच्छा तुलनेने अधिक तीव्र किंवा वारंवार जाणवू शकते. अनेक पुरुषांसाठी संभोग हा केवळ शारीरिक आनंद नसून ताण कमी करणे, जवळीक अनुभवणे किंवा स्वतःची स्वीकारार्हता जाणवणे, याचाही भाग असू शकतो. काही पुरुष भावना व्यक्त करण्यात कमी पडतात. त्यामुळे प्रेम किंवा आपुलकी ते शारीरिक जवळकीतून दाखवतात. काही पुरुष संभोगाला प्रेम आणि नात्यातील बांधिलकीचा भाग मानतात. काहींसाठी ते आकर्षण, उत्सुकता किंवा शारीरिक गरज यापुरते मर्यादित असू शकते. सुरक्षितता, स्वीकार आणि जोडीदाराकडून आदर मिळणे, यामुळे कामभावना अधिक संतुलित राहते. म्हणजे कामभावनेवर भावनिक व मानसिक गोष्टी परिणाम करतात. त्यावर सामाजिक प्रभाव मात्र अधिक असतो. त्यामुळे लैंगिकतेवर त्याचे गडद परिणाम जाणवतात.

समाजात 'पुरुष नेहमी तयार असतो' किंवा 'पुरुषाने पुढाकार घ्यावा' अशा कल्पना खोलवर रुजलेल्या असतात. त्यामुळे अनेक पुरुष स्वतःच्या भावना, भीती किंवा असुरक्षितता लपवतात. अश्लील माध्यमे किंवा चुकीची माहिती यामुळे वास्तव आणि अपेक्षा यांच्यात अंतर निर्माण होऊन त्याचा पुरुषाच्या कामभावनेवर परिणाम होऊ शकतो. अशावेळी नातेसंबंधात परस्पर संमती, भावनिक संवाद, जोडीदाराच्या गरजांचा आदर, विश्वास आणि सुरक्षितता या गोष्टी महत्त्वाच्या असतात. एकूणच सर्व पुरुष सारखे नसतात. काहींची कामेच्छा जास्त असते, काहींची कमी; काही भावनिक जवळीक शोधतात, तर काही अधिक शारीरिक

अनुभवाकडे झुकतात. त्यावर व्यक्तिमत्त्व आणि अनुभव यांचा मोठा प्रभाव असतो.

७. आत्मसमर्पण प्रवृत्ती – हीनभाव : हे दोन वेगवेगळे; पण अनेकदा एकमेकांशी जोडलेले मानसिक गुणधर्म असू शकतात. एखाद्या स्त्रीमध्ये हे कसे दिसू शकते, याची काही सामान्य लक्षणे अशी असू शकतात.

आत्मसमर्पण प्रवृत्ती असलेली स्त्री स्वतःच्या गरजांपेक्षा इतरांच्या इच्छांना जास्त महत्त्व देते. स्वतःचे मत स्पष्टपणे मांडत नाही. तिला 'नाही' म्हणण्यास अडचण येते. सतत इतरांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करते. इतरांवर निर्णय सोडते. नात्यात स्वतःचे हक्क मागण्यास संकोच करते. संघर्ष टाळण्यासाठी गप्प राहते. स्वतःच्या भावना दाबून ठेवते.

स्त्रीमध्ये स्वतःबद्दल कमीपणाची भावना असते. तो तिचा हीनभाव असतो. 'मी पुरेशी चांगली नाही' अशी सतत भावना व्यक्त करते. इतरांशी स्वतःची तुलना करते. कौतुक स्वीकारतांना तिला अस्वस्थ वाटते. टीकेची जास्त भीती असते. आत्मविश्वास कमी असतो. स्वतःच्या यशालाही कमी लेखते. नात्यांमध्ये स्वतःला कमी समजते, अशी काही लक्षणे काही स्त्रियांमध्ये आढळतात. दोन्ही एकत्र असतील, तर कधी कधी हीनभावामुळे स्त्री अतिशय समर्पित किंवा दबलेली भूमिका घेऊ शकते. 'माझे मत महत्त्वाचे नाही.' असे तिला वाटू शकते किंवा समोरचा रागावू नये; म्हणून ती मागे हटते. तिला स्वीकारले जावे, यासाठी तिला सतत जुळवून घ्यावे लागेल. याची काही कारणे सांगितली आहेत. जसे, बालपणीचे अनुभव, कठोर टीका किंवा दुर्लक्ष, भावनिक नियंत्रण असलेले

नाते, सामाजिक किंवा कौटुंबिक दबाव, सतत तुलना आणि आत्मविश्वास कमी करणारे अनुभव, असे काही तिच्या वाट्याला आलेले असते. मात्र प्रत्येक शांत, समंजस किंवा समर्पणाची वृत्ती असलेल्या स्त्रीमध्ये हीनभाव असतोच, असे नाही. काही स्त्रियांचा स्वभावच मृदू किंवा सहकार्यशील असतो. फरक इतकाच की, तिला स्वतःची किंमत जाणवत नाही. ती स्वतःच्या गरजा व्यक्त करू शकत नाही.

अनेकदा सतत जुळवून घेताना स्वतःला काय वाटते, काय हवे, हेच ती दडपते. समोरच्याला नाराज करायचे नाही, असा विचार ती करते. तेव्हा ती स्वतःच्या सीमा आखत नाही. मात्र सामाजिक दबावामुळे ती इतरांशी समर्पणाच्या दृष्टीने 'आत्ता मला वेळ नाही', 'हे मला सोयीचे नाही', 'मी विचार करून सांगते' अशी बचावात्मक, पण ठाम भूमिका घेते. 'मी काहीच करू शकत नाही. माझ्यामुळेच सगळे बिघडते', अशी स्वतःबद्दलची नकारात्मक भाषा बोलते. कारण कधी-कधी बालपणातील टीका, दुर्लक्ष, नियंत्रक नाती किंवा भावनिक दुखापती यांमुळे ही प्रवृत्ती तयार होते. ते समजून घेतल्याने स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो; परंतु स्त्रिया त्या विचारांपर्यंत फारशा पोहोचत नाहीत. संस्कारांचा भाग म्हणून त्याकडे पाहतात आणि स्वतःच्या भावना दडपून ठेवतात.

पुरुषामधील आत्मविश्वास, स्वाभिमान, असुरक्षितता, प्रेम, भीती, अशा अनेक भावनांचा प्रभाव असतो. पुरुषाच्या मानसिकतेतही या भावना वेगवेगळ्या प्रकारे कार्य करतात. त्यापैकी 'आत्मसमर्पण प्रवृत्ती' आणि 'हीनभावना' या दोन मानसिक प्रवृत्ती एकत्र आल्यास पुरुषाच्या विचारसरणीवर, वागणुकीवर आणि नातेसंबंधांवर खोल परिणाम होतो.

अशा पुरुषाचा स्वभाव बाहेरून शांत, समंजस आणि नम्र दिसत असला, तरी आतून तो असुरक्षितता, कमीपणा आणि स्वीकार मिळवण्याच्या विचारात असू शकतो.

हीनभावना म्हणजे स्वतःला इतरांपेक्षा कमी समजणे. अशा पुरुषाला 'तो पुरेसा सक्षम, आकर्षक, बुद्धिमान किंवा महत्त्वाचा नाही.', असे सतत वाटत राहते. तो स्वतःची तुलना इतरांशी करतो आणि बहुतेक वेळा स्वतःलाच कमी लेखतो. त्याच्या मनात 'मी योग्य नाही', 'माझ्यात काहीतरी कमी आहे' किंवा 'लोक मला नाकारतील' अशा भावना खोलवर रुजलेल्या असतात. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास कमी होतो आणि स्वतःबद्दल आदराची भावना दुर्बल बनते. या हीनभावनेमुळे पुरुषामध्ये आत्मसमर्पणाची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. तो समोरच्या व्यक्तीला विरोध करण्याऐवजी सहज मान्य करतो. स्वतःचे मत, इच्छा किंवा भावना व्यक्त करण्याऐवजी तो त्या दाबून ठेवतो. त्याला संघर्ष, वाद किंवा नकार यांची भीती वाटत असल्यामुळे तो अनेकदा शांत राहणे पसंत करतो. नातेसंबंध टिकून राहावेत, समोरची व्यक्ती नाराज होऊ नये किंवा आपल्याला सोडून जाऊ नये; म्हणून तो स्वतःच्या गरजांकडे दुर्लक्ष करतो. काही वेळा तो स्वतःचे नुकसान सहन करूनही दुसऱ्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करतो. कारण अशा पुरुषाला स्वीकार, कौतुक आणि भावनिक सुरक्षिततेची तीव्र गरज असते. कोणी त्याचे कौतुक केले किंवा त्याला महत्त्व दिले, तर त्याला स्वतःची किंमत असल्याची भावना निर्माण होते. त्यामुळे तो अनेकदा लोकांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करतो.

विशेषतः आत्मविश्वासी, प्रभावी किंवा अधिकारशाली लोकांसमोर तो पटकन झुकतो. कारण 'समोरची व्यक्ती अधिक सक्षम आहे आणि आपण तिच्यापेक्षा कमी आहोत.', असे त्याला वाटते. त्यामुळे त्याचा स्वभाव अत्यंत समर्पित वाटू शकतो. बाहेरून पाहता असा पुरुष शांत, नम्र, समजूतदार आणि निष्ठावान वाटतो. तो कमी बोलणारा, भांडण टाळणारा आणि समोरच्याला जास्त महत्त्व देणारा असतो; परंतु आतून त्याच्या मनात असुरक्षितता आणि भीती दडलेली असते. त्याला स्वतःची मते ठामपणे मांडतांना संकोच वाटतो. निर्णय घेतांना आत्मविश्वास नसल्यामुळे तो अनेकदा दुसऱ्यांवर अवलंबून राहतो. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास नसल्यामुळे तो मोठे निर्णय घेण्यास घाबरतो.

राग किंवा दुःख व्यक्त करण्याची पद्धतही अशा पुरुषामध्ये वेगळी दिसते. तो उघडपणे राग व्यक्त करत नाही. उलट तो भावना मनात दाबून ठेवतो. कारण 'विरोध केला तर नाते तुटेल किंवा लोक आपल्याला नाकारतील.', असे त्याला वाटते. त्यामुळे तो स्वतःलाच दोष देतो, गप्प राहतो किंवा मनातच त्रास सहन करतो. काही वेळा दीर्घकाळ दडपलेल्या भावना अचानक नैराश्य, मानसिक ताण किंवा आतल्याआत रागाच्या रूपाने बाहेर येऊ शकतात. अशा मानसिकतेची कारणे अनेक असू शकतात. बालपणी सतत तुलना होणे, अपमानास्पद अनुभव, कुटुंबातील कठोर वातावरण, प्रेम किंवा कौतुकाचा अभाव, वारंवार अपयश किंवा नात्यांमधील असुरक्षितता यांमुळे पुरुषामध्ये हीनभावना निर्माण होऊ शकते.

समाजामध्ये 'पुरुष नेहमी मजबूत असावा' अशी अपेक्षा असल्यामुळे तो स्वतःच्या कमकुवत भावना व्यक्त करू शकत नाही. परिणामी त्याच्या मनातील भीती आणि कमीपणा आणखी वाढत जातो. मात्र ही अवस्था कायमची असते, असे नाही. योग्य आत्मजाणीव, स्वतःबद्दल आदर निर्माण करणे, स्वतःचे मत व्यक्त करण्याचा सराव, भावनिक समतोल आणि सकारात्मक नातेसंबंध यांच्या मदतीने पुरुष या मानसिकतेत बदल घडवू शकतो. आत्मविश्वास वाढल्यावर त्याची समर्पणाची प्रवृत्ती अतिरेकी राहत नाही आणि तो स्वतःच्या भावना व गरजांनाही महत्त्व देऊ लागतो. अशाप्रकारे पुरुषामधील आत्मसमर्पण प्रवृत्ती आणि हीनभावना या एकमेकांशी जोडलेल्या मानसिक अवस्था आहेत. या प्रवृत्तीमुळे तो बाहेरून शांत आणि समंजस दिसला, तरी आतून तो स्वतःची किंमत, स्वीकार आणि सुरक्षितता शोधत असतो. तेव्हा त्याची आत्महीनतेची भावना कमी होऊ शकते.

८. जिज्ञासा प्रवृत्ती – आश्चर्य : 'जिज्ञासा प्रवृत्ती' म्हणजे नवीन गोष्टी जाणून घेण्याची, समजून घेण्याची आणि अनुभवण्याची नैसर्गिक इच्छा होय. 'आश्चर्य' ही भावना त्या प्रवृत्तीला चालना देते. 'अनेक स्त्रियांमध्ये निरीक्षणशक्ती, भावनिक सूक्ष्मता आणि नातेसंबंध समजून घेण्याची उत्सुकता अधिक असते.', असे स्त्रीच्या सहजप्रवृत्तीबाबत मानसशास्त्र आणि समाजशास्त्रात असे मानले जाते. त्यामुळे त्यांच्यात जिज्ञासा आणि आश्चर्याची प्रतिक्रिया ठळकपणे प्रकट होते. एखादी नवीन गोष्ट पाहिली की, तिच्यामागचे कारण जाणून घेण्याची इच्छा होणे, लोकांच्या भावना, बोलणे आणि वर्तनातील सूक्ष्म बदल पटकन ओळखणे, घर, कुटूंब, नाती आणि सामाजिक वातावरण याबद्दल सतत कुतूहल वाटणे, सौंदर्य, कला,

निसर्ग आणि भावनिक अनुभव यांबद्दल विशेष आकर्षण वाटणे आणि 'हे असे का घडले?' किंवा 'यामागचा अर्थ काय?' असे प्रश्न मनात येणे, अशी काही स्त्रीच्या जिज्ञासा प्रवृत्तीची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत; परंतु जिज्ञासा ही सर्व मानवांमध्ये असणारी मूलभूत मानसिक प्रवृत्ती असल्याने व्यक्तीनुसार बदलते.

पुरुषामध्ये जिज्ञासा प्रवृत्ती ही अनेकदा शोधक, तर्कप्रधान आणि कृतीकेंद्री स्वरूपात दिसून येते. नवीन गोष्टी समजून घेणे, समस्या सोडवणे आणि एखाद्या गोष्टीचे कार्य कसे चालते हे जाणून घेण्याची त्याची नैसर्गिक ओढ असते. तर आश्चर्य ही भावना त्याच्या मनात शोध, प्रयोग आणि आव्हान स्वीकारण्याची प्रेरणा निर्माण करते. एखाद्या गोष्टीमागील तांत्रिक किंवा व्यवहारिक कारण शोधण्याची इच्छा, नवीन साधने, यंत्रे, तंत्रज्ञान किंवा कल्पना समजून घेण्याकडे आकर्षण, समस्या आल्यास 'हे कसे सोडवता येईल?' असा विचार करणे, साहस, शोध, स्पर्धा आणि अनुभव यांविषयी उत्सुकता, एखाद्या विषयात खोलवर माहिती मिळवण्याची वृत्ती, निरीक्षणातून निष्कर्ष काढणे आणि त्यावर कृती करण्यासाठी धडपड करणे, तसेच आव्हानात्मक परिस्थितीत नवीन उपाय शोधण्याचा प्रयत्न करणे, अशी त्याची प्रवृत्ती असते. अर्थात, आश्चर्यामुळे पुरुषाच्या मनात अनेकदा शोध घेण्याची आणि समजून घेऊन जिंकण्याची प्रेरणा जागृत होते. त्यामुळे त्याची जिज्ञासा ज्ञान, कौशल्य आणि अनुभव वाढविण्याकडे अधिक केंद्रित झालेली असते.

९. आत्मविधान प्रवृत्ती – अहंभाव : आत्मविधान प्रवृत्ती म्हणजे स्वतःचे अस्तित्व, महत्त्व, क्षमता आणि व्यक्तिमत्त्व प्रस्थापित करण्याची प्रवृत्ती.

अहंभाव म्हणजे स्वतःबद्दलची जाणीव आणि स्वमहत्त्वाची भावना. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अहंकारवृत्ती म्हणजे व्यक्तीची स्वतःबद्दलची मानसिक प्रतिमा, स्वतःचे महत्त्व आणि इतरांकडून मान्यता मिळवण्याची गरज. ही वृत्ती स्त्री-पुरुष दोघांमध्येही असते; पण तिची अभिव्यक्ती अनेकदा वेगवेगळ्या प्रकारे दिसून येते. स्त्री अनेकदा नातेसंबंध, भावना आणि स्वीकार यांमधून स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करते. तिचा अहंभाव, प्रेम, आदर, जिव्हाळा आणि भावनिक मान्यता यांच्याशी जोडलेला असू शकतो. स्वतःची किंमत तिला 'मी इतरांसाठी किती महत्त्वाची आहे' यामधून जाणवते. स्वतःचे मत मांडतांना ती समन्वय आणि संवेदनशीलता जपण्याचा प्रयत्न करू शकते. तिच्या आत्मविधानात काळजी घेणे, जपणे आणि भावनिक आधार देणे यांचा प्रभाव दिसून येतो.

स्त्रीच्या संदर्भात कधी-कधी बाहेरून दिसणारा अहंकार हा प्रत्यक्षात स्वतःचे संरक्षण करण्याचा मार्ग असतो. जसे, सतत कमी लेखले जाणे, भावनिक दुखापती, मान्यता न मिळणे व नात्यांतील असुरक्षितता यांमुळे ती स्वतःभोवती मानसिक कवच तयार करते. विशेषतः भावनिक नात्यांत आपल्याला समजून घ्यावे, कौतुक करावे, महत्त्व द्यावे, अशी तिला गरज असते. ही गरज पूर्ण न झाल्यास राग, हट्टीपणा, दुर्लक्ष करणे व भावनिक अंतर ठेवणे अशा प्रतिक्रिया दिसू शकतात. परिस्थिती किंवा नाते आपल्या नियंत्रणात असावे, असे तिला वाटते. हे नेहमी वर्चस्वासाठीच असते, असे नाही. अनेकदा ते सुरक्षिततेची गरज, अनिश्चिततेची भीती आणि पूर्वानुभवातील अस्थिरता यातून निर्माण होते. समाजात सौंदर्य, यश, नाती आणि करिअर यांच्या आधारावर स्त्रियांचे अधिक मूल्यांकन केले जाते. त्यामुळे स्वतःची इतरांशी तुलना करणे, श्रेष्ठ दिसण्याचा प्रयत्न करणे,

टीका सहन न होणे अशा गोष्टी वाढू शकतात. 'मी बरोबर आहे' ही भावना तिला टिकवायची असते. चूक मान्य करणे कठीण वाटते, माफी मागणे अवघड जाते आणि स्वतःची बाजू सतत योग्य वाटते. हे फक्त स्त्रियांमध्येच नाही, तर सर्व मानवांमध्ये दिसून येते.

पुरुष अनेकदा कार्य, यश, क्षमता, नेतृत्व आणि स्वतंत्र ओळख यांमधून स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. त्याचा अहंभाव 'मी काय करू शकतो', 'मी किती सक्षम आहे' याभोवती अधिक केंद्रित असू शकतो. स्पर्धा, नियंत्रण, निर्णयक्षमता आणि कर्तृत्व यांतून आत्मविश्वास व्यक्त होतो. स्वतःचे मत ठामपणे मांडण्याची प्रवृत्ती अधिक दिसू शकते. सामाजिक स्थान, यश किंवा अधिकार यांमधून स्वतःचे महत्त्व जाणवण्याची शक्यता अधिक असते. स्वतःचे मत, क्षमता, अस्तित्व आणि मर्यादा ठामपणे मांडण्याची स्वाभिमानी प्रवृत्ती त्याच्यात असते. मात्र स्वतःचे महत्त्व अतिशयोक्तीने अनुभवणे किंवा स्वतःला श्रेष्ठ समजणे, हा त्याचा अहंकार असतो.

लहानपणापासून त्याला मजबूत राहा, जिंका, भावना कमी दाखवा, यशस्वी व्हा, असे शिकविल्यामुळे तो स्वतःची किंमत कामगिरीशी जोडतो. करिअर, पैसा, निर्णयक्षमता, सामाजिक प्रतिष्ठा, यांतून त्याचे आत्मविधान वाढते. स्वतः निर्णय घेण्याची इच्छा, हस्तक्षेप न आवडणे, कमकुवत दिसण्याची भीती, अशा प्रतिक्रिया तो अहंभावामुळे देतो. आत्मविश्वास, इतरांचाही आदर, चूक मान्य करण्याची तयारी आणि स्थिर व्यक्तिमत्त्व हे स्वाभिमानी पुरुषाचे गुण असतात. अहंकारी पुरुष श्रेष्ठत्वाची भावना बाळगतो. इतरांना कमी लेखतो. त्याला चूक स्वीकारणे कठीण जाते. तो

आपल्या असुरक्षिततेवर पडदा टाकतो. विशेषतः अतिअहंकार अनेकदा आतल्या असुरक्षिततेला झाकण्यासाठी तयार झालेले मानसिक कवच असते; परंतु प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, संस्कार, अनुभव आणि परिस्थिती यांनुसार या प्रवृत्ती वेगवेगळ्या प्रकारे प्रकट होऊ शकतात. त्यामुळे आपण व्यक्तीला ओळखून ते पारखू शकतो.

१०. संघ प्रवृत्ती – एकाकीभाव : स्त्री स्वभावतः भावनिक, संवेदनशील आणि नातेसंबंध जपणारी असते. त्यामुळे तिच्यात संघ प्रवृत्ती अधिक प्रमाणात दिसून येते. ती कुटूंब, मैत्री, समाज आणि नात्यांमध्ये रमणारी असते. इतरांशी संवाद साधणे, सहकार्य करणे, भावना व्यक्त करणे आणि आपलेपण टिकवणे, हे तिच्या स्वभावाचे महत्त्वाचे गुण असतात; परंतु जेव्हा तिला अपेक्षित प्रेम, समजून घेणे किंवा साथ मिळत नाही, तेव्हा तिच्यात एकाकीभाव निर्माण होऊ शकतो. भावना व्यक्त न होणे, दुर्लक्ष, तणाव किंवा नात्यांतील दुरावा, यांमुळे ती मानसिकदृष्ट्या एकटी पडल्यासारखे अनुभवू शकते. अशा वेळी ती शांत राहणे, स्वतःमध्येच गुंतून जाणे किंवा भावनिक असुरक्षितता अनुभवणे यांसारख्या प्रतिक्रिया देऊ शकते.

पुरुषामध्येही संघ प्रवृत्ती आणि एकाकीभाव आढळतो; पण त्याची अभिव्यक्ती स्त्रीपेक्षा थोडी वेगळी असते. पुरुष सामान्यतः स्वतःला मजबूत, स्थिर आणि स्वावलंबी दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे तो भावना कमी व्यक्त करतो. तरीही त्याला मित्रमंडळी, कामाचे गट, समाज किंवा कुटूंब, यांच्याशी जोडलेले राहण्याची गरज असते. त्याची संघ प्रवृत्ती सहकार्य, नेतृत्व, जबाबदारी आणि संरक्षण या रूपांत अधिक दिसते; परंतु

जेव्हा त्याला अपयश, ताण, भावनिक आधाराचा अभाव किंवा नात्यांतील दुरावा अनुभवावा लागतो, तेव्हा त्याच्यात एकाकीभाव निर्माण होतो. अनेकदा पुरुष हा एकाकीपणा उघडपणे व्यक्त करत नाही. तो शांत राहणे, स्वतःमध्ये गुंतून जाणे, कामात रमणे किंवा लोकांपासून दूर राहणे, अशाप्रकारे प्रतिक्रिया देऊ शकतो. मात्र सगळेच पुरुष असे असतात, असे म्हणता येत नाही. प्रत्येकाचा स्वभाव हा भिन्न असतो.

११. अन्नसंशोधन प्रवृत्ती – क्षुधा : भूक ही मूलभूत जैविक गरज असून, भूक लागल्यावर शरीराला ऊर्जा, पोषण आणि आरोग्य टिकवण्यासाठी अन्नाची आवश्यकता जाणवते. त्यामुळे स्त्री भूक भागवण्यासाठी अन्न मिळवण्याचा प्रयत्न करते. कुटुंबाच्या आरोग्याशी संबंधित अन्ननिवड करून पोषणाची जाणीव ठेवते. अनेकदा स्त्रिया अन्नाला प्रेम, काळजी आणि जिव्हाळ्याशी जोडून भावनिक संबंध राखतात. स्वतःबरोबरच कुटुंबातील इतरांच्या अन्नाचीही काळजी घेतात. तिच्या आहाराच्या सवयींवर संस्कार, परंपरा आणि समाजाचा प्रभाव असतो. अर्थात मानसशास्त्रानुसार ही प्रवृत्ती केवळ शारीरिक गरज नसून भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांशीही संबंधित असते.

पुरुषामध्येही अन्न प्राप्त करण्याची इच्छा असते. भूक भागवण्यासाठी तो अन्न शोधतो. पुरुषाला शारीरिक ऊर्जेची गरज अधिक मानली जाते. त्यामुळे काम, श्रम किंवा हालचालींसाठी अधिक ऊर्जा मिळवण्याची प्रवृत्ती दिसते. तसेच आवडीनुसार अन्न निवडण्याची प्रवृत्ती असते. काही वेळा

जास्त प्रमाणात किंवा शक्तिवर्धक अन्नाचे आकर्षण निर्माण होते. मित्रपरिवार, जीवनशैली व संस्कृतीनुसार आहाराच्या सवयी बदलत असतात. स्पर्धात्मक, सक्रिय स्वभावाचा आणि सामाजिक वातावरणाचा त्याच्यावर प्रभाव असतो. एकूणच मानसशास्त्राच्या दृष्टीने पुरुष आणि स्त्री दोघांचीही भूक ही मूलभूत जैविक प्रवृत्ती आहे; पण सामाजिक, सांस्कृतिक आणि वैयक्तिक सवयींमुळे त्यामध्ये फरक दिसून येतो.

१२. निर्माण प्रवृत्ती – कर्तृत्वभाव : स्त्रीमध्ये नैसर्गिकरीत्या निर्माणविषयक प्रवृत्ती अधिक प्रमाणात आढळते. ती केवळ नवीन गोष्टी निर्माण करण्यापुरती मर्यादित नसून संगोपन, संवर्धन आणि विकास यांशीही संबंधित असते. घर, कुटूंब, समाज आणि संस्कृती यांचे जतन व उभारणी करण्यात स्त्री महत्त्वाची भूमिका बजावते. स्त्रीमध्ये जबाबदारीची जाणीव प्रबळ असते. ती कार्य करतांना संवेदनशीलता, सहकार्य आणि समन्वय यांना महत्त्व देते. कुटुंबातील विविध भूमिका पार पाडताना ती कर्तव्यनिष्ठ व संयमी राहते. शिक्षण, कला, विज्ञान, उद्योग, राजकारण, अशा अनेक क्षेत्रांत स्त्रिया आपल्या कर्तृत्वाने स्वतःची ओळख निर्माण करीत आहेत. त्यामुळे त्यांची कर्तृत्वशक्ती वाढत गेलेली दिसते.

पुरुषामध्येही निर्माण प्रवृत्ती महत्त्वाची मानली जाते. तो नवीन कल्पना, संशोधन, तंत्रज्ञान, उद्योग आणि समाजरचना यांत योगदान देण्याचा प्रयत्न करतो. समाजाच्या प्रगतीसाठी पुरुषाची कार्यक्षमता, धाडस आणि निर्णयक्षमता उपयुक्त ठरते. पुरुषामध्ये सामान्यतः कर्तृत्व सिद्ध करण्याची इच्छा प्रबळ असते. तो कार्य करतांना ध्येय, स्पर्धा आणि नेतृत्व यांना महत्त्व देतो.कुटूंब आणि समाजासाठी जबाबदाऱ्या पार पाडतांना तो संरक्षक व

कर्तव्यदक्ष भूमिका निभावतो. विविध क्षेत्रांत पुरुष आपल्या मेहनत, आत्मविश्वास आणि जिद्दीने प्रगती साधतो. अर्थातच स्त्री आणि पुरुष दोघांच्याही निर्माण प्रवृत्ती व कर्तृत्वभाव समाजासाठी पूरक असतात.

१३. संपादन प्रवृत्ती – स्वामित्वभाव किंवा श्रेष्ठ असण्याची भावना :

स्त्रीमध्ये संपादन प्रवृत्ती (Possessiveness) किंवा 'मी श्रेष्ठ, नियंत्रक आहे' अशी भावना अनेक स्तरांवर दिसून येते. ही भावना साधारणपणे भावनिक जुळवणूक, असुरक्षितता, प्रेम किंवा नियंत्रणाची गरज यांतून निर्माण होते. जोडीदाराने इतर महिलांशी जास्त जवळीक ठेवू नये, अशी अपेक्षा असते. 'माझ्यासाठी वेळ द्यावा', हा तिचा आग्रह असतो. नात्यात विशेष स्थान हवे, सतत संपर्क, लक्ष किंवा खात्री असावी, असे तिला वाटते. कधी मत्सर, राग किंवा दुखावलेपणा जाणवतो. भावनिक गुंतवणूक जास्त असल्याने गमावण्याची भीती, फसवणूक, दुर्लक्ष, आत्मविश्वासाचा अभाव किंवा आसक्तीची शैली / भावनिक जुळवणीची शैली, यांसारखे तिचे पूर्वानुभव असल्याने तिच्यात स्वामित्वभाव निर्माण होतो.

काही स्त्रियांमध्ये स्वतःचे मत, क्षमता किंवा सामाजिक स्थान यांमुळे 'मी अधिक योग्य' अशी भावना असू शकते. ती निर्णयांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करते. स्वतःचे मत अंतिम मानते. जोडीदाराला कमी लेखते. भावनिक किंवा बौद्धिक वरचष्मा दाखवते. 'माझ्याशिवाय हे होणार नाही' असा दृष्टिकोन बाळगते; पण काही वेळा हे खरे श्रेष्ठत्व नसून स्वतःचे संरक्षण करण्याची पद्धत असते. पूर्वी दाबल्या गेलेल्या भावना, स्वावलंबन सिद्ध करण्याची गरज, समाजातील अनुभवांमुळे तयार झालेली

बचावात्मक भूमिका, प्रेम आणि नियंत्रण यांतील फरक, तसेच काळजी आणि possessiveness यांमधील सूक्ष्म फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. एकूणच मानसशास्त्रात याचा संबंध नात्यांमध्ये आपण भावनिकदृष्ट्या कसे जोडतो, विश्वास कसा ठेवतो, जवळीक किंवा दूरावा कसा हाताळतो, स्वतःचे अस्तित्व, मूल्य आणि पात्रता यांविषयीची भावना, तसेच दोघांमध्ये कोणाचा प्रभाव जास्त आहे, कोण जास्त ऐकून घेतो आणि कोणाला दुसऱ्याची अधिक गरज वाटते, या नात्यातील अप्रत्यक्ष समतोलाशी जोडला जातो.

संपादन प्रवृत्ती आणि श्रेष्ठत्व किंवा स्वामित्वभाव पुरुषांमध्येही वेगवेगळ्या प्रकारे दिसून येतो. तो केवळ वैयक्तिक स्वभावामुळे नसून संस्कार, समाजरचना, आत्मविश्वास, भीती आणि नात्यांतील अनुभव यांचाही परिणाम असतो. पुरुष अनेकदा प्रेम, सुरक्षितता, नियंत्रण किंवा गमावण्याच्या भीतीमुळे पझेसिव्ह होऊ शकतो. जोडीदार कुणाशी बोलते, भेटते यावर लक्ष ठेवणे, 'कुठे आहेस?', 'कोणासोबत आहेस?' अशी सतत माहिती हवी असणे, इतर पुरुषांबद्दल मत्सर वाटणे, कपडे किंवा वागणुकीबाबत हेवा वाटणे, 'ती माझी आहे' असा दृष्टिकोन ठेवून तिच्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे, अशा स्वरूपाचा स्वामित्वभाव त्याच्यात दिसून येतो. यामागे असुरक्षितता, आत्मविश्वासाचा अभाव, नाते तुटण्याची भीती तसेच 'रक्षणकर्ता' किंवा 'मालक' अशा परंपरागत कल्पना रूढ झालेल्या असणे, ही कारणे असू शकतात. म्हणजेच 'ती व्यक्ती फक्त माझीच आहे' या भावनेतून तिच्यावर अधिक हक्क, नियंत्रण किंवा पकड ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

काही पुरुषांमध्ये 'मी निर्णय घेणारा', 'मी वरचढ' अशी श्रेष्ठत्वाची किंवा स्वामित्वाची भावना असते. त्यावेळी स्वतःचे मत अंतिम मानणे, स्त्रीच्या निर्णयांना कमी महत्त्व देणे, आर्थिक किंवा सामाजिक शक्तीचा वापर करून नियंत्रण ठेवणे, भावना व्यक्त न करता अधिकार गाजवणे, 'पुरुष म्हणून माझे ऐकलेच पाहिजे' अशी अपेक्षा करणे, या त्याच्या वृत्ती बनतात. यामागे पितृसत्ताक संस्कार, अहंकार, स्वतःची ओळख नियंत्रणाशी जोडलेली असणे आणि भावनिक कमकुवतपणा लपवण्याची सवय, ही कारणे असू शकतात. अशाप्रकारे स्त्री असो वा पुरुष, स्वामित्वाची भावना आणि श्रेष्ठत्व या भावना व्यक्तीच्या असुरक्षितता, आसक्ती, अहम् आणि सामाजिक कंडिशनिंग यांतून निर्माण होतात.

१४. हास्य प्रवृत्ती – विनोदभाव : स्त्रीच्या स्वभावातील हास्यप्रवृत्ती ही तिच्या संवेदनशील, प्रेमळ आणि समंजस व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. विनोदभावामुळे स्त्री घरातील वातावरण आनंदी व प्रसन्न ठेवते. ती छोट्या-छोट्या प्रसंगांतूनही आनंद शोधते आणि इतरांनाही हसवण्याचा प्रयत्न करते. स्त्रीचा विनोद साधारणतः कोमल, मनाला न दुखावणारा आणि आपुलकी निर्माण करणारा असतो. ती कुटुंबातील तणाव कमी करण्यासाठी हलक्या-फुलक्या बोलण्याचा उपयोग करते. आई, बहीण, पत्नी किंवा मैत्रीण या नात्यांत तिचा विनोदभाव नात्यांना अधिक घट्ट बनवतो.

आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, नोकरी, कला, साहित्य आणि मनोरंजन क्षेत्रांतही आपल्या उत्कृष्ट विनोदबुद्धीने विशेष ओळख निर्माण करत आहेत. स्टँड-अप कॉमेडी, लेखन, अभिनय अशा क्षेत्रांत अनेक महिला

प्रभावीपणे कार्य करताना दिसतात. असे असले तरी स्त्रीचा विनोद हा नेहमीच मर्यादित, सुसंस्कृत आणि संवेदनशील असावा, अशी समाजाची अपेक्षा असते. हास्यप्रवृत्ती ही स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला आनंद, आत्मविश्वास आणि सामाजिक सौहार्द प्रदान करणारे महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य आहे; परंतु समाजाने तिच्या या प्रवृत्तीला स्त्रीसभ्यतेशी जोडल्यामुळे स्त्रिया अनेकदा मर्यादा पाळतात. ती चारचौघांत मोकळेपणाने हास्यप्रवृत्ती व्यक्त करत नाहीत. कारण 'लोक काय म्हणतील?' ही भीती त्यांना वाटत असते.

पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वात हास्यप्रवृत्तीला विशेष महत्त्व असते. विनोदभावामुळे पुरुष अधिक मैत्रीपूर्ण, आत्मविश्वासी आणि सामाजिक बनतो. तो आपल्या बोलण्यातून, कृतीतून किंवा प्रसंगानुसार केलेल्या विनोदातून इतरांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न करतो. त्याचा विनोदभाव अनेकदा उत्साही आणि प्रसंगी टोमणे मारणारा असू शकतो. मित्रमंडळींमध्ये हसत-खेळत वातावरण निर्माण करणे, ताणतणाव कमी करणे आणि कठीण परिस्थितीतही सकारात्मकता टिकवणे, हे त्याच्या हास्यप्रवृत्तीचे वैशिष्ट्य मानले जाते. कुटुंबात व समाजात त्याचा विनोदभाव नात्यांना हलकेपणा आणि आनंद देतो. वडील, भाऊ, पती किंवा मित्र या भूमिकांमध्ये तो विनोदाच्या माध्यमातून जवळीक वाढवतो; परंतु चारचौघांत विनोद करताना इतरांच्या भावना दुखावतील असे व्यंगात्मक विनोदही काही पुरुष करतात. त्याच्या विनोदाचा अतिरेक किंवा उपहासात्मक स्वरूप नात्यांमध्ये दुरावा निर्माण करू शकतो. तसेच अनेक पुरुष कला, अभिनय, लेखन, नाटक, चित्रपट आणि स्टँड-अप कॉमेडी यांसारख्या क्षेत्रांत आपल्या विनोदबुद्धीमुळे प्रसिद्ध झाले आहेत. अर्थातच हास्यप्रवृत्ती ही पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वातील आनंद, आत्मविश्वास आणि

सामाजिक संवाद अधिक प्रभावी करणारी महत्त्वाची प्रवृत्ती आहे. जैविक आणि सामाजिक अशा दोन्ही अंगांनी स्त्री-पुरुष यांच्या वागण्याच्या पद्धती घडत असल्याचे दिसून येते.

अ-स्त्रीचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

स्त्री आणि पुरुष ही निसर्गनिर्मित भिन्न जैविक रचना असून सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात त्यांची झालेली जडणघडण, यांमुळे त्यांचे स्वभाव, गुणधर्म आणि जीवनविषयक दृष्टिकोन वेगवेगळे बनलेले आहेत. त्यांच्या विचार करण्याच्या पद्धती आणि भावना भिन्न असून त्यांच्या वर्तनपद्धतीही वेगळ्या आहेत. काही मानसतज्ज्ञ आणि विचारवंत यांच्या मतांच्या आधारे येथे त्याचे विश्लेषण केलेले आहे.

ऑर्थर शोपेनहावर या १९व्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञाने On Women (Über die Weiber-१८५१) हा स्त्रियांविषयी एक वादग्रस्त निबंध लिहिला आहे. त्यामध्ये त्यांनी स्त्रियांच्या स्वभाव, विवाह, प्रेम आणि समाजातील भूमिकेविषयी आपला दृष्टिकोन मांडलेला आहे. शोपेनहावर यांच्या मते, 'स्त्रिया भावनिक आणि तात्कालिक विचार करणाऱ्या असतात. त्यांच्यात दीर्घकालीन तर्कशक्ती आणि तत्त्वचिंतनाची क्षमता कमी असते. त्यामुळे त्या व्यवहारकुशल असल्या तरी उच्च बौद्धिक कार्यासाठी योग्य नसतात.' असे सांगून ते स्त्रियांना 'बालिश' आणि 'दूरदृष्टी नसलेल्या' असे संबोधतात. तसेच स्त्रियांचे अस्तित्व मुख्यतः संततीनिर्मिती आणि संगोपनासाठी आहे,

स्त्री-पुरुष आकर्षण हे वैयक्तिक प्रेम नसून निसर्गाची युक्ती आहे, म्हणजेच प्रेमामागे जैविक उद्देश कार्यरत असतो, असे ते म्हणतात. त्यांच्या मते, "जगण्याची आणि प्रजाती टिकवण्याची अंध प्रेरणा स्त्रीच्या ठिकाणी असते. समाजातील स्त्रियांची भूमिका स्पष्ट करतांना त्यांनी 'स्त्रियांची प्राथमिक भूमिका घर आणि मुलांभोवती असावी; राजकारण, तत्त्वज्ञान किंवा नेतृत्वासाठी पुरुष अधिक योग्य आहेत," हे विचार त्या काळातील पितृसत्ताक सामाजिक रचनेचे प्रतिबिंब मानले जात असले, तरी आजही लिंगभावभेदाच्या दृष्टीने समाजात त्यांचे काही अंश अस्तित्वात असल्याचे दिसून येते.

'स्त्रियांचे सौंदर्य हे वस्तुनिष्ठ नसून लैंगिक आकर्षणामुळे निर्माण झालेला भास आहे. निसर्ग पुरुषांना आकर्षित करून प्रजोत्पादन घडवून आणतो,' असे स्त्रीचे सौंदर्य आणि त्याबद्दलचे आकर्षण त्यांनी सांगितले आहे. त्यांचे एकूण विचार उपरोधिक, निराशावादी आणि अनेकदा स्त्रीद्वेषी मानले जातात. मात्र त्याविषयीची प्रत्येकाची अनुभूती आज वेगवेगळी असू शकते. आजच्या काळात हा निबंध स्त्रीद्वेषी मानला जात असल्यामुळे या निबंधावर आधुनिक स्त्रीवादी विचारवंतांनी कठोर टीका केली आहे. बहुतेक स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, हा निबंध केवळ जुनाट नाही, तर स्त्रियांना कमी लेखणारा आणि पितृसत्ताक सत्तेला वैचारिक आधार देणारा असल्याचे म्हटले आहे. 'स्त्रिया स्वभावतः भावनिक, कमी तर्कशुद्ध आणि घरकेंद्री असतात,' असे शोपेनहावरने स्त्रियांचे नैसर्गिक स्वरूप सांगितले. तर हे 'नैसर्गिक' नसून सामाजिक संस्कारांचे परिणाम आहेत. स्त्रियांना शिक्षण, सत्ता आणि स्वातंत्र्य नाकारले गेले; त्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला शोपेनहावरने 'स्वभाव' समजले, असा विरोध सीमोन द

बोव्हा यांनी केला. मात्र 'स्त्री म्हणून जन्म होत नाही; समाज स्त्री बनवतो.', हे त्यांनी मान्य केले.

स्त्री म्हणजे 'प्रजोत्पादन' या दृष्टिकोनावर स्त्रीवादी म्हणतात की, 'स्त्री ही केवळ जैविक भूमिका निभावणारी व्यक्ती नाही; ती स्वतंत्र बुद्धिमत्ता, इच्छा आणि ओळख असलेली व्यक्ती आहे.' तर आधुनिक स्त्रीवाद म्हणतो, 'स्त्रीला 'माणूस' म्हणून न पाहता 'कार्य' म्हणून पाहणे ही वस्तूकरणाची प्रक्रिया आहे.'; परंतु सर्व समाजाने आतापर्यंत स्त्रीला साधनच समजले आहे. 'लिंगाशी जोडलेल्या भूमिका मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक अभिनय असतात; त्या जन्मजात निश्चित नसतात,' असे ज्यूडिथ बटलर यांच्यासारख्या विचारवंताचे मत पाहिले की त्याची खात्री पटते. 'प्रेमामागील अवचेतन प्रेरणा, सामाजिक मुखवटे, लैंगिकतेतील सत्तासंबंध यांचे त्याने केलेले विश्लेषण पुढे मानसशास्त्र आणि सांस्कृतिक अभ्यासात उपयोगी पडले.' हेही मानवी इच्छांबद्दलचे त्यांचे निरीक्षण महत्त्वाचे मानले आहे. त्यामुळे काही स्त्रीवादी त्याला पूर्णपणे नाकारत नाहीत. 'त्याचे लेखन वस्तुनिष्ठ तत्त्वज्ञान नसून वैयक्तिक कटुतेने रंगलेले आहे,' असेही स्त्रीवादी म्हणतात. काही आधुनिक अभ्यासक शोपेनहावरचे स्त्रीविषयक निष्कर्ष चुकीचे मानतात. मात्र तो विरोध हा स्त्रीच्या पूर्ण स्वातंत्र्याच्या दृष्टीने स्त्रीवादी विचार म्हणून मान्य केला जातो. परंतु शोपेनहावरचे निष्कर्ष आज मोठ्या प्रमाणावर नाकारले जात असले, तरी सामाजिक वास्तव समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे.

अशाप्रकारे स्त्रीस्वभावाबद्दल अनेक तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. ही मते त्यांच्या काळ, संस्कृती

आणि वैयक्तिक अनुभवांवर आधारित आहेत. त्यामुळे काही विचार आजच्या दृष्टीने प्रगत वाटतात, तर काही मर्यादित किंवा वादग्रस्तही वाटू शकतात. अशा वेळी वैयक्तिक अनुभवाच्या आधारे स्त्री-पुरुषांच्या स्वभावगुणांचा विचार करणे आणि त्यांना पारखणे अधिक सोयीचे ठरेल.

कार्ल जंग यांनी 'Analytical Psychology' या सिद्धांतावर आधारित स्त्रीस्वभावाबद्दल काही विचार मांडले आहेत. त्यांनी 'अनिमा' आणि 'ॲनिमस' ही संकल्पना मांडून 'प्रत्येक व्यक्तीच्या मनात विरुद्ध लिंगाचे मानसिक प्रतिबिंब असते,' असे सांगितले आहे. स्त्रीच्या अवचेतन मनात असलेले 'पुरुषत्वाचे प्रतीक' म्हणजे 'ॲनिमस' होय. म्हणजेच प्रत्येक स्त्रीच्या मनात एक 'आतला पुरुष' असतो. तो विचार, तर्क, निर्णयक्षमता, धाडस आणि अधिकारभाव अशा गुणांशी जोडला जातो. हा प्रत्यक्ष पुरुष नसून एक मानसिक प्रतिमा असते. 'ॲनिमस' हा वेगवेगळ्या अनुभवांतून तयार होतो. वडील, भाऊ, शिक्षक यांचे वर्तन, समाजातील पुरुषांविषयीच्या कल्पना, कथा, चित्रपट आणि संस्कृतीतील पुरुषपात्रे, या अनुभवांतून तिच्यात पुरुषी प्रतिमा निर्माण होतात. जसे, एखाद्या मुलीने वडिलांना खूप कडक आणि अधिकारशाही पाहिले असेल, तर तिचा 'ॲनिमस' ही तसाच कठोर असू शकतो.

शारीरिक शक्ती, क्रियाशील/रोमँटिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक/अर्थपूर्ण पुरुष, असे 'ॲनिमस' चे चार टप्पे जंगने सांगितले आहेत. त्यानुसार निर्णय घेण्याची शैली, कधी कधी स्त्रीच्या मनात कठोर, ठाम आवाज, पुरुषांचे आकर्षण वाटणे आणि नकारात्मक 'ॲनिमस' म्हणजे "सगळे पुरुष असेच असतात," असा ठाम, कठोर विश्वास असणे,

हे गुण तिच्या ठिकाणी असतात. सकारात्मक 'ॲनिमस' आत्मविश्वास वाढवतो, स्वतःसाठी उभे राहण्यास मदत करतो आणि स्पष्ट विचार व निर्णयक्षमता देतो. हा 'ॲनिमस' मानसिक प्रतिमा असली, तरी स्त्री आपल्या मनातील विचार, भावना किंवा गुण बाहेरच्या पुरुषांवर लादते. अर्थात 'ॲनिमस' म्हणजे स्त्रीच्या मनातील पुरुषत्व, जे तिच्या विचारांवर, भावनांवर, निर्णयांवर आणि नातेसंबंधांवर प्रभाव टाकते. बऱ्याचदा त्याचे अनुभवही येतात.

सिग्मंड फ्रॉईडने मनोविश्लेषणात्मक दृष्टिकोनातून स्त्रीच्या स्वभावाबद्दल मांडणी केली आहे. आजच्या काळात त्यांच्या अनेक विचारांवर टीकाही करण्यात आली आहे. फ्रॉईड यांच्या मते, "मुलीचा मानसलैंगिक विकास होतांना मुलगी वडिलांकडे आकर्षित होते. तिला आईबद्दल स्पर्धा किंवा मत्सर वाटू शकतो. लहान वयातील (वय ३–६ वर्षे) हा एक मानसिक टप्पा असतो. तिच्या या भावनांना 'इलेक्ट्रा कॉम्प्लेक्स' म्हणतात; पण आजच्या आधुनिक मानसशास्त्रात ही संकल्पना पूर्णपणे मान्य नाही. तिच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. त्याऐवजी 'अटॅचमेंट थिअरी' अधिक मान्य आहे. त्यांच्या मते, "मुलींना एका टप्प्यावर लिंगाबद्दल मत्सर निर्माण होतो. मुलगी स्वतःला अपूर्ण समजते. तिला पुरुषांपेक्षा कमी असल्याची भावना निर्माण होऊ शकते." हा विचार आज अत्यंत वादग्रस्त मानला जातो आणि स्त्रीविरोधी म्हणून त्यावर टीका केली जाते.

फ्रॉईड यांच्या मते, "स्त्रिया अधिक भावनिक, संवेदनशील आणि संबंधांवर केंद्रित असतात; पुरुषांच्या तुलनेत कमी तर्कशुद्ध असतात. हा त्यांचा दृष्टिकोन आज सर्वमान्य नाही. तरीही समाज स्त्रीकडे त्या दृष्टीने पाहतो.

तसेच 'स्त्रीच्या जीवनात मातृत्व खूप महत्त्वाचे असते. स्त्रीच्या इच्छा आणि ओळख मातृत्वाशी जोडलेल्या असतात.', असेही त्यांनी सांगितले आहे. एकूणच आजच्या मानसशास्त्रात फ्रॉईड यांच्या विचारांवर मोठ्या प्रमाणात टीका केली जाते. कारण आधुनिक मानसशास्त्रानुसार स्त्रीचा स्वभाव हा जैविक, मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांचा एकत्रित परिणाम आहे. तो कोणत्याही एका सिद्धांताने पूर्णपणे समजावता येत नाही, असे सांगितले जाते.

अरिस्टॉटल यांनी स्त्रीच्या स्वभावाबद्दल मांडलेले विचार त्या काळच्या ग्रीक समाजाचे प्रतिबिंब मानले जाते. त्यामुळे आजच्या दृष्टीने ते मर्यादित आणि पुरुषसत्ताक ठरविले जातात. मात्र आजही अनेक समाजांमध्ये पुरुषसत्ताक व्यवस्था टिकून आहे. त्यानुसार स्त्रीची होणारी जडणघडण आणि पूर्वीची सामाजिक मानसिकता आजही बऱ्याच प्रमाणात टिकून आहे. 'स्त्रीमध्ये बुद्धी असते; पण तिची निर्णयक्षमता पुरुषांपेक्षा कमी असते,' असे अरिस्टॉटल मानत होते. स्त्री अधिक भावनिक असते; मात्र आधुनिक मानसशास्त्र सांगते की, भावना आणि तर्क हे दोन्ही स्त्री-पुरुषांमध्ये असतात. हा फरक सामाजिक संस्कारांमुळे अधिक दिसतो. पुरुषांना 'रडू नको' असे शिकवले जाते. स्त्रियांना भावना व्यक्त करणे शिकवले जाते. त्यामुळे 'भावनिक' हा जैविक गुण नसून सामाजिक परिणाम असतो. स्त्रीचा स्वभाव पुरुषापेक्षा अधिक भावनिक, मृदू आणि घरकेंद्री असतो. ती कुटूंब सांभाळणारी असते. घरात मूल आजारी पडले तर आई रात्रभर जागून त्याची काळजी घेते; त्याच्या वेदनेने ती स्वतः भावूक होते. स्त्रीचा हा भावनिक स्वभाव असतो; पण आधुनिक विचार सांगतो की, काळजी घेणे हा फक्त स्त्रीचा गुण नसून पुरुषही तितकीच

माया करू शकतो. अर्थात सामाजिक परिस्थितीनुसार स्त्रीचा स्वभाव बनलेला दिसतो. त्यामुळे त्याला पूर्णपणे नैसर्गिक मानले गेले नाही.

इ.स.पूर्व चौथ्या शतकातील ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यांनी स्त्री आणि पुरुष यांच्या आत्मिक किंवा बौद्धिक क्षमतेत मूलभूत फरक मानलेला नाही. स्त्रियांमध्येही पुरुषांप्रमाणेच गुण आणि क्षमता असू शकतात, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते "काही स्त्रिया पुरुषांइतक्याच बुद्धिमान, शूर आणि प्रशासनक्षम असू शकतात. स्त्रिया सैनिक होऊ शकतात. स्त्रिया राज्यकर्त्या होऊ शकतात. योग्य क्षमता असल्यास स्त्रिया 'फिलॉसॉफर किंग्ज'प्रमाणे नेतृत्व करू शकतात. याचबरोबर प्लेटोने स्त्रीबाबत प्रगत विचार मांडले असले, तरी स्त्री पूर्णतः पुरुषासमान आहे, असे स्पष्टपणे मानले नाही. त्यांच्या काही मतांनुसार शारीरिकदृष्ट्या स्त्रिया पुरुषांपेक्षा कमकुवत आहेत. बहुतांश क्षेत्रांत पुरुष अधिक सक्षम असतात; पण काही स्त्रिया त्यांच्याइतक्याच सक्षम असू शकतात, असे त्यांनी सांगितले. म्हणजेच त्यांनी दोन्ही बाजूच्या शक्यता वर्तविल्या आहेत. त्याची प्रचीती आज येतेच आहे.

कॅरेन हॉर्नी या आधुनिक मानसशास्त्रज्ञ आणि मानसविश्लेषक होत्या. फ्रॉईडच्या पारंपरिक मानसविश्लेषण सिद्धांतांवर टीका करून त्यांनी नव्या दृष्टिकोनाची मांडणी केली आणि स्त्रियांना कमी लेखणाऱ्या पारंपरिक विचारांना विरोध केला. 'त्या काळात अनेक मानसशास्त्रज्ञ स्त्रियांना मानसिकदृष्ट्या कमी समजत होते. हॉर्नी यांनी हा विचार नाकारला आणि स्त्रिया व पुरुष दोघेही समान क्षमतांचे आहेत,' असे सांगितले. मुलगी लहानपणी स्वतःकडे पुरुषांसारखे लिंग नसल्याची जाणीव झाल्यावर तिला

न्यूनगंड आणि ईर्ष्या वाटते, या फ्रॉईडच्या 'पेनिस एन्वी' संकल्पनेला त्यांनी विरोध केला. स्त्रियांना समाजातील कमी दर्जा, मर्यादित अधिकार आणि पुरुषप्रधान व्यवस्था हीच न्यूनगंडाची खरी कारणे आहेत, असे त्यांनी सांगितले. समाज आणि संस्कृतीचा प्रभाव असल्याने स्त्रियांचे व्यक्तिमत्त्व जैविक कारणांनी नव्हे, तर समाजातील संस्कार, अपेक्षा आणि वागणूक यांमुळे घडते, असे त्यांचे मत होते. त्यांनी स्त्रीच्या आत्मविश्वासावर भर देऊन स्त्रियांनी स्वतःची क्षमता ओळखून स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकसित करावे, असे प्रतिपादन केले.

कॅरोल गिलिगन या अमेरिकन मानसशास्त्रज्ञ, स्त्रीवादी विचारवंत आणि 'एथिक्स ऑफ केअर' या नैतिक विकास सिद्धांताच्या अभ्यासक आहेत. त्यांच्या मते, "स्त्रियांची नैतिक विचारसरणी पुरुषांपेक्षा वेगळी असते. त्या निर्णय घेताना नातेसंबंध, काळजी आणि इतरांच्या भावनांना अधिक महत्त्व देतात. स्त्रिया न्यायापेक्षा काळजी, सहानुभूती आणि जबाबदारी यांवर आधारित नैतिकता विकसित करतात." त्यांनी 'लॉरेन्स कोलबर्ग' यांच्या नैतिक विकास सिद्धांतावर टीका केली. त्यांच्या मते, कोलबर्गचा सिद्धांत पुरुषकेंद्री होता आणि त्यात स्त्रियांच्या अनुभवांना कमी महत्त्व दिले गेले. स्त्रियांचा आवाज, अनुभव आणि भावना मानसशास्त्रात स्वतंत्रपणे समजून घेतल्या पाहिजेत; त्यांची तुलना नेहमी पुरुषांच्या निकषांशी करू नये. स्त्रिया स्वतःची ओळख प्रामुख्याने नातेसंबंध आणि परस्पर जोडणीतून निर्माण करतात. समाजातील पितृसत्ताक रचना स्त्रियांचा खरा आवाज दडपते; त्यामुळे स्त्रियांना स्वतःचे मत व्यक्त करण्यासाठी सामाजिक स्वातंत्र्य आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. अर्थात स्त्रियांचे विचार नातेसंबंध, सहानुभूती आणि काळजी यांवर आधारित असतात.

भारतीय पुराणग्रंथ, धर्मशास्त्रे आणि महाकाव्यांमध्ये स्त्रीस्वभावाबद्दल एकसारखे मत आढळत नाही. वेगवेगळ्या काळात, समाजरचनेनुसार आणि लेखकांच्या दृष्टिकोनानुसार स्त्रीस्वभावाचे वर्णन केलेले दिसते. देवीमहात्म्य, रामायण आणि महाभारत, यांसारख्या ग्रंथांत स्त्रीला 'शक्ती', 'जननी', 'धैर्य', 'त्याग' आणि 'संरक्षण' यांचे प्रतीक मानले आहे. धर्मशास्त्रीय आणि पितृसत्ताक पद्धतीचे समर्थन करणाऱ्या मनुस्मृतीसारख्या काही धर्मशास्त्रांत स्त्रीला भावनिक व चंचल मानून तिला संरक्षणाची गरज असल्याचे वर्णन आढळते.

स्त्रीने वडील, पती किंवा पुत्र यांच्या संरक्षणाखाली राहावे, असे मत काही ठिकाणी मांडलेले आहे. काही श्लोकांमध्ये स्त्रीच्या स्वभावाबद्दल संशयात्मक किंवा नियंत्रक भाषा दिसते. तर अनेक ग्रंथांमध्ये करुणा, प्रेम, कुटुंबसंरक्षण, सहनशीलता, बुद्धिमत्ता, त्याग आणि धैर्य हे स्त्रीचे गुण मानले आहेत. चाणक्यनीती'मध्ये स्त्रीच्या गुणांचे कौतुक आहे, तर काही ठिकाणी संशयात्मक किंवा कठोर मतेही दिसतात. स्त्रियांचा आहार दुप्पट, बुद्धी चौपट, धाडस सहापट आणि कामभावना आठपट असते, असे म्हटले आहे. 'कामात दासीसारखी, सल्ल्यात मंत्र्यासारखी, भोजन देताना आईसारखी, शय्येत रंभेसारखी आणि धर्मपालनात साथ देणारी' असेही वर्णन आढळते. मानवी आसक्ती आणि कामभावनेबद्दल आकर्षणामुळे भावनांवर आणि मोहावर नियंत्रण ठेवावे, असेही सांगितले आहे.

भारतीय संस्कृत साहित्य, पुराणे, महाकाव्ये आणि सुभाषितांमध्ये स्त्रीचे अनेक गुण वर्णिले आहेत. हे वर्णन केवळ गृहिणी म्हणून नाही, तर माता, विदुषी, धैर्यवान, करुणामयी आणि शक्तिरूप अशा विविध रूपांत केलेले

आहे. तसेच करुणा, प्रेम, बुद्धिमत्ता, धैर्य, संयम, निष्ठा, त्याग, आत्मसन्मान आणि शक्ती हे स्त्रीचे आदर्श गुण साधारणपणे मानले गेले आहेत. तर संस्कृत काव्यात स्त्रीची लज्जा, विनय, करुणा, धैर्य आणि मधुर वाणी हे तिच्या सौंदर्याचे भाग मानले गेले आहेत.

भारतीय संतांनी स्त्रीच्या मनाचा आणि स्वभावाचा उल्लेख करताना स्त्रीच्या प्रेम, ममता, सहनशीलता, भक्ती आणि त्याग यांचे कौतुक केले; तर काही ठिकाणी सांसारिक मोह, आकर्षण किंवा मानवी दुर्बलतेचे वर्णन केले आहे. अशा दोन प्रकारच्या वर्णनांमुळे त्या काळातील सामाजिक परिस्थितीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला दिसतो. संत तुकाराम यांनी स्त्रीच्या मनात माया, प्रेम आणि कुटुंब टिकवण्याची शक्ती असून आईच्या ममतेला अत्यंत पवित्र मानले. संत ज्ञानेश्वर यांनी स्त्रीचे मन कोमल, करुणामय आणि भक्तीभावाने भरलेले असते, असे सांगून आत्म्याच्या पातळीवर स्त्री-पुरुष भेद नसल्याचे म्हटले आहे.

संत एकनाथ यांनी स्त्री सहनशील, कष्टाळू आणि कुटुंबासाठी त्याग करणारी असल्याचे सांगितले आहे. संत बहिणाबाई यांनी स्त्रीच्या मनातील दुःख, संघर्ष, प्रेम, संसारातील जबाबदाऱ्या आणि अंतर्मनातील भक्ती यांचे वर्णन करून स्त्रीचे मन संवेदनशील असल्याचे म्हटले आहे. संत कबीर यांनी स्त्रीच्या भावना, प्रेम, माया, भक्ती आणि मानवी स्वभावातील मोह यांचा उल्लेख केलेला आढळतो. तुलसीदास यांनी स्त्रीला साधनेतील अडथळा किंवा मोहाचे कारण मानले. त्यामुळे त्यांच्या लिखाणात स्त्रीपासून दूर राहण्याचा उपदेश दिसतो. हे आध्यात्मिक वैराग्याशी जोडलेले होते. एकूणच काही संतवाङ्मयात स्त्रीला “मोहाचे प्रतीक” म्हणून

दाखवलेले आढळते; पण ते बहुधा आध्यात्मिक साधनेतील मोह-माया यांचे प्रतीकात्मक वर्णन असते. सर्वच संतांनी स्त्रीविरोधी विचार मांडले असे नाही. अनेक संतांनी स्त्रीच्या मनातील भक्ती, प्रेम, त्याग आणि सामर्थ्य यांचे गौरवपूर्ण वर्णन केले आहे.

रजनीश ओशो यांच्या मते, 'स्त्री ही केवळ सामाजिक भूमिका निभावणारी व्यक्ती नसून एक स्वतंत्र, सर्जनशील आणि प्रेममय ऊर्जा आहे. स्त्रीचे मूलभूत गुण प्रेम, करुणा, सौंदर्य, संवेदनशीलता आणि अंतर्ज्ञान आहेत. स्त्री तर्कापेक्षा भावना आणि अनुभवातून जीवन अधिक खोलपणे समजू शकते. स्त्री ही स्वीकारणारी ऊर्जा असल्याने ती नातेसंबंध, जीवन आणि प्रेम अधिक सहजपणे आत्मसात करू शकते. स्त्री पुरुषापेक्षा कमी नाही; उलट काही बाबतीत ती अधिक जीवनाभिमुख आणि आध्यात्मिकतेच्या जवळ असते. ती सहज ध्यानावस्थेकडे जाऊ शकते. कारण तिच्यात नैसर्गिक शांतता आणि समर्पणाची वृत्ती असते. स्त्री स्वतःचे निर्णय घेते, प्रेम करते; पण गुलाम होत नाही आणि स्वतःची ओळख टिकवते.' मात्र ओशो यांच्या काही विधानांवर टीकाही झाली आहे. कारण त्यांनी स्त्री-पुरुषांचे स्वभाव वेगळे असल्याचे सांगताना अनेक व्यापक सामान्यीकरणे केलीत. आधुनिक स्त्रीवादी विचारसरणीतील काही लोकांना हे मान्य नाही. तरीही त्यांनी स्त्रीला शक्ती, प्रेम, सौंदर्य, अंतर्ज्ञान आणि सर्जनशीलतेचे प्रतीक मानले, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

भारतीय मानसशास्त्रज्ञांनी 'स्त्रीस्वभाव' हा केवळ जैविक नसून सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक घटकांशी जोडलेला असल्याचे सांगितले आहे. गिरींद्रशेखर बोस यांनी फ्रॉईडच्या सिद्धांतांचा भारतीय

संस्कृतीच्या दृष्टीने पुनर्विचार केला असून त्यांच्या मते, 'स्त्री-पुरुषांचे वर्तन कुटुंबव्यवस्था आणि संस्कारांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते.' सुधीर काकर यांनी भारतीय समाज, लैंगिकता, स्त्री-पुरुष संबंध आणि भारतीय मानसशास्त्र यांविषयी लेखन केले असून स्त्रीबाबत भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था आणि लैंगिकतेच्या संदर्भात चर्चा केली आहे. त्यांच्या मते, "भारतीय समाजात स्त्रीची ओळख अनेकदा 'आई', 'पत्नी' किंवा 'त्याग करणारी व्यक्ती' अशी घडवली जाते. स्त्रियांच्या लैंगिकतेवर आणि इच्छांवर समाज नियंत्रण ठेवतो; त्यामुळे अनेक स्त्रिया स्वतःच्या भावना दडपून जगतात. भारतीय संस्कृतीत स्त्रीला एकीकडे देवी मानले जाते; पण दुसरीकडे तिच्यावर नियंत्रणही ठेवले जाते. भारतीय कुटुंबात आई-मुलाचे नाते खूप खोल असते आणि त्याचा पुरुषांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम होतो." याचबरोबर त्यांच्या लिखाणात स्त्रियांच्या दडपलेल्या भावना, लैंगिकता आणि सामाजिक बंधने यांचे मानसशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे.

दुर्गानंद सिन्हा हे प्रसिद्ध भारतीय मानसशास्त्रज्ञ होते. त्यांनी सामाजिक मानसशास्त्र, संस्कृती आणि मानवी वर्तन यांचा अभ्यास करताना स्त्रियांच्या बाबतीत सांगितले आहे की, "भारतीय समाजात स्त्रीची भूमिका कुटुंबकेंद्रित ठेवली जाते; त्यामुळे तिची ओळख अनेकदा 'आई', 'पत्नी' किंवा 'कुटुंबाची जबाबदार व्यक्ती' अशी तयार होते. समाजातील परंपरा, धर्म आणि सांस्कृतिक मूल्ये स्त्रियांच्या वर्तनावर मोठा प्रभाव टाकतात. स्त्री-पुरुष समानतेकडे समाज बदलत असला, तरी पारंपरिक अपेक्षा अजूनही स्त्रियांवर दबाव टाकतात. व्यक्तीचे वर्तन समजून घेण्यासाठी तिची सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी महत्त्वाची असते; त्यामुळे

भारतीय स्त्रियांचे अनुभव पाश्चात्त्य स्त्रियांसारखे नसतात. शिक्षण आणि सामाजिक बदल यामुळे स्त्रियांची भूमिका बदलत आहे; पण भारतीय कुटुंबव्यवस्थेचा प्रभाव अजूनही मजबूत आहे." अर्थात स्त्रीचा स्वभाव हा घडत नाही, तर घडविला जातो, असे यातून दिसते.

आशिष नंदी यांच्या मते, "समाजात 'स्त्रीत्व' म्हणजे करुणा, संवेदनशीलता, सहकार्य आणि अहिंसा यांना सकारात्मक मानले जाते. स्त्रीत्व हीन नसून मानवी समाज अधिक मानवी बनवणारी शक्ती आहे." तर बी. व्ही. सिन्हा यांनी भारतीय सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून स्त्रियांच्या वर्तनाचे स्पष्टीकरण केले आहे. त्यांच्या मते, "स्त्रीचे वर्तन हे केवळ वैयक्तिक स्वभावावर अवलंबून नसून कुटुंब, संस्कृती, सामाजिक अपेक्षा आणि कार्यपरिस्थिती यांमुळे घडते. लहानपणापासून मुलींना नम्र राहणे, सहनशील असणे, कुटुंबाला प्राधान्य देणे व आज्ञाधारक राहणे, अशा मूल्यांचे शिक्षण दिले जाते. त्यामुळे स्त्रियांच्या वर्तनात सहकार्य, काळजी आणि संबंध टिकवण्याची प्रवृत्ती अधिक दिसते.

काम करणाऱ्या स्त्रियांना व्यावसायिक आणि कौटुंबिक अशा दोन भूमिका सांभाळाव्या लागतात. या दोन जबाबदाऱ्यांमुळे मानसिक ताण, अपराधीपणा आणि भावनिक संघर्ष निर्माण होऊ शकतो. स्त्रिया मानवी संबंध अधिक जपतात, भावनिक संकेत लवकर ओळखतात आणि सहानुभूती व संवादात प्रभावी असतात. ही वैशिष्ट्ये सामाजिक संस्कारांमुळे विकसित होतात. पुरुषप्रधान समाजात स्त्रियांच्या निर्णयक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जातात. नेतृत्वगुण कमी लेखले जातात.

यामुळे काही स्त्रियांमध्ये कमी आत्मविश्वास किंवा स्वतःला मागे ठेवण्याची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते. मात्र आधुनिक शिक्षण, नोकरी आणि आर्थिक स्वातंत्र्यामुळे स्त्रियांमध्ये स्वनिर्णयक्षमता आणि आत्मविश्वास वाढत आहे. पारंपरिक भूमिकांबद्दल प्रश्न विचारले जात आहेत; म्हणून स्त्रियांचे वर्तन स्थिर नसून सामाजिक बदलांनुसार बदलणारे आहे." अर्थातच स्त्रीचा स्वभाव समजून घेण्यासाठी तिच्या मानसिकतेसोबतच भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक अपेक्षा समजून घेणे आवश्यक आहे. कारण त्या परिप्रेक्षात राहून कुटूंब व समाज मुलीच्या लहानपणापासून तिचे 'स्त्रीत्त्व' घडविण्यावर भर देत असतो. आणि कुटूंब समाजाचा विचार करून मुलीला तसे घडवितो.

ब- पुरुषाचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये

स्त्रीचे स्वभाव-गुणवैशिष्ट्ये पाहिली असता त्यापेक्षा काहीसे वेगळेपण पुरुषाच्या ठिकाणी दिसून येते. शोपेनहावरच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य विषय 'मानवी इच्छा (Will)' हा होता. त्याच्या मते, "माणूस बुद्धीपेक्षा इच्छांच्या प्रभावाखाली जास्त जगतो." असे सांगून त्याने पुरुषांविषयी काही ठळक मते मांडलेली आहेत. The World as Will and Representation या ग्रंथात काही प्रमाणात 'मानवस्वभाव' आणि 'इच्छाशक्ती'च्या सिद्धांतातून पुरुषाच्या स्वभावाविषयीचे विचार प्रकट केलेले आहेत. त्यांनी 'पुरुष हा 'Will' म्हणजे इच्छाशक्तीचा वाहक असून तो इच्छेच्या प्रभावाखाली असतो. त्याच्या महत्त्वाकांक्षा, संघर्ष, प्रेम, सत्ता, संपत्ती यामागे हीच इच्छा कार्यरत असते. जसे, एखादा पुरुष यश, पैसा किंवा प्रतिष्ठा मिळवण्यासाठी सतत मेहनत करतो. त्याला वाटते की, यश मिळाल्यावर समाधान मिळेल;

पण इच्छा संपत नाहीत. नवीन इच्छा निर्माण होतात. त्यामुळे पुरुषाकडे तर्कशक्ती आणि विचारशक्ती असली, तरी त्याच्यावर इच्छेचेच नियंत्रण असते. 'माणूस आपल्या इच्छेनुसार कृती करू शकतो; पण त्याच्या इच्छा स्वतःच्या नियंत्रणात नसतात.', असे सांगितले आहे. म्हणजे प्रत्यक्षात त्याच्या नैसर्गिक प्रवृत्ती आणि इच्छाच त्याला चालवतात; म्हणून शोपेनहावर 'इच्छा म्हणजे दुःखाचे मूळ' मानतो.

पुरुष सतत काहीतरी मिळवण्याच्या प्रयत्नात असतो. इच्छा पूर्ण झाली नाही तर दुःख; आणि पूर्ण झाली तरी कंटाळा निर्माण होतो. जसे, गरीब पुरुषाला पैसा हवा असतो. पैसा मिळाल्यावर प्रतिष्ठा हवी असते. प्रतिष्ठा मिळाल्यावर अधिक सत्ता हवी असते. अशाप्रकारे पुरुष कायम असमाधानी राहतो. 'प्रेम ही केवळ भावनिक गोष्ट नसून वंश टिकवण्याची नैसर्गिक योजना आहे,' असे सांगून शोपेनहावर प्रेमाकडे जैविक आणि नैसर्गिक दृष्टीने पाहतो. पुरुष प्रेमासाठी त्याग करतो, संघर्ष करतो; पण यामागे वैयक्तिक भावना नसून निसर्गाची प्रेरणा असते. 'मानवी जीवन म्हणजे अखंड संघर्ष असून पुरुषाला पूर्ण शांतता क्वचितच मिळते.' कारण पुरुष त्याच्या अंतर्गत इच्छाशक्तीमुळे सतत स्पर्धा, सत्ता, यश आणि सामाजिक स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करतो.' एकूणच पुरुष हा इच्छांनी चालवला जाणारा, बुद्धिनिष्ठ; पण असमाधानी, महत्त्वाकांक्षी आणि संघर्षशील, प्रेम व यशाच्या मागे धावणारा दिसतो.

कार्ल जंग यांनी प्रत्येक पुरुषामध्ये स्त्रीलिंगी बाजू म्हणजेच पुरुषाच्या अवचेतन मनात एक 'स्त्रीस्वभावी' भाग असतो, त्यालाच त्यांनी अनिमा म्हटले आहे. 'पुरुष' हा फक्त जैविक अस्तित्व नसून एक मानसशास्त्रीय

रचना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. स्त्रीप्रमाणे पुरुषाच्या मनातील भावना, संवेदनशीलता, कल्पनाशक्ती, प्रेमभावना, अंतर्ज्ञान आणि भावनिक गूढता हे गुणही जंग यांनी सांगितले आहेत. जंग यांच्या मते, 'अनेक पुरुष हे गुण बाहेरून दाखवत नाहीत. त्यामुळे हे गुण अवचेतनात राहतात आणि 'अनिमा' म्हणून प्रकट होतात.' म्हणजे एखादा पुरुष एखाद्या स्त्रीकडे अतिशय आकर्षित होतो, तेव्हा कधी कधी त्या स्त्रीमध्ये त्याला स्वतःच्या अंतर्गत आदर्श स्त्रीचे प्रतिबिंब दिसते. तेव्हा स्वतःच्या भावनिक जगाशी जोडणे, सर्जनशीलता आणि अंतर्ज्ञान वाढवणे, व्यक्तिमत्त्व अधिक पूर्ण बनवणे आणि अवचेतनाशी संपर्क साधणे, असे 'अनिमा'चे महत्त्व असते. त्यांच्या मते, "मूलभूत आकर्षण, जैविक स्तर, सौंदर्य आणि रोमँटिक आदर्श, आध्यात्मिक प्रेम, शहाणपण आणि आत्मज्ञान हे 'अनिमा'चे काही टप्पेही सांगितले आहेत. 'अनिमा' समजून घेतली नाही, तर भावनिक अस्थिरता, अवास्तव प्रेमकल्पना, लहरीपणा, नात्यांमध्ये गोंधळ, या गोष्टी उद्भवू शकतात."

सिग्मंड फ्राईड यांनी "मानवी व्यक्तिमत्त्व आणि लैंगिक विकासामध्ये पुरुषांच्या बाबतीत काही विशिष्ट टप्पे आणि संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत. 'साधारणपणे ३ ते ६ वर्षांच्या वयोगटात मुलाला आपल्या आईबद्दल अतिशय आकर्षण आणि प्रेम वाटते. त्याच वेळी वडील हे प्रतिस्पर्धी वाटू लागतात. मुलाच्या अवचेतन मनात 'आई फक्त माझी असावी' अशी भावना तयार होते. या अवस्थेला फ्राईड यांनी 'ओडिपस कॉम्प्लेक्स', असे नाव दिले. मात्र फ्राईड यांनी याला लैंगिक अर्थाने नव्हे, तर अवचेतन भावनिक आकर्षण मानले आहे.

फ्राईड यांनी Id – नैसर्गिक भूक व लैंगिक इच्छा, Ego – वास्तवाशी जुळवून घेणारा भाग आणि Superego – नैतिकता व समाजाचे नियम, असे पुरुषांच्या वर्तनावर प्रभाव टाकणारे तीन मानसिक घटक सांगितले. समजा, एखाद्या पुरुषाला राग आला (Id), पण तो परिस्थिती लक्षात घेऊन शांत राहतो (Ego) आणि योग्य-अयोग्य विचार करतो (Superego), असे तो वागतो. तसेच पुरुषांमध्ये आक्रमकता आणि लैंगिक प्रेरणा अधिक प्रभावी असतात. मुलगा वडिलांची ओळख स्वीकारून स्वतःचे पुरुषत्व विकसित करतो. मुलगा आपल्या वडिलांचे वर्तन, बोलण्याची पद्धत किंवा सवयी यांचे अनुकरण करतो. त्यातून त्याचे पुरुषत्व घडत जाते. एकूणच फ्राईड यांच्या मते, पुरुषांचे व्यक्तिमत्त्व मुख्यतः बालपणीच्या अनुभवांवर आणि लैंगिक विकासाच्या टप्प्यांवर अवलंबून असते. त्यांच्या सिद्धांतात आई-वडिलांशी असलेले नाते खूप महत्त्वाचे मानले गेले आहे. मात्र आज अनेक मानसशास्त्रज्ञ फ्राईड यांच्या कल्पनांना पूर्णपणे स्वीकारत नाहीत; पण बालपणापासून मुलाचा व्यक्तिमत्त्व आणि मानसिक विकास वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर होत असतो, असे फ्राईड यांनी सांगितले आहे.

*** *** ***

क. स्त्री-पुरुष नातेसंबंध

मानव हा सामाजिक प्राणी आहे. समाजात राहण्यासाठी विविध प्रकारच्या नातेसंबंधांची निर्मिती होते. स्त्री आणि पुरुष यांच्यातील संबंध हे मानवी जीवनातील सर्वात महत्त्वाच्या सामाजिक संबंधांपैकी एक आहेत. या संबंधांमध्ये भावनिक, सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक आणि नैतिक घटकांचा समावेश असतो. तसेच स्त्री-पुरुष नातेसंबंध हे केवळ विवाह किंवा प्रेमसंबंधापुरते मर्यादित नसून मैत्री, सहकार्य, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक संबंध आणि सामाजिक संबंध, अशा विविध स्वरूपांत दिसून येतात.

१ नातेसंबंधाची संकल्पना

दोन व्यक्तींमध्ये निर्माण होणारे परस्पर भावनिक, मानसिक, सामाजिक किंवा वैयक्तिक बंध म्हणजे नातेसंबंध होय, असे म्हटले जाते. नातेसंबंध व्यक्तीच्या जीवनाला दिशा देतात आणि तिच्या वर्तनावर प्रभाव टाकतात. समाजशास्त्रज्ञांच्या मते, नातेसंबंध हे समाजाच्या रचनेचे मूलभूत घटक आहेत. व्यक्ती एकमेकांशी संवाद साधतात, विचारांची देवाणघेवाण करतात आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून संबंध निर्माण करतात.

२. स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे स्वरूप

स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे स्वरूप अनेक घटकांवर अवलंबून असते. ते प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती आणि काळजी या भावनांवर आधारित असते. समाजातील नियम, मूल्ये आणि संस्कृती यांच्या प्रभावाखाली त्यांचे

सामाजिक नाते निर्माण होते. परस्पर समजूतदारपणा, भावनिक सुरक्षितता आणि मानसिक आधार या मानसिक पातळीवरही ते आधारित असते. प्रत्येक समाजातील परंपरा, धार्मिक श्रद्धा आणि संस्कृती यांचा सांस्कृतिक प्रभाव या नात्यांवर पडतो. त्यामुळे त्यांच्यात समायोजनपेक्षा अंतर अधिक पडत जाते. त्याचे काही प्रकार पाडले जातात.

३.१. कौटुंबिक नाते : कुटुंब ही समाजातील मूलभूत संस्था असून स्त्री-पुरुषांमधील कौटुंबिक नातेसंबंध प्रेम, जबाबदारी आणि कर्तव्यांवर आधारित असतात. उदाहरणार्थ, आई-वडील, भाऊ-बहीण, पती-पत्नी, सासू-सून आणि जावई-सासरे. या कौटुंबिक नातेसंबंधांमुळे सामाजिक मूल्यांचे संवर्धन होते.

३.२. मैत्रीचे नाते : स्त्री आणि पुरुष यांच्यातील मैत्री हे आधुनिक समाजात वाढत्या प्रमाणात दिसून येणारे नाते आहे. विश्वास, मोकळेपणा, परस्पर आदर व भावनिक आधार ही त्याची वैशिष्ट्ये असून, मैत्रीमुळे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो.

३.३. प्रेमसंबंध : प्रेमसंबंध हा स्त्री-पुरुष नात्याचा अत्यंत भावनिक प्रकार असून, प्रेमामध्ये आकर्षण, जिव्हाळा, भावनिक गुंतवणूक व बांधिलकी यांचा समावेश असतो. मानसशास्त्रज्ञ रॉबर्ट स्टर्नबर्ग यांच्या त्रिकोणी प्रेम सिद्धांतानुसार प्रेमामध्ये जवळीक, उत्कटता आणि बांधिलकी हे तीन घटक असतात.

३.४. वैवाहिक नाते : विवाह ही समाजमान्य संस्था असून विवाहामुळे दोन व्यक्ती आणि दोन कुटुंबे एकत्र येतात. भावनिक सहकार्य, आर्थिक

सहकार्य, सामाजिक जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन व कौटुंबिक स्थैर्य ही त्याची वैशिष्ट्ये मानली जातात. यशस्वी वैवाहिक जीवनासाठी संवाद आणि विश्वास महत्त्वाचे असतात.

३.५. व्यावसायिक नाते : कार्यस्थळी स्त्री-पुरुष सहकारी म्हणून काम करतात. समूहकार्य, परस्पर आदर, व्यावसायिकता व समान संधी या दृष्टीने व्यावसायिक नात्याचे महत्त्व असते. कामाच्या ठिकाणी लिंगभेद न करता समान वागणूक देणे आवश्यक आहे.

३.६. सामाजिक नाते : समाजातील विविध उपक्रम, संस्था आणि संघटनांमधून स्त्री-पुरुष संबंध निर्माण होतात. उदा. शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, सांस्कृतिक कार्यक्रम, स्वयंसेवी संघटना, कार्यस्थळे तसेच विविध सामाजिक उपक्रम. या ठिकाणी स्त्री-पुरुष एकत्र काम करताना परस्पर सहकार्य, संवाद आणि विश्वास यांवर आधारित नाती निर्माण होतात. ही नाती समाजातील नियम, मूल्ये, परंपरा आणि अपेक्षा यांमुळे प्रभावित होत असल्याने त्यांना सामाजिक नाते असे म्हणतात. अशा नात्यांमध्ये वैयक्तिक भावनांपेक्षा सामाजिक जबाबदाऱ्या, शिस्त आणि नैतिक मूल्यांना अधिक महत्त्व दिले जाते असतात.

४. नातेसंबंधातील मानसशास्त्रीय पैलू : मानसशास्त्राच्या दृष्टीने स्त्री आणि पुरुष दोघांनाही प्रेम, आदर, स्वीकार, सुरक्षितता आणि भावनिक आधाराची समान गरज असते. स्त्री-पुरुषांमधील नाते केवळ शारीरिक आकर्षणावर आधारित नसून परस्पर विश्वास, समजूतदारपणा, संवाद, सहकार्य आणि सहानुभूती यांवर टिकून राहते. एकमेकांच्या भावना, विचार

आणि गरजांचा आदर केल्यास नाते अधिक दृढ होते. तसेच, एकमेकांना मानसिक आधार, प्रोत्साहन आणि सुरक्षिततेची भावना दिल्यास त्यांच्यात आत्मीयता व विश्वास वाढतो. याउलट गैरसमज, अविश्वास, असंवेदनशील वागणूक किंवा संवादाचा अभाव असल्यास नातेसंबंधात तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे स्त्री-पुरुषांमधील निरोगी आणि आनंदी नातेसंबंधांसाठी परस्पर प्रेम, विश्वास, आदर, समानता आणि प्रभावी संवाद या गोष्टी अत्यंत आवश्यक मानल्या जातात.

६ विश्वास, आदर आणि समर्पण : विश्वासाशिवाय कोणतेही नाते टिकू शकत नाही; म्हणून प्रामाणिकपणा, दिलेला शब्द पाळणे, पारदर्शकता, जबाबदारी स्वीकारणे तसेच आदर आणि समर्पण यांमुळे नात्यातील स्थिरता वाढते. हे विश्वास निर्माण करण्याचे मार्ग सांगितले आहेत. मात्र नातेसंबंधाच्या नावाखाली एक दुसऱ्याचा फायदा करून घेत असेल तर त्याच्या स्वार्थीपणामुळे ते नाते फार काळ टिकत नाही. मग त्यात स्त्री-असो की पुरुष कोण कोणाचा फायदा करून घेतो आणि कोण कोणाशी समान व्यवहार करतो, यावरही बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. विश्वास, आदर आणि समर्पण त्या गोष्टी दृढ होतात.

७. आधुनिक काळातील स्त्री-पुरुष नातेसंबंध : आधुनिक काळात शिक्षण, तंत्रज्ञान आणि आर्थिक बदलांमुळे नातेसंबंधांचे स्वरूप बदलले आहे. त्यात महिलांचे शिक्षण वाढले, आर्थिक स्वावलंबन वाढले, प्रेमविवाहांचे प्रमाण वाढले, समानतेची जाणीव वाढली व वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्व दिले गेले. त्याचा परिणाम असा झाला की, पुरुषांना स्त्रीचे वर्चस्व सहन करण्याची परंपरागत सवय नसल्याने त्यांच्यात संघर्ष

निर्माण होणे स्वाभाविक आहे. कारण पुरुषाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन जुना जो सामाजिक समजुतींचा विचार करतो आणि स्त्रीचा दृष्टीकोन आधुनिक समानतावादी विचारसरणीचा, अशी विसंगती दोघांमध्ये वितुष्ट निर्माण करणारी ठरलेली आहे.

८.सोशल मीडियाचा प्रभाव : आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा नातेसंबंधांवर मोठा प्रभाव पडतो. संपर्क सुलभ होतो, दूर राहणाऱ्या व्यक्तींशी संबंध टिकतात, संवाद वाढतो, हे त्याचे सकारात्मक परिणाम आहेत. तर गोपनीयतेचा अभाव, मत्सर, गैरसमज आणि आभासी संबंधांवर अधिक अवलंबित्व हे त्याचे नकारात्मक परिणाम आहेत.

९.भारतीय समाजातील स्त्री-पुरुष नातेसंबंध : भारतीय समाजात नातेसंबंधांना सांस्कृतिक व धार्मिक आधार आहे. त्यामुळे कुटुंबकेंद्रित व्यवस्था, विवाहसंस्थेला महत्त्व, ज्येष्ठांचा आदर व परस्पर सहकार्य हे त्याचे वैशिष्ट्य मानले जाते. आजच्या आधुनिकतेमुळे पारंपरिक आणि आधुनिक मूल्यांचा समन्वय नातेसंबंधांत दिसून येतो.

१०. स्त्री-पुरुष समानता आणि नातेसंबंध :

समानता ही निरोगी नात्याची मूलभूत अट आहे. कारण निर्णयप्रक्रियेत सहभाग, आत्मसन्मानात वाढ, आर्थिक स्वातंत्र्य व नात्यातील संतुलन हे त्याचे फायदे आहेत. स्त्री आणि पुरुष दोघेही समान हक्क आणि जबाबदाऱ्या स्वीकारतात, तेव्हा नाते अधिक सुदृढ बनते.

११.नातेसंबंधातील समस्या आणि आव्हाने : स्त्री-पुरुष नातेसंबंधांमध्ये काही समस्या आणि आव्हाने निर्माण होऊ शकतात. त्यामध्ये संवादाचा अभाव, गैरसमज, अवास्तव अपेक्षा, विश्वासाचा अभाव, मत्सर, आर्थिक ताण, करिअरमधील व्यस्तता, कौटुंबिक हस्तक्षेप, सामाजिक दबाव, मानसिक ताणतणाव आणि व्यक्तिमत्त्वातील भिन्नता यांचा समावेश होतो. या समस्या वेळेवर समजून घेतल्या नाहीत, तर नातेसंबंधांमध्ये दुरावा निर्माण होऊ शकतो. संवादाचा अभाव हा नातेसंबंधातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. अनेक वेळा व्यक्ती आपल्या भावना, अपेक्षा किंवा नाराजी स्पष्टपणे व्यक्त करत नाही. त्यामुळे गैरसमज वाढतात. विश्वास कमी झाल्यास संशय निर्माण होतो आणि नात्यातील सुरक्षिततेची भावना कमी होते. मत्सर, स्वामित्वाची भावना आणि अति नियंत्रण यांमुळेही नातेसंबंध तणावपूर्ण होतात.

आर्थिक परिस्थितीचा नातेसंबंधांवर मोठा प्रभाव पडतो. बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता, उत्पन्नातील असमानता किंवा खर्चाच्या बाबतीतील मतभेद यांमुळे पती-पत्नी किंवा जोडीदारांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. त्याचप्रमाणे करिअरला प्राधान्य देताना भावनिक गरजांकडे दुर्लक्ष झाल्यास नात्यात दुरावा येण्याची शक्यता असते. आजच्या काळात सोशल मीडियाचा वापर वाढल्यामुळेही अनेक समस्या निर्माण होत आहेत. मोबाईल, सोशल मीडिया किंवा आभासी संबंध यांमुळे प्रत्यक्ष संवाद कमी होतो. त्यामुळे संशय, असुरक्षितता आणि भावनिक अंतर निर्माण होऊ शकते. कौटुंबिक हस्तक्षेप, पारंपरिक अपेक्षा, लिंगभावाशी संबंधित पूर्वग्रह आणि सामाजिक दबाव यांचाही नातेसंबंधांवर परिणाम होतो. अनेक वेळा

व्यक्ती स्वतःच्या इच्छेपेक्षा समाजाच्या अपेक्षांनुसार वागत असल्यामुळे मानसिक संघर्ष निर्माण होतो.

१२ निरोगी नातेसंबंधासाठी आवश्यक घटक : निरोगी आणि दीर्घकालीन नातेसंबंध टिकवण्यासाठी काही मूलभूत मूल्ये आवश्यक मानली जातात. त्यामध्ये परस्पर विश्वास, आदर, प्रामाणिकपणा, सुसंवाद, भावनिक समज, सहकार्य, संयम, क्षमाशीलता आणि समानता यांचा समावेश होतो. एकमेकांचे विचार, भावना आणि व्यक्तिमत्त्व समजून घेण्याची तयारी असणे आवश्यक आहे. मतभेद झाले, तरी शांतपणे चर्चा करून त्यावर उपाय शोधण्याची वृत्ती नाते अधिक मजबूत करते. एकमेकांना बदलण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वीकारण्याची वृत्ती अधिक महत्त्वाची मानली जाते.

जोडीदाराच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा आदर करणे, त्याच्या आवडी-निवडी समजून घेणे, भावनिक आधार देणे आणि कठीण प्रसंगी एकमेकांच्या पाठीशी उभे राहणे, यामुळे नात्यातील विश्वास अधिक दृढ होतो. आधुनिक मानसशास्त्रानुसार यशस्वी नातेसंबंध हे परस्पर संवाद, भावनिक सुरक्षितता, समान निर्णयक्षमता आणि परस्पर सन्मान यांवर आधारित असतात. त्यामुळे स्त्री-पुरुष नातेसंबंध हे केवळ सामाजिक संस्था नसून दोन व्यक्तींमधील विश्वास, प्रेम, जबाबदारी आणि सहजीवनाचा प्रवास आहे.

१३. स्त्री-पुरुष नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी उपाय : स्त्री-पुरुष नातेसंबंध अधिक दृढ करण्यासाठी काही मूलभूत गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

१३.१. प्रभावी संवाद – दोघांनीही आपल्या भावना, अपेक्षा आणि अडचणी मोकळेपणाने व्यक्त कराव्यात. एकमेकांचे शांतपणे ऐकून घेण्याची सवय असावी.

१३.२. परस्पर विश्वास – विश्वास हा नात्याचा पाया आहे. संशय, खोटेपणा किंवा माहिती लपविणे यामुळे नात्यात दुरावा निर्माण होतो. त्यामुळे प्रामाणिकपणा आवश्यक आहे.

१३.३. परस्पर आदर – एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वाचा, मतांचा, भावनांचा आणि स्वातंत्र्याचा आदर करणे आवश्यक आहे. मतभेद असले तरी व्यक्तीचा अपमान होणार नाही, याची काळजी घ्यावी.

१३.४. भावनिक आधार – अडचणीच्या काळात एकमेकांना धीर देणे, समजून घेणे आणि मानसिक आधार देणे आवश्यक असते. यामुळे सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

१३.५. अहंकार बाजूला ठेवणे – नात्यात ‘मी’पेक्षा ‘आपण’ या भावनेला महत्त्व असावे. चूक झाल्यास ती स्वीकारणे आणि आवश्यक असेल तेथे माफी मागणे नाते टिकविण्यास उपयुक्त ठरते.

१३.६. संघर्षाचे सकारात्मक व्यवस्थापन – मतभेद किंवा वाद झाले तरी ते शांतपणे सोडविण्याचा प्रयत्न करावा. रागाच्या भरात निर्णय घेणे किंवा अपमानास्पद भाषा वापरणे टाळावे.

१३.७. वैयक्तिक स्वातंत्र्याचा आदर – प्रत्येक व्यक्तीची स्वतःची ओळख, आवडी-निवडी, मित्रपरिवार आणि वैयक्तिक अवकाश असतो. त्याचा आदर करणे आवश्यक आहे.

१३.८. समान जबाबदारी – कुटुंब, आर्थिक व्यवहार, मुलांचे संगोपन आणि घरातील कामे यांची जबाबदारी शक्य तितकी समानपणे वाटून घेतल्यास नात्यात समाधान वाढते.

१३.९. क्षमाशीलता – प्रत्येक व्यक्तीकडून चुका होऊ शकतात. लहानसहान चुका मनात साठवून न ठेवता क्षमा करण्याची वृत्ती नाते अधिक परिपक्व बनवते.

१३.१०. एकत्र वेळ घालविणे – व्यस्त जीवनशैली असूनही एकमेकांसोबत दर्जेदार वेळ घालविणे आवश्यक आहे. त्यामुळे भावनिक जवळीक वाढते.

एकूणच स्त्री-पुरुष नातेसंबंध हा मानवी जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा पाया आहे. या नात्यांमध्ये प्रेम, विश्वास, आदर, संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य या मूल्यांना विशेष महत्त्व आहे. स्त्री आणि पुरुष यांच्या जैविक, मानसिक आणि सामाजिक वैशिष्ट्यांमध्ये काही भिन्नता असली, तरी दोघेही समान मानवी मूल्यांचे वाहक आहेत. त्यामुळे कोण श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून, दोघेही एकमेकांना पूरक आहेत.

आधुनिक काळात स्त्री-पुरुष समानतेच्या संकल्पनेमुळे या नात्यांमध्ये सकारात्मक बदल होत आहेत. महिलांचे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, निर्णयप्रक्रियेत सहभाग आणि वैयक्तिक स्वातंत्र्य वाढल्यामुळे नातेसंबंध अधिक समतोल आणि परस्पर आदरावर आधारित होत आहेत, तर मानसशास्त्रीय दृष्टिकोनानुसार प्रत्येक व्यक्तीला प्रेम, स्वीकार, सुरक्षितता आणि भावनिक आधाराची गरज असते. ही गरज पूर्ण झाल्यास व्यक्तीचे मानसिक आरोग्य चांगले राहते आणि नातेसंबंध अधिक दृढ होतात. याउलट संवादाचा अभाव, संशय, अवास्तव अपेक्षा, अहंकार आणि असहिष्णुता यांमुळे नात्यांमध्ये तणाव निर्माण होतो.

आजच्या काळात तंत्रज्ञान, सोशल मीडिया, बदलती जीवनशैली आणि करिअरकेंद्री विचारसरणी यांमुळे स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे स्वरूप बदलत आहे. त्यामुळे परस्पर संवाद, विश्वास, वैयक्तिक स्वातंत्र्याचा आदर आणि भावनिक समतोल यांना पूर्वीपेक्षा अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. नाते टिकविण्यासाठी दोघांनीही समान सहभाग, जबाबदारी आणि सहकार्याची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे, अशाप्रकारे स्त्री-पुरुष नातेसंबंध हे केवळ सामाजिक किंवा जैविक बंधन नसून परस्पर विश्वास, प्रेम, समानता, जबाबदारी आणि सहजीवन यांवर आधारलेली एक गतिशील प्रक्रिया आहे. निरोगी, समताधिष्ठित आणि सुदृढ समाजरचना निर्माण करण्यासाठी स्त्री-पुरुष नातेसंबंधांमध्ये समानता, परस्पर आदर आणि मानवी मूल्यांचे जतन करणे अत्यावश्यक आहे.

*** *** ***

भाग-२ : स्त्रीवाद आणि साहित्य

अ - पितृसत्ता व स्त्रीचे दुय्यम स्थान

ब. स्त्रीवाद : संकल्पना व स्वरूप

१. पाश्चात्त्य तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

२. भारतीय तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

३. मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी केलेल्या स्त्रीवादाच्या व्याख्या

४. स्त्रीवादाचे स्वरूप

क - स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

१. पाश्चात्त्य स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

२. भारतातील स्त्रीवादी चळवळ व भूमिका

३. १९६० नंतर भारतातील स्त्रीवादी चळवळ

४. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची भूमिका

ड - स्त्रीवादी साहित्य

१. पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्य

२. भारतीय स्त्रीवादी साहित्य

३. मराठीतील स्त्रीवादी साहित्य

*** *** ***

अ - पितृसत्ता व स्त्रीचे दुय्यम स्थान

जगातील सर्व समाज सारखे नव्हते. प्रत्येक समाज पूर्णपणे स्त्रीविरोधी नव्हता. काही समाज मातृसत्ताक किंवा मातृवंशीय होते. मात्र जगातील बहुतेक समाजांमध्ये पुरुषप्रधान व्यवस्था असल्यामुळे निर्णयसत्ता पुरुषांकडे होती. त्यामुळे शिक्षण, संपत्ती आणि रोजगाराच्या संधी स्त्रियांना कमी मिळाल्या. धार्मिक व सामाजिक रूढींमुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने आली. घरकाम आणि मुलांची जबाबदारी हीच स्त्रीची मुख्य भूमिका मानली गेली. त्यामुळे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत स्त्रियांचा सहभाग कमी राहिला. म्हणजेच इतिहास, अर्थव्यवस्था, धर्म, सत्ता, युद्ध, जैविक भूमिका आणि सांस्कृतिक परंपरा या विविध कारणांमुळे जगभरातील अनेक समाजांमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले. त्याची काही कारणे खालीलप्रमाणे दिली आहेत.

१. प्रारंभीच्या मानवसमाजाची रचना

मानव सुरुवातीच्या काळात शिकार करून व जंगलात खाण्यासारखे मिळेल ते गोळा करून उदरनिर्वाह करीत होता. त्यावेळी समाजांमध्ये स्त्री-पुरुषांमध्ये तुलनेने अधिक समानता होती, असे अनेक मानवशास्त्रज्ञ मानतात. कारण अन्न गोळा करणे, फळे, मुळे, औषधी वनस्पती मिळवणे यांत स्त्रियांचा मोठा वाटा होता. पुरुष शिकार करत असत; पण अन्नाचा स्थिर स्रोत स्त्रियांच्या कामातूनच उपलब्ध होत असे. त्या काळात मालमत्ता किंवा जमीन यांची खासगी मालकी नव्हती; त्यामुळे सत्ता केंद्रित नव्हती. नंतरच्या काळात शेतीचा शोध लागल्याने मानवी

जीवन स्थिर होत गेले आणि परिस्थिती बदलली. म्हणजे समाज व संस्कृतीची विकसित घडण होत असतांना धार्मिक संहिता निर्माण केल्या आणि त्या चौकटीत लोकजीवन बद्ध होत गेले. त्यात स्त्री आणि पुरुष यांच्या जगण्या-वागण्याच्या पद्धती ठरविल्या गेल्या. पुरुषापेक्षा स्त्रीची भूमिका दुय्यम मानली गेली होती.

२. शेती आणि खाजगी मालमत्ता

कृषीक्रांतीमुळे मानवाने भटकंती सोडून स्थिर वसाहती निर्माण केल्या. शेती व पशुपालन सुरू झाले. जमीन, जनावरे आणि धान्य यांची मालकी निर्माण झाली. अन्नउत्पादन वाढले. गावे व शहरे विकसित झाली. लोक एकत्र राहू लागल्याने भाषा, कला, धर्म, सण-उत्सव यांचा विकास होऊन संस्कृती अधिक विकसित झाली. शेतीमुळे जास्त अन्न तयार होऊ लागल्यामुळे लोकांनी उरलेले धान्य व वस्तू यांची देवाणघेवाण सुरू केली. परिणामी व्यापार वाढला. त्यातून वारसा कोणाला द्यायचा हा प्रश्न महत्त्वाचा ठरला. त्यासाठी पुरुषांना आपली संतती निश्चित करण्याची गरज वाटू लागली. यातून स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्यावर नियंत्रण सुरू झाले. तेव्हापासून पितृसत्ताक व्यवस्था बळकट होत गेली. विवाहसंस्था अधिक कठोर बनविली गेली. त्यामुळे स्त्रियांवर अनेक बंधने आली. त्यांचे स्वातंत्र्य कमी झाले, शिक्षण व संपत्तीवरील अधिकार मर्यादित झाले आणि त्यांना मुख्यतः घरगुती कामांपुरतेच मर्यादित ठेवले गेले. स्त्रीला 'घर' आणि पुरुषाला 'बाहेरचे जग' अशी स्थान व कार्यविभागणी करण्यात आली.

३. शारीरिक शक्ती आणि युद्धव्यवस्था

प्राचीन व अतिप्राचीन इतिहासातील बहुतेक साम्राज्ये युद्धावर आधारित होती. आपले अस्तित्व आणि राज्य टिकविण्यासाठी युद्ध, सैन्य आणि संरक्षण यामध्ये शारीरिक शक्तीला महत्त्व होते. स्त्रियांपेक्षा पुरुष सरासरीने अधिक स्नायूशक्तीचे असल्याने राज्य, सेना, राजकारण आणि जमीन यांवरील पुरुषांचे नियंत्रण वाढले आणि सत्ताकेंद्र त्यांच्या हातात गेले. परिणामी पुरुष सत्ताधारी बनला, तर स्त्री पालनपोषण करणारी ठरली. समाजाची तशी मानसिक चौकटही तयार झाली. त्यात बदल करणे म्हणजे धर्मद्रोह मानले जायचे. त्यामुळे निर्माण झालेल्या परंपरेचे निमूटपणे पालन केले जायचे.

४. मातृत्व आणि जैविक जबाबदाऱ्या

स्त्रीवर जैविकदृष्ट्या गर्भधारणा, प्रसूती, स्तनपान आणि लहान मुलांची काळजी या नैसर्गिक जबाबदाऱ्या येऊन पडल्या. प्राचीन काळात आरोग्य सुविधा नव्हत्या, प्रसूती धोकादायक होती आणि बालमृत्यूचे प्रमाणही जास्त होते. त्यामुळे स्त्री घराभोवतीच अधिक मर्यादित राहिली. समाजाने यालाच तिची नैसर्गिक भूमिका मानून स्त्री म्हणजे 'चूल आणि मूल' यासंबंधी कायमस्वरूपी नियम तयार केले.

५. धर्म आणि सांस्कृतिक व्याख्या

जगातील अनेक धर्मांच्या व्याख्या पुरुषांनी केल्यामुळे धार्मिक संस्थांमध्ये त्यांनी स्वतःच्या बाजूने संहिता निर्माण केल्या. त्यामुळेही

पुरुषसत्ता बळकट झाली. अनेक समाजांत स्त्रीला एका बाजूला 'पवित्र' मानले गेले, तर दुसऱ्या बाजूला तिला मोह, पाप किंवा प्रलोभनाचे प्रतीक मानण्यात आले. त्यामुळे तिच्यावर शिक्षण, धार्मिक नेतृत्व आणि वारसाहक्क यांबाबत विविध निर्बंध लादण्यात आले. तिला पुरुषाच्या अधीन बनविण्यात आले.

६. आर्थिक अवलंबित्व

पुरुषांच्या नावावर संपत्ती होती. स्त्रियांना शिक्षण नव्हते आणि रोजगाराच्या संधीही कमी होत्या; त्यामुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहिल्या. त्यांना वडील, पती किंवा कुटुंबातील इतर पुरुषांवर आर्थिक गरजांसाठी अवलंबून राहावे लागे. समाजात पुरुष कमावणारा आणि स्त्री गृहिणी अशी भूमिका निश्चित करण्यात आली होती. त्यामुळे स्त्रीने आर्थिक निर्णय घेणे किंवा नोकरी करणे काही ठिकाणी आजही योग्य मानले जात नाही. विवाहानंतर तिचे आर्थिक निर्णय कुटुंबातील इतर सदस्य घेतात. घरकाम, मुलांची काळजी आणि वृद्धांची सेवा या जबाबदाऱ्या प्रामुख्याने स्त्रियांवर असतात. या कामांना आर्थिक मूल्य दिले जात नाही. त्यामुळे अनेक स्त्रियांना स्वतःचे स्वतंत्र उत्पन्न मिळविणे शक्य होत नाही.

७. शिक्षणापासून वंचितता

पूर्वी मुलींना शिक्षण दिले जात नव्हते. त्यामुळे ज्ञान आणि निर्णयक्षमता पुरुषांकडे केंद्रित झाली होती. कायदे पुरुषांनी बनवले, इतिहास पुरुषांनी लिहिला आणि त्यामध्ये स्त्रियांचे योगदान अदृश्य झाले. आधुनिक काळापर्यंत स्त्रियांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले. नंतर

त्यांना शिक्षण मिळू लागले असले, तरी त्याविषयीचे निर्णय कुटुंबातील पुरुषच घेत आले आहेत.

८. परंपरा आणि सामाजिक नियंत्रण

एकदा एखादी व्यवस्था तयार झाली की, ती पुढील पिढ्यांमध्ये परंपरा म्हणून टिकून राहते. पडदा प्रथा, बालविवाह, सतीप्रथा आणि 'कुटुंबाची इज्जत' या नावाखाली स्त्रियांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याची मानसिकता यांमुळे स्त्रीची वैयक्तिक ओळख कमी करून तिला कुटुंबाच्या प्रतिष्ठेशी जोडले गेले.

९. स्त्रियांनीही कधी कधी ही व्यवस्था स्वीकारली

स्त्रीचे लहानपणापासून सामाजिकीकरण होत असताना तिला स्त्रीत्वाची विशिष्ट ओळख करून दिली जाते. तिला पर्याय उपलब्ध नसतात आणि तिची सुरक्षितता परंपरेतच असल्याचे तिला शिकविले जाते. काही अपवाद वगळता अनेक स्त्रिया परंपरागत व्यवस्था आणि संस्कारांचा भाग म्हणून स्वतःही पितृसत्ताक मूल्ये पुढे नेताना दिसतात. हा त्यांचा वैयक्तिक दोष नसून सामाजिक रचनेचा परिणाम असतो. कारण समाजात राहायचे तर कुटुंबाला सामाजिक प्रथा-परंपरा पाळणे एक प्रकारे बंधनकारक बनले होते.

१०. आधुनिक काळातील बदल : आधुनिक काळात औद्योगिक क्रांती, शिक्षण आणि लोकशाही मूल्ये यांमुळे परिस्थिती बदलत गेली. स्त्रियांना शिक्षण, नोकरीच्या संधी, मतदानाचा अधिकार, कायदेशीर हक्क आणि

गर्भनियोजन तंत्रज्ञान यांबाबत अधिक स्वातंत्र्य मिळू लागले. त्यांना आर्थिक स्वातंत्र्य, राजकीय सहभाग आणि वैयक्तिक निर्णयक्षमता प्राप्त होऊ लागली. तथापि, त्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले, असे चित्र पूर्णपणे दिसून येत नव्हते.

आजही असमानता का टिकून आहे, या प्रश्नावर विचारमंथन केले गेले आहे. हजारो वर्षांची सामाजिक रचना काही दशकांत पूर्णपणे बदलत नाही. त्यामुळे कायद्याने समानता असली, तरी समाजाची मानसिकता पूर्णपणे बदललेली नाही. वेतनातील तफावत, घरगुती हिंसा आणि नेतृत्वाच्या क्षेत्रातील स्त्रियांचे कमी प्रतिनिधित्व या समस्या आजही अस्तित्वात आहेत. अशाप्रकारे स्त्रीला दुय्यम स्थान मिळण्यामागे एकच कारण नसून अनेक ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कारणे आहेत. आधुनिक समाज अधिक समतेकडे वाटचाल करीत असला, तरी हा बदल अजूनही सुरू असलेली एक सामाजिक प्रक्रिया आहे. त्यासाठी स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या आहेत.

*** *** ***

ब. स्त्रीवाद : संकल्पना व स्वरूप

स्त्री ही पुरुषाइतकीच जाणीवसंपन्न, विचारशील आणि स्वतंत्र व्यक्ती आहे, ही विचारसरणी बळकट होत गेल्याने स्त्रीवाद अस्तित्वात आला. त्यामुळे आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करीत आहे. शिक्षण, विज्ञान, राजकारण, उद्योग, कला आणि क्रीडा अशा सर्व क्षेत्रांत ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे. मात्र स्त्रीवाद हा पुरुषांविरोधातील संघर्ष नसून अन्यायाविरोधातील लढा आहे. समानता, स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा यांसाठीचा हा आवाज आहे, अशी स्पष्ट भूमिका स्त्रीवादाने घेतली आहे.

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क, स्वातंत्र्य आणि संधी मिळाव्यात, हा स्त्रीवादाचा मूलभूत हेतू आहे. स्त्रीवाद हा केवळ स्त्रियांच्या अधिकारांचा प्रश्न नसून सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेचा विचार मांडणारी व्यापक विचारसरणी आहे. विसाव्या शतकात जगभर स्त्रीवादी चळवळींनी वेग घेतला आणि शिक्षण, रोजगार, राजकारण, साहित्य, संस्कृती आणि कायदा या क्षेत्रांमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी आणले. भारतातही स्त्रीवादी विचारसरणीने सामाजिक परिवर्तनाला गती दिली.

पाश्चात्त्य विचारवंतांच्या मते, स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष समानतेसाठी संघर्ष करणारी चळवळ. स्त्रियांवर होणारे अन्याय, शोषण, लैंगिक भेदभाव आणि पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध करणे हे स्त्रीवादाचे मुख्य उद्दिष्ट आहे. "स्त्रीवाद ही पाश्चात्त्य विचारधारा आहे. 'स्त्रीवादी' ही

संज्ञा आपल्या येथे पाश्चात्त्य Feminism या शब्दावरून आलेली दिसते. स्त्रीवाद हा स्त्रियांच्या प्रश्नांनी भरलेला विचारमंच आहे. या संकल्पनेवरून त्याची पूर्णपणे प्रचिती येते. 'स्त्री' आणि 'वाद' हे दोन शब्द मिळून 'स्त्रीवाद' हा शब्द तयार झाला आहे. 'वाद' म्हणजे एखादी विशिष्ट विचारप्रणाली आणि विचारप्रवाह होय. हा वाद स्त्रियांच्या जीवनात निर्माण होणाऱ्या समस्यांमधून उदयास आलेला दिसतो." याशिवाय भारतीय संदर्भात स्त्रीवादाने स्त्रियांच्या शिक्षण, स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि सामाजिक सहभागावर भर दिला. महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या हक्कांसाठी महत्त्वपूर्ण कार्य केल्याने स्त्रीजीवनात अनेक सुधारणा घडून आल्या.

समाजातील पितृसत्ताक व्यवस्थेने स्त्रियांना दुय्यम स्थान दिल्यामुळे आधुनिक काळात स्त्रियांना शिक्षण, संपत्ती, रोजगार, राजकीय प्रतिनिधित्व आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या बाबतीत समान संधी मिळणे आवश्यक असल्याचे विचारवंतांनी प्रतिपादन केले. त्यातून स्त्रीवाद ही संकल्पना रूढ होत गेली. स्त्री आणि पुरुष यांना समान सामाजिक दर्जा मिळावा, स्त्रीला स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार असावा, पुरुषप्रधान संस्कृतीमुळे निर्माण होणाऱ्या विषमतेविरुद्ध संघर्ष करावा, पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध करावा, स्त्रियांच्या प्रगतीसाठी शिक्षणाला महत्त्व द्यावे आणि स्त्रियांना मूलभूत मानवी हक्क प्राप्त व्हावेत, अशा अनेक बाबी या संकल्पनेत समाविष्ट आहेत. त्यावरून स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक हक्कांच्या संरक्षणासाठी तसेच समानतेसाठी चालविलेली विचारधारा म्हणजे स्त्रीवाद होय, अशी त्याची व्याख्या करता

येईल. अनेक पाश्चात्त्य आणि भारतीय विचारवंतांनी स्त्रीवादाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. विविध तत्त्वज्ञ, समाजसुधारक आणि साहित्यिकांनी स्त्रीवादाच्या व्याख्या व संकल्पना मांडल्या आहेत. काही प्रमुख विचारवंतांनी मांडलेल्या संकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

१. पाश्चात्त्य तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

१. सिमोन द बोव्हा (Simone de Beauvoir) : यांनी त्यांच्या 'द सेकंड सेक्स' (१९४९) या ग्रंथात, 'स्त्री जन्मतः दुय्यम नसते; समाज आणि संस्कृती तिला त्या भूमिकेत ढकलतात.' असे सांगून स्त्रीचे दुय्यमत्व ही सामाजिक निर्मिती असल्याचे प्रतिपादन केले. पितृसत्ताक समाजरचनेचा विरोध करून स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारले जावे, अशा विचारांची मांडणी केली. त्याचा तत्कालीन समाजजीवनावर सकारात्मक परिणाम झालेला दिसून येतो.

२. बेल हुक्स (bell hooks) : यांनी 'Feminism Is for Everybody' या पुस्तकात "Feminism is a movement to end sexism, sexist exploitation and oppression." अशी स्त्रीवादाची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, स्त्रीवाद हा फक्त स्त्रियांसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे. त्यांनी लिंगभेद, वर्णभेद आणि वर्गभेद यांना विरोध केला आहे.

३. केट मिलेट (Kate Millett) : Sexual Politics (१९७०) या पुस्तकात त्यांनी स्त्रीवादाची व्याख्या करताना म्हटले आहे की, 'स्त्रियांवर पुरुषप्रधान

समाजव्यवस्थेमुळे होणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि लैंगिक शोषण ओळखून त्याविरुद्ध समानतेसाठी केलेला संघर्ष म्हणजे स्त्रीवाद होय.' त्यांच्या मते, समाजातील सत्ता पुरुषांच्या हातात केंद्रित असते. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. स्त्री-पुरुष संबंध म्हणजे लैंगिक राजकारण असून समाजातील लिंगाच्या आधारावर निर्माण होणारे सत्तासंबंध, अधिकार आणि असमानतेचा अभ्यास आहे. ते केवळ वैयक्तिक नसून राजकीय आणि सत्तात्मक संबंध आहेत. शिक्षण, रोजगार, राजकारण, लैंगिक स्वातंत्र्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या सर्व क्षेत्रांत स्त्री-पुरुष समानता आवश्यक आहे. स्त्रीला केवळ कायदेशीर नव्हे, तर मानसिक, सांस्कृतिक आणि लैंगिक बंधनांतूनही मुक्त करणे आवश्यक आहे. कारण पुरुषप्रधान संस्कृती स्त्रियांचे दमन करते. साहित्य, कला आणि संस्कृतीमध्ये स्त्रियांचे चित्रण अनेकदा पुरुषप्रधान दृष्टिकोनातून केले जाते; त्यावर टीका करणे हाही स्त्रीवादाचा भाग आहे. अशा प्रकारे त्यांनी स्त्रीवादाला केवळ सामाजिक सुधारणा नव्हे, तर सत्ता आणि समानतेच्या राजकारणाशी जोडलेले व्यापक आंदोलन म्हणून स्पष्ट केले आहे.

४. मेरी वूलस्टोनक्राफ्ट (Mary Wollstonecraft) : यांनी सांगितले आहे की, "स्त्रिया पुरुषांपेक्षा कनिष्ठ नसतात; त्यांना योग्य शिक्षण आणि संधी न दिल्यामुळे त्या मागे राहतात. स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षणामुळे स्त्री स्वतंत्र व बुद्धिमान नागरिक बनते. स्त्री आणि पुरुष दोघेही समान बुद्धी व नैतिक क्षमता असलेले मानव आहेत. त्यामुळे त्यांना समान हक्क मिळणे आवश्यक आहे. स्त्रियांनी फक्त सौंदर्य किंवा घरगुती भूमिकेत मर्यादित न राहता स्वतंत्र विचारसरणी विकसित करावी. समाजाने स्त्रियांना कमकुवत आणि भावनाप्रधान म्हणून घडवले

आहे, ही सामाजिक रचना बदलली पाहिजे. स्त्रियांची उन्नती झाली तर संपूर्ण समाज अधिक नैतिक आणि प्रगत बनेल." अशा विचारातून त्यांनी स्त्रीवादाला समान हक्क, शिक्षण, स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठेच्या चळवळीचे स्वरूप दिले आणि स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता मिळावी, यावर विशेष भर दिला.

२. भारतीय तत्त्वज्ञ, साहित्यिकांच्या स्त्रीवादी संकल्पना

ब्रिटिश कालखंडात भारतीय समाजात स्त्रीवादाची सुरुवात झाली. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घालताना स्त्रीशिक्षण हे स्त्रीमुक्तीचे प्रमुख साधन मानले. स्त्रियांचा स्वाभिमान आणि आत्मनिर्भरता यांवर त्यांनी भर दिला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रिया आणि शूद्र यांचे शिक्षण आवश्यक मानले. त्यांच्यासाठी स्वतः शाळाही सुरू केल्या. त्यांनी जातिभेद आणि लिंगभेद यांना विरोध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना संपत्ती, विवाह आणि घटस्फोटाचे अधिकार मिळवून देण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. त्यांनी स्त्रीस्वातंत्र्य हे सामाजिक लोकशाहीचा आधार आहे, असे प्रतिपादन करून स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण केले. पंडिता रमाबाई यांनी विधवा स्त्रियांचे पुनर्वसन करून स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रचार केला. नंतरच्या काळात स्त्रीवादाच्या व्याख्या आणि संकल्पना विविध विचारवंतांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून मांडल्या आहेत.

१. डॉ. नीरा देसाई : "स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान समजून घेणे, त्यामागील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक

कारणांचा अभ्यास करणे तसेच स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे."

२. डॉ. उमा चक्रवर्ती : "स्त्रीवाद म्हणजे पितृसत्ताक व्यवस्थेचे विश्लेषण करून स्त्रियांना समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठीचा वैचारिक व सामाजिक संघर्ष."

३. डॉ. वीणा मुजूमदार : "स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांना समान हक्क, समान संधी, विकासाच्या प्रक्रियेत समान सहभाग आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठीचा वैचारिक व सामाजिक प्रयत्न."

४. कमला भसीन : "स्त्रीवाद म्हणजे स्त्री आणि पुरुष दोघांनाही समान मानवी हक्क, संधी आणि सन्मान मिळावा यासाठीची चळवळ. स्त्रीवाद पुरुषांविरुद्ध नसून पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्ध आहे."

५. डॉ. शार्मिला रेगे : "स्त्रीवाद हा केवळ स्त्रियांच्या प्रश्नांपुरता मर्यादित नसून जात, वर्ग, लिंग आणि सामाजिक विषमता यांचा परस्परसंबंध समजून घेणारी परिवर्तनवादी विचारसरणी आहे."

६. निवेदिता मेनन : "स्त्रीवाद म्हणजे समाजातील लिंगाधारित असमानतेला प्रश्न विचारून समानता, स्वातंत्र्य आणि न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न."

३. मराठी साहित्याच्या अभ्यासकांनी केलेल्या स्त्रीवादाच्या व्याख्या

१. डॉ. विद्युत भागवत : "स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला माणूस म्हणून मान्यता देणारी आणि तिच्या समान हक्कांसाठी लढणारी विचारप्रणाली."

२. डॉ. अश्विनी धोंगडे : "स्त्रीला पुरुषांप्रमाणे समान हक्क, संधी आणि सामाजिक स्थान मिळावे, तसेच स्त्रीवरील अन्याय, शोषण आणि दुय्यमत्वाविरुद्धचा विचार व चळवळ म्हणजे स्त्रीवाद."

याचबरोबर सुमती लांडे यांनी संपादित केलेल्या 'स्त्रीवाद' या पुस्तकात काही लेखिकांनी स्त्रीवादाची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडली आहे.

३. शारदा साठे : "स्त्रीवाद म्हणजे स्त्रियांच्या हक्कांचे आणि अधिकारांचे समर्थन करणारे विचारसूत्र होय." (पृ. ४७)

४. प्रीती सदावर्ते : "स्त्रियांच्या एकूणच जीवनाविषयी समाजापुढे निर्माण झालेले प्रश्न-उपप्रश्न यांची सांगोपांग चर्चा करणारी मतप्रणाली म्हणजे स्त्रीवाद." (पृ. ६२)

५. माया पंडित : "कोणत्याही समाजामध्ये काही विशिष्ट संरचना, संकल्पना, कल्पनाप्रणाली आणि व्यवहार यांमुळे अन्याय होत असतो. त्या अन्यायाविरुद्ध झगडण्याची भूमिका घेऊन उभे राहणे म्हणजे स्त्रीवाद." (पृ. ८३)

६. विद्युत भागवत : "स्त्री-पुरुषांतील 'सत्ता' संबंधांची राजकीय जाणीव म्हणजे स्त्रीवाद." (पृ. १०७)

७. रजिया पटेल : "स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या हक्कांसाठी आणि आत्मसन्मानासाठी लढा देणे आवश्यक आहे. या लढ्याचे जे स्वरूप आहे, त्याला स्त्रीवाद म्हणून ओळखले जाते." (पृ. १२९)

८. अश्विनी धोंगडे यांच्या मते, "स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून दूर जाणे, त्याच्या विरोधात वागणे किंवा स्वतःचा वेगळा समूह निर्माण करणे नव्हे. परंपरेने हजारो वर्षे संस्कृतीने स्त्रीला एक व्यक्ती म्हणून, एक मानव म्हणून नाकारून तिला किड्या-मुंग्यांप्रमाणे जगण्यास भाग पाडले. पायातील चप्पल समजून जी हीनतेची वागणूक दिली, त्या विरोधात उभे राहणे एवढेच नव्हे, तर इतिहासाने स्त्रीचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली आहे, त्यातून बाहेर पडून स्वतःचे हक्क आणि अधिकार मागून घेण्यासाठी तयार झालेले हे व्यासपीठ म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीला स्वतःच्या स्वातंत्र्याची जाणीव करून देणारा हा मानवी हक्क आहे."

एकूणच स्त्रीवाद हा परुषांविरुद्धची लढाई नाही. ती राजकीय चळवळ असून समाजात स्त्रीला पूर्वीचे दिलेले दुय्यम स्थान हटवून पुरुषांच्या बरोबरीचे स्थान प्राप्त करून देणे, ही त्याची संकल्पना आहे.

४. स्त्रीवादाचे स्वरूप

स्त्रीकेंद्री अभ्यास करताना अभ्यासकांनी आधुनिक काळात जगभर निर्माण झालेल्या स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळी, स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने समान संधी देण्याच्या चळवळी आणि त्यातून विकसित झालेली स्त्रीनिष्ठ विचारधारा यांच्या अनुषंगाने स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट केली आहे.

त्यावरून स्त्रीवादाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये लक्षात येतात. पाश्चात्त्य आणि भारतीय विचारवंतांनी स्त्रीच्या भावविश्वाची अभिव्यक्ती करून स्त्रीला परंपरागत दास्यातून मुक्त करण्याचे विचार मांडले. त्याचा प्रत्यक्ष परिणाम त्या त्या समाजावर होऊन स्त्रीसुधारणांचे पर्व निर्माण होत गेलेले दिसून येते. विवाहसंस्था आणि सामाजिक बंधनांवर प्रश्न उपस्थित केले गेले. स्त्रीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा आग्रह धरण्यात आला. पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध करून स्त्रियांच्या सामाजिक न्यायासाठी संघर्ष करण्यात आला. स्त्री-पुरुष समानता मान्य करून स्त्रीची स्वतंत्र ओळख प्रस्थापित करण्यात आली. पुरुषसत्ताक मूल्यांना प्रश्न विचारले गेले आणि स्त्रीच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून तिलाही पुरुषाइतकेच अधिकार असल्याचे मान्य करण्यात आले. लिंगभेदाचे विश्लेषण करून सामाजिक परिवर्तनाची लाट निर्माण करण्यात आली. त्यातून स्त्रियांचे प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामाजिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. स्त्रीमुक्तीसाठी शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

- **स्त्रीवादाची वैशिष्ट्ये**

१. स्त्रीशिक्षणावर भर.

२. आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य.

३. पितृसत्ताक व्यवस्थेचा विरोध.

४. स्त्रीच्या अनुभवांना महत्त्व.

५. सामाजिक न्याय आणि समानता.

६. दलित आणि ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष.

७. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता.

८. सामाजिक आणि सांस्कृतिक अन्यायाविरुद्ध संघर्ष.

९. समानता, विकासाच्या संधी आणि सक्षमीकरणावर भर.

एकूणच स्त्रीवादाकडे केवळ पाश्चात्त्य विचारधारा म्हणून न पाहता भारतीय समाजव्यवस्थेशी जोडून त्याचे विश्लेषण करण्यात आले. स्त्रीवाद हा स्त्रीच्या स्वातंत्र्याचा, आत्मसन्मानाचा आणि सामाजिक न्यायाचा संघर्ष आहे, हे सर्व विचारवंतांच्या मांडणीतून स्पष्ट होते. त्यानुसार स्त्रीवादाचे पुढील प्रकार मानले जातात.

१. उदारमतवादी स्त्रीवाद – स्त्रियांना शिक्षण, मतदानाचा अधिकार आणि समान संधी मिळाव्यात, यावर भर देतो.

२. मार्क्सवादी स्त्रीवाद – स्त्रियांचे शोषण हे आर्थिक व्यवस्थेशी जोडलेले आहे, असे मानतो.

३. जहाल स्त्रीवाद – पितृसत्ताक व्यवस्थाच स्त्रियांच्या दडपशाहीचे मूळ कारण सांगतो.

४. समाजवादी स्त्रीवाद – भांडवलशाही आणि पितृसत्ता या दोन्ही व्यवस्थांना विरोध करतो.

५. दलित स्त्रीवाद – जात आणि लिंग या दुहेरी शोषणाविरुद्ध आवाज उठवतो.

अशाप्रकारे स्त्रीवाद ही केवळ स्त्रियांची चळवळ नसून समानता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायासाठीचा व्यापक संघर्ष आहे. स्त्रीवादामुळे समाजात स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जागृती निर्माण झाली. शिक्षण, कायदा, साहित्य आणि राजकारण या क्षेत्रांत स्त्रियांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. तरीही लैंगिक विषमता, स्त्रीभ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसा आणि सामाजिक भेदभाव यांसारख्या समस्या आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे स्त्रीवादी विचारसरणी आजच्या काळात अधिक महत्त्वाची ठरते.

*** *** ***

क - स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

जगामध्ये प्रबोधनयुग सुरू झाल्यापासून मानवी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत गेला. त्याचप्रमाणे स्त्रीजीवनाचेही पुनरावलोकन करण्यात आले. त्यामुळे परंपरागत लिंगभेद आणि लिंगभाव यांविषयी नव्या विचारसरणी उदयास आल्या आणि विविध स्त्रीवादी चळवळी उभ्या राहिल्या. विशिष्ट भूमिका घेऊन स्त्रीमुक्तीची आंदोलने होत राहिली. महिलांना समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. काळानुसार या चळवळींचे विविध टप्पे विकसित झाले. कारण काळ, परिस्थिती आणि बदलती जीवनमूल्ये यांनुसार त्यांच्या भूमिका बदलणे स्वाभाविक आहे. समाजाच्या परिवर्तनसह त्यांच्या आंदोलनाची दिशाही बदललेली आहे.

१. पाश्चात्त्य स्त्रीवादी चळवळ आणि भूमिका

इंग्लंडमधील प्रसिद्ध लेखिका, तत्त्वज्ञ आणि प्रारंभीच्या स्त्रीवादी विचारवंत मेरी वूलस्टोनक्राफ्ट यांनी १७९२ मध्ये प्रकाशित झालेल्या 'A Vindication of the Rights of Woman' या ग्रंथात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत, अशी भूमिका मांडली आहे. त्यांनी महिलांच्या शिक्षणावर विशेष भर दिला. स्त्रिया बुद्धी आणि क्षमतेने पुरुषांइतक्याच सक्षम आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेवर टीका करून महिलांना स्वातंत्र्य, आत्मसन्मान आणि आर्थिक स्वावलंबन मिळाले पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. हा ग्रंथ स्त्रीवादी चळवळीचा पाया मानला जातो.

जॉन स्टुअर्ट मिल यांनीही स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करून महिलांना पुरुषांप्रमाणे समान सामाजिक, राजकीय आणि कायदेशीर हक्क मिळावेत, यावर भर दिला. त्यांनी महिलांच्या गुलामगिरीविरुद्ध भूमिका मांडली. महिलांना योग्य शिक्षण मिळाल्यास त्या सर्व क्षेत्रांत यशस्वी होऊ शकतात, असे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर मतदानाचा अधिकार, राजकीय हक्क, विवाहातील समानता आणि समाजाच्या प्रगतीसाठी स्त्रीस्वातंत्र्य आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला युनायटेड किंगडममध्ये महिलांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी Suffragette Movement सुरू झाली. महिलांच्या मतदानाच्या हक्कासाठी आक्रमक पद्धतीने आंदोलन करणाऱ्या महिलांना Suffragettes असे म्हटले जात असे. एमेलिन पँकहर्स्ट या ब्रिटनमधील महिलांच्या मतदानाच्या हक्कासाठी लढणाऱ्या प्रसिद्ध नेत्या आणि सफ्रजेट चळवळीच्या प्रमुख नेतृत्वांपैकी एक होत्या. त्यांनी महिलांना समान राजकीय हक्क मिळावेत म्हणून आंदोलन, मोर्चे आणि व्यापक प्रचार केला. त्यांनी १९०३ मध्ये 'Women's Social and Political Union (WSPU)' ही संस्था स्थापन केली. 'Deeds, not Words' (फक्त बोलणे नव्हे, कृती हवी) हे या संस्थेचे घोषवाक्य होते. त्यांच्या आंदोलनामुळे ब्रिटनमध्ये महिलांच्या मतदानाच्या हक्काबाबत मोठी जागृती झाली. अखेर १९१८ मध्ये काही महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला आणि त्यानंतर सर्व महिलांना समान मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला.

विसाव्या शतकात महिलांनी समान वेतन, रोजगारातील समानता, प्रसूती हक्क आणि लैंगिक भेदभावाविरोधात कायदे करण्यासाठी संघर्ष केला. त्यामुळे Equal Pay Act, 1970 आणि Sex Discrimination Act, 1975 हे महत्त्वाचे कायदे अस्तित्वात आले. परिणामी या चळवळींमुळे महिलांना राजकीय हक्क मिळाले. शिक्षण व नोकरीच्या संधी वाढल्या. समाजातील महिलांचे स्थान अधिक मजबूत झाले. तसेच जगभरातील स्त्री-समता आंदोलनांना प्रेरणा मिळाली.

फ्रान्समधील सिमोन द बोव्हा यांनी 'The Second Sex' या ग्रंथातून स्त्रियांच्या शोषणाचे आणि सामाजिक स्थितीचे विश्लेषण केले. पुरुषप्रधान समाजव्यवस्था स्त्रियांवर अन्याय करते आणि स्त्रीला Second Sex (दुय्यम लिंग) म्हणून पाहिले जाते, यावर त्यांनी टीका केली. स्त्रियांना आर्थिक, सामाजिक आणि वैचारिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांनी आधुनिक स्त्रीवादाला वैचारिक दिशा दिली आणि स्त्रियांच्या हक्कांविषयी जागतिक स्तरावर जागृती निर्माण केली. तसेच दुसऱ्या टप्प्यातील स्त्रीवादी चळवळीला प्रेरणा दिली.

अमेरिकेत महिला हक्कांची संघटित चळवळ १८४० च्या दशकात सुरू झाली. ही चळवळ सुरुवातीला गुलामगिरीविरोधी आंदोलनाशी जोडलेली होती. एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन आणि लुक्रेशिया मॉट यांनी महिलांच्या समान हक्कांसाठी आवाज उठवला. १८४८ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्यातील सेनेका फॉल्स येथे पहिली महिला हक्क परिषद भरविण्यात आली. महिलांना मतदानाचा अधिकार, शिक्षण आणि समान हक्क मिळावेत, या उद्देशाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेत Declaration of Sentiments हा जाहीरनामा तयार करण्यात आला. तो अमेरिकेच्या Declaration of Independence वर आधारित होता. महिलांना मतदानाचा अधिकार, शिक्षण, नोकरी आणि मालमत्तेचे अधिकार मिळावेत, अशी मागणी त्यामध्ये करण्यात आली. समाजातील स्त्रियांवरील अन्याय आणि भेदभावाविरोधात आवाज उठविण्यात आला. या जाहीरनाम्यामुळे जागतिक स्त्रीवादी चळवळीला नवी दिशा मिळाली. एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन यांनी या परिषदेत महत्त्वाची भूमिका बजावत हा जाहीरनामा तयार करण्यात मोलाचे योगदान दिले आणि स्त्री-पुरुष समानतेचा जोरदार पुरस्कार केला.

लुक्रेशिया मॉट यांनी महिलांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी सातत्याने आवाज उठवला. त्या गुलामगिरीविरोधी चळवळीतील सक्रिय कार्यकर्त्या होत्या. १८४८ मधील Seneca Falls Convention आयोजित करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही परिषद अमेरिकेतील पहिली महिला हक्क परिषद मानली जाते. त्यांनी महिलांच्या शिक्षण, मतदानाचा हक्क आणि सामाजिक समानतेसाठी व्यापक प्रचार केला.

महिलांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी सुसन बी. अँथनी, ॲलिस पॉल आणि इतर कार्यकर्त्यांनी मोर्चे, सभा आणि आंदोलनांच्या माध्यमातून मोठा संघर्ष केला. १९२० मध्ये अमेरिकेच्या संविधानातील Nineteenth Amendment to the United States Constitution मंजूर झाले आणि महिलांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. हा महिला हक्क चळवळीचा मोठा विजय मानला जातो.

१९६० आणि १९७० च्या दशकात महिला चळवळीची दुसरी लाट सुरू झाली. या काळात केवळ मतदानाचा अधिकार नव्हे, तर समान वेतन, रोजगारातील समान संधी, प्रजनन स्वातंत्र्य, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसाचारास विरोध आणि स्त्रियांच्या सामाजिक स्थानाच्या प्रश्नांवर चळवळी उभ्या राहिल्या.

बेटी फ्रिडन यांनी १९६३ मध्ये The Feminine Mystique हे पुस्तक लिहिले. या ग्रंथात त्यांनी मध्यमवर्गीय अमेरिकन महिलांच्या जीवनातील असमाधान मांडले आणि त्यांच्या सामाजिक भूमिकांवर चिकित्सक चर्चा केली. महिलांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न राष्ट्रीय स्तरावर आणला. त्यामुळे महिलांच्या शिक्षण, करिअर, स्वातंत्र्य आणि समान हक्कांविषयी व्यापक चर्चा सुरू झाली आणि अमेरिकेतील दुसऱ्या टप्प्यातील महिला हक्क चळवळीला मोठी चालना मिळाली.

१९९० नंतर वंश, लैंगिक ओळख आणि विविध सामाजिक गटांतील महिलांच्या प्रश्नांवर विशेष भर देण्यात आला. अलीकडील काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून लैंगिक छळ आणि असमानतेविरुद्ध विविध मोहिमा उभ्या राहिल्या. अमेरिकेतील सामाजिक कार्यकर्त्या तराना बर्क यांनी २००६ मध्ये #MeToo Movement ही लैंगिक अत्याचाराविरोधातील जागतिक सामाजिक चळवळ सुरू केली. या चळवळीत महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि न्याय यांवर विशेष भर देण्यात आला.

एकूणच अमेरिकेतील महिला हक्क चळवळींमुळे महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला, शिक्षण व नोकरीच्या संधी वाढल्या, समान वेतनासंदर्भातील कायदे झाले, राजकारणातील महिलांचा सहभाग वाढला आणि महिलांविरुद्धच्या भेदभावाबाबत व्यापक जागरूकता निर्माण झाली. तरीही समान वेतन, लैंगिक हिंसा आणि राजकीय प्रतिनिधित्व यांसारखे प्रश्न आजही पूर्णपणे सुटलेले नाहीत.

युरोपमध्ये प्रबोधन काळात 'सर्व मानव समान आहेत.' ही कल्पना पुढे आली; परंतु प्रत्यक्षात स्त्रियांना शिक्षण, मतदान, मालमत्तेचे हक्क आणि सार्वजनिक जीवनातील सहभाग यांपासून वंचित ठेवले जात होते. त्यामुळे युरोप आणि अमेरिकेतील स्त्रीवादी चळवळ स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक समानतेसाठी उभी राहिली. या चळवळीमधून सुरुवातीपासून आजपर्यंत पुढील प्रमुख भूमिका स्पष्ट झाल्या आहेत.

१. स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार.

२. विवाहात समानता.

३. स्त्रिया बुद्धिमान व स्वतंत्र व्यक्ती आहेत.

४. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह.

५. मतदानाचा अधिकार.

६. मालमत्तेचा अधिकार.

७. शिक्षण व नोकरीतील समान संधी.

८. विवाहविषयक कायद्यांमध्ये सुधारणा.

९. समान वेतन.

१०. प्रजनन हक्क (गर्भपाताचा अधिकार).

११. लैंगिक स्वातंत्र्य.

१२. घरगुती हिंसाचाराविरोधी कायदे.

१३. कार्यस्थळी भेदभावाविरोध.

१४. कृष्णवर्णीय स्त्रियांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष.

१५. LGBTQ+ हक्क.

१६. शरीरस्वातंत्र्य

१७. सौंदर्याच्या सामाजिक निकषांवर टीका.

१८. लैंगिक ओळख आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य.

१९. पितृसत्ताक संस्कृतीवर टीका.

२०. इंटरनेटवरील स्त्रीद्वेषाविरोध.

२१. ट्रान्स महिलांच्या समावेशावरील चर्चा.

२२. मानसिक आरोग्य आणि भावनिक श्रम यांची दखल.

२. भारतातील स्त्रीवादी चळवळ व भूमिका

स्त्रीवादी चळवळीमुळे जगभरात स्त्रियांच्या शिक्षण, मतदान, रोजगार, कायदे आणि सामाजिक स्थान यांमध्ये मोठे बदल झाले. एकोणिसाव्या शतकात, विशेषतः इंग्रजी राजवटीच्या काळात, त्याच्या प्रभावाने भारतातही स्त्रीसुधारणेचे पर्व सुरू झाले आणि स्त्रीवादी चळवळ विकसित होत गेली. इंग्रजी राजवटीमुळे शिक्षण, कायदे आणि सामाजिक सुधारणा यांना चालना मिळाली. समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षण व स्त्रीसुधारणेसाठी प्रयत्न केले. त्यामुळे समाजाचा दृष्टिकोन बदलला आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी सामाजिक व राजकीय चळवळी निर्माण झाल्या.

राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीचा कायदा आणि संमतीवयाच्या कायद्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू करून स्त्रीशिक्षणाला चालना दिली. इंग्रजी शिक्षणामुळे आधुनिक विचार वाढले, अंधश्रद्धा व अन्यायकारक प्रथा कमी होऊ लागल्या आणि स्त्रियांच्या संरक्षणासाठी सुधारणा घडून आल्या.

महाराष्ट्रात लोकहितवादी आणि बाळशास्त्री जांभेकर यांनी विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांच्या प्रश्नांबाबत जनजागृती केली. वृत्तपत्रांमधून त्यांनी सतीप्रथा, बालविवाह आणि बहुपत्नीत्व यांसारख्या प्रथांविरुद्ध आवाज उठवला. महात्मा फुले यांनी स्त्रीजीवन सुधारण्यासाठी

शिक्षणाला महत्त्व देऊन स्त्रीमुक्ती चळवळीची सुरुवात केली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवाविवाह करून विधवांच्या उन्नतीसाठी संस्था स्थापन केल्या. गोपाळ गणेश आगरकर यांनी स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. त्यांनी बालविवाह, सतीप्रथा, केशवपन यांसारख्या वाईट प्रथांचा विरोध करून स्त्रियांच्या बौद्धिक विकासासाठी शिक्षण आवश्यक असल्याचे सांगितले.

याचबरोबर आगरकर, महात्मा गांधी आणि विठ्ठल रामजी शिंदे यांसारख्या समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रीजीवनात मोठे परिवर्तन घडून आले. सत्याग्रह चळवळी, स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रियांचा सहभाग आणि सामाजिक सुधारणांच्या विचारांमुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, राजकीय जागृती आणि वैचारिक विकास निर्माण झाला. विवाहसंस्था, जातिभेद आणि स्त्रीदास्य यांविरोधातील विचारांनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून समाजात स्थान मिळवून दिले. त्यामुळे स्त्रीच्या सामाजिक, राजकीय आणि मानसिक स्वातंत्र्याच्या दिशेने क्रांतिकारक बदल घडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानिक आणि कायदेशीर दृष्टिकोनातून भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्याचा विचार सामाजिक समता, जातिनिर्मूलन आणि मानवाधिकारांच्या संदर्भात केला. स्त्रीच्या गुलामीमागे जातीव्यवस्था आणि मनुस्मृतीतील स्त्रीविरोधी विचार कारणीभूत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिंदू कोड बिल, समान वेतन, प्रसूती रजा, वारसा हक्क आणि स्त्रियांसाठी आरक्षण यांसारख्या उपायांद्वारे त्यांनी स्त्रीला समान अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. भारतीय संविधानामुळे स्त्रियांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक

क्षेत्रांत समान संधी मिळाल्या. त्यामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास वाढला, पारंपरिक बंधने कमी झाली आणि स्त्रीकडे स्वतंत्र व्यक्ती म्हणून पाहण्याची समाजाची दृष्टी बदलू लागली.

स्त्रियांच्या शिक्षणप्रसारामुळे महिलांमध्ये आपल्या हक्कांविषयी जागृती निर्माण झाली आणि त्यांनी स्वतः स्त्रीसुधारणेच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे आणि ताराबाई शिंदे यांसारख्या स्त्रियांनी समाजातील अन्याय, स्त्रीदमन आणि पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथाने स्त्री-पुरुष समानतेचा ठाम विचार मांडत जात, धर्म आणि पितृसत्ताक व्यवस्थेवर कठोर टीका केली. त्यामुळे भारतीय स्त्रीवादी विचारसरणीला भक्कम पाया मिळाला आणि स्त्रीच्या स्वत्व, अधिकार व समानतेच्या लढ्याला नवी दिशा प्राप्त झाली.

- **१९६० नंतर भारतातील स्त्रीवादी चळवळ**

भारतामध्ये १९६० नंतर स्त्रियांच्या हक्कांसाठी विविध स्तरांवर चळवळी उभ्या राहिल्या. या चळवळींनी शिक्षण, समान वेतन, हिंसाचाराविरोध, राजकीय सहभाग, कायदे-सुधारणा आणि सामाजिक न्याय यांसाठी मोठे कार्य केले. भारतीय स्त्रीवादी चळवळ ही केवळ महिलांच्या हक्कांसाठीची चळवळ नव्हती, तर सामाजिक परिवर्तनाची व्यापक प्रक्रिया होती. या चळवळीमुळे महिलांना शिक्षण, कायदेशीर संरक्षण, रोजगार आणि समाजात अधिक सन्मानाचे स्थान मिळण्यास मदत झाली.

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने स्त्रियांना समानतेचा अधिकार दिला. तरीही समाजात बालविवाह, हुंडा, स्त्रीशिक्षणाचा अभाव आणि रोजगाराच्या मर्यादित संधी यांसारख्या समस्या कायम होत्या. त्यामुळे भारतीय महिलांच्या हक्कांसाठी आणि संरक्षणासाठी काही महत्त्वाचे कायदे करण्यात आले.

१९६१ च्या मातृत्व लाभ कायद्यामुळे (Maternity Benefit Act, 1961) काम करणाऱ्या महिलांना प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतर सशुल्क रजा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला. यामुळे महिलांच्या आरोग्याचे आणि रोजगाराचे संरक्षण झाले. हुंडाबंदी कायदा, १९६१ अंतर्गत विवाहात हुंडा घेणे किंवा देणे हा गुन्हा घोषित करण्यात आला. महिलांवर होणारे अत्याचार कमी करण्यासाठी हा महत्त्वाचा कायदा ठरला. महिलांना आणि पुरुषांना समान कामासाठी समान वेतन मिळावे, यासाठी समान वेतन कायदा, १९७६ लागू करण्यात आला. वैद्यकीय गर्भपात कायदा, १९७१ अंतर्गत विशिष्ट परिस्थितींमध्ये सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताला परवानगी देण्यात आली. महिलांच्या आरोग्य आणि प्रजनन हक्कांच्या दृष्टीने हा मोठा बदल मानला जातो.

१९७० च्या दशकात महिलांनी महागाई, हिंसाचार, हुंडा आणि समान हक्कांसाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलने केली. महाराष्ट्रात महिलांनी महागाईविरोधी मोर्चे काढले. १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले. त्यामुळे भारतीय समाजात महिलांविषयी जागरूकता वाढली. स्त्रियांच्या हक्क, शिक्षण, समानता आणि स्वातंत्र्य यांबद्दल व्यापक चर्चा सुरू झाली. अनेक महिला संघटना निर्माण झाल्या

आणि त्यांनी स्त्रियांच्या समस्या मांडण्यास सुरुवात केली. शासनाने महिलांसाठी विविध कायदे आणि कल्याणकारी योजना राबवल्या. त्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सहभागात वाढ झाली. या काळात स्त्रीमुक्तीची आंदोलने अधिक संघटित आणि सक्रिय झाली. महिलांनी शिक्षण, समान हक्क, रोजगार, हुंडाबंदी, अत्याचारविरोध, घटस्फोट, वारसाहक्क आणि राजकीय सहभाग यांसाठी आंदोलने केली. अनेक महिला संघटना स्थापन झाल्या. त्यांनी मोर्चे, सभा, जनजागृती कार्यक्रम आयोजित केले आणि कायद्यांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. माध्यमांद्वारे स्त्रियांच्या प्रश्नांना प्रसिद्धी मिळाली आणि समाजात महिलांच्या हक्कांविषयी जागरूकता वाढली.

सन २००० नंतर भारतातील स्त्रीवादी चळवळ अधिक व्यापक, आधुनिक आणि हक्कांवर आधारित बनली. या काळात महिलांनी केवळ समानतेची मागणी न करता सुरक्षितता, शिक्षण, रोजगार, राजकीय प्रतिनिधित्व आणि लैंगिक स्वातंत्र्य यांसारख्या मुद्द्यांवरही आवाज उठवला. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे ही चळवळ अधिक वेगाने पसरली. बलात्कार, कौटुंबिक हिंसा, हुंडाबळी आणि ॲसिड हल्ल्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर आंदोलने झाली. २०१२ मधील दिल्लीतील 'निर्भया' प्रकरणानंतर संपूर्ण देशात स्त्रीसुरक्षेचा प्रश्न केंद्रस्थानी आला. कठोर कायदे, जलद न्यायालये आणि पोलिस सुधारणांची मागणी करण्यात आली.

२०१८ मध्ये भारतात #MeToo मोहिमेने वेग घेतला. चित्रपटसृष्टी, पत्रकारिता, शिक्षण आणि राजकारणातील महिलांनी लैंगिक

छळाविरोधात खुलेपणाने आवाज उठवला. त्यामुळे कार्यस्थळी लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याविषयी जागरूकता वाढली.

महिलांच्या शिक्षणावर भर दिल्यामुळे आयटी, बँकिंग, प्रशासन, उद्योग आणि इतर क्षेत्रांत महिलांचा सहभाग वाढला. स्वयंरोजगार, स्वयं-साहाय्य गट आणि सूक्ष्म वित्त योजनांमुळे ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण झाले.

दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक महिलांच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देण्यात आले. स्त्रीवाद केवळ शहरी आणि उच्चवर्गीय महिलांपुरता मर्यादित राहिला नाही. दलित, आदिवासी आणि मुस्लिम महिलांच्या स्वतंत्र समस्या मांडल्या जाऊ लागल्या. सर्व महिलांचा अनुभव सारखा नसतो, ही जाणीव समाजात अधिक दृढ झाली. विशेषतः फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्राम यांसारख्या सोशल मीडिया माध्यमांद्वारे महिलांनी आपले अनुभव मांडण्यास सुरुवात केली. ऑनलाइन मोहिमा, डिजिटल आंदोलने आणि जनजागृती मोठ्या प्रमाणावर वाढली. तरुण पिढीही मोठ्या प्रमाणात या चळवळीत सहभागी झाली. या काळात महिलांसाठी अनेक महत्त्वाचे कायदे आणि योजना राबविण्यात आल्या. घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा (२००५), कार्यस्थळी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा (२०१३), 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियान (२०१५) आणि महिला आरक्षणासंदर्भातील कायदा (२०२३) हे त्यांपैकी महत्त्वाचे टप्पे मानले जातात. त्याविषयी समाजात जागृती केली जाते.

एकूणच २००० नंतरची भारतीय स्त्रीवादी चळवळ अधिक जागरूक, संघर्षशील आणि समावेशक झाली. तिने महिलांच्या हक्कांना

सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. ग्रामीण भागात अजूनही पितृसत्ताक विचार मजबूत आहेत. महिलांविरोधातील गुन्हे पूर्णपणे कमी झालेले नाहीत. समान वेतन, सुरक्षितता आणि राजकीय प्रतिनिधित्व यांमध्ये अजूनही असमानता आहे. गेल्या काही शतकांपासून महिलांच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी जागर सुरू असूनही, पुरुषसत्ताक व्यवस्थेत महिलांचे अनेक प्रश्न आणि समस्या आजही अस्तित्वात आहेत, असे एका बाजूला दिसून येते; तर दुसऱ्या बाजूला महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्यामध्ये निर्माण झालेले आत्मभानही मोठ्या प्रमाणात दिसून येते. त्याबाबत भारतातील स्त्रीवादी चळवळीची भूमिका खालीलप्रमाणे आहे.

३. भारतीय स्त्रीवादी चळवळीची भूमिका

१. महिलांना समान हक्क मिळवून देणे.

२. स्त्रियांवरील अन्याय व भेदभावाविरोधात आवाज उठवणे.

३. शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढवणे.

४. महिलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण करणे.

५. बालविवाह, हुंडाप्रथा, स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या प्रथांना विरोध करणे.

६. महिलांवरील हिंसाचाराविरोधात लढा देणे.

७. राजकारणात महिलांचा सहभाग वाढवणे.

८. स्त्रियांना स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सन्मान मिळवून देणे.

९. महिलांसाठी समान वेतनाची मागणी करणे.

१०. कार्यस्थळी लैंगिक छळाविरोधात संरक्षण मिळवून देणे.

११. आरोग्य व पोषण सुविधांबाबत जागरूकता वाढवणे.

१२. ग्रामीण व दलित महिलांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देणे.

१३. महिलांमध्ये कायदेशीर हक्कांविषयी जागृती करणे.

१४. निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवणे.

१५. स्त्रियांच्या आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास करणे.

१६. डिजिटल माध्यमातून महिलांचा आवाज समाजापर्यंत पोहोचवणे.

१७. समाजात लिंगसमानतेची भावना निर्माण करणे.

१८. महिला आरक्षणाला समर्थन देणे.

४. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची भूमिका

महाराष्ट्र हे सामाजिक सुधारणांच्या परंपरेचे अग्रगण्य राज्य मानले जाते. एकोणिसाव्या शतकात स्त्रियांना शिक्षण, संपत्ती, स्वातंत्र्य आणि सार्वजनिक जीवनात सहभाग यांसारखे मूलभूत अधिकार नाकारले जात

होते. बालविवाह, विधवांवरील अन्याय, हुंडापद्धती, जातीय विषमता आणि पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्था यांमुळे स्त्रियांचे जीवन अनेक बंधनांनी वेढलेले होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात समाजसुधारकांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी सुरू केलेल्या प्रयत्नांना पुढे स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. काळानुसार ही चळवळ केवळ सामाजिक सुधारणांपुरती मर्यादित न राहता समानता, मानवी हक्क, आर्थिक स्वावलंबन, राजकीय सहभाग आणि लैंगिक न्याय यांसाठीच्या व्यापक सामाजिक चळवळीत रूपांतरित झाली.

१. स्त्रीवादी चळवळीचा ऐतिहासिक पाया

महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळीची पायाभरणी महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केली. १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया घातला. स्त्री शिक्षित झाल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही, हा विचार त्यांनी कृतीतून सिद्ध केला. यानंतर राजर्षी शाहू महाराज यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले आणि सामाजिक समतेची धोरणे राबवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या घटनात्मक अधिकारांसाठी, वारसाहक्कासाठी आणि समानतेसाठी संघर्ष केला. हिंदू कोड बिलाद्वारे त्यांनी महिलांच्या कायदेशीर अधिकारांना बळकटी देण्याचा प्रयत्न केला.

२. स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीवादी चळवळ

स्वातंत्र्यानंतर महिलांना घटनात्मक समानता मिळाली; परंतु सामाजिक वास्तवात भेदभाव कायम होता. त्यामुळे १९७० नंतर स्त्रीवादी

चळवळीने नवे स्वरूप धारण केले. या काळात हुंडाबळी, बलात्कार, कौटुंबिक हिंसा, स्त्रीभ्रूणहत्या, लैंगिक छळ, समान वेतन, पुनरुत्पादनाचे अधिकार आणि राजकीय प्रतिनिधित्त्व यांसारखे प्रश्न केंद्रस्थानी आले. स्त्रीवादी संघटनांनी महिलांचे प्रश्न वैयक्तिक नसून सामाजिक आणि राजकीय आहेत, ही भूमिका मांडली. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीला व्यापक सामाजिक आधार मिळाला.

३. स्त्रीमुक्ती संघटनेची भूमिका

स्त्री मुक्ती संघटना ही महाराष्ट्रातील प्रभावी स्त्रीवादी संघटना आहे. या संघटनेने महिलांवरील कौटुंबिक हिंसा, हुंडा, लैंगिक छळ, स्त्रीभ्रूणहत्या आणि असंघटित क्षेत्रातील महिलांच्या प्रश्नांवर सातत्याने काम केले. कचरा वेचक महिलांचे संघटन, स्वयंरोजगार, पर्यावरण आणि आर्थिक स्वावलंबन यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवून आणला. अर्थात या संघटनेचे वैशिष्ट्य म्हणजे तिने स्त्रीवादाला केवळ समान हक्कांच्या मागणीपुरते मर्यादित ठेवले नाही, तर सामाजिक न्याय, आर्थिक स्वावलंबन आणि स्त्रियांच्या नेतृत्वविकासाशी जोडले. त्यामुळे स्त्रीवादी चळवळ अधिक लोकाभिमुख आणि व्यापक बनली.

४. महिला दक्षता समितीची भूमिका

महिला दक्षता समिती ही महिलांच्या संरक्षणासाठी आणि न्यायासाठी कार्य करणारी महत्त्वाची संघटना आहे. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, लैंगिक अत्याचार, पोटगी, वारसाहक्क आणि महिलांवरील अन्यायाविरुद्ध या समितीने प्रभावी लढे उभारले. पीडित महिलांना

कायदेशीर मदत, समुपदेशन आणि सामाजिक आधार देण्याचे कामही या समितीने केले. महिला दक्षता समितीने स्त्रियांच्या प्रश्नांना न्यायव्यवस्था आणि राज्याच्या जबाबदारीशी जोडले. त्यामुळे महिलांच्या संरक्षणासाठी कायद्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी सामाजिक दबाव निर्माण झाला. त्या चळवळीची भूमिका खालीलप्रमाणे होती.

१. स्त्रीशिक्षणाचा व्यापक प्रसार करण्यासाठी मोहीम राबविणे

२. महिलांमध्ये हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे

३. हुंडा, कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ यांसारख्या प्रश्नांवर समाजात चर्चा करून त्यावर उपाय शोधणे आणि स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी कायदेशीर लढा देणे

४. महिलांच्या संरक्षणासाठी विविध कायदे आणि धोरणांना चालना मिळण्यासाठी संघर्ष करणे

५. स्वयं-साहाय्य गट आणि लघुउद्योगांमुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे

६. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढविणे

७. स्त्री-पुरुष समानता हे लोकशाहीचे मूलभूत मूल्य म्हणून समाजात अधिक दृढ करणे

८. महाराष्ट्रातील स्त्रीवादी चळवळ ही केवळ महिलांच्या हक्कांची चळवळ नसून सामाजिक न्याय, लोकशाही आणि समानतेची चळवळ आहे. हे समाजाला पटवून देणे

*** *** ***

ड - स्त्रीवादी साहित्य

स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्रियांचे जीवन, अनुभव, संघर्ष, हक्क, स्वातंत्र्य आणि समाजातील स्थान यांचे वास्तववादी व चिकित्सक चित्रण करणारे साहित्य होय. स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडणे, स्त्रियांवरील अन्याय व भेदभावाला विरोध करणे आणि स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला स्वतंत्र ओळख मिळवून देणे, हे या साहित्याचे प्रमुख प्रयोजन मानले जाते. या साहित्यामध्ये स्त्रीच्या भावना, आत्मसन्मान, शिक्षण, स्वावलंबन, सामाजिक बंधने आणि तिचे अधिकार यांवर विशेष भर दिला जातो.

पाश्चात्त्य साहित्यापासून मराठी साहित्यापर्यंत स्त्रीवादी विचार प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत. स्त्रीच्या स्वातंत्र्य, समानता आणि सन्मानाचा पुरस्कार करणारे तसेच तिच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून लिहिले गेलेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय. स्त्रीसुधारणेच्या आधुनिक पर्वापासून संपूर्ण जगात या साहित्याची निर्मिती होत आहे.

अ. पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्य

पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्यामध्ये स्त्रीचे जीवन, तिचे अस्तित्व, सामाजिक बंधने, मानसिक संघर्ष आणि स्वातंत्र्य यांचे सखोल चित्रण आढळते. हे साहित्य केवळ स्त्रियांच्या दुःखाचे वर्णन करत नाही, तर स्त्रीचे आत्मभान, अधिकार आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व यांचा शोध घेते. विविध लेखकांनी कादंबरी, कथा, कविता, नाटक आणि आत्मकथन यांच्या माध्यमातून स्त्रीजीवनाचे वास्तव मांडले आहे. कविता, कथा, कादंबरी

आणि नाटक या सर्व साहित्यप्रकारांतून स्त्रीजीवनाचे विविध पैलू प्रभावीपणे मांडले गेले आहेत. स्त्रीवादी साहित्यामध्ये स्त्रीच्या जीवनातील विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक अनुभवांचे वास्तववादी चित्रण केले जाते. समाजातील पितृसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रीवर होणारे अन्याय, भेदभाव, शोषण आणि दमन यांचा चिकित्सक विचार या साहित्यामध्ये आढळतो. स्त्रीला शिक्षण, रोजगार, निर्णयस्वातंत्र्य आणि समान संधी मिळाव्यात, यासाठी तिच्या स्वातंत्र्याची आकांक्षा आणि संघर्ष यांचे प्रभावी चित्रण केले जाते.याशिवाय स्त्रीच्या मनातील भावनिक संघर्ष, आत्मसन्मान, आत्मभान आणि स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची धडपड हेही महत्त्वाचे विषय आहेत.

१. कविता

पाश्चात्त्य स्त्रीवादी कवितेमध्ये स्त्रीच्या अंतर्मनातील वेदना, अस्मिता, भावनिक संघर्ष, लैंगिकता आणि बंडखोरी यांचे प्रभावी चित्रण आढळते. स्त्रीवर समाजाने घातलेल्या बंधनांविरुद्धचा आवाज या कवितांमध्ये स्पष्टपणे व्यक्त होतो.

सिल्व्हिया प्लाथ (Sylvia Plath) : या विसाव्या शतकातील प्रसिद्ध अमेरिकन कवयित्री, कादंबरीकार आणि स्त्रीवादी लेखिका होत्या. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे मानसिक संघर्ष, नैराश्य, एकटेपणा, आत्मभान आणि समाजातील दडपण यांचे अत्यंत प्रभावी चित्रण आढळते. त्या आत्मस्वीकारात्मक (Confessional) कवितेच्या प्रवाहातील महत्त्वाच्या

कवयित्री मानल्या जातात. त्यांच्या कवितांमध्ये वैयक्तिक अनुभव, भावनिक वेदना आणि अंतर्मनातील ताण प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत.

'Daddy' आणि 'Lady Lazarus' या कवितांमध्ये पुरुषसत्ताक व्यवस्थेविषयीचा रोष, स्त्रीचे दडपलेले अस्तित्व आणि आत्मसंघर्ष व्यक्त होतो. त्यांची 'The Bell Jar' ही कादंबरी विशेष प्रसिद्ध आहे. या कादंबरीत एका तरुण स्त्रीच्या मानसिक अस्थिरतेचे आणि समाजातील अपेक्षांमुळे निर्माण झालेल्या ताणाचे चित्रण करण्यात आले आहे. ही कादंबरी स्त्रीवाद, मानसिक आरोग्य, वैयक्तिक ओळख, पितृसत्ताक समाजव्यवस्था, शिक्षण, करिअर आणि स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नांवर भाष्य करते.

ॲड्रियन रिच (Adrienne Rich) या अमेरिकन कवयित्री, निबंधकार आणि प्रख्यात स्त्रीवादी लेखिका होत्या. विसाव्या शतकातील पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीची अस्मिता, स्वातंत्र्य, सामाजिक अन्याय, प्रेम, मातृत्व आणि पुरुषप्रधान व्यवस्थेविरोधातील संघर्ष यांचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांच्या कवितांमध्ये स्त्रीच्या अनुभवांना केंद्रस्थानी स्थान दिले आहे. त्यांनी स्त्रीच्या भावना, ओळख आणि सामाजिक दडपशाही यांना स्पष्टपणे अभिव्यक्त केले. त्यांच्या लेखनात स्त्रीच्या आत्मभानाचा आणि स्वातंत्र्याच्या शोधाचा ठाम आवाज दिसून येतो. स्त्रीचे आत्मभान, भावनिक व मानसिक संघर्ष, पुरुषसत्तेविरोधी बंड, शरीरस्वातंत्र्य आणि स्त्रीची अस्मिता हे त्यांच्या कवितेतील प्रमुख विषय आहेत.

२. कथा

केट चॉपिन यांच्या कथांनी स्त्रीच्या अंतर्मनाला साहित्याच्या केंद्रस्थानी आणून पाश्चात्त्य स्त्रीवादी साहित्याला महत्त्वपूर्ण दिशा दिली. त्यांच्या स्त्रीवादी कथांमध्ये स्त्रीच्या दैनंदिन जीवनातील समस्या, कौटुंबिक बंधने, सामाजिक दडपशाही आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या संघर्षाचे वास्तववादी चित्रण केले आहे. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून जगण्याची इच्छा, विवाहामुळे तिच्या स्वातंत्र्यावर येणारी मर्यादा, स्त्रीच्या मनातील इच्छा, एकटेपणा, मानसिक संघर्ष आणि भावनिक दडपण, समाजातील पुरुषसत्ताक मूल्यांमुळे स्त्रीचे जीवन नियंत्रित केले जाणे, तसेच स्त्रीने स्वतःची ओळख आणि स्वाभिमान जपण्यासाठी केलेला प्रयत्न हे त्यांच्या कथांचे प्रमुख विषय आहेत. एकूणच, त्यांच्या कथांमध्ये स्त्रीचे स्वातंत्र्य, वैयक्तिक भावना, विवाहसंस्थेतील बंधने आणि पुरुषप्रधान समाजातील स्त्रीची घुसमट यांचे वास्तववादी चित्रण आढळते.

ॲलिस वॉकर यांच्या कथांनी कृष्णवर्णीय स्त्रीच्या अनुभवांना साहित्याच्या केंद्रस्थानी आणून स्त्रीवादी साहित्य अधिक व्यापक आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील बनवले. त्यांच्या कथांमध्ये कृष्णवर्णीय स्त्रियांचे जीवन, वर्णभेद, स्त्रीदमन, गरिबी, अन्याय आणि आत्मसन्मानाचा संघर्ष यांचे प्रभावी चित्रण आढळते. समाजात कृष्णवर्णीय स्त्रियांना वर्णभेद आणि लिंगभेद या दोन्ही प्रकारच्या अन्यायांना सामोरे जावे लागते, हे त्यांच्या कथांमधून स्पष्ट होते. स्त्री स्वतःची ओळख शोधण्याचा आणि स्वाभिमानाने जगण्याचा प्रयत्न करते, हा त्यांच्या लेखनातील महत्त्वाचा विषय आहे. कुटुंब आणि समाजातील पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रीचे होणारे दमन

त्यांनी वास्तववादी पद्धतीने मांडले आहे. गरिबी, वर्णद्वेष आणि सामाजिक विषमता यांचा स्त्रीच्या जीवनावर होणारा परिणाम त्यांच्या कथांमधून स्पष्ट होतो. आई–मुलगी, बहिणी किंवा स्त्रियांच्या परस्पर सहकार्याचे आणि भावनिक नात्यांचे चित्रण त्यांच्या साहित्यामध्ये आढळते. स्त्री मानसिक, सामाजिक आणि आर्थिक बंधनांतून मुक्त होऊन स्वतंत्र जीवन जगण्याचा प्रयत्न करते, हा त्यांच्या कथांचा मुख्य आशय आहे.

३. कादंबरी

पाश्चात्त्य स्त्रीवादी कादंबऱ्यांमध्ये स्त्रीचे सामाजिक स्थान, आत्मशोध, आर्थिक स्वावलंबन आणि पुरुषप्रधान संस्कृतीविरोधातील संघर्ष यांचे विस्तृत चित्रण आढळते.

व्हर्जिनिया वूल्फ यांच्या प्रमुख कादंबऱ्यांमध्ये 'Mrs Dalloway', 'To the Lighthouse आणि 'Orlando' यांचा समावेश होतो. त्यांच्या लेखनात स्त्रियांचे स्वातंत्र्य, समाजातील बंधने, एकाकीपणा, काळ आणि मानवी अस्तित्व यांसारखे विषय आढळतात. वूल्फ यांनी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा प्रश्न प्रभावीपणे मांडला. 'Mrs Dalloway' आणि 'To the Lighthouse' या कादंबऱ्यांमध्ये स्त्रीला स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी स्वतंत्र जागा आणि संधी आवश्यक आहेत, हा त्यांचा मुख्य विचार मांडला असून स्त्रियांच्या अंतर्मनातील संघर्षही त्यांनी प्रभावीपणे चित्रित केला आहे.

शार्लट ब्रॉन्टे यांच्या साहित्यामध्ये स्त्रीचे स्वातंत्र्य, आत्मसन्मान, प्रेम, सामाजिक बंधने आणि मानवी भावना यांचे अत्यंत प्रभावी चित्रण दिसते. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतंत्र विचार, भावनिक आणि मानसिक संघर्षांचे चित्रण, समाजातील वर्गभेद आणि अन्यायाविरुद्ध सूचक टीका तसेच प्रेम आणि नैतिकतेतील संघर्ष यांची प्रभावी मांडणी त्यांनी केली आहे.

'Jane Eyre' या कादंबरीत नायिकेचा आत्मसन्मान, स्वाभिमान आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्वासाठीचा संघर्ष दिसून येतो. त्यांच्या नायिका पारंपरिक चौकटीत अडकलेल्या नसून स्वतःच्या विचारांनी जगणाऱ्या आहेत. 'Jane Eyre' ही अनाथ मुलगी अनेक संकटांवर मात करून स्वतःचा मार्ग शोधते. या कादंबरीत स्त्रीचा आत्मसन्मान, प्रेमातील समानता आणि नैतिक मूल्ये यांचा प्रभावी विचार मांडला आहे. 'Villette' ही कादंबरी मानसिक एकटेपणा, प्रेम आणि आत्मसंघर्ष यांवर आधारित आहे. त्यामुळे आधुनिक स्त्रीवादी साहित्याच्या प्रारंभीच्या लेखकांमध्ये शार्लट ब्रॉन्टे यांची गणना केली जाते.

सिमोन द बोव्हा या फ्रान्समधील प्रसिद्ध तत्त्वज्ञ, लेखिका आणि स्त्रीवादी विचारवंत होत्या. त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्त्रीचे जीवन, तिचे स्वातंत्र्य, प्रेम, मानसिक संघर्ष आणि पुरुषप्रधान समाजातील तिची अवस्था यांचे प्रभावी चित्रण आढळते. स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा शोध, प्रेमसंबंधांमध्ये समानतेची अपेक्षा, विवाहसंस्थेमुळे स्त्रीवर येणारी बंधने, स्त्रीचे मानसिक एकटेपण आणि भावनिक संघर्ष, समाजाने स्त्रीवर लादलेल्या पारंपरिक भूमिकांविषयीचा असंतोष तसेच आत्मसन्मान आणि स्वातंत्र्यासाठी स्त्रीचा संघर्ष ही त्यांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख आशयमूल्ये आहेत. त्यांच्या

कादंबऱ्यांतील स्त्री पात्रे पारंपरिक चौकटी मोडून स्वतःचे अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करतात. त्या केवळ प्रेमकथांपुरत्या मर्यादित नसून स्त्रीच्या अंतर्मनाचे आणि सामाजिक वास्तवाचे चिंतन करणाऱ्या आहेत.

ब- भारतीय स्त्रीवादी साहित्य

भारतीय साहित्याच्या इतिहासात स्त्रीवादी साहित्य हा एक महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनवादी प्रवाह मानला जातो. स्त्रियांच्या जीवनातील अन्याय, सामाजिक बंधने, लैंगिक विषमता, पितृसत्ताक व्यवस्था आणि स्वातंत्र्याच्या प्रश्नांना साहित्यिक अभिव्यक्ती देणारे हे साहित्य समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन ठरले आहे. स्त्रीवादी साहित्य केवळ स्त्रियांच्या वेदनांचे चित्रण करत नाही, तर त्यांच्या अस्मिता, आत्मभान, अधिकार आणि संघर्षालाही प्रभावी आवाज देते. भारतात स्त्रीवादी साहित्याचा विकास सामाजिक सुधारणांच्या चळवळींसोबत झाला. शिक्षण, विधवा पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य आणि समानतेच्या विचारांनी साहित्यविश्वात नवीन प्रवाह निर्माण केला. विविध भारतीय भाषांतील लेखिकांनी आपल्या अनुभवांद्वारे स्त्रीजीवनाचे वास्तव मांडले आणि साहित्याला नवी दृष्टी दिली.

हिंदी साहित्यातील महादेवी वर्मा यांच्या साहित्यामध्ये स्त्रीची सामाजिक चेतना, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य यांचा प्रभावी विचार आढळतो. श्रृंखला की कड़ियाँ या निबंधसंग्रहातून त्यांनी स्त्रियांच्या सामाजिक बंधनांवर टीका केली आहे. महादेवी वर्मा यांच्या साहित्यामध्ये स्त्रीची सामाजिक चेतना, संवेदनशीलता, आत्मभान आणि स्वाभिमान यांची

प्रभावी अभिव्यक्ती दिसून येते. त्यांनी स्त्रीला पितृसत्तात्मक बंधनांशी संघर्ष करणारी आणि स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक होत जाणारी व्यक्ती म्हणून चित्रित केले आहे. त्यांच्या लेखनात स्त्रीशिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक दृष्टिकोनातील बदल यांना महत्त्व दिले असून स्त्रीमुक्तीसाठी मानसिक आणि सामाजिक परिवर्तन आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले आहे.

मन्नू भंडारी यांच्या साहित्यात स्त्री-जाणिवा अत्यंत प्रभावी आणि वास्तववादी स्वरूपात व्यक्त झालेल्या दिसतात. त्यांनी मध्यमवर्गीय स्त्रीचा मानसिक संघर्ष, तिच्यावरील कौटुंबिक बंधने, तिचा आत्मसन्मान आणि स्वतंत्र अस्तित्वाच्या प्रश्नांना त्यांच्या कथांमधून अधोरेखित केलेले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्री ही केवळ सहनशील किंवा त्यागमूर्ती नसून स्वतःच्या भावना, इच्छा आणि अधिकारांविषयी जागरूक असलेली व्यक्ती म्हणून समोर येते.

'आपका बंटी', 'यही सच है' आणि 'एक इंच मुस्कान' यांसारख्या साहित्यकृतींमध्ये मन्नू भंडारी यांनी विवाहसंस्था, स्त्री-पुरुष संबंध आणि सामाजिक रूढींवर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या स्त्री पात्रांमध्ये आत्मनिर्णयाची क्षमता, भावनिक स्वातंत्र्य आणि सामाजिक अन्यायाविरुद्धचा संघर्ष स्पष्ट दिसतो. त्यांच्या साहित्याची विशेषता म्हणजे त्यांनी स्त्रीच्या अंतर्मनातील वेदना, असुरक्षितता आणि स्वातंत्र्याची आकांक्षा अत्यंत संवेदनशीलतेने मांडली आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाला हिंदी स्त्रीवादी साहित्यामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

कृष्णा सोबती यांच्या साहित्यातील स्त्रीवादी जाणिवा अत्यंत प्रखर, धाडसी आणि वास्तववादी स्वरूपात व्यक्त झालेल्या दिसतात. त्यांनी स्त्रीला पारंपरिक बंधनांत अडकलेली व्यक्ती म्हणून न दाखवता, स्वतःच्या इच्छा, भावना आणि अस्तित्वाची जाणीव असलेली स्वतंत्र व्यक्ती म्हणून चित्रित केले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीच्या लैंगिकतेचा, आत्मसन्मानाचा, स्वातंत्र्याचा आणि आत्मनिर्णयाच्या अधिकाराचा स्पष्ट पुरस्कार आढळतो.

'मित्रो मरजानी' या कादंबरीतील 'मित्रो' हे पात्र हिंदी साहित्यातील स्त्री-अस्मितेचे प्रभावी प्रतीक मानले जाते. मित्रो समाजाने घालून दिलेल्या नैतिक बंधनांना प्रश्न विचारते आणि स्वतःच्या भावनांना निर्भीडपणे व्यक्त करते. त्यामुळे कृष्णा सोबती यांनी स्त्रीच्या दडपलेल्या भावविश्वाला प्रभावी साहित्यिक अभिव्यक्ती दिली आहे. त्यांच्या 'ज़िंदगीनामा', 'दिल-ओ-दानिश' आणि 'ऐ लड़की' यांसारख्या साहित्यकृतींमध्ये स्त्रीचे सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक संघर्ष वास्तववादी पद्धतीने मांडले आहेत. त्यांनी पितृसत्ताक व्यवस्थेवर टीका करत स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव निर्माण केली. कृष्णा सोबती यांच्या साहित्याची विशेषता म्हणजे त्यांनी स्त्रीच्या अनुभवांना कोणत्याही आडपडद्याशिवाय मांडले आहे. त्यामुळे हिंदी स्त्रीवादी साहित्यामध्ये त्यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

महाश्वेता देवी यांचे बंगाली साहित्य स्त्रीमुक्ती, सामाजिक न्याय आणि मानवतेचा संदेश देणारे आहे. त्यांनी समाजातील गरीब, आदिवासी आणि दलित स्त्रियांचे दुःख, अत्याचार आणि संघर्ष जिवंतपणे मांडले

आहेत. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्यांतील स्त्रिया केवळ अन्याय सहन करणाऱ्या नसून, त्याविरुद्ध संघर्ष करणाऱ्या आहेत. त्यांच्या 'हजार चौराशीची आई' या कादंबरीत एका आईच्या माध्यमातून स्त्रीची सामाजिक आणि राजकीय जाणीव व्यक्त होते. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून चित्रित केले आहे. स्त्री ही पुरुषांवर अवलंबून नसून स्वतःचे निर्णय घेणारी आणि आत्मसन्मान जपणारी आहे. महाश्वेता देवी यांनी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील अन्याय, स्त्रीवरील अत्याचार, लैंगिक शोषण आणि सामाजिक दुजाभाव यांचा कठोर विरोध केला आहे. तसेच 'द्रौपदी' या कथेतील 'डोपदी मेझेन' हे पात्र राज्यसत्तेच्या आणि पुरुषसत्तेच्या विरोधात ठामपणे उभे राहते. ही कथा स्त्रीच्या प्रतिकारशक्तीचे प्रभावी प्रतीक मानली जाते. महाश्वेता देवी यांनी आदिवासी स्त्रियांचे जीवन, त्यांचे हक्क, जमीन, श्रमशोषण आणि दारिद्र्य यांचे वास्तव मांडले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्री ही दुर्बल नसून लढाऊ, जिद्दी आणि परिवर्तन घडविणारी आहे. ती अन्यायाविरुद्ध बंड करणारी आहे.

आशापूर्णा देवी यांच्या 'प्रथम प्रतिश्रुती' या बंगाली कादंबरीची नायिका सत्यवती आहे. ती परंपरावादी आणि पुरुषप्रधान समाजात वाढणारी मुलगी आहे. त्या काळात स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार नव्हता. अशा वातावरणात सत्यवती समाजातील अन्यायकारक रूढींना विरोध करते आणि स्त्रीच्या स्वाभिमानासाठी संघर्ष करते. ही कादंबरी एका स्त्रीच्या आत्मजागृतीचा आणि समाजपरिवर्तनाच्या संघर्षाचा प्रवास दाखवते. कादंबरीत स्त्रियांना शिक्षण मिळावे, त्यांनी जागृत व्हावे आणि स्वतःचे विचार मांडावेत, हा

संदेश दिला आहे. सत्यवती शिक्षणाला मुक्तीचे साधन मानते. समाजातील स्त्रियांवरील अन्याय, दुय्यम वागणूक आणि परंपरांच्या नावाखाली होणारे शोषण यांचे वास्तववादी चित्रण या कादंबरीत आढळते.

सत्यवती स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करते. ती स्त्रीला केवळ घरापुरती मर्यादित न ठेवता समाजात समान स्थान मिळावे, असे मानते. बालविवाह, अंधश्रद्धा आणि स्त्रीदास्य यांसारख्या प्रथांविरुद्ध सत्यवतीचा संघर्ष हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. कादंबरीत स्त्रीच्या आत्मसन्मान, स्वाभिमान आणि स्वतःच्या ओळखीच्या शोधाला महत्त्व दिले आहे. एकूणच, 'प्रथम प्रतिश्रुती' या कादंबरीतून आशापूर्णा देवी यांनी स्त्रीच्या स्वातंत्र्य, शिक्षण आणि समानतेचा प्रभावी पुरस्कार केला आहे. तसेच 'सुवर्णलता' ही एका स्त्रीच्या अंतर्गत वेदना आणि संघर्षाची कथा आहे. या कादंबरीतून आशापूर्णा देवी यांनी स्त्रीच्या भावविश्वाचे आणि तिच्या स्वातंत्र्यलढ्याचे संवेदनशील चित्र उभे केले आहे. या कादंबरीत विवाहानंतरचे स्त्रीचे दडपलेले जीवन, पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेवरील टीका, स्त्रीच्या आत्मसन्मान आणि स्वातंत्र्याची आस, शिक्षण व जागृतीचे महत्त्व तसेच मूक संघर्ष करणाऱ्या स्त्रीचे प्रभावी चित्रण केले आहे.

अरुंधती रॉय यांच्या इंग्रजी साहित्यामध्ये स्त्रीवादी विचारसरणी अत्यंत प्रभावीपणे मांडलेली दिसते. त्यांनी स्त्रियांच्या सामाजिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक शोषणाचा अभ्यास करून त्याला साहित्यिक रूप दिले आहे. त्यांच्या लेखनातून स्त्रीच्या स्वातंत्र्याची, अस्मितेची आणि पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्धच्या संघर्षाची प्रभावी अभिव्यक्ती झालेली आहे.

पुरुषप्रधान समाजाने स्त्रियांवर लादलेल्या बंधनांचा निषेध करून त्यांनी स्त्रीला केवळ कुटुंबापुरती मर्यादित न ठेवता तिच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा आग्रह धरला आहे. त्यासाठी त्यांच्या 'The God of Small Things' या कादंबरीचा विशेष उल्लेख केला जातो. या कादंबरीतील अम्मू हे पात्र समाजाच्या रूढ नियमांना आव्हान देते. विवाहसंस्था, जातिभेद आणि स्त्रीवरील नियंत्रण यांना ती विरोध करते. अम्मूचे जीवन हे स्त्रीच्या स्वाभिमानासाठी चाललेल्या संघर्षाचे प्रतीक मानले जाते. ती समाजाच्या दडपशाहीविरुद्ध स्वतःचे अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करते. या कादंबरीत स्त्रियांच्या लैंगिक शोषणाचा आणि सामाजिक अन्यायाचा वास्तववादी वेध घेतला आहे. समाजातील दुहेरी नैतिकता आणि स्त्रीविषयीचे भेदभावपूर्ण दृष्टिकोन त्यांनी उघड केले आहेत. स्त्रीला स्वतःचे विचार, भावना आणि निर्णय घेण्याचा अधिकार आहे, ही जाणीव त्यांनी करून दिली आहे. स्त्री ही पुरुषाची मालमत्ता नसून स्वतंत्र व्यक्ती आहे.

त्यांच्या कथानकांमध्ये स्त्रीच्या भावनिक वेदना, एकटेपणा आणि असुरक्षितता यांचे सूक्ष्म चित्रण आढळते. त्यामुळे त्यांचा स्त्रीवाद हा केवळ स्त्री-पुरुष समानतेपुरता मर्यादित नसून जात, वर्ग आणि सामाजिक विषमता यांच्याशीही जोडलेला आहे. दलित, गरीब आणि उपेक्षित स्त्रियांचे जीवन त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने मांडले आहे.'The Ministry of Utmost Happiness' या कादंबरीत अरुंधती रॉय यांनी स्त्रीचे जीवन अत्यंत संवेदनशील आणि वास्तववादी पद्धतीने मांडले आहे. या कादंबरीतील स्त्रिया समाजातील अन्याय, भेदभाव, हिंसा आणि उपेक्षा सहन करत असल्या तरी स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करतात.

अंजुम आणि तिलो यांसारख्या व्यक्तिरेखांमधून स्त्रीची वेदना, एकटेपणा आणि स्वातंत्र्याची ओढ व्यक्त होते.

समाज स्त्रीला ठरावीक चौकटीत ठेवण्याचा प्रयत्न करतो; परंतु या स्त्रिया त्या बंधनांना आव्हान देतात. कादंबरीत स्त्रीचे जीवन केवळ कौटुंबिक भूमिकांपुरते मर्यादित नसून तिची ओळख, आत्मसन्मान आणि जगण्याचा अधिकार यांवर भर दिला आहे. जात, धर्म, राजकारण आणि लिंगभेद यांच्या दबावाखालीही स्त्री स्वतःचे अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करते, हा या कादंबरीतील मुख्य स्त्रीवादी आशय आहे.शशी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया 'मी कोण?' या प्रश्नाचे उत्तर शोधताना दिसतात. त्या केवळ पत्नी, आई किंवा मुलगी म्हणून नव्हे, तर स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःची ओळख निर्माण करू इच्छितात. समाजातील पुरुषसत्ताक मूल्यांमुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते, हे त्यांनी प्रभावीपणे दाखवले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये स्त्री अनेकदा स्वतःच्या भावना दडपून जगते. हे मौन तिच्या वेदनेचे प्रतीक आहे. That Long Silence या कादंबरीत हे विशेष ठळकपणे दिसते. शिक्षणामुळे स्त्रीमध्ये आत्मजाणीव निर्माण होते आणि ती स्वतःच्या अधिकारांविषयी विचार करू लागते, हा स्त्रीवादी विचार त्यांच्या साहित्याचा महत्त्वाचा भाग आहे. फक्त आर्थिक नव्, तर मानसिक आणि भावनिक स्वातंत्र्यही स्त्रीसाठी आवश्यक आहे, असे त्यांनी सुचवले आहे.

अनिता देसाई यांच्या साहित्यात स्त्रीच्या मनातील संघर्ष, तिची ओळख, स्वातंत्र्याची आकांक्षा आणि पुरुषप्रधान समाजातील तिची घुसमट यांचे अत्यंत प्रभावी चित्रण आढळते. त्या स्त्रीच्या अंतर्मनातील

भावना, एकटेपणा, असुरक्षितता आणि मानसिक ताण यांचे सूक्ष्म चित्रण करतात. त्यांच्या नायिका बाह्य संघर्षापेक्षा अंतर्गत संघर्ष अधिक अनुभवतात. त्यांच्या कादंबऱ्यांत स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सामाजिक व्यवस्थेवर टीका दिसून येते. विवाहसंस्था, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक अपेक्षा यांमुळे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व कसे दडपले जाते, हे त्यांनी दाखवले आहे. त्यांच्या नायिका स्वतःची ओळख शोधण्याचा प्रयत्न करतात. त्या केवळ पत्नी किंवा आई या भूमिकांमध्ये अडकून राहत नाहीत, तर स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करू इच्छितात.

आधुनिक जीवनातील स्त्रीचे भावनिक एकाकीपण हा त्यांच्या साहित्याचा महत्त्वाचा विषय आहे. समाजात असूनही स्त्री मानसिकदृष्ट्या एकटी पडते, हे त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. काही नायिका पारंपरिक मूल्यांना विरोध करतात. त्या अन्यायकारक बंधने नाकारून स्वतःचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ, Cry, the Peacock मध्ये मायाच्या मानसिक ताणातून स्त्रीची घुसमट व्यक्त होते. Fire on the Mountain मध्ये स्त्रीच्या एकाकी जीवनाचे आणि स्वातंत्र्याच्या शोधाचे चित्रण आहे, तर Where Shall We Go This Summer? मध्ये वैवाहिक जीवनातील असमाधान आणि स्त्रीच्या भावविश्वाचा वेध घेतला आहे.

वैवाहिक वादांमध्ये हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा किंवा तत्सम कायदेशीर तरतुदींचा काही प्रकरणांमध्ये गैरवापर झाल्याचे आरोप करण्यात येतात. महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांचे महत्त्व अबाधित ठेवत सर्वोच्च न्यायालयाने काही निर्णयांमध्ये अशा संभाव्य गैरवापराबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रत्येक प्रकरणात पुराव्यांचे स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ परीक्षण आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

३. आर्थिक शोषण

- आर्थिक तडजोडीसाठी दबाव आणणे
- मालमत्ता किंवा आर्थिक लाभासाठी दबाव टाकणे
- घटस्फोट किंवा वैवाहिक वादांमध्ये आर्थिक दडपण निर्माण करणे
- पैशांसाठी जोडीदारावर मानसिक किंवा भावनिक दबाव टाकणे

४. घरगुती हिंसा :

काही पुरुषही शारीरिक, मानसिक, भावनिक किंवा आर्थिक स्वरूपाच्या कौटुंबिक हिंसेचे बळी ठरू शकतात. त्यांना जोडीदार, कुटुंबातील सदस्य किंवा इतर नातेवाईकांकडून अपमानास्पद वागणूक, धमक्या, मारहाण, मानसिक छळ किंवा आर्थिक नियंत्रणाचा सामना करावा लागू शकतो. मात्र समाजात पुरुष नेहमीच मजबूत असतात, त्यांनी दुःख व्यक्त करू नये

किंवा मदत मागू नये, अशी रूढ समजूत असल्यामुळे अनेक पुरुष अशा घटनांची तक्रार करत नाहीत. सामाजिक संकोच, बदनामीची भीती, उपहास होण्याची शक्यता आणि योग्य मदतीचा अभाव यांमुळे अनेक प्रकरणे नोंदवली जात नाहीत. त्यामुळे पुरुषांवरील घरगुती हिंसेचे संपूर्ण चित्र अधिकृत आकडेवारीत दिसून येत नाही. म्हणूनच घरगुती हिंसेकडे स्त्री किंवा पुरुष असा भेद न करता मानवी हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न म्हणून पाहणे आवश्यक आहे.

५. आत्महत्येकडे ढकलणारा मानसिक ताण

राष्ट्रीय गुन्हे नोंदवही (NCRB) च्या आकडेवारीच्या आधारे दाखल करण्यात आलेल्या काही याचिकांमध्ये विवाहित पुरुषांच्या आत्महत्यांमध्ये कौटुंबिक व वैवाहिक तणाव हा महत्त्वाचा घटक असल्याचा दावा करण्यात आला आहे. तथापि, आत्महत्येमागील कारणे बहुआयामी असतात आणि प्रत्येक प्रकरणाचे स्वतंत्र मूल्यमापन आवश्यक असते.

- **काही न्यायालयीन प्रकरणे**

अ. २०२५ मधील एका प्रकरणात Bombay High Court ने वैवाहिक वादातून दाखल झालेली हुंडाबळीसंदर्भातील FIR पुराव्यांचा अभाव आणि आरोपांतील विसंगती लक्षात घेऊन रद्द केली.

ब. दुसऱ्या एका प्रकरणात Rohini Sudarshan Gangurde यांच्याविरुद्धच्या आरोपांमध्ये मृत पतीवर आर्थिक दबाव, घर स्वतःच्या नावावर करण्याची मागणी आणि कथित मानसिक छळ यांचा उल्लेख

करण्यात आला होता. हे प्रकरण आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपांशी संबंधित असून त्यावरील अंतिम निष्कर्ष न्यायालयीन प्रक्रियेनंतरच निश्चित होतो. असे असले तरी सर्व महिलांच्या तक्रारी खोट्या असतात किंवा सर्व पुरुष अत्याचाराचे बळी असतात, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक प्रकरणातील वस्तुस्थिती, उपलब्ध पुरावे, साक्षी आणि परिस्थिती यांच्या आधारे न्यायालये स्वतंत्रपणे निर्णय देतात. त्यामुळे कोणत्याही एका बाजूचे सार्वत्रिकीकरण करणे टाळले पाहिजे. तथापि, गेल्या काही वर्षांपासून पुरुषांवर महिलांकडून होणाऱ्या मानसिक, भावनिक, आर्थिक किंवा कायदेशीर छळाच्या घटनांबाबत समाजात आणि प्रसारमाध्यमांमध्ये वाढती चर्चा होताना दिसते. पुरुष हक्क संघटना, काही संशोधन आणि न्यायालयीन निरीक्षणांमधूनही या विषयाकडे अधिक गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या विषयाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून चालणार नाही. या संदर्भात उपलब्ध असलेल्या काही नोंदी आणि वृत्तांचा संक्षिप्त आढावा पुढीलप्रमाणे आहे.

- **सांगलीतील पुरुष हक्क समितीची नोंद**

सांगली येथे कार्यरत असलेल्या पुरुष हक्क समितीने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार त्यांच्या कार्यालयात सुमारे ९५० लेखी तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्याशिवाय सुमारे दीड हजार पुरुषांनी दूरध्वनीद्वारे सल्ला आणि मदत मागितली असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या तक्रारींमध्ये वैवाहिक वाद, मानसिक छळ, आर्थिक दबाव, बदनामी, मुलांपासून दूर ठेवणे आणि खोट्या तक्रारींची भीती अशा विविध स्वरूपांच्या समस्या मांडण्यात आल्या आहेत. समितीशी संबंधित ॲड. बाळासाहेब पाटील

आणि ॲड. धर्मेंद्र चव्हाण यांनी माध्यमांशी बोलताना असे मत व्यक्त केले की, समाजात 'महिलेकडून पुरुषाची छळवणूक होऊ शकते' हे वास्तव स्वीकारण्याची मानसिकता अद्याप पुरेशी विकसित झालेली नाही. त्यांच्या मते, अनेक पुरुष सामाजिक प्रतिष्ठा, उपहास किंवा अविश्वासाच्या भीतीमुळे पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यास कचरतात. त्यांनी पुढे असेही सांगितले की, राज्यातील विविध जिल्हा कार्यालयांमध्ये वर्षभरात हजारो तक्रारी प्राप्त होतात आणि दररोज शेकडो व्यक्ती दूरध्वनीद्वारे मार्गदर्शन मागतात. या दाव्यांची स्वतंत्र शासकीय पडताळणी उपलब्ध नसली, तरी पुरुष हक्क संघटनांकडून या विषयावर सातत्याने लक्ष वेधले जात आहे. (सांगली दर्पण, २०२३) त्यामुळे पीडित पुरुषांच्या अनेक तक्रारी पुरुष हक्क संघटनांकडे गेल्याच्या नोंदी आणि त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार झाल्याच्या तक्रारी आढळून आलेल्या आहेत. त्यांचे प्रमाण अधिक नसले तरी पुरुष हे स्त्रीकडून पीडित बनलेले असतात, असे दिसून येते. बरेच जण सारं सहन करतात. त्याची वाच्यता कुठे करत नाहीत.

- **पुण्यातील हनी-ट्रॅप आणि ब्लॅकमेलचे प्रकरण**

पुण्यातील कोथरूड परिसरात घडलेल्या एका प्रकरणात एका महिलेवर एका तरुणाला गुंगीचे औषध देऊन त्याचे लैंगिक शोषण केल्याचा, आक्षेपार्ह छायाचित्रे काढून ब्लॅकमेल केल्याचा आणि आर्थिक लाभ मिळविण्याचा आरोप करण्यात आला होता. या प्रकरणात संबंधित महिलेविरुद्ध नंतर आणखी एका गुन्ह्याची नोंद झाल्याची माहिती माध्यमांत प्रसिद्ध झाली होती. या प्रकरणाचा उल्लेख येथे केवळ अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे अस्तित्व दर्शविण्यासाठी करण्यात आलेला असून,

प्रत्येक गुन्हेगारी प्रकरणात अंतिम सत्य न्यायालयीन प्रक्रियेनंतरच निश्चित होते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. (News18 Marathi, पुणे आवृत्ती)

- **पुरुष हक्क समितीकडे वाढत्या तक्रारी**

आंतरराष्ट्रीय पुरुष दिन (२०२४) निमित्त प्रसिद्ध झालेल्या एका वृत्तानुसार, पुरुषांच्या समस्यांवर कार्य करणाऱ्या अखिल भारतीय पुरुष हक्क समितीकडे राज्यभरातून दररोज शंभरहून अधिक दूरध्वनी येत असल्याचे सांगण्यात आले आहे. या वृत्तात पुणे, मुंबई, नागपूर यांसारख्या महानगरांमधून सर्वाधिक तक्रारी प्राप्त होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

समितीच्या म्हणण्यानुसार, विवाहबाह्य संबंध, आर्थिक तणाव, नोकरीच्या ठिकाणी होणारा मानसिक छळ, कौटुंबिक मतभेद, सोशल मीडियामुळे निर्माण होणारे गैरसमज आणि वैवाहिक संघर्ष या कारणांमुळे अनेक पुरुष मानसिक तणावाला सामोरे जात आहेत. या सर्व दाव्यांकडे अधिकृत सरकारी आकडेवारी म्हणून नव्हे, तर पुरुष हक्क संघटनांनी मांडलेल्या निरीक्षणांच्या स्वरूपात पाहणे अधिक योग्य ठरेल.

- **कायद्यांच्या गैरवापराबाबतची चर्चा**

महिलांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे, विशेषतः हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा किंवा लैंगिक अत्याचारासंदर्भातील तरतुदी, भारतीय समाजात अत्यंत आवश्यक मानल्या जातात. तथापि, काही प्रकरणांमध्ये या कायद्यांचा गैरवापर झाल्याचे आरोप न्यायालयांपुढेही आले आहेत. सर्वोच्च

न्यायालयाने काही निर्णयांमध्ये अशा संभाव्य गैरवापराबाबत चिंता व्यक्त केली असली, तरी त्याचवेळी महिलांच्या संरक्षणासाठी हे कायदे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे. पुरुष हक्क संघटनांच्या मते, काही वैवाहिक वादांमध्ये खोटे किंवा अतिरंजित आरोप केल्यामुळे पुरुषांना सामाजिक, मानसिक आणि आर्थिक परिणामांना सामोरे जावे लागते. या दाव्यांबाबत सर्वसाधारण निष्कर्ष काढणे योग्य नसले, तरी न्यायालयांनीही काही प्रकरणांमध्ये पुराव्याअभावी गुन्हे रद्द केलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाचे मूल्यमापन वस्तुनिष्ठ पुराव्यांच्या आधारेच होणे आवश्यक आहे.

पुरुष हक्क संरक्षण समितीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब पाटील यांनी माध्यमांशी बोलताना गेल्या काही वर्षांत पुरुषांवरील मानसिक आणि वैवाहिक अत्याचाराच्या तक्रारी वाढत असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, बदलती सामाजिक मूल्यव्यवस्था, माध्यमांचा प्रभाव, कौटुंबिक संवादाचा अभाव आणि वैवाहिक संघर्ष या घटकांचाही या परिस्थितीशी संबंध असू शकतो. तथापि, या मतांचे मूल्यमापन करताना व्यापक समाजशास्त्रीय संशोधन आणि अधिकृत आकडेवारी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. "काही पुरुष हक्क संघटनांचा असा दावा आहे...", "काही माध्यम अहवालांनुसार...", "काही न्यायालयीन प्रकरणांमध्ये..." या गोष्टी दिसून येतात.

भारतात आणि महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारांच्या तुलनेत पुरुषांवरील अत्याचारांची नोंद कमी होते; परंतु पुरुष हक्क समित्यांच्या मते हा छळ वाढत आहे. सामाजिक दबावामुळे अनेक पुरुष याविरोधात

उघडपणे बोलत नाहीत. महाराष्ट्रात स्त्रीकडून पुरुषांवर होणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप आणि माहिती खालीलप्रमाणे आहे.

- **अत्याचारांचे मुख्य प्रकार**

१. मानसिक छळ :

कौटुंबिक कलह, सतत अपमान करणे किंवा मुलांचा ताबा मिळवण्याची धमकी देणे. पत्नीकडून पतीला मारहाण होणे किंवा शारीरिक दुखापत पोहोचवणे. भारतीय दंड संहितेच्या (उदा. कलम ४९८-अ, आता नवीन BNS) अंतर्गत खोट्या गुन्ह्यांमध्ये किंवा बलात्काराच्या आरोपांमध्ये अडकवणे. आर्थिक फायद्यासाठी किंवा सूडबुद्धीने असे गुन्हे दाखल केले जातात. तिला पैशांसाठी ब्लॅकमेल करणे किंवा त्याची फसवणूक करणे, असे प्रकार घडतात.

२. सामाजिक स्थिती आणि वास्तव : प्रतिष्ठा आणि संकोच :

'पुरुष कधीही पीडित असू शकत नाही' अशा सामाजिक समजुतीमुळे पुरुष आपल्यावरील अन्यायाबद्दल पोलिसांत किंवा समाजात बोलण्यास कचरतात. त्यामुळे तक्रारींचे प्रमाण कमी दिसते. महाराष्ट्रभरातून, विशेषतः शहरी भागातून, कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्या पुरुषांच्या तक्रारी पुढे येत आहेत.

३. कायदेशीर स्थिती व मदत : महिलांसाठी कायदे अधिक :

भारतीय कायद्यांमध्ये प्रामुख्याने महिलांच्या संरक्षणासाठी तरतुदी (उदा. घरगुती हिंसाचार महिला संरक्षण कायदा, २००५) आहेत. त्यामुळे स्त्री तिच्यासोबतच्या पुरुषाला धाक दाखवून तिच्या मनासारखे त्याला वागवते. परिणामी, पुरुषाची मानसिक कोंडी होते. त्याची मानहानी होते.

४. सामाजिक मानसिकता :

महिलेकडूनही पुरुषाची छळवणूक होते, हे वास्तव स्वीकारण्याची समाजाची मानसिकता नाही. पुरुषच महिलेला छळतो, यावरच समाजाचा दांडगा विश्वास आहे. महिलेने छळले, अशी तक्रारही पोलिसांकडून दाखल करून घेतली जात नाही. 'महिलेने छळले', असे सांगणे पुरुषांना लाजिरवाणे वाटते.

५. पुरुष पीडितांची अवस्था :

कौटुंबिक व वैवाहिक नात्यांमधील मानसिक, भावनिक किंवा इतर प्रकारच्या छळामुळे काही पुरुष गंभीर तणाव, नैराश्य आणि एकाकीपणाचा अनुभव घेतात. काही प्रकरणांमध्ये या तणावाचे गंभीर परिणाम होऊन आत्महत्येसारख्या दुर्दैवी घटना घडल्याची नोंद आहे. कोरोना काळात घरामध्ये दीर्घकाळ एकत्र राहणे, आर्थिक अडचणी, बेरोजगारी आणि मानसिक तणाव यांमुळे अनेक कुटुंबांतील वाद वाढले आणि त्यामुळे वैवाहिक मतभेद तसेच घटस्फोटाच्या प्रकरणांमध्येही वाढ झाल्याचे काही अभ्यासांमध्ये दिसून आले आहे.

*** *** ***

क. पुरुषवादी-पुरुषहक्क चळवळ

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमानता या संकल्पनांनी जागतिक सामाजिक चळवळींना नवे स्वरूप दिले होते. त्यातून स्त्रीवादी चळवळींनी महिलांच्या प्रश्नांना सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. त्याच वेळी पुरुषांच्या विशिष्ट सामाजिक, मानसिक, कौटुंबिक आणि कायदेशीर समस्यांवरही चर्चा सुरू झाली. या प्रक्रियेतून पुरुषवादी अथवा पुरुषहक्क चळवळीचा उदय झाला.

पुरुषहक्क चळवळ ही पुरुषांच्या मानसिक आरोग्य, आत्महत्या, पितृत्व हक्क, कौटुंबिक न्यायव्यवस्था, सामाजिक अपेक्षा आणि लिंग-निरपेक्ष न्याय यांसारख्या विषयांवर केंद्रित असलेली एक सामाजिक चळवळ आहे; म्हणून ती स्त्रियांच्या विरोधी काम करणारी चळवळ नाही, हे इथे आपण लक्षात घ्यायला हवे. कारण, "स्त्रीवादी चळवळीमुळे समाजात झालेले बदल आणि कुटुंबसंस्थेच्या बदलत्या रचनेमुळे पुरुषांच्या प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि त्यातून पुरुषांच्या चळवळी उदयास आल्या," असे मायकेल किमेल यांनी सांगितले आहे. विशेषतः दोन महत्त्वाच्या घटकांनी या चळवळीला चालना मिळत गेली.

१. स्त्रीवादी चळवळीचा प्रभाव :

१९६० नंतर स्त्रीवादी चळवळींनी महिलांच्या शिक्षण, रोजगार, राजकीय सहभाग, मालमत्ता हक्क आणि समानतेसाठी मोठे आंदोलन केले. त्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक भूमिकांमध्ये बदल घडून आले. या बदलांमुळे पुरुषांच्या पारंपरिक भूमिकांबाबतही प्रश्न निर्माण झाले. उदाहरणार्थ,

पुरुषच कुटुंबाचा एकमेव कमावता असावा, ही संकल्पना बदलू लागली. घरकाम आणि बालसंगोपनात पुरुषांचा सहभाग वाढू लागला आणि स्त्री-पुरुष संबंध अधिक समताधिष्ठित होऊ लागले.

२. कुटुंबसंस्थेतील बदल :

आधुनिक समाजात कुटुंबसंस्थेमध्ये अनेक बदल झाले. घटस्फोटांचे प्रमाण वाढले. एकल पालक कुटुंबे वाढली. विवाहसंस्थेतील पारंपरिक भूमिका बदलल्या आणि मुलांच्या संगोपनात वडिलांच्या भूमिकेबाबत नवीन प्रश्न निर्माण झाले. या बदलांमुळे काही पुरुषांना पितृत्व हक्क, मुलांच्या पालकत्वाचे अधिकार, मानसिक ताण आणि सामाजिक अपेक्षा यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागला. परिणामी, पुरुषांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या संघटना आणि चळवळी उदयास आल्या. परंतु मायकेल किमेल यांच्या मते, "पुरुषहक्क चळवळीचा उदय हा स्त्रीवादी चळवळीविरोधातील प्रतिक्रिया म्हणून नव्हे, तर स्त्रीवादी चळवळीमुळे घडून आलेल्या सामाजिक परिवर्तनांना आणि बदलत्या कौटुंबिक संरचनांना प्रतिसाद म्हणून झाला. स्त्रियांच्या वाढत्या सामाजिक सहभागामुळे आणि कुटुंबसंस्थेतील बदलांमुळे पुरुषांच्या पारंपरिक भूमिकांमध्ये परिवर्तन घडले. या प्रक्रियेत पुरुषांच्या मानसिक आरोग्य, पितृत्व हक्क, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि सामाजिक अपेक्षा यांसारखे प्रश्न पुढे आले आणि त्यातून पुरुषहक्क चळवळीचा विकास झाला."

- **अभ्यासाची सैद्धांतिक चौकट : पुरुषहक्क चळवळीचा अभ्यास पुढील सिद्धांतांच्या आधारे करता येतो.**

१. सामाजिक चळवळ सिद्धांत (Social Movement Theory)

हर्बर्ट ब्लूमर या अमेरिकन समाजशास्त्रज्ञाच्या मते, "सामाजिक चळवळी समाजातील विशिष्ट असंतोषातून निर्माण होतात. पुरुषहक्क चळवळही सामाजिक बदल, कौटुंबिक रचना आणि लिंगसंबंधातील परिवर्तनांमुळे उदयास आली."

२. सापेक्ष वंचितता सिद्धांत (Relative Deprivation Theory)

टेड रॉबर्ट गूर (Ted Robert Gurr) या अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाच्या मते, "एखाद्या गटाला अपेक्षित आणि प्रत्यक्ष स्थितीतील फरक जाणवल्यास चळवळी उदयास येतात. पुरुषहक्क चळवळीत काही पुरुषांना न्यायव्यवस्था किंवा सामाजिक धोरणांमध्ये असमतोल जाणवतो."

३. संसाधन संघटन सिद्धांत (Resource Mobilization Theory)

जॉन डी. मॅकार्थी (John D. McCarthy) आणि मेयर एन. झाल्ड (Mayer N. Zald) यांनी १९७७ मध्ये संसाधन संघटन सिद्धांत (Resource Mobilization Theory) मांडला. त्यांच्या मते, "कोणतीही चळवळ संघटनात्मक संसाधनांमुळे विकसित होते." पुरुषहक्क चळवळीच्या बाबतीत SIFF, CRISP, Families Need Fathers आणि National

Coalition for Men यांसारख्या संस्थांनी संघटनात्मक संसाधनांच्या साहाय्याने चळवळीचा विस्तार घडवून आणला.

- **पाश्चात्य देशांतील पुरुषहक्क चळवळीचा उदय**

१९६०–७० च्या दशकात पाश्चात्य देशांमध्ये स्त्रीवादी चळवळींचा प्रभाव वाढला. त्याचवेळी पुरुषांच्या सामाजिक भूमिकांवर पुनर्विचार सुरू झाला. त्यात पुरुषांवरील आर्थिक जबाबदाऱ्या, भावनिक दडपण, युद्धातील सहभाग, धोकादायक रोजगार आणि कौटुंबिक भूमिका हे सुरुवातीचे प्रश्न होते. यामुळे १९७० च्या दशकात Men's Liberation Movement उदयास आली.

वॉरेन फॅरेल (Warren Farrell) हे अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, लेखक आणि पुरुषांच्या सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक आहेत. पुरुषहक्क चळवळीच्या वैचारिक विकासात त्यांचे विशेष योगदान मानले जाते. त्यांच्या मते, "पारंपरिक लिंगभूमिका केवळ महिलांनाच नव्हे, तर पुरुषांनाही तितक्याच प्रमाणात हानी पोहोचवतात." तसेच समाजातील पारंपरिक लिंगभूमिका पुरुष आणि स्त्रिया दोघांवरही मर्यादा घालतात. पुरुषांनी नेहमीच कुटुंबाचा आर्थिक भार उचलावा, भावनिकदृष्ट्या कठोर राहावे आणि संकटांचा सामना एकट्याने करावा, अशा सामाजिक अपेक्षा पुरुषांच्या मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करतात. त्यामुळे पुरुषांच्या समस्यांकडे स्वतंत्र सामाजिक प्रश्न म्हणून पाहण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

- **अमेरिकेतील पुरुषहक्क चळवळ**

स्त्रीवादी चळवळीच्या वाढीनंतर पुरुषांनाही काही सामाजिक, कायदेशीर आणि कौटुंबिक प्रश्नांचा सामना करावा लागत असल्याची भूमिका या चळवळीने मांडली. १९७० नंतर अमेरिकेत घटस्फोटाचे प्रमाण वाढले. मुलांच्या पालकत्वाचे प्रश्न, वडिलांचे अधिकार आणि कौटुंबिक न्यायालयांची भूमिका या विषयांवर चर्चा सुरू झाली. त्यात वडिलांचे हक्क म्हणून घटस्फोटानंतर मुलांच्या जीवनात वडिलांचा सहभाग टिकवून ठेवण्याची मागणी केली गेली. CDC च्या अहवालांनुसार अमेरिकेत पुरुष आत्महत्यांचे प्रमाण महिलांपेक्षा अधिक आढळून आल्याने पुरुषांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष वेधले गेले. पुरुषांवरील हिंसा थांबविण्यासाठी काही संस्थांनी पुरुष पीडितांसाठी निवारा केंद्रांची मागणी केली. हे प्रमुख प्रश्न मांडले गेले.

अमेरिकेतील प्रमुख संस्था व कार्य

National Coalition for Men (राष्ट्रीय पुरुष आघाडी), American Coalition for Fathers and Children (वडील आणि मुले यांच्यासाठी अमेरिकन आघाडी) व National Center for Men (राष्ट्रीय पुरुष केंद्र) या संस्था प्रामुख्याने पुरुषांचे हक्क, वडिलांचे अधिकार, कौटुंबिक कायद्यातील समानता आणि पुरुषांशी संबंधित सामाजिक प्रश्न यांवर काम करतात.

१. National Coalition for Men :

स्थापना अमेरिकेत पुरुषांच्या हक्कांसाठी वकिली करण्यासाठी करण्यात आली. न्यायव्यवस्था, कौटुंबिक कायदे, मुलांच्या पालकत्वाचे हक्क, शिक्षण आणि रोजगारातील कथित लिंगभेद यांसारख्या विषयांवर काम करते. पुरुषांवरील कौटुंबिक हिंसा, आत्महत्या, आरोग्यविषयक समस्या आणि सामाजिक पूर्वग्रह यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करते. काही प्रकरणांमध्ये लिंग-समानतेसंबंधी कायदेशीर आव्हाने (lawsuits)देखील दाखल केली आहेत.

२. American Coalition for Fathers and Children :

वडिलांचे आणि मुलांचे हक्क संरक्षित करण्यासाठी कार्य करणारी संस्था. घटस्फोट किंवा विभक्त राहण्याच्या परिस्थितीत वडिलांना मुलांशी नियमित संपर्क व संयुक्त पालकत्व (shared parenting) मिळावे यासाठी प्रयत्न करते. कौटुंबिक न्यायालयीन व्यवस्थेत वडिलांना समान वागणूक मिळावी यासाठी जनजागृती आणि धोरणात्मक पाठपुरावा करते व मुलांच्या संगोपनात आई-वडील दोघांचाही सक्रिय सहभाग असावा, यावर भर देते.

३. National Center for Men :

पुरुषांशी संबंधित कायदेशीर, सामाजिक आणि आरोग्यविषयक प्रश्नांवर संशोधन व जनजागृती करते. पुरुषांच्या आरोग्य, शिक्षण, पालकत्व हक्क, लष्करी भरती, कौटुंबिक कायदे आणि लिंग-समानतेशी संबंधित मुद्द्यांवर

काम करते. पुरुषांनाही काही क्षेत्रांत भेदभावाचा सामना करावा लागतो, हा मुद्दा सार्वजनिक चर्चेत आणण्याचा प्रयत्न करते व धोरणात्मक बदल, संशोधन आणि कायदेशीर कारवाईद्वारे आपली भूमिका मांडते.

एकूणच, या तिन्ही संस्था पुरुष आणि वडिलांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे, कौटुंबिक न्यायव्यवस्थेत समानता वाढवणे आणि पुरुषांच्या सामाजिक-मानसिक समस्यांकडे लक्ष वेधणे यासाठी कार्य करतात. त्यांच्या कार्यपद्धती व विचारसरणीबाबत विविध मतप्रवाह आहेत. काही जण त्यांना पुरुष-अधिकार चळवळीचा महत्त्वाचा भाग मानतात, तर काही टीकाकार त्यांच्या काही भूमिकांशी असहमत असतात. तरीही पितृत्व हक्क, पुरुषांचे मानसिक आरोग्य, कायदेशीर सुधारणा व त्याबाबतचे संशोधन यांकडे दुर्लक्ष करता येत नाही.

- **युरोपमधील पुरुषहक्क चळवळ**

युनायटेड किंगडममधील Families Need Fathers (कुटुंबांना वडिलांची गरज आहे) आणि Fathers 4 Justice (वडिलांसाठी न्याय) या संस्था युरोपातील सर्वात प्रभावी पुरुषहक्क संस्थांपैकी मानल्या जातात. Families Need Fathers (FNF) ही संस्था १९७४ मध्ये स्थापन झाली. विभक्त झालेल्या किंवा घटस्फोट घेतलेल्या पालकांच्या मुलांना दोन्ही पालकांशी संबंध टिकवून ठेवण्यास मदत करणे, हे तिचे मुख्य उद्दिष्ट असून विभक्त पालकांना माहिती, सल्ला व भावनिक आधार देणे, मुलांना आई-वडील दोघांचाही सहवास मिळावा यासाठी shared parenting (सामायिक पालकत्व) धोरणाचा प्रचार करणे, कुटुंब न्यायव्यवस्था

(family courts) आणि धोरणकर्त्यांपुढे पालकांच्या हक्कांबाबत मांडणी करणे व मुलांना एका पालकापासून पूर्णपणे दूर ठेवले जाण्याच्या समस्यांवर जनजागृती करणे, ही तिची मुख्य कार्ये आहेत.

१. Fathers 4 Justice (F4J) :

ही ब्रिटनमधील वडिलांच्या हक्कांसाठी काम करणारी मोहीम-आधारित संस्था असून तिची स्थापना २००१–२००३ च्या सुमारास झाली. मॅट ओ'कॉनर हे ब्रिटनमधील वडिलांच्या हक्कांसाठी (fathers' rights) काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, लेखक आणि मार्केटिंग सल्लागार आहेत. ते Fathers 4 Justice (F4J) या संघटनेचे संस्थापक म्हणून विशेष ओळखले जातात. वैवाहिक विभक्ततेनंतर आपल्या दोन मुलांना भेटण्यावर मर्यादा आल्याचा अनुभव त्यांना आला. त्यानंतर त्यांनी २००१ मध्ये Fathers 4 Justice चळवळ सुरू केली. या संघटनेचा उद्देश घटस्फोट किंवा विभक्ततेनंतर मुलांच्या संगोपनात वडिलांना अधिक अधिकार आणि सहभाग मिळावा हा आहे. सदस्यांनी अनेकदा सुपरहिरो (उदा. Batman, Spider-Man) यांच्या वेशात सरकारी इमारतींवर चढून निदर्शने केली. ब्रिटिश संसदेत निदर्शने, सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये व्यत्यय आणि इतर प्रतीकात्मक आंदोलने यांमुळे या चळवळीला मोठी प्रसिद्धी मिळाली. तेव्हा F4J ही संघटना अत्यंत लक्षवेधी आंदोलनांसाठी प्रसिद्ध झाली. त्यांनी Fathers4Justice: The Inside Story हे पुस्तकही लिहिले.

मॅट ओ'कॉनर यांच्या आंदोलन पद्धतींवर टीकादेखील झाली. काहींनी त्या पद्धतींना अतिशय आक्रमक किंवा प्रसिद्धी मिळवण्यासाठी केलेले प्रयत्न

असे म्हटले. तरीही ब्रिटनमध्ये कौटुंबिक न्यायव्यवस्था आणि वडिलांच्या भूमिकेबाबत राष्ट्रीय पातळीवर चर्चा घडवून आणण्यात त्यांच्या चळवळीचा मोठा प्रभाव मानला जातो. त्यांच्या चळवळीमुळे ब्रिटनमध्ये shared parenting (आई-वडिलांचा समान सहभाग) या विषयावर व्यापक सार्वजनिक चर्चा सुरू झाली, ही त्यांची सर्वात महत्त्वाची कामगिरी मानली जाते.

घटस्फोट किंवा विभक्त झाल्यानंतर वडिलांना मुलांशी नियमित संपर्क मिळावा यासाठी अभियान चालवणे.

- Equal Parenting (दोन्ही पालकांना समान भूमिका) या संकल्पनेचा प्रचार करणे.

- कुटुंब कायद्यात सुधारणा करण्यासाठी सरकार आणि संसदेकडे मागण्या करणे.

- लक्ष वेधण्यासाठी नाट्यमय आंदोलने, मोर्चे आणि "सुपरहिरो" वेशातील सार्वजनिक निदर्शने आयोजित करणे., हे त्या संस्थेचे विशेष कार्य मानले जाते.

एकूणच Families Need Fathers ही मुख्यतः समर्थन व सल्ला देणारी संस्था आहे, तर Fathers 4 Justice ही वडिलांच्या हक्कांसाठी सार्वजनिक आंदोलन आणि कायद्यात सुधारणा मागणारी संस्था आहे. ही संस्था जनजागृती मोहिमा, निदर्शने आणि विविध सार्वजनिक उपक्रमांच्या

माध्यमातून मुलांच्या संगोपनातील वडिलांच्या समान हक्कांसाठी आवाज उठवते.

२. वडिलांचा सहभाग आणि बालविकास :

फ्रेंच संशोधक आणि कौटुंबिक धोरण तज्ज्ञांचा असा युक्तिवाद असतो की, मुलाच्या भावनिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी दोन्ही पालकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असतो. त्यामुळे विभक्तीनंतरही वडिलांचा संपर्क टिकून राहावा, यावर भर दिला जातो. याच कारणामुळे फ्रान्समध्ये सामायिक पालकत्व (shared parenting) आणि संयुक्त पालकत्व (joint custody) यावर सातत्याने चर्चा होत असते.

३. Fathers' Rights चळवळींचा प्रभाव :

ब्रिटनमधील Matt O'Connor यांच्या Fathers 4 Justice प्रमाणेच फ्रान्समध्येही काही संघटना असा दावा करतात की, विभक्तीनंतर मुलांचा मुख्य ताबा आईकडे राहण्याची प्रवृत्ती अजूनही जास्त आहे आणि त्यामुळे वडिलांचे मुलांशी असलेले संबंध कमकुवत होतात. मात्र, फ्रान्समध्ये या मागण्या बहुतेक वेळा 'पुरुषांवरील अन्याय' म्हणून न मांडता 'मुलांना दोन्ही पालकांची गरज असते' या भाषेत मांडल्या जातात.

४. पुरुषांचे प्रश्न = जबाबदारीचा प्रश्न

फ्रान्समध्ये पुरुषांच्या प्रश्नांची चर्चा फक्त अधिकारांपुरती मर्यादित नाही. वडिलांनी मुलांच्या संगोपनात, शिक्षणात आणि आर्थिक जबाबदाऱ्यांमध्ये सक्रिय भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा असते. २०२४ मध्ये राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी वडिलांच्या मुलांशी संपर्क ठेवण्याची जबाबदारी (duty of visitation) या संकल्पनेवर सार्वजनिक चर्चा सुचवली होती. वडिलांचा सहभाग वाढवणे हा त्यामागील उद्देश होता.

५. कुटुंबसंस्था मजबूत ठेवण्याचा प्रयत्न

मुलांच्या जीवनात वडील सक्रिय असतील, तर सामाजिक समस्या कमी होऊ शकतात. विभक्त कुटुंबांमध्येही पालकांचे सहकार्य टिकवणे आवश्यक आहे. पालकत्व हे फक्त जैविक नाते नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीही आहे, असे फ्रान्समध्ये मानले जाते. कारण पालकांनी मुलाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्याला प्रेम, संरक्षण, योग्य संस्कार आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा असते.

६. टीका आणि वाद

सर्वजण या दृष्टिकोनाशी सहमत नाहीत. महिला संघटना आणि बालहक्क गटांचा युक्तिवाद असतो की, प्रत्येक प्रकरण वेगळे असते आणि घरगुती हिंसा, अत्याचार किंवा असुरक्षित परिस्थितीत "समान पालकत्व" सक्तीने लागू करता कामा नये. मुलाचे हित हेच अंतिम निकष राहिले पाहिजे. एकूणच फ्रान्समध्ये पुरुषांच्या प्रश्नांचा विचार प्रामुख्याने ‘वडिलांचे हक्क’ म्हणून न होता ‘मुलांच्या कल्याणासाठी वडिलांचा सहभाग’ या चौकटीत केला जातो. त्यामुळे तेथे पुरुषांचे प्रश्न, बालकल्याण, संयुक्त

पालकत्व आणि कुटुंबसंस्थेचे स्थैर्य हे एकमेकांशी घट्ट जोडलेले दिसून येतात.

ऑस्ट्रेलियाने पुरुषांच्या आरोग्याला केवळ वैयक्तिक समस्या किंवा 'पुरुषांनी स्वतः सांभाळायची बाब' म्हणून न पाहता, तो एक सार्वजनिक आरोग्याचा (Public Health) विषय आहे, अशी स्पष्ट भूमिका घेतली. याच दृष्टिकोनातून National Men's Health Strategy 2020–2030 हे धोरण तयार करण्यात आले. त्याबाबत पुरुषांचे सरासरी आयुर्मान स्त्रियांपेक्षा कमी आहे. आत्महत्या, अपघात, जोखीमयुक्त वर्तन आणि अनेक दीर्घकालीन आजारांमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. अनेक पुरुष आजार गंभीर होईपर्यंत डॉक्टरांकडे जात नाहीत. ग्रामीण भागातील, आदिवासी, आर्थिकदृष्ट्या वंचित आणि सामाजिकदृष्ट्या एकाकी पुरुषांचे आरोग्य परिणाम अधिक वाईट आहेत, असे ऑस्ट्रेलियन सरकारने निरीक्षण नोंदविले आहे.

पुरुषांचे खराब आरोग्य हे केवळ वैयक्तिक निवडींचे परिणाम नसून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि आरोग्यव्यवस्थेतील घटकांशी संबंधित आहे, हा त्यांच्या रणनीतीचा मुख्य संदेश असून 'ऑस्ट्रेलियातील प्रत्येक पुरुष आणि मुलगा दीर्घ, निरोगी, समाधानकारक आणि अर्थपूर्ण जीवन जगू शकेल.' हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी त्यांनी काही प्रमुख प्राधान्य क्षेत्रे ठरविली आहेत. जसे,

१. मानसिक आरोग्य आणि कल्याण (Mental Health & Wellbeing) : पुरुषांमधील आत्महत्या, नैराश्य, एकटेपणा व

व्यसनाधीनता यांना मोठे सार्वजनिक आरोग्य आव्हान मानले गेले. त्यासाठी मदत मागण्यावरील कलंक कमी करणे, मानसिक आरोग्य सेवांपर्यंत पुरुषांची पोहोच वाढवणे व भावनिक साक्षरता वाढवणे, ही उद्दिष्टे ठरविली गेली.

२. दीर्घकालीन आजार (Chronic Conditions) : हृदयरोग, मधुमेह, कर्करोग व श्वसनाचे आजार याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. कारण पुरुष अनेकदा तपासणी उशिरा करतात. त्यामुळे लवकर निदानावर भर देण्यात आला.

३. लैंगिक व प्रजनन आरोग्य (Sexual and Reproductive Health) : यामध्ये लैंगिक आरोग्य, वंध्यत्व, प्रोस्टेट आरोग्य व वडील म्हणून सहभाग या विषयांना मुख्य प्रवाहातील आरोग्य चर्चेत आणण्याचा प्रयत्न आहे.

४. दुखापती आणि जोखीमयुक्त वर्तन (Injuries and Risk Taking) : पुरुषांमध्ये रस्ते अपघात, कार्यस्थळावरील मृत्यू, मद्य व अमली पदार्थांचा वापर आणि धोकादायक वर्तन यांचे प्रमाण जास्त असल्याचे नमूद केले आहे.

५. निरोगी वृद्धत्व (Healthy Ageing) : लोकसंख्या वृद्ध होत असल्यामुळे वृद्ध पुरुषांचे शारीरिक आरोग्य, सामाजिक एकाकीपणा व निवृत्तीनंतरचे मानसिक आरोग्य यावर विशेष लक्ष दिले गेले. याचबरोबर काही धोरणात्मक उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत. त्यात पुरुषांना स्वतःचे

आरोग्य सुधारण्यासाठी सक्षम करणे, पुरुषांच्या विविधतेची दखल घेणे, आरोग्यविषयक साक्षरता वाढवणे, "आजारी पडल्यावरच डॉक्टरांकडे जाणे" ही मानसिकता बदलणे व आरोग्यसेवांबाबतचा संकोच कमी करणे यांचा समावेश आहे. तसेच आरोग्यव्यवस्था पुरुषांसाठी अधिक अनुकूल बनविण्यासाठी डॉक्टर आणि आरोग्यकर्मचाऱ्यांना पुरुषांच्या गरजांबाबत प्रशिक्षण देणे, पुरुष आरोग्य सेवा अधिक सुलभ करणे व प्रतिबंधात्मक तपासण्या वाढवणे यावर भर देण्यात आला आहे. संशोधन आणि पुराव्यांचा पाया मजबूत करण्यासाठी पुरुषांच्या आरोग्यावर अधिक संशोधन करणे, डेटा संकलन सुधारणे व धोरणे पुराव्यावर आधारित करणे, ही उद्दिष्टेही निश्चित करण्यात आली आहेत.

ऑस्ट्रेलियन सरकारची रणनीती सर्व पुरुषांना एकसारखे मानत नाही. तर Aboriginal and Torres Strait Islander पुरुष, ग्रामीण व दुर्गम भागातील पुरुष, आर्थिकदृष्ट्या वंचित पुरुष, अपंग पुरुष, सांस्कृतिक व भाषिक विविध पार्श्वभूमीतील पुरुष, LGBTIQA+ (हा विविध लैंगिक ओळखी (sexual orientations) आणि लिंग ओळखी (gender identities) यांचा समावेश करणारा शब्द आहे.) पुरुष, माजी सैनिक, सामाजिकदृष्ट्या एकाकी पुरुष व कारागृह किंवा न्यायव्यवस्थेशी संबंधित पुरुष यांसारख्या गटांसाठी स्वतंत्र लक्ष दिले जाते.

पूर्वी अनेक देशांमध्ये आरोग्य धोरणे 'सर्वांसाठी समान' या तत्त्वावर आधारित होती. ऑस्ट्रेलियाने मात्र पुरुषांचे आरोग्य परिणाम, आरोग्यसेवांचा वापर, आत्महत्या, अपघाती मृत्यू आणि मदत मागण्याचे वर्तन हे वेगळे असतात, त्यामुळे पुरुषांसाठी स्वतंत्र सार्वजनिक आरोग्य

धोरण आवश्यक आहे, अशी भूमिका स्वीकारली. यामुळे पुरुषांच्या प्रश्नांना 'वैयक्तिक कमकुवतपणा' म्हणून नव्हे, तर राष्ट्रीय सार्वजनिक आरोग्याच्या चौकटीत स्थान मिळाले. अर्थात 'पुरुषांनी फक्त मजबूत राहावे' ऐवजी 'पुरुष निरोगी राहतील यासाठी समाज, सरकार आणि आरोग्यव्यवस्था जबाबदार आहेत' अशी भूमिका ऑस्ट्रेलियाने स्वीकारली.

- **भारतातील पुरुषहक्क चळवळ**

१. 'सेव्ह इंडियन फॅमिली फाउंडेशन' (SIFF)

बंगळूरमधील संगणक-कुशल पतींच्या एका गटाने, ज्यांना त्यांच्या पत्नींकडून कथितरित्या त्रास दिला जातो, एकत्र येऊन 'सेव्ह इंडियन फॅमिली फाउंडेशन' (SIFF) नावाचा एक सामाजिक मंच २००५ साली स्थापन केला. भारतातील पुरुषांच्या हक्कांसाठी काम करणारा हा एक नोंदणीकृत, निधी नसलेला, ना-नफा तत्त्वावर चालणारा, गैर-सरकारी (NGO) गट असून भारतातील विविध समविचारी स्वयंसेवी संस्थांसोबत कार्य करतो. या संस्थेची स्थापना २००५ मध्ये झाली असून छळाशी संबंधित भारतीय कायद्यांच्या कथित गैरवापराच्या विरोधात काम करणारा हा एक समर्थक गट आहे. ही संस्था भारतातील विविध शहरे आणि प्रांतांमध्ये कार्यरत असलेल्या अनेक पुरुष व कौटुंबिक हक्क संघटनांची एक छत्री संघटना आहे. २०१० मध्ये या गटाने त्यांच्या संकेतस्थळावर दावा केला होता की, त्यांचे ३०,००० सदस्य प्रत्यक्ष जमिनीवर आणि ३,५०० हून अधिक इंटरनेटवर आहेत, जे कमांडोंप्रमाणे जोमाने आणि आवेशाने या कायदेशीर दहशतवादाशी लढत आहेत.

एसआयएफएफ (SIFF) ने पुरुषांसाठी अनेक उपक्रम राबविले. एक ॲप आणि हेल्पलाइन सुरू केली, ज्यावर चार महिन्यांत २५,००० पेक्षा जास्त दूरध्वनी आले. भारतीय दंड संहिता (१९८३) चे कलम ४९८-अ आणि महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ यांविरुद्ध मोहीम चालवून संस्थेने असा दावा केला की, "या कायद्यांचा काही भारतीय महिलांकडून गैरवापर केला जातो. या कायद्यांमुळे काही पुरुषांना कायदेशीर, मानसिक आणि सामाजिक छळाला सामोरे जावे लागते. तसेच काही प्रकरणांत वकील आणि महिला या कायद्यांचा वापर पैसे व कौटुंबिक मालमत्ता मिळवण्यासाठी आणि वडिलांना मुलांचा ताबा नाकारण्यासाठी करतात."

एसआयएफएफ (SIFF) सदस्यांनी हे कायदे लिंगनिरपेक्ष बनवण्याची आणि महिलांकडून होणाऱ्या अत्याचारांपासून पुरुषांच्या संरक्षणाचा समावेश करण्यासाठी त्यात सुधारणा करण्याची मागणी केली आहे. महिला आणि त्यांच्या कुटुंबांकडून होणारा हुंडा-छळ हा स्त्रीवादी कल्पनेची निर्मिती असल्याचा त्यांचा दावा असून, कौटुंबिक अत्याचाराच्या जवळजवळ सर्व प्रकरणांमध्ये स्त्रीच अत्याचार करणारी असते, असे त्यांचे मत आहे. ते तुरुंगवासाची शिक्षा काढून टाकून हुंडाविरोधी गुन्ह्यांचे गुन्हेगारीकरण रद्द करण्यासाठी मोहीम चालवतात. या संस्थेने भारतात पुरुष आयोगाच्या स्थापनेसाठीदेखील समर्थन केले आहे. विवाह कायद्यातील २०१० च्या दुरुस्तीलाही विरोध केला. २०२२ मध्ये वैवाहिक बलात्काराला गुन्हा घोषित करण्याविषयी दाखल झालेल्या एका न्यायालयीन याचिकेलाही विरोध करून ‘विवाह संप’ आंदोलन प्रायोजित केले.

एसआयएफएफ (SIFF) महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली देशात सुरू असलेल्या कथित कायदेशीर दहशतवादाबद्दल वृत्तवाहिन्यांवरील दूरदर्शन कार्यक्रम, निदर्शने, रोड शो, पत्रकार परिषद, लेख प्रकाशन, ऑनलाइन ब्लॉगिंग इत्यादी विविध माध्यमांतून जनजागृती करते. महिलाविषयक कायद्यांच्या कथित गैरवापरामुळे पीडित झालेल्या पुरुषांना मानसिक व नैतिक आधार देऊन त्यांच्या तक्रारी मांडण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करते. तसेच खोट्या खटल्यांविरुद्ध प्रभावीपणे आणि सत्याच्या विश्वासाने लढण्यासाठी एकमेकांचे अनुभव व कायदेशीर कौशल्य वापरून लिंगसमानता आणि कौटुंबिक सलोख्याचा संदेश पसरवते. अवैध कायद्यांविरुद्ध सातत्याने आंदोलन करून सरकारला सध्याच्या वैवाहिक कायद्यांचे पुनरावलोकन करून त्यात सुधारणा करण्याची, तसेच समाजात आणि दिवाणी व फौजदारी न्यायव्यवस्थेत सुव्यवस्था पुनर्संचयित करण्यासाठी त्यामध्ये तर्कसंगतता आणण्याची विनंती करते.

भारतातील कानपूर येथील दामन वेल्फेअर सोसायटी अँड ट्रस्ट ही भारतातील पुरुषांच्या हक्कांशी (Men's Rights) संबंधित काम करणारी एक नोंदणीकृत, स्वयंसेवी (NGO), ना-नफा (Non-Profit) संस्था असल्याचे संस्थेच्या अधिकृत माहितीत नमूद केले आहे. तिचे मुख्य उद्दिष्ट पुरुषांवरील सामाजिक, कौटुंबिक आणि कायदेशीर समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे आणि मदत उपलब्ध करून देणे हे आहे. तसेच कौटुंबिक व वैवाहिक वादांमध्ये अडचणीत असलेल्या पुरुषांना मार्गदर्शन करणे, कथित खोटे हुंडा, कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ किंवा इतर कायदेशीर प्रकरणांमध्ये सल्ला व समुपदेशन करणे, पुरुषांच्या मानसिक

आरोग्य, सामाजिक भेदभाव आणि कायदेशीर हक्कांबाबत जनजागृती करणे, तसेच विविध शहरांमध्ये बैठका, चर्चासत्रे आणि मोहिमा आयोजित करणे, ही तिची मुख्य कार्ये आहेत. ही संस्था 'Men in Distress' साठी 8882-498-498 ही राष्ट्रीय हेल्पलाइन चालवते. स्वतःला Save Indian Family Movement या चळवळीशी संलग्न असल्याचे सांगते. संस्थेच्या मते, ती पुरुषांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या विविध गटांबरोबर कार्य करते. 'Men's Hub (My Voice) नावाचे त्रैमासिक (Quarterly) मासिक प्रकाशित करते, ज्यामध्ये पुरुषांच्या अनुभवांवर, सामाजिक प्रश्नांवर आणि कायदेशीर मुद्द्यांवर लेख प्रकाशित होतात.

अशाप्रकारे दामन वेल्फेअर सोसायटी अँड ट्रस्ट ही संस्था पुरुषांच्या हक्क, आरोग्य आणि सन्मानासाठी कार्य करते. पुरुषांविरुद्ध होणारा लैंगिक भेदभाव, छळ आणि सामाजिक उपेक्षा याविषयी जागरूकता निर्माण करणे हे तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. दामनचे मत आहे की, "समाजात अडचणीत असलेल्या स्त्रियांना सहानुभूती मिळते; परंतु पुरुषांच्या समस्यांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे संस्था अशा पुरुषांना एकत्र आणून त्यांना आधार देण्याचे आणि त्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे काम करते." त्यासाठी दामन विविध कार्यक्रम, उपक्रम, जनजागृती मोहिमा आणि आंदोलने आयोजित करून पुरुषांवरील अन्याय व भेदभावाविरुद्ध समाजात जागृती निर्माण करते. तसेच भारतातील आणि परदेशातील समविचारी संस्थांसोबत सहकार्य करून पुरुष-स्त्री समानतेसाठी आणि सर्व वयोगटांतील पुरुषांवरील भेदभाव कमी करण्यासाठी प्रयत्न करीत असते.

२. वास्तव फाउंडेशन

वास्तव फाउंडेशन ही पुरुष आणि मुलांच्या हक्कांचे, कल्याणाचे आणि न्याय्य वागणुकीचे समर्थन करणारी एक स्वयंसेवी संस्था (NGO) आहे. संस्थेचे उद्दिष्ट पुरुषांशी संबंधित सामाजिक, कायदेशीर आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे, तसेच प्रभावित पुरुषांना आवश्यक मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे हे आहे. संस्था खोट्या कायदेशीर प्रकरणांना सामोरे जाणाऱ्या पुरुषांना कायदेशीर सहाय्य, मानसिक आरोग्य समुपदेशन आणि भावनिक आधार प्रदान करते. पुरुषांवरील घरगुती हिंसाचार, पुरुषांच्या आत्महत्या आणि लिंगभेदी कायद्यांबाबत जनजागृती मोहिमा राबवून समाजात संतुलित आणि न्याय्य दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करते. याशिवाय, 8882 498 498 या विशेष हेल्पलाइनद्वारे तातडीची मदत व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.

संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष अमित देशपांडे हे मुंबईस्थित पुरुष हक्क कार्यकर्ते आहेत. अभियांत्रिकीची पार्श्वभूमी असलेल्या अमित देशपांडे यांनी २०११ पासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय योगदान दिले आहे. त्यांनी पुरुषांसाठी आत्महत्या प्रतिबंधक हेल्पलाइन, समुपदेशन सत्रे आणि विविध जनजागृती उपक्रम सुरू केले आहेत. तसेच त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, सार्वजनिक कार्यक्रम आणि माध्यमांद्वारे पुरुषांच्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या TEDx म्हणजे (Technology, Entertainment, Design या संकल्पनेवर आधारित, स्थानिक पातळीवर स्वतंत्रपणे आयोजित केले जाणारे व्याख्यानमालांचे कार्यक्रम) यातील

भाषणातून लैंगिक समानता आणि पुरुषांच्या हक्कांबाबतची त्यांची भूमिका स्पष्ट होते.

एकूणच वास्तव फाउंडेशन पुरुषांच्या अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या समस्यांना समाजासमोर आणून सर्वांसाठी अधिक न्याय्य, संतुलित आणि सहानुभूतीपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. देशभर त्यांच्या साप्ताहिक बैठका होतात. त्यात त्यांनी दिल्ली, लुधियाना, चंदीगड, लखनौ, फरिदाबाद, कानपूर, पटियाला, अमृतसर, कोलकाता, बंगळुरू (बेंगळुरू), चेन्नई, विशाखापट्टणम, हैदराबाद, सिकंदराबाद, जयपूर, इंदूर, पानिपत, नागपूर, अहमदाबाद, वडोदरा (बडोदा), पोरबंदर, सुरत आणि मुंबई या शहरांचा उल्लेख केलेला आहे.

२०११ मध्ये अमित देशपांडे यांच्या सामाजिक कार्यातून सुरू झालेली ही चळवळ २०१३ मध्ये "वास्तव" या स्वरूपात उभी राहिली आणि २०१४ मध्ये नोंदणीकृत NGO बनली. आज वास्तव फाउंडेशन पुरुषांचे हक्क, मानसिक आरोग्य, आत्महत्या प्रतिबंध, कायदेशीर सहाय्य आणि जनजागृती या क्षेत्रांत कार्य करणाऱ्या भारतातील प्रमुख पुरुष कल्याण संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

अशाप्रकारे पुरुषांच्या हक्कांसाठी काम करणारी ही चळवळ विवाह, कौटुंबिक वाद, कथित खोटे कौटुंबिक गुन्हे, मानसिक ताण आणि आत्महत्या प्रतिबंध यांसंबंधी जनजागृती, समुपदेशन आणि सहाय्य पुरवते. कुटुंबव्यवस्था मजबूत ठेवणे आणि लिंगन्यायाचा मुद्दा मांडणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पुरुषांवरील भेदभाव, मानसिक आरोग्य, कौटुंबिक व

कायदेशीर अडचणी याबाबत मदत करणारी ही संस्था हेल्पलाइन, समुपदेशन, जनजागृती मोहीम, साप्ताहिक सहाय्य गट आणि पुरुषांच्या हक्कांबाबत वकिली हे प्रमुख उपक्रम राबवते. पुरुष व मुलांच्या कल्याणासाठी कार्य करणारी स्वयंसेवी संस्था म्हणून ती आत्महत्या प्रतिबंधक हेल्पलाइन, मानसिक आरोग्य समुपदेशन, कायदेशीर मार्गदर्शन, तणाव व्यवस्थापन आणि लिंगन्यायाबाबत जनजागृती यावर विशेष भर देते.

- **महाराष्ट्रातील पुरुषहक्क चळवळ**

महाराष्ट्र हा भारतातील पुरुषहक्क चळवळीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू राहिला असून पुणे, मुंबई, नागपूर आणि नाशिक येथे चळवळीचे संघटनात्मक जाळे निर्माण झाले. प्रभावित पुरुष एकत्र येऊन अनौपचारिक बैठका घेऊ लागले. सुरुवातीला या बैठकांचे स्वरूप समुपदेशन, कायदेशीर माहितीची देवाणघेवाण आणि मानसिक आधार देणे असे होते. पुढे या गटांमधून स्थानिक संस्था व स्वयंसेवी संघटनांची निर्मिती झाली.

महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय SIF नेटवर्कमध्ये सुरुवातीपासून सक्रिय सहभाग घेतला. मुंबई आणि नागपूर ही पुढील काळात पुरुषहक्क चळवळीची महत्त्वाची केंद्रे बनली. नंतर अनेक राष्ट्रीय बैठका आणि परिषदांमध्ये महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांचा प्रभाव दिसून आला. त्याचे काही ऐतिहासिक टप्पे पुढीलप्रमाणे मांडता येतात.

१. पहिला टप्पा (२०००–२००५)

२००० च्या दशकाच्या सुरुवातीला विवाहसंबंधी कायद्यांच्या गैरवापराबाबत काही पुरुषांनी आपले अनुभव इंटरनेटवर मांडण्यास सुरुवात केली. Yahoo Groups सारख्या ऑनलाइन मंचांवर चर्चा सुरू झाली. २००४ मध्ये Misuse Dowry Act गटाची निर्मिती झाली आणि २००५ मध्ये Save Indian Family (SIF) नेटवर्क अस्तित्वात आले. त्यानंतर पुरुषांनी त्यांच्यावर होणाऱ्या घरगुती हिंसेच्या बाबत सार्वजनिक ठिकाणी वाचा फोडलेली दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर आणि नाशिक येथे प्रभावित पुरुषांचे लहान गट तयार होऊ लागले. या गटांचे कार्य मुख्यतः मानसिक आधार देणे, कायदेशीर माहिती पुरवणे, अनुभवांची देवाणघेवाण आणि परस्पर सहाय्य यापुरते मर्यादित होते. हा काळ पुरुषहक्क चळवळीच्या संघटनात्मक पायाभरणीचा काळ मानला जातो.

२. दुसरा टप्पा (२००६–२०१०)

या काळात पुरुषहक्क चळवळ ऑनलाइन गटांमधून प्रत्यक्ष सामाजिक नेटवर्कमध्ये रूपांतरित झाली. महाराष्ट्रातील नागपूर, पुणे आणि मुंबई येथे कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत झाले. नागपूरला पुरुषहक्क चळवळीची "विचारधारा आणि नेतृत्वाची राजधानी" असे संबोधले जाते. राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय परिषदांचे आयोजन, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन (१९ नोव्हेंबर) कार्यक्रमांचे आयोजन, पुरुष आयोग (National Commission for Men) आणि पुरुष कल्याण मंत्रालयाच्या मागणीसाठी

जनजागृती, कौटुंबिक वादांमध्ये अडकलेल्या पुरुषांना समुपदेशन व सामाजिक आणि कायदेशीर प्रश्नांवर चर्चासत्रे हे त्याचे कार्य होते.

पुणे हे पुरुषहक्क चळवळीत विशेषतः संयुक्त पालकत्व (Shared Parenting) या विषयासाठी ओळखले जाते. विभक्त झालेल्या वडिलांच्या प्रश्नांवर काम, संयुक्त पालकत्वासाठी जनजागृती, कायदे, मानसशास्त्र आणि कुटुंबव्यवस्थेवर परिसंवाद व मानसिक आरोग्य आणि पुरुषांच्या भावनिक समस्यांवर चर्चा. हे त्यांचे प्रमुख कार्य आहे. त्यांनी पुण्यात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन केले आहे. २०२३ मध्ये पुरुष प्रश्नांवरील आंतरराष्ट्रीय परिषद (International Conference for Men's Issues) पुण्यात आयोजित करण्यात आली होती. हे त्यांचे विशेष योगदान मानले जाते. शिवाय संशोधनावर आधारित चर्चा, कायदे सुधारणा विषयक संवाद, वडिलांच्या हक्कांबाबत जनजागृती व ऑनलाइन आणि ऑफलाइन सपोर्ट नेटवर्क तयार करणे, ही त्यांची भूमिका आहे.

मुंबई हे पुरुषहक्क चळवळीचे सर्वात जुने आणि प्रभावी महानगरीय केंद्र मानले जाते.कौटुंबिक प्रकरणांतील समुपदेशन, कायदेशीर मार्गदर्शन, माध्यमांशी संवाद, जनजागृती मोहीमा, संकटग्रस्त पुरुषांसाठी समर्थन गट तयार करणे हे त्याचे महत्त्वाचे कार्य मानले जाते. मुंबईतील कार्यकर्त्यांनी सुरुवातीच्या काळात Yahoo Groups आणि ऑनलाइन नेटवर्किंगद्वारे महाराष्ट्रातील विविध शहरांना जोडण्याचे काम केले. नंतर माध्यमांमध्ये पुरुषांच्या प्रश्नांना स्थान मिळवून देण्यात भूमिका महत्त्वाची मानली आहे.

एकूणच नागपूर, पुणे आणि मुंबई या तिन्ही केंद्रांनी वेगवेगळ्या पद्धतीने पुरुषहक्क चळवळीला आकार दिला. नागपूरने नेतृत्त्व, आंदोलन आणि राष्ट्रीय समन्वय साधला. पुणे गटाने संयुक्त पालकत्व, संशोधन आणि धोरणात्मक चर्चा यावर भर दिला तर मुंबईने कायदेशीर मदत, समुपदेशन आणि माध्यमांतील प्रतिनिधित्व केले. या तिन्ही केंद्रांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील पुरुषहक्क चळवळ स्थानिक सहाय्य गटांपासून राष्ट्रीय स्तरावरील संघटित सामाजिक चळवळ म्हणून विकसित झाली.

३. तिसरा टप्पा (२०११–२०१५) :

हा काळ चळवळीच्या सार्वजनिक सक्रियतेचा काळ असून या काळात घटस्फोटानंतर मुलांच्या संगोपनात दोन्ही पालकांचा समान सहभाग असावा, या मागणीसाठी देशभर मोहिमा राबवण्यात आल्या. राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्याची मागणी जोर धरू लागली. काही संघटनांनी फादर्स डे आंदोलनात्मक स्वरूपात साजरा करून वडिलांच्या पालकत्वाच्या अधिकारांवर लक्ष वेधले. Marriage Laws (Amendment) Bill संदर्भातील चर्चांमध्ये पुरुषहक्क संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला. या टप्प्यात नागपूर हे पुरुषहक्क चळवळीचे महत्त्वाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून उदयास आले.

४. चौथा टप्पा (२०१६–२०२०) :

डिजिटल विस्तार आणि न्यायालयीन प्रभावाचा टप्पा मानला जातो. या काळात सोशल मीडियामुळे चळवळीची पोहोच झपाट्याने वाढली.

Facebook, WhatsApp, Telegram, YouTube यांच्या माध्यमातून कायदेशीर माहिती, समुपदेशन, जनजागृती व संघटनात्मक समन्वय यांना गती मिळाली. तसेच कलम ४९८अ आणि कौटुंबिक कायद्यांशी संबंधित न्यायालयीन निर्णयांवर व्यापक चर्चा झाली. पुणे, मुंबई आणि नागपूर येथे या विषयावर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. पुरुष आयोगाच्या मागणीला सोशल मीडियातून नवीन बळ मिळाले. कोविड-१९, २०२० मध्ये सर्व उपक्रम ऑनलाइन झाले आणि डिजिटल नेटवर्क अधिक मजबूत झाले.

५. पाचवा टप्पा (२०२१–२०२६) :

हा टप्पा आधुनिक पुरुषहक्क चळवळीचा टप्पा मानला जातो. या काळात नैराश्य, आत्महत्या, कौटुंबिक तणाव व भावनिक आरोग्य हे विषय केंद्रस्थानी आले. त्यासाठी सोशल मीडिया चळवळ जोमाने कामाला लागली. Instagram, YouTube आणि X (Twitter) वर मोठ्या प्रमाणावर मोहिमा सुरू झाल्या. वडिलांच्या अधिकारांबरोबरच मुलांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवणारी चर्चा वाढली. राष्ट्रीय पुरुष आयोगाची मागणी अधिक संघटित स्वरूपात मांडली जाऊ लागली आणि मुंबई पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या शहरांमध्ये विविध स्वरूपाचे पुरुष सहायता गट सक्रिय झाले. त्यामागे बरीच सामाजिक वास्तवता समोर या चळवळीने जोम धरलेला दिसतो. जसे,

“जसे महिलांवरील अन्याय, अत्याचाराच्या घटना रोज शेकडो घडतात, तसे आजच्या घडीला पुरुषांवरील अन्यायाच्या घटना पाच-पन्नास घडतात, हेही वास्तव आहे. त्यामुळे पुरुषांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात ३६ जिल्ह्यांमध्ये पुरुष हक्क संरक्षण समिती कार्यरत आहे. वर्षभरात प्रत्येक जिल्हा कार्यालयात २५०० तक्रारी दाखल होतात. रोज किमान ४०० ते ५०० जण नाव न सांगता किंवा खोटे नाव सांगून त्यांना दिल्या जाणाऱ्या त्रासाची तक्रार सांगून सल्ला विचारतात अशी माहिती अशी माहिती पुरुष हक्क संरक्षण समितीचे ॲड. बाळासाहेब पाटील, ॲड. धर्मेंद्र चव्हाण यांनी दिली. तसेच पुरुष हक्क संरक्षण समितीचे राष्ट्रीय अधिवेशन २९ डिसेंबर रोजी धुळे येथे होणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.

जगभरात १९ नोव्हेंबर रोजी जागतिक पुरुष दिन साजरा होतो. पुरुष हक्क संरक्षण समिती ०७ नोव्हेंबर १९९६ रोजी नाशिक येथे स्थापन झाली. तिच्या राज्यभरात ३६ शाखा आहेत. देशात पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्याची समितीची मागणी आहे. जुलमी आणि व्याभिचारी स्त्रीच्या अत्याचारास बळी पडलेल्या पुरुषांना मानसिक आणि कायदेशीर आधार/सल्ला देण्याचे काम ही समिती करते. शहरी भाग आणि ग्रामीण भागातील पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचे स्वरूप वेगवेगळे आहे. शहरात पुरुषांवर अन्याय होण्यासाठी विभक्त कुटुंब पध्दती आणि मोबाईलचा वापर, आर्थिक तफावत या बाबी कारणीभूत ठरतात, तर ग्रामीण भागातील पुरुषांवर अन्याय करण्यात महिलांना सहाय्य करणाऱ्या नातेवाईकांचा घरात अति वावर, पैशाचा अभाव कारण ठरते.” अशी श्वेता झगडे यांनी

वर्षभरात पुरुषांवरील छळाच्या २५०० तक्रारी, ही बातमी दिली आहे. त्यावरून त्याचा अंदाज येऊ शकतो.

परिणामी पुरुषांच्या समस्यांवर सार्वजनिक चर्चा सुरू केली, मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढवली, संयुक्त पालकत्वाचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर नेला, पुरुषांसाठी समुपदेशन आणि सहाय्य गट निर्माण केले, कौटुंबिक कायद्यांबाबत चर्चेला चालना दिली, हे सर्व महाराष्ट्रातील पुरुषहक्क चळवळीचे योगदान मानले जाते. त्याबाबत पुरुषहक्क चळवळीवर अनेकदा टीकादेखील झाली. महिलांवरील हिंसा अजूनही गंभीर सामाजिक समस्या आहे, पुरुषहक्क चळवळीतील काही दावे अधिक संशोधनाची गरज दर्शवतात व संतुलित आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन आवश्यक आहे, अशी टीका केली गेली. पुरुषांच्या समस्यांकडे दुर्लक्ष होते, पुरुषांसाठी स्वतंत्र आयोग आवश्यक आहे व मानसिक आरोग्य आणि आत्महत्या या गंभीर समस्या आहेत, असे पुरुषहक्क चळवळीच्या कार्यकर्त्यांनी समर्थन केले.

अशाप्रकारे २००० ते २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील पुरुषहक्क चळवळ ही ऑनलाइन सहाय्य गटांपासून डिजिटल, सामाजिक आणि धोरणात्मक चळवळीपर्यंत विकसित झाली. Save Indian Family नेटवर्कच्या स्थापनेपासून मानसिक आरोग्य, संयुक्त पालकत्व आणि पुरुष आयोगाच्या मागणीपर्यंत तिचा प्रवास झाला. आज ही चळवळ महाराष्ट्रातील सामाजिक चर्चेचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे. असे असले तरी राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्यासाठी देशातील सर्वच पुरुष हक्क चळवळी आग्रही आहेत.

"महिलांकडून पुरुषांवर आणि त्यांच्या कुटुंबीयांवर होणारी हिंसा ही काही नवीन गोष्ट नाही. पुरुषांवरील अत्याचारांबाबत पुरेशी आकडेवारी उपलब्ध नसली, तरी अशा घटनांमध्ये वाढ होत असल्याचे नाकारता येत नाही. गेल्या काही वर्षांपासून राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्याची मागणी सातत्याने होत आहे. दिल्ली, लखनऊ, रांची आणि जयपूर यांसारख्या अनेक शहरांतून ही मागणी पुढे येत आहे. विशेषतः पुरुषांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या संस्था किंवा महिलांकडून व त्यांच्या कुटुंबीयांकडून छळ झाल्याचा दावा करणाऱ्या व्यक्ती ही मागणी करत आहेत.

महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वातंत्र्य आणि विविध सामाजिक-आर्थिक बदलांमुळे महिलांचे घरातील आर्थिक निर्णयांवरील आणि संसाधनांवरील नियंत्रण वाढले आहे. त्याचबरोबर त्यांच्या हक्कांविषयीची जागरूकताही वाढली आहे. अशा परिस्थितीत स्त्री-पुरुषांमधील सत्तासंघर्ष आणि हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होणे अपेक्षित आहे. या संघर्षात अधिक शक्तिशाली व्यक्ती शोषक आणि कमी शक्तिशाली व्यक्ती शोषित ठरू शकते. या बदलांचा स्त्री-पुरुष संबंधांवर परिणाम झाला आहे. मात्र या मुद्द्यांच्या आधारे पुरुषांवरील अत्याचारांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. परंतु राष्ट्रीय पुरुष आयोगाची स्थापना हा या समस्येवरील एकमेव उपाय आहे, असेही म्हणता येणार नाही. तसेच राष्ट्रीय महिला आयोग आणि राष्ट्रीय पुरुष आयोग यांच्यात विविध मुद्द्यांवर संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, जे दोन्ही लिंगांच्या हितासाठी योग्य ठरणार नाही. याशिवाय हे समजून घेणे आवश्यक आहे की समाज, कुटुंब आणि पती-पत्नी यांचे संबंध परस्पर विश्वास आणि सामाजिक भांडवलावर टिकून

असतात. त्यामुळे न्यायालये, कायदे आणि आयोग यांची भूमिका महत्त्वाची असली, तरी त्यांनाही काही मर्यादा असतात.” असे अनंत कुमार, प्राध्यापक, झेवियर समाज सेवा संस्था, रांची यांनी म्हटले आहे.

डिसेंबर २०२५ मध्ये राज्यसभेत आम आदमी पक्षाचे खासदार अशोककुमार मित्तल यांनी राष्ट्रीय पुरुष आयोग विधेयक, २०२५ (National Commission for Men Bill, 2025) हे खाजगी सदस्य विधेयक (Private Member Bill) म्हणून सादर केले. या विधेयकाचा उद्देश पुरुषांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्याशी संबंधित तक्रारींचे निवारण आणि पुरुष कल्याणासाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याचा आहे. हा प्रस्तावित आयोग महिलांसाठी असलेल्या National Commission for Women (NCW) प्रमाणे पुरुषांसाठी कार्य करेल, अशी कल्पना या विधेयकामागे आहे.

पुरुषांच्या हक्कांचे संरक्षण करणे, पुरुषांशी संबंधित तक्रारी स्वीकारणे व त्यांची चौकशी करणे, पुरुषांवर परिणाम करणाऱ्या कायद्यांचा अभ्यास व पुनरावलोकन करणे, मानसिक आरोग्य, कौटुंबिक वाद, घटस्फोट, मुलांच्या ताब्याचे प्रश्न, आत्महत्या यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष देणे, केंद्र सरकारला धोरणात्मक शिफारशी देणे व पुरुषांच्या कल्याणासाठी संशोधन व जनजागृती करणे, ही प्रस्तुत आयोगाची कामे असणार आहेत. हा आयोग स्थापन करण्याची मागणी करताना विधेयकाचे समर्थक काही महत्त्वाचे मुद्दे मांडतात. ते पुढीलप्रमाणे—

१. पुरुषांच्या आत्महत्यांचे प्रमाण : राष्ट्रीय गुन्हे नोंदवही ब्युरो (NCRB) च्या आकडेवारीनुसार भारतात आत्महत्या करणाऱ्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण महिलांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे पुरुषांच्या मानसिक आरोग्यावर विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे समर्थकांचे मत आहे.

२. कौटुंबिक व वैवाहिक वाद : काही पुरुष संघटनांचे म्हणणे आहे की घटस्फोट प्रकरणे, पोटगी, मुलांचा ताबा, कौटुंबिक हिंसाचाराचे आरोप व हुंडाबळी किंवा ४९८-अ सारख्या कायद्यांचा कथित गैरवापर या बाबींमध्ये पुरुषांनाही न्याय मिळण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आवश्यक आहे.

३. पुरुषांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय संस्था नाही : महिला, बालक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक यांच्यासाठी राष्ट्रीय आयोग आहेत; परंतु पुरुषांसाठी स्वतंत्र राष्ट्रीय आयोग नाही. तो स्थापन व्हावा, यासाठी समर्थक पुरुषांच्या हिताची बाजू मांडतात.

राष्ट्रीय पुरुष आयोगाची मागणी होत असताना त्याच्या विधेयकाला विरोधही करण्यात आलेला आहे. काही महिला हक्क संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी काही आक्षेप मांडले आहेत. जसे, भारतात महिलांविरुद्ध हिंसा, भेदभाव आणि असमानता अजूनही मोठ्या प्रमाणात आहे; महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या यंत्रणांचे महत्त्व कमी होऊ नये; पुरुष आयोगामुळे विद्यमान महिला संरक्षण कायद्यांवर दबाव येऊ शकतो; तसेच काही समस्यांसाठी स्वतंत्र आयोगाऐवजी विद्यमान संस्थांना अधिक सक्षम करणे योग्य ठरेल.

भारतात राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन होण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने अद्याप अधिकृतपणे मान्यता दिलेली नाही. अशा आयोगाची घोषणा अद्याप झालेली नाही. सरकारचा पाठिंबा मिळाल्यास शक्यता वाढू शकते. मात्र Private Member Bill असल्यामुळे तो कायदा बनेल, याची हमी नाही, असे सांगितले जाते.

एकूणच राष्ट्रीय पुरुष आयोग विधेयक, २०२५ हे पुरुषांच्या हक्क, मानसिक आरोग्य, कौटुंबिक प्रश्न आणि न्यायव्यवस्थेशी संबंधित मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करणारे प्रस्तावित विधेयक आहे. समर्थकांच्या मते यामुळे पुरुषांना स्वतंत्र संस्थात्मक व्यासपीठ मिळेल; तर विरोधकांच्या मते विद्यमान सामाजिक वास्तवात महिलांच्या संरक्षणालाच अधिक प्राधान्य आवश्यक आहे. त्यामुळे हा विषय केवळ कायदेशीर नसून सामाजिक आणि राजकीय दृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात आहे.

*** *** ***

ड. पुरुषवाद : संकल्पना, स्वरूप आणि भूमिका

पुरुषवाद ही एक नवीन, वेगळीच गोष्ट वाटणे स्वाभाविक आहे; पण ती एक पुरुषकेंद्री विचारधारा मानायला हरकत नसावी. पुरुषांचे अनुभव, विचार आणि समाजातील त्यांची भूमिका पाहता, पुरुषांच्या भावना आणि त्यांच्या संघर्षांचा आत्मशोध घेणारी ही विचारधारा आहे. हा शोध स्त्रीविरोधी किंवा स्त्रीवादविरोधी नाही.

आधुनिक काळात समाजात स्त्री-पुरुष समानता रुजविली गेली. स्त्रियांच्या बाजूने अनेक कायदे झाले. त्यामुळे पुरुषाची कोंडी होऊ नये, त्याच्यावर कौटुंबिक आणि सामाजिक दबाव टाकून त्याचा मानसिक व भावनिक छळ होऊ नये, स्त्रीला सक्षम बनवून सुरक्षित ठेवताना पुरुषांवर अन्याय-अत्याचार तर होत नाहीत ना, हेही पाहिले पाहिजे. म्हणून पुरुषवादाची कल्पना या ठिकाणी मांडायची आहे.

ॲड. संजय घायाळ यांनी 'पत्नीकडून होणारा पतीचा छळ' या पुस्तकात पुरुषांवर होणाऱ्या अन्यायाची कारणे सांगितलेली आहेत. तेव्हा, "स्त्री ही पुरुषाच्या जीवनातील वास्तव नाही. ती एक भ्रम आहे. स्त्री ही पुरुषाकडे, त्याच्याशी असलेल्या नातेसंबंधाकडे तटस्थपणे आणि स्वार्थी दृष्टिकोनातून पाहते. 'आई' असलेली स्त्री त्याला अपवाद ठरते. स्त्री भावनिकदृष्ट्या स्थिर नसते. तेव्हा पुरुषाची मानसिक घुसमट होते..." म्हणून स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती चळवळी आणि स्त्रियांच्या अस्तित्वासाठी केलेले कायदे पुरुषाच्या जीवनावर उलट परिणाम करणारे तर ठरले नाहीत ना? याचा शोध घेण्याची वेळ आलेली आहे. कारण स्त्रीला स्वातंत्र्य व

पुरुषांबरोबर समान संधी मिळाली. ते मिळणे आवश्यक होते; परंतु अनेक नातेसंबंधांत त्याचे विपरीत परिणाम दिसू लागले. त्यामुळेच पुरुष हक्क संरक्षण समित्या स्थापन झाल्या आणि पुरुषवादी चळवळी जन्माला आल्या. असे का घडावे? या प्रश्नाचे उत्तर पुरुषहक्क चळवळीच्या माध्यमातून आधी मिळाले आहे. त्या पार्श्वभूमीवर पुरुषवादाची संज्ञा, संकल्पना, स्वरूप आणि भूमिका पाहायची आहे. आधीच्या विश्लेषणाशी ते सुसंगत ठेवण्याचा प्रयत्न असल्याने स्त्रीविरोधी तक्रारीचा सूर त्यात नसेल, हेही भान राखणे आवश्यक आहे.

- **पुरुषवाद : संकल्पना व स्वरूप**

पुरुष हा स्त्रीपेक्षा जैविकदृष्ट्या अधिक सक्षम व कणखर असतो. तसेच भावनिकदृष्ट्या स्थिर, न रडणारा, आक्रमक, शूर, गंभीर, बुद्धीने शहाणा, निर्णयक्षम व स्पष्ट विचारांचा असतो, अशी समाजमान्य प्रतिमा आहे. त्याला लहानपणापासूनच लिंगभावाची ओळख होत असल्यामुळे समाजाला अपेक्षित असलेल्या भूमिका तो आत्मसात करीत असतो. विशिष्ट अपेक्षा, भूमिका, वागणे, बोलणे व राहणे याबाबतची अनेक वैशिष्ट्ये तो जपत असतो. त्याच्या नैसर्गिक व सहज प्रवृत्तीच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी समाजाकडून दबावही असतो.

आधुनिक काळापासून स्त्रियांना समान संधी मिळवून देण्यासाठी आणि लिंगभेद कमी करण्यासाठी विविध प्रयत्न केले गेले. कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या. समाजात जागरूकता वाढवून महिलांना सशक्त करण्यावर भर देण्यात आला. त्यावेळी पुरुषाच्या बाजूने होणाऱ्या

नकारात्मक परिणामांकडे फारसे लक्ष दिले गेलेले दिसत नाही. स्त्रीला माणूस म्हणून समान स्थान देताना पुरुषाला स्त्रीकडून निर्माण होणाऱ्या समस्यांचाही विचार झालेला नाही. स्त्रियांना सर्व क्षेत्रांत समान संधी मिळत गेली. त्यामुळे त्यांच्या जीवनात स्वातंत्र्य आणि आत्मनिर्भरता निर्माण झाली; परंतु दुसरीकडे पुरुषांची कोंडी झाली. विशेषतः मध्यमवर्गीय पुरुषांना त्याचे परिणाम अधिक जाणवू लागलेले दिसतात. तेव्हा पुरुषाच्या सर्वांगीण सुरक्षेची हमी देणारी विचारधारा म्हणजे पुरुषवाद, अशी धारणा निर्माण व्हायला हवी.

आजपर्यंत पुरुषाला त्याच्या हक्कांसाठी चळवळीची गरज वाटली नव्हती; पण स्त्रीकडून, विशेषतः पत्नीकडून, तर कधी तिच्या माहेरच्या माणसांकडून नात्याने पती असलेल्या पुरुषावर अन्याय होतो. लोक किंवा कायदे त्याच्या बाजूपेक्षा स्त्रीकडे अधिक झुकतात. अशा वेळी पुरुषवाद हा एक विचारप्रवाह मानून कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात जैविकदृष्ट्या त्याच्या पौरुषत्वाचे सन्मानपूर्वक संरक्षण व्हायला पाहिजे. त्याच्याविषयीची पारंपरिक सामाजिक मानसिकता बदलली पाहिजे. यासाठी काही नवे विचार आणि सिद्धांत समाजमनात रुजविले जाणे गरजेचे आहे.

पुरुषाबाबत वापरल्या जाणाऱ्या Male, Masculine, Masculinity आणि Masculinism या शब्दांचे मराठी अर्थ पाहिले तर Male म्हणजे नर / पुरुष (जैविक लिंग). Masculine म्हणजे पुरुषी गुणधर्म असलेला; हे एक विशेषण आहे. Masculinity म्हणजे पुरुषत्व किंवा पुरुषी गुणधर्मांचा संच. अर्थात ही एक कल्पना किंवा गुणधर्मांचा

समूह मानला जातो. Masculinism म्हणजे पुरुषांच्या हक्कांवर किंवा हितांवर भर देणारी सामाजिक-राजकीय विचारसरणी. अर्थात ती पुरुषांच्या हितांबद्दलची विचारसरणी किंवा चळवळ आहे.

समाजामध्ये पूर्वीपासून पुरुषत्वाला, म्हणजे पुरुषी गुणधर्मांच्या समुच्चयाला, प्राधान्य देण्यात आलेले आहे. त्यात पुरुष आणि मुलांशी संबंधित गुणधर्म, वर्तन आणि भूमिकांचा एक संच समाविष्ट असतो. पुरुषत्व हे सैद्धांतिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या बांधलेले असल्याचे मानले जाते. पुरुषत्व मानले जाणारे काही वर्तन सांस्कृतिक आणि जैविक या दोन्ही घटकांनी प्रभावित असते. पुरुषत्व जैविक किंवा सामाजिकदृष्ट्या किती प्रमाणात प्रभावित आहे, हा वादाचा विषय आहे. ते जैविक पुरुष लिंगाच्या व्याख्येपेक्षा वेगळे आहे; कारण कोणतीही व्यक्ती पुरुषत्वाचे गुणधर्म प्रदर्शित करू शकते. पुरुषत्वाची मानके वेगवेगळ्या संस्कृतींमध्ये आणि ऐतिहासिक काळानुसार बदलत गेली आहेत. पाश्चात्य संस्कृतींमध्ये त्याचा अर्थ पारंपरिकपणे स्त्रीत्वाशी तुलना करून स्पष्ट केला जातो. वेब्स्टर शब्दकोशात Masculinity चा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे—

- पुरुषत्व (Masculinity) :

पुरुषत्वाचे समानार्थी शब्द

पुरुष लिंगाचा गुणधर्म किंवा स्वभाव; पुरुषी किंवा मर्दानी असण्याचा गुण, अवस्था किंवा प्रमाण.

पुरुषत्व आणि स्त्रीत्व यांबद्दलच्या पारंपरिक कल्पनांना आव्हान देणे.

"...अशी एक शैली जी परिष्कृत सुसंस्कृतता आणि स्पष्ट, ठाशीव पुरुषत्व यांमध्ये आलटून-पालटून दिसते." — स्टुअर्ट कीट

"स्वतःच्या वातावरणावर नियंत्रण ठेवणारा पुरुष ही आजच्या काळातील पुरुषत्वाची प्रचलित अमेरिकन प्रतिमा आहे." याचबरोबर असेही नमूद केले जाते की—

- पुरुषत्व = पुरुष असण्याबाबतच्या सामाजिक अपेक्षा - 'पुरुषत्व' ही संज्ञा एखाद्या समाजात मुलगे आणि पुरुष यांच्यासाठी योग्य मानल्या जाणाऱ्या भूमिका, वर्तन आणि गुणधर्म यांना संदर्भित करते.

पुरुषत्व हे केवळ जैविक घटकांमुळे ठरत नाही; उलट ते सामाजिक, ऐतिहासिक आणि राजकीय प्रक्रियांद्वारे घडवले व परिभाषित केले जाते.

पुरुषत्वाला आपण पुरुषपणाशी संबंधित सामाजिक अपेक्षा आणि प्रथा यांविषयी बोलण्यासाठी वापरला जाणारा संक्षिप्त शब्द मानू शकतो.

अशा अपेक्षा आणि प्रथा ज्यांना व्यक्ती तसेच कायदा, अर्थव्यवस्था, धर्म, शिक्षण आणि प्रसारमाध्यमे यांसारख्या संस्था दररोज बळकटी देतात.

स्त्रिया तसेच पुरुषही पुरुषत्वाविषयीच्या या सामाजिक अपेक्षांना बळकटी देण्यात सहभागी असतात. (उदा., जेव्हा एखादी आई आपल्या मुलाला "पुरुषासारखे वाग" आणि "रडू नको" असे सांगते.)

वरील विवेचनावरून असे दिसून येते की, स्त्रीवादी चळवळींनी स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि समानतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्याचबरोबर समाजातील बदलत्या कुटुंबरचना, लिंगसंबंध आणि कायदेशीर व्यवस्थेमुळे पुरुषांच्या काही विशिष्ट समस्या देखील पुढे येऊ लागल्या. या पार्श्वभूमीवर जगातील अनेक देशांत पुरुषांच्या अनुभवांचा, मानसिक आरोग्याचा, पितृत्व हक्कांचा, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचा आणि न्यायव्यवस्थेतील स्थानाचा स्वतंत्रपणे विचार करण्यास सुरुवात झाली. त्यातून पुरुषहक्क चळवळी विकसित झाल्या आणि पुरुषांच्या प्रश्नांकडे अभ्यासाच्या स्वतंत्र विषय म्हणून पाहिले जाऊ लागले. याच संदर्भात 'पुरुषत्व' (Masculinity) आणि 'पुरुषवाद' (Masculinism) या संज्ञांमधील भेद समजून घेणे आवश्यक ठरते.

'पुरुषत्व' ही संज्ञा पुरुषांशी संबंधित सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक गुणधर्मांशी निगडित आहे; तर 'पुरुषवाद' ही पुरुषांच्या अनुभव, हक्क, जबाबदाऱ्या आणि सामाजिक स्थान यांचा विचार करणारी वैचारिक संकल्पना म्हणून समोर येते. प्रस्तुत संशोधनात 'पुरुषवाद' ही संज्ञा स्त्रीवादाच्या विरोधी विचारसरणी म्हणून नव्हे, तर लिंगभाव समानतेच्या व्यापक चौकटीत पुरुषांच्या प्रश्नांचा अभ्यास करणारी विचारधारा या अर्थाने वापरण्यात आलेली आहे. एकूणच पुरुषत्व म्हणजे समाजाने पुरुषांकडून अपेक्षित केलेल्या भूमिका, वागणूक, सवयी आणि गुणधर्म. हे

केवळ जन्मतः मिळणारे जैविक वैशिष्ट्य नसून समाज, इतिहास, राजकारण, धर्म, शिक्षण आणि माध्यमे यांच्या प्रभावातून घडत जाते.

- **पुरुषवाद : संकल्पना आणि व्याख्या**

मुलगा जन्माला आला की, त्याचा 'पुरुषी' किंवा 'मर्दानी' असण्याचा गुण, स्थिती किंवा प्रमाण याला समाज प्राधान्य देतो. त्यामुळे पौरुषत्त्व हे केवळ जैविकदृष्ट्या परिभाषित केले जात नाही. पुरुषपणाबाबतच्या सामाजिक अपेक्षा आणि प्रथांबद्दल बोलण्याचा एक संक्षिप्त मार्ग म्हणून पुरुषत्वाकडे पाहिले जाते. अर्थात, 'पुरुषाच्या जैविक गुणांचे, त्याच्या मानसिक व भावनिक अवस्थेचे आणि त्याच्या पौरुषत्त्वाचे परिमाण समाजाकडून ठरवून दिलेले असतात. त्या पौरुषत्त्वाचे समंजसपणे संरक्षण व संवर्धन केले जाणे, तसेच त्याचे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य जपले जाणे म्हणजे पुरुषवाद,' असे म्हणता येईल.

मानवी समाजातील लिंगसंबंधांचा अभ्यास करताना स्त्रीवादाने महिलांच्या हक्कांसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तथापि, कालांतराने काही अभ्यासक आणि सामाजिक गटांनी पुरुषांनाही विशिष्ट सामाजिक आणि मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते, असा मुद्दा मांडला. या पार्श्वभूमीवर पुरुषवाद ही संकल्पना विकसित झाली. पुरुषवाद हा स्त्रीवादाचा विरोध नसून पुरुषांच्या समस्या आणि अधिकारांविषयी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न मानला जातो. त्यामुळे पुरुषवादाबाबत गैरसमज करून न घेता, ती पुरुषांच्या हक्कांबाबतची एक

समतोल आणि समुचित विचारधारा आहे, असे मानून चालणे आवश्यक आहे. स्त्री व पुरुष या दोघांमध्ये संघर्ष न होता समन्वय साधला जावा, अशी त्यामागील अपेक्षा आहे.

पुरुषवाद (Masculinism) ही अशी विचारधारा आहे जी पुरुषांच्या हक्कांचे, हितसंबंधांचे आणि सामाजिक स्थानाचे समर्थन करते. या दृष्टिकोनानुसार पुरुषांनाही अनेक सामाजिक अपेक्षा, मानसिक ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागतो. पुरुषवादाचा मुख्य उद्देश पुरुषांच्या समस्यांकडे समाजाचे लक्ष वेधणे आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे हा आहे. कारण लिंगसमानता ही केवळ महिलांसाठी नव्हे, तर पुरुषांसाठीही आवश्यक आहे. त्यामुळे पुरुष आणि महिला या दोघांच्याही हक्कांचा समतोल राखणे आवश्यक आहे. पुरुषांना घटस्फोट, पालकत्व हक्क, मानसिक आरोग्य, कार्यस्थळी जोखमीची कामे, वाढते आत्महत्यांचे प्रमाण आणि काही ठिकाणी कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशा वेळी त्यांच्या सदृढ अस्तित्वासाठी वैचारिकदृष्ट्या जागरूक राहणे म्हणजे पुरुषवाद होय.

स्त्रीवादी चळवळींचा विरोधक म्हणजे पुरुषवाद नाही. पुरुषांविषयी समाजाच्या पारंपरिक अपेक्षा आणि धारणांचा फेरविचार करून पुरुषाच्या भावनांचा आदर राखला जावा, पुरुषांच्या समस्यांचे अतिरंजित चित्रण केले जाते, याबाबतचे गैरसमज दूर व्हावेत आणि लिंगसमानतेच्या व्यापक उद्दिष्टांपासून लक्ष विचलित होऊ न देता किंवा कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता सिद्धांत आणि वैचारिक मांडणी यांच्या आधारे पुरुषांच्या

प्रश्नांचा अभ्यास करणे, म्हणजे पुरुषवाद होय. तसेच "पुरुषाच्या जैविक गुणांचे, त्याच्या मानसिक व भावनिक अवस्थेचे आणि त्याच्या पौरुषत्त्वाचे समंजसपणे संरक्षण व संवर्धन केले जाणे, तसेच त्याचे सामाजिक, राजकीय, मानसिक आणि भावनिक स्वास्थ्य जपले जाणे म्हणजे पुरुषवाद."

पुरुषवाद ही आधुनिक समाजातील एक महत्त्वपूर्ण सामाजिक आणि वैचारिक संकल्पना आहे. पुरुषांच्या समस्या, अधिकार आणि मानसिक आरोग्य यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करून तो लिंगसमानतेच्या चर्चेला नवीन दिशा देतो. पुरुषवाद हा स्त्रीवादाला परस्परविरोधी न मानता परस्परपूरक दृष्टिकोन म्हणून पाहतो आणि समाजातील सर्व लिंगांच्या समान सन्मान, न्याय आणि विकासासाठी संतुलित दृष्टिकोन स्वीकारतो.

- **पुरुषवादाचे स्वरूप**

आधुनिक समाजात स्त्रीवाद, मानवाधिकार आणि लिंगसमानता या संकल्पनांबरोबरच पुरुषवाद (Masculinism/Men's Rights Perspective) ही संकल्पनाही चर्चेत आली आहे. पुरुषवाद हा पुरुषांच्या सामाजिक, मानसिक, आर्थिक आणि कायदेशीर समस्यांवर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन मानला जातो. समाजातील पुरुषांच्या अधिकारांचे संरक्षण, त्यांच्यावर होणारा भेदभाव, मानसिक आरोग्याच्या समस्या आणि कौटुंबिक कायद्यांतील असमतोल यांसारख्या मुद्द्यांवर पुरुषवादी विचारसरणी भर देते.

समाजाने पुरुषत्वाची संकल्पना ठरवून पारंपरिकपणे पुरुष आणि मुलांशी संबंधित कणखरपणा, शक्ती, नियंत्रण, आक्रमकता, स्पर्धा, भावना दाबून ठेवणे, निष्ठा आणि नेतृत्व यांसारखे गुण, वर्तन आणि भूमिका स्पष्ट केलेल्या आहेत. ज्याच्याकडे हे गुण असतील त्यालाच सामर्थ्यवान पुरुष मानले गेले आहे. सामाजिक संवाद, कुटूंब, माध्यमे, कामाची ठिकाणे यांसारख्या संस्थांद्वारे त्याला तसे शिकविले जाऊन ते बळकट केले जाते. सहनशक्ती, संरक्षण, स्वावलंबन, कमी भावनिक अभिव्यक्ती, स्पर्धात्मकता, निर्णय घेण्याची क्षमता आणि कुटुंबाची तरतूद करण्याची जबाबदारी, अशी त्याच्याकडून अपेक्षा केली जाते. तो अधिक प्रामाणिक आणि कमी हानिकारक असावा, अशी समाजाची धारणा असते. त्याच्याकडे नेतृत्व आणि अधिकार असावेत, अशी अपेक्षा केली जाते; काही सामाजिक संकल्पनांमध्ये नियंत्रण राखण्यासाठी कठोरतेचा किंवा हिंसेचाही पुरस्कार केला जातो. शाळा आणि इतर शैक्षणिक संस्था कधीकधी हेतुपुरस्सर, तर कधीकधी नकळतपणे अशा पुरुषत्वाला प्रोत्साहन देतात. त्यातून तयार झालेले त्याचे व्यक्तिमत्त्व अबाधित राहावे, त्याचा स्वाभिमान, अस्मिता आणि आत्मसन्मान जपला जावा, समाजाकडून त्याच्या पुरुषत्वाची अवहेलना होऊ नये, त्याच्याकडून अवास्तव अपेक्षा करून त्याच्या सहनशक्तीला सतत आव्हान दिले जाऊ नये आणि त्याचे अस्तित्व सन्मानाने टिकून राहावे, असे पुरुषवादाचे स्वरूप आहे.

१. पुरुषांच्या अधिकारांवर भर : पुरुषांनाही काही क्षेत्रांमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो, असे पुरुषवादाचे मत आहे. घटस्फोट, मुलांच्या

पालकत्वाचे हक्क, कौटुंबिक हिंसाचाराच्या आरोपांशी संबंधित प्रश्न यांवर विशेष लक्ष दिले जाते.

२. लिंगसमतेची मागणी : पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही समान संधी आणि न्याय मिळावा, अशी भूमिका घेतली जाते. लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध केला जातो. अशा वेळी स्त्रीच्या बाजूने अधिक सकारात्मक दृष्टीने पाहिले जाते, त्या वेळी पुरुषांकडे कळत- न कळत दुर्लक्ष होते. कधी-कधी पूर्वग्रह दुषितपणाने पुरुष अकारण त्या विरोधास बळी पडतात. त्यामुळे त्यांच्याबाबतीतही समानता राखली जावी.

३. पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा विचार : पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा विषय आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. समाजात पुरुषांनी नेहमी खंबीर, धाडसी आणि भावनांवर नियंत्रण ठेवणारे असावे, अशी अपेक्षा केली जाते. त्यामुळे अनेक पुरुष तणाव, नैराश्य, चिंता, भावनिक वेदना किंवा मानसिक अडचणी असूनही त्या व्यक्त करण्यास कचरतात. यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

४. परंपरागत पुरुष भूमिकांचे पुनर्मूल्यांकन

पुरुष हा कुटुंबाचा प्रमुख कमावता असला पाहिजे, अशा सामाजिक अपेक्षांवर प्रश्न उपस्थित केले जातात. बदलत्या सामाजिक परिस्थितीत पुरुषांच्या भूमिकांचा नव्याने विचार केला जातो.

५. सामाजिक आणि कायदेशीर सुधारणांचा आग्रह

समकालीन पुरुषवादी विचारांमध्ये पुरुषांशी संबंधित कायदे आणि सार्वजनिक धोरणांमध्ये संतुलन व न्याय असावा, अशी मागणी व्यक्त केली जाते. या भूमिकेनुसार कायदे हे कोणत्याही एका लिंगाच्या बाजूने झुकणारे नसून संविधानातील समानता, नैसर्गिक न्याय आणि मानवी अधिकारांच्या तत्त्वांवर आधारित असावेत. कौटुंबिक वाद, पालकत्व, मानसिक आरोग्य, कौटुंबिक हिंसा किंवा लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये प्रत्येक व्यक्तीला समान न्यायप्रक्रिया आणि निष्पक्ष सुनावणी मिळणे आवश्यक आहे. पुरुषवादाचा हा दृष्टिकोन स्त्रियांच्या हक्कांना विरोध करणारा नसून, न्यायव्यवस्था अधिक संतुलित, पुरावानिष्ठ आणि सर्वसमावेशक असावी, असा आग्रह धरणारा आहे.

अशाप्रकारे पुरुषवाद ही विचारसरणी पुरुषांच्या समस्या आणि अधिकारांवर लक्ष केंद्रित करते. त्यासाठी त्याचे विविध प्रवाह निर्माण झालेले आहेत. काही प्रवाह लिंगसमतेचा पुरस्कार करतात, तर काही प्रवाह स्त्रीवादाच्या विशिष्ट भूमिकांवर टीका करतात. त्यामुळे पुरुषवादाचा अभ्यास करताना त्याचे विविध पैलू समजून घेणे आवश्यक आहे. कारण पुरुषवाद (Masculinism) अभ्यासताना तो केवळ ‘पुरुषांचे हक्क’ किंवा ‘स्त्रीवादाला प्रतिसाद’ म्हणून न पाहता, एक सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय आणि राजकीय विचारप्रवाह म्हणून समजून घेणे महत्त्वाचे आहे.

- **पुरुषवाद : विविध पैलू**

१. ऐतिहासिक पार्श्वभूमी : पुरुषवादाची उत्पत्ती कशी झाली? विविध देशांमध्ये पुरुषवादी चळवळींचा विकास कसा झाला? स्त्रीवादी चळवळींशी त्याचे नाते आणि परस्पर प्रभाव काय आहेत? याची उत्तरे तपासून पाहणे आवश्यक आहे.

२. पुरुषत्व (Masculinity) संकल्पना : समाज "खरा पुरुष" कसा असावा, याबद्दल कोणत्या अपेक्षा ठेवतो? पारंपरिक आणि आधुनिक पुरुषत्वातील फरक कोणते आहेत? "विषारी पुरुषत्व" (Toxic Masculinity) आणि त्यावरील चर्चेचाही विचार करणे आवश्यक आहे.

३. पुरुषांचे सामाजिक प्रश्न : आत्महत्या, मानसिक आरोग्य, एकाकीपणा, कामाच्या ठिकाणी असलेले धोके, बेघरपणा, व्यसनाधीनता, पुरुषांवरील हिंसा आणि तिची नोंद, तसेच त्याच्या सामाजिक अस्तित्वाशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

४. कुटुंब आणि कायदे : घटस्फोट, मुलांचा ताबा, पोटगी, कौटुंबिक हिंसा प्रकरणांतील पुरुषांचे अनुभव तसेच पितृत्वाचे हक्क आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करणे आवश्यक आहे.

५. शिक्षण आणि रोजगार : मुलांच्या शैक्षणिक कामगिरीतील प्रवाह, रोजगारातील बदल आणि त्यांचा पुरुषांवर होणारा परिणाम तसेच आर्थिक जबाबदाऱ्यांबाबतच्या सामाजिक अपेक्षा यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

६. मानसशास्त्रीय पैलू : पुरुषांच्या भावनिक अभिव्यक्तीवर असलेली सामाजिक बंधने, मानसिक आरोग्य सेवा घेण्याबाबतची अनिच्छा, आत्मसन्मान, ओळख (Identity) आणि सामाजिक दबाव यांचा विचार केला जातो.

७. माध्यमे आणि सांस्कृतिक प्रतिनिधित्व : चित्रपट, मालिका, जाहिराती यांमधील पुरुषांचे चित्रण, पुरुषांविषयीचे रूढ समज आणि लोकप्रिय संस्कृतीचा पुरुषत्वावर होणारा प्रभाव यांचा अभ्यास केला जातो.

८. पुरुषवाद आणि स्त्रीवाद यांचे संबंध : सहमतीचे मुद्दे आणि मतभेद, लिंगसमानतेबाबत दोन्ही प्रवाहांचे दृष्टिकोन तसेच पुरुषवादी विचारसरणीतील विविध प्रवाह (उदारमतवादी, पुराणमतवादी, हक्ककेंद्रित इ.) यांचा विचार केला जातो.

९. आंतरविभागीयता (Intersectionality) : जात, वर्ग, धर्म, वंश आणि लैंगिकता यांचा पुरुषांच्या अनुभवांवर होणारा परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. सर्व पुरुषांचे अनुभव सारखे नसतात, ही बाबही लक्षात घेतली पाहिजे.

१०. समकालीन वादविवाद : पुरुष हक्क चळवळी, सकारात्मक पुरुषत्व (Positive Masculinity), लिंगसमानता आणि पुरुषांची भूमिका तसेच डिजिटल माध्यमे व ऑनलाइन पुरुषवादी समुदायांचा प्रभाव यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे पुरुषवादाचा अभ्यास करताना समर्थक आणि टीकात्मक दोन्ही दृष्टिकोनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे विषयाचा संतुलित आणि वस्तुनिष्ठ अभ्यास करता येतो. पुरुषांच्या समस्या, सामाजिक विशेषाधिकार, लिंगसंबंध आणि समानता यांचा परस्परसंबंध समजून घेतल्यास पुरुषवादाचे स्वरूप अधिक स्पष्टपणे लक्षात येते.

- **पुरुषवादाची भूमिका**

पुरुषांच्या समस्या मांडताना महिलांच्या समस्या कमी लेखणे योग्य नाही. त्याचप्रमाणे महिलांवरील अत्याचाराची गंभीरता मान्य करताना पुरुषांवरील मानसिक, भावनिक किंवा आर्थिक छळ दुर्लक्षित करणेही योग्य नाही. समाजाने हिंसाचार आणि मानसिक आरोग्य या विषयांकडे लिंगनिरपेक्ष दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. कोणतीही व्यक्ती स्त्री किंवा पुरुष, जर अत्याचार, मानसिक तणाव किंवा सामाजिक दडपणाचा बळी ठरत असेल, तर तिला मदत आणि न्याय मिळणे हेच लोकशाही समाजाचे लक्षण आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी असलेले कायदे आणि संरक्षण व्यवस्था कायम ठेवत सर्व पीडितांसाठी अधिक संवेदनशील, न्याय्य आणि संतुलित सहाय्यव्यवस्था उभारणे ही काळाची गरज आहे.

१. घरगुती हिंसाचाराने पीडित पुरुषांना संरक्षण देणे.

२. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाच्या खोट्या तक्रारींपासून पुरुषांचा बचाव करणे.

३. बलात्काराचे खोटे आरोप झाल्यास पुरुषाला कायद्याचे पाठबळ मिळणे.

४. पुरुषांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढू नये, याकडे लक्ष देणे.

५. उलट खटल्यांच्या (Counter Case) धमकीचा धोका टाळणे.

६. कलम ४९८अ या अजामीनपात्र कायद्यात आवश्यक सुधारणा करणे.

७. पुरुषांच्या मानसिक आरोग्य आणि आत्महत्येच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देणे.

८. पुरुषवाद महिलांविरोधी नसून, कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात आहे.

९. सर्व पुरुष लाभार्थी नसतात आणि पुरुषांनाही विशिष्ट प्रकारचे सामाजिक तोटे व बंधने भोगावी लागतात, या भूमिकेभोवती पुरुषवाद केंद्रित आहे.

१०. पुरुषांना समान न्याय, समान संधी आणि सामाजिक सन्मान मिळावा, यासाठी प्रयत्न करणे.

११. समाज पुरुषांकडून भावनिकदृष्ट्या खंबीर राहण्याची अपेक्षा करतो. त्यामुळे नैराश्य, चिंता आणि तणाव यांसारख्या समस्यांकडे दुर्लक्ष होते. अशा परिस्थितीत पुरुषवाद पुरुषांच्या मानसिक आरोग्यावर भर देतो.

१२. घटस्फोट, मुलांच्या पालकत्वाचे हक्क आणि कौटुंबिक न्यायव्यवस्थेत पुरुषांना समान वागणूक मिळावी, अशी पुरुषवादाची मागणी असते.

१३. पुरुषांवर होणाऱ्या सामाजिक पूर्वग्रहांनाही लिंगभेदाचाच एक भाग मानले जाते.

१४. पुरुषवाद लिंगसमानतेची व्याप्ती अधिक व्यापक बनवतो. समानतेचा अर्थ केवळ महिलांच्या प्रगतीपुरता मर्यादित नसून सर्व लिंगांच्या कल्याणाशी संबंधित आहे, ही जाणीव तो निर्माण करतो.

१५. कायदा, शिक्षण, रोजगार आणि कौटुंबिक बाबींमध्ये पुरुषांनाही समान न्याय मिळावा, यासाठी प्रयत्न करून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे.

१६. मानसिक आरोग्य, आत्महत्या, कामाच्या ठिकाणी होणारे धोके, कौटुंबिक तणाव इत्यादी प्रश्नांवर चर्चा करून पुरुषांच्या समस्यांकडे समाजाचे लक्ष वेधणे.

१७. स्त्री-पुरुष दोघांनाही समान संधी आणि समान वागणूक मिळावी, यासाठी भूमिका मांडणे आणि लिंगसमानतेचा आग्रह धरणे.

१८. "पुरुष नेहमीच मजबूत असावा", "भावना व्यक्त करू नयेत" अशा पारंपरिक अपेक्षांवर प्रश्न उपस्थित करून सामाजिक रूढींना आव्हान देणे.

१९. घटस्फोट, मुलांच्या संगोपनाचा हक्क, पितृत्व हक्क यांसारख्या विषयांवर पुरुषांची बाजू मांडून कौटुंबिक हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणे.

एकूणच पुरुषवादाची भूमिका म्हणजे पुरुषांच्या हक्क, समस्या आणि सामाजिक स्थान यांबाबत जागरूकता निर्माण करून त्यांना न्याय, समानता आणि आवश्यक संरक्षण मिळवून देण्याचा प्रयत्न करणे. पुरुषांनाही मानसिक आरोग्य, कौटुंबिक हिंसा, पालकत्वाचे हक्क, घटस्फोटानंतर मुलांशी संपर्क, कार्यस्थळावरील ताण, आत्महत्या आणि सामाजिक अपेक्षांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना सामोरे जावे लागते, याकडे समाजाचे लक्ष वेधणे हा या विचाराचा उद्देश आहे. तसेच पुरुष आणि स्त्रिया या दोघांनाही समान संधी, समान कायदेशीर संरक्षण, परस्पर आदर आणि न्याय मिळावा, अशी भूमिका पुरुषवाद मांडतो. त्यामुळे पुरुषवादाचा उद्देश कोणत्याही लिंगाचे वर्चस्व प्रस्थापित करणे नसून, पुरुषांच्या समस्यांकडेही संवेदनशीलतेने पाहून सर्वांसाठी अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि संतुलित समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे हा आहे. त्यामुळे त्याविषयी गैरसमज होण्याला काही कारण नाही.

*** *** ***

इ. पाश्च्यात्य आणि भारतीय साहित्यातील पुरुषप्रतिमा

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब मानले जाते. समाजातील मूल्यव्यवस्था, सांस्कृतिक संकेत, सत्तासंबंध आणि मानवी भावविश्व यांचे दर्शन साहित्यातून घडत असते. स्त्री आणि पुरुष या प्रतिमा जैविक आणि सामाजिक लिंगभावाच्या अनुषंगाने त्यातून साकारलेल्या असतात. पुरुषप्रतिमांच्या बाबतीत सांगायचे तर विविध कालखंडांतील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदलांनुसार पुरुषाची भूमिका, त्याच्या अपेक्षा आणि त्याची मानसिकता यांमध्ये सातत्याने परिवर्तन होत आले आहे. त्यामुळे साहित्यातील पुरुषप्रतिमा ही एकसाची नसून बहुआयामी आणि परिवर्तनशील मानली जाते.

पारंपरिक साहित्यामध्ये पुरुषाला कर्ता, कुटुंबप्रमुख, शूर योद्धा, निर्णयक्षम नेता आणि समाजव्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणून चित्रित केले गेले; परंतु बदलत्या सामाजिक वास्तवामुळे पुरुषत्वाच्या संकल्पना नव्याने मांडल्या जात असून त्याचा प्रभाव साहित्यनिर्मितीवर स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे आधुनिक आणि उत्तरआधुनिक साहित्याने या रूढ प्रतिमांना प्रश्न विचारत पुरुषाच्या भावनिक, संवेदनशील, संघर्षशील आणि असुरक्षित पैलूंनाही अभिव्यक्त केले आहे. साहित्यातील पुरुषप्रतिमा या केवळ पुरुष पात्रांच्या वर्णनापुरत्या मर्यादित नसून, समाजातील लिंगभान, सत्ताकेंद्रे, नातेसंबंध आणि सांस्कृतिक अपेक्षा यांचे विश्लेषण त्या निमित्ताने केलेले असते.

- **पाश्चात्त्य लेखकांच्या साहित्यातील पुरुषप्रतिमा**

पाश्चात्त्य साहित्य हे जगातील सर्वाधिक समृद्ध, प्रभावशाली आणि व्यापक साहित्यपरंपरांपैकी एक मानले जाते. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया, इटली, स्पेन, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया या देशांतील साहित्याने जागतिक साहित्याला नवे विचार, नवे साहित्यप्रकार आणि मानवी जीवनाचे व्यापक आकलन दिले आहे. कथा, कादंबरी आणि नाटक या साहित्यप्रकारांमधून या देशांतील साहित्यिकांनी समाजजीवन, संस्कृती, राजकारण, नैतिक मूल्ये, व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी मनोविश्व यांचे सखोल चित्रण केले आहे.

साहित्यातील पात्रे ही लेखकाच्या जीवनदृष्टीची आणि समाजाच्या वास्तवाची प्रतिनिधी असतात. त्यामध्ये पुरुष पात्रांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले दिसते. पाश्चात्त्य साहित्यामधील पुरुषप्रतिमा या केवळ कुटुंबप्रमुख, योद्धा, राजा किंवा शासक म्हणून मर्यादित नसून त्या प्रेमी, मित्र, विचारवंत, क्रांतिकारक, संघर्षशील व्यक्ती, नैतिक मूल्यांचे पुरस्कर्ते तसेच मानवी दुर्बलतांनी ग्रस्त अशा विविध रूपांत आढळतात. या पुरुषप्रतिमांमधून तत्कालीन समाजव्यवस्था, सत्तासंबंध, वर्गभेद, सांस्कृतिक मूल्ये आणि मानवी मानसिकतेचे दर्शन घडते.

चार्ल्स डिकन्स, थॉमस हार्डी, लिओ टॉलस्टॉय, फ्योदोर दोस्तोयेव्ह्स्की, व्हिक्टर ह्यूगो, ऑनरे द बाल्झाक, विल्यम शेक्सपिअर, हेन्रिक इब्सेन, अर्नेस्ट हेमिंग्वे आणि इतर अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतींमध्ये पुरुष पात्रांचे विविधांगी चित्रण केले आहे. त्यांच्या

साहित्यामधील पुरुष कधी आदर्शवादी व कर्तव्यनिष्ठ दिसतो, तर कधी महत्त्वाकांक्षी, विद्रोही, भावनाशील, शोकात्म किंवा अस्तित्ववादी संघर्ष करणारा मनुष्य म्हणून समोर येतो.

विल्यम शेक्सपिअर यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा या पाश्चात्त्य साहित्यातील सर्वात प्रभावी आणि बहुआयामी मानल्या जातात. शेक्सपिअर यांनी आपल्या नाटकांमधून पुरुषांचे विविध स्वभाव, मानसिकता, गुण-दोष, महत्त्वाकांक्षा, प्रेम, सत्ता, नैतिक संघर्ष आणि शोकांतिका यांचे वास्तववादी चित्रण केले आहे.

ऑथेल्लो व मॅकबेथ यांसारखी पात्रे शूर, पराक्रमी आणि नेतृत्वगुणांनी संपन्न आहेत. ते समाजात प्रतिष्ठित स्थान मिळवतात; परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील दोष त्यांना पतनाकडे नेतात. मॅकबेथ हा शेक्सपिअरच्या पुरुषप्रतिमेचा महत्त्वाचा नमुना आहे. सत्तेची आणि कीर्तीची अतिरेकी महत्त्वाकांक्षा माणसाला कशा प्रकारे नैतिक अधःपतनाकडे नेते, हे या पात्रातून दिसते. हॅम्लेट हा बुद्धिमान, संवेदनशील आणि चिंतनशील युवक आहे. जीवन, मृत्यू, न्याय आणि कर्तव्य यांसंबंधीच्या प्रश्नांमुळे तो सतत मानसिक संघर्षात अडकलेला दिसतो. रोमिओ हा प्रेमळ आणि निष्ठावान पुरुष असून तो प्रेमासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या तरुणाचे प्रतीक आहे. प्रेम, निष्ठा, समर्पण आणि त्याग या गुणांचे दर्शन त्याच्या व्यक्तिमत्त्वातून घडते.

शेक्सपिअरच्या काही पुरुष पात्रांमध्ये सत्ता, लोभ आणि स्वार्थ यांचे दर्शन घडते. अशा पात्रांमुळे मानवी स्वभावातील नकारात्मक बाजू

उलगडून दाखवली जाते. त्यांच्या साहित्यातील पुरुष पात्रे पूर्णतः आदर्श किंवा पूर्णतः दुष्ट नसतात, तर गुण-दोषांनी युक्त वास्तववादी पुरुष असतात. त्या पुरुष पात्रांमध्ये धैर्य, प्रेम, करुणा, मत्सर, अहंकार, लोभ आणि असुरक्षितता यांचे मिश्रण आढळते. त्यामुळे ती पात्रे वास्तववादी आणि मानवी वाटतात. एकूणच शेक्सपिअर यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा या केवळ नायकांच्या प्रतिमा नसून मानवी स्वभावाचे व्यापक प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिमा आहेत. हॅम्लेटमधील विचारशील पुरुष, मॅकबेथमधील महत्त्वाकांक्षी पुरुष, ऑथेल्लोमधील भावनाप्रधान पुरुष आणि रोमिओमधील प्रेमळ पुरुष या सर्व प्रतिमांमधून शेक्सपिअर यांनी पुरुषमनाचे विविध पैलू प्रभावीपणे उभे केले आहेत. त्यामुळे त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा आजही मानसशास्त्रीय, सामाजिक आणि साहित्यिक अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

चार्ल्स डिकन्स यांनी आपल्या साहित्यामधून व्हिक्टोरियन इंग्लंडमधील सामाजिक विषमता, गरिबी, बालशोषण आणि मानवी मूल्यांचे वास्तववादी चित्रण केले आहे. त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये संघर्ष, नैतिकता, मानवतावाद आणि सामाजिक जाणीव यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या साहित्यामधील पुरुष अनेकदा प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगणारे आहेत. गरिबी, अनाथपण, सामाजिक अन्याय आणि आर्थिक विषमता यांचा सामना करत असतानाही ते हार मानत नाहीत. जसे, ऑलिव्हर ट्विस्ट हा अनाथ मुलगा अत्यंत कठीण परिस्थितीत वाढतो. त्याच्यावर अन्याय होतो; परंतु तो गुन्हेगारी मार्ग स्वीकारत नाही. त्याच्या संघर्षातून डिकन्स यांनी गरीब वर्गाच्या जीवनाचे वास्तव दाखवले आहे.

डिकन्स यांच्या पुरुष पात्रांची सर्वात महत्त्वाची बाजू म्हणजे त्यांची नैतिकता. समाजातील भ्रष्टाचार, लोभ आणि अन्याय यांच्या वातावरणातही ही पात्रे सत्य, प्रामाणिकपणा आणि सदाचार टिकवून ठेवतात. डेव्हिड कॉपरफिल्ड हे पात्र याचे उत्तम उदाहरण आहे. जीवनातील अनेक अडचणींना तोंड देऊनही तो नैतिक मूल्यांचा त्याग करत नाही. त्यामुळे तो आदर्श पुरुषप्रतिमेचे प्रतिनिधित्व करतो. विशेषतः डिकन्स यांचा मानवतावाद त्यांच्या पुरुष पात्रांमधून प्रकर्षाने दिसून येतो. त्यांच्या पात्रांमध्ये सहानुभूती, करुणा आणि इतरांच्या दुःखाविषयी संवेदनशीलता आढळते. ऑलिव्हर ट्विस्ट आणि डेव्हिड कॉपरफिल्ड ही पात्रे स्वतः दुःख भोगूनही इतरांविषयी द्वेष बाळगत नाहीत. यामुळे डिकन्स यांची पुरुषप्रतिमा केवळ संघर्ष करणारी नसून मानवतेची मूल्ये जपणारी ठरते.

डिकन्स यांच्या पुरुष पात्रांद्वारे समाजातील दोषांवर टीका केली जाते. त्यांच्या नायकांमधून बालमजुरी, गरिबी, वर्गभेद आणि अन्यायकारक सामाजिक व्यवस्था यांविरुद्ध आवाज उठविला जातो. त्यातून सामाजिक अन्यायाविरुद्ध उभा राहणारा पुरुष साकार होतो. ऑलिव्हर ट्विस्टचे जीवन हे त्या काळातील अनाथ मुलांच्या दुःखाचे प्रतीक आहे. त्यामुळे तो केवळ एक व्यक्ती नसून समाजातील शोषित वर्गाचा प्रतिनिधी ठरतो. कारण डिकन्स यांची पुरुषप्रतिमा पूर्णपणे काल्पनिक आदर्शवादी नाही. ती वास्तव जीवनातील संघर्षातून घडलेली आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात वास्तववाद आणि आदर्शवाद यांचा सुंदर मिलाफ आढळतो.

थॉमस हार्डी हे इंग्लंडच्या ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण करणारे महत्त्वाचे साहित्यिक आहेत. त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा या आदर्शवादी नसून जीवनातील संघर्ष, नियतीचे बंधन, प्रेमातील अपयश आणि सामाजिक रूढी यांच्याशी झगडणाऱ्या वास्तववादी व्यक्ती आहेत. हार्डी यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची पार्श्वभूमी ग्रामीण इंग्लंडमधील 'वेसेक्स' प्रदेश आहे. त्यामुळे त्यांच्या पुरुष पात्रांचे जीवन निसर्ग, शेती, परंपरा आणि ग्रामीण संस्कृतीशी जोडलेले आहे. उदाहरणार्थ, फार फ्रॉम द मॅडिंग क्राऊडमधील गॅब्रिएल ओक हा कष्टाळू, प्रामाणिक आणि जमिनीशी नाते असलेला शेतकरी आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून ग्रामीण जीवनातील साधेपणा आणि कर्तव्यनिष्ठा दिसून येते.

हार्डी यांच्या साहित्यातील पुरुष पात्रांना अनेकदा परिस्थिती आणि नशिबाच्या कठोर खेळाला सामोरे जावे लागते. म्हणजे नियतीपुढे हतबल होणाऱ्या पुरुषप्रतिमा दिसतात. द मेयर ऑफ कॅस्टरब्रिजमधील मायकेल हेन्चर्ड हे पात्र याचे उत्तम उदाहरण आहे. त्याच्या चुकीच्या निर्णयांमुळे आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याचे जीवन शोकांतिकेकडे झुकते. प्रयत्न करूनही तो नियतीपासून सुटू शकत नाही. तसेच त्यांच्या पुरुष पात्रांना प्रेम आणि सामाजिक कर्तव्य यांच्यामध्ये संघर्ष करावा लागतो. समाजातील रूढी, वर्गभेद आणि नैतिक मूल्ये यांमुळे पुरुषांचे वैयक्तिक जीवन गुंतागुंतीचे बनते. जूड द ऑब्स्क्युअरमधील ज्यूड फॉले हा शिक्षण, प्रेम आणि सामाजिक प्रतिष्ठा यांची स्वप्ने पाहणारा युवक आहे; परंतु सामाजिक बंधने आणि परंपरा त्याच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. परिणामी त्याचे जीवन शोकांत ठरते.

हार्डी यांच्या पुरुष पात्रांमध्ये केवळ चांगले गुणच नसतात; त्यांच्यात कमतरताही असतात. ते कधी चुकीचे निर्णय घेतात, भावनांच्या आहारी जातात किंवा परिस्थितीसमोर कमकुवत पडतात. मायकेल हेन्चर्ड, ज्यूड फॉले आणि इतर पात्रांमध्ये अहंकार, असुरक्षितता, प्रेम, निष्ठा, मत्सर आणि पश्चात्ताप यांचे मिश्रण दिसते. यांशिवाय हार्डी यांच्या साहित्यामधील पुरुष अनेकदा शोकांतिकेचे बळी ठरतात. त्यांच्या आकांक्षा, स्वप्ने आणि प्रयत्न यांना समाज किंवा नियतीकडून पूर्णत्व मिळत नाही. त्यामुळे त्यांच्या जीवनात दुःख, निराशा आणि अपयश यांचे वर्चस्व दिसते.

लिओ टॉलस्टॉय हे रशियन साहित्यातील महान कादंबरीकार मानले जातात. त्यांच्या साहित्यामध्ये पुरुषप्रतिमा केवळ सामाजिक किंवा कौटुंबिक भूमिकांपुरत्या मर्यादित नसून त्या नैतिक, आध्यात्मिक आणि तात्त्विक शोध घेणाऱ्या व्यक्तिमत्त्वांच्या रूपात साकारलेल्या आहेत. टॉलस्टॉय यांच्या पुरुष पात्रांमध्ये आत्मपरीक्षण, जीवनाचा अर्थ शोधण्याची धडपड आणि समाजाशी असलेला संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. त्यांच्या साहित्यामधील पुरुष सतत योग्य-अयोग्य, सत्य-असत्य आणि नैतिक-अनैतिक यांचा विचार करतात. ते केवळ भौतिक यशाला महत्त्व देत नाहीत, तर जीवनातील उच्च मूल्यांचा शोध घेतात.

'वॉर अँड पीस'मधील पुरुष पात्रे युद्ध, सत्ता आणि सामाजिक प्रतिष्ठा यांच्या अनुभवातून नैतिकतेचे महत्त्व ओळखतात. त्यांचा प्रवास हा आत्मविकास आणि नैतिक जाणीवेचा प्रवास ठरतो. ही पात्रे सतत स्वतःच्या जीवनाचे, कृतींचे आणि विचारांचे परीक्षण करतात. यातील पियेर बेझुखोव हे पात्र जीवनाचा खरा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करते. संपत्ती,

समाजातील स्थान आणि वैयक्तिक सुख यापलीकडे जाऊन तो आध्यात्मिक समाधानाचा शोध घेतो. त्यामुळे टॉलस्टॉय यांची पुरुषप्रतिमा ही आत्मशोध घेणाऱ्या व्यक्तीची प्रतिमा बनते.

व्यक्ती आणि समाज यांच्यातील संघर्ष रेखाटताना त्यांच्या पुरुष पात्रांना समाजाच्या अपेक्षा, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक इच्छांमध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न करावा लागतो. आंद्रेई बोल्कोन्स्की हे पात्र कर्तव्य, राष्ट्रप्रेम आणि वैयक्तिक आनंद यांच्यामधील संघर्ष अनुभवते. याशिवाय टॉलस्टॉय यांच्या पुरुष पात्रांमध्ये गुण आणि दोष यांचे संतुलित चित्रण आढळते. ते पूर्णतः आदर्शवादी किंवा पूर्णतः दोषपूर्ण नसतात. त्यांच्यात प्रेम, अहंकार, करुणा, असुरक्षितता, धैर्य आणि पश्चात्ताप यांसारख्या मानवी भावना दिसून येतात. युद्ध, हिंसा आणि सत्तासंघर्ष यांच्या पार्श्वभूमीवरही प्रेम, करुणा आणि मानवता अशा भावना व आस्था पुरुष पात्रांमध्ये आढळतात. पुरुष पात्रे ही आध्यात्मिक जाणीव असलेली आणि समाज, कुटुंब व व्यक्ती यांच्या संघर्षातून घडलेली आहेत.

फ्योदोर दोस्तोव्ह्स्की हे जागतिक साहित्यातील महान मानसशास्त्रीय कादंबरीकार मानले जातात. त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा मानवी मनाच्या गूढ, गुंतागुंतीच्या आणि संघर्षमय स्वरूपाचे दर्शन घडवतात. त्यांच्या पात्रांमध्ये बाह्य संघर्षापेक्षा अंतर्गत मानसिक संघर्ष अधिक महत्त्वाचा असतो. अपराध, पाप, प्रायश्चित्त, श्रद्धा, नैतिकता आणि मोक्ष यांसारख्या विषयांभोवती त्यांच्या पुरुष पात्रांचे जीवन फिरताना दिसते. त्यामुळे त्यांच्यामध्ये तीव्र मानसिक संघर्ष चालू असतो. ही पात्रे सतत स्वतःच्या विचारांशी, भावनांशी आणि नैतिक प्रश्नांशी झगडत

असतात. त्यामुळे हे त्यांच्या पुरुष पात्रांचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरते. 'क्राइम अँड पनिशमेंट'मधील रोदिओन रास्कोलनिकोव्ह हा युवक स्वतःच्या बुद्धिवादी तत्त्वज्ञानामुळे खून करतो; परंतु त्यानंतर अपराधगंड, भीती आणि मानसिक अस्थिरतेमुळे सतत त्रस्त राहतो. त्याच्या मनातील हा संघर्ष संपूर्ण कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. दोस्तोव्ह्स्की यांच्या पुरुषप्रतिमा अनेकदा पाप आणि नैतिकतेच्या सीमारेषेवर उभ्या असतात. त्यांच्या पात्रांकडून चुका घडतात; परंतु त्या चुकांनंतर निर्माण होणारा आत्मसंघर्ष आणि प्रायश्चित्ताची प्रक्रिया अधिक महत्त्वाची ठरते. रास्कोलनिकोव्हला वाटते की काही "महान" व्यक्तींना नैतिक नियम मोडण्याचा अधिकार असतो; परंतु खून केल्यानंतर त्याला जाणवते की कोणतेही तत्त्वज्ञान मानवी विवेकबुद्धीपेक्षा श्रेष्ठ असू शकत नाही. त्यामुळे त्याचा प्रवास अपराधापासून प्रायश्चित्ताकडे जाणारा ठरतो.

दोस्तोव्ह्स्की यांच्या पुरुष पात्रांमध्ये चांगुलपणा आणि वाईटपणा, श्रद्धा आणि संशय, प्रेम आणि द्वेष, अहंकार आणि नम्रता यांचे द्वंद्व सतत दिसते. रास्कोलनिकोव्ह एकाच वेळी संवेदनशील आणि निर्दयी, बुद्धिमान आणि अस्थिर, आत्मविश्वासी आणि अपराधी अशा परस्परविरोधी गुणांनी युक्त आहे. या विरोधाभासांमुळे त्याची व्यक्तीरेखा अत्यंत जिवंत आणि वास्तववादी बनते. दोस्तोयेव्ह्स्की यांच्या साहित्यामधील पुरुष सतत जीवन, ईश्वर, नैतिकता आणि मानवी अस्तित्व यांविषयी विचार करतात. ते केवळ कृती करणारे नायक नसून विचार करणारे आणि आत्मपरीक्षण करणारे व्यक्ती असतात. त्यांच्या पात्रांचा संघर्ष हा केवळ सामाजिक नसून तत्त्वज्ञानाशी आणि अस्तित्वाशी संबंधित असतो. त्यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा बौद्धिक आणि मानसशास्त्रीयदृष्ट्या समृद्ध वाटतात.

दोस्तोयेव्ह्स्की यांच्या साहित्यामध्ये मानवी जीवनातील अंतिम सत्य म्हणून मोक्ष आणि आत्मशुद्धी यांना महत्त्व दिलेले दिसते. अपराधानंतर पश्चात्ताप आणि आत्मस्वीकार यांद्वारे पात्रांचा आध्यात्मिक पुनर्जन्म घडतो. रास्कोलनिकोव्हच्या जीवनातही प्रायश्चित्त आणि आत्मस्वीकार यांमुळे परिवर्तन घडते. त्यामुळे त्याची कथा ही केवळ अपराधाची नसून आत्मोद्धाराची कथा बनते.

ऑनरे द बाल्झाक हे फ्रेंच वास्तववादी साहित्याचे प्रमुख लेखक मानले जातात. त्यांच्या 'ला कॉमेडी ह्युमेन' या विशाल साहित्यसंचामधून त्यांनी फ्रेंच समाजाचे सर्वांगीण चित्रण केले आहे. बाल्झाक यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा या समाजातील वर्गसंघर्ष, आर्थिक स्पर्धा, सत्तेची लालसा आणि यशासाठीची धडपड यांचे वास्तववादी प्रतिनिधित्व करतात. त्यांच्या साहित्यामध्ये समाज विविध आर्थिक आणि सामाजिक स्तरांत विभागलेला दिसतो. त्यांच्या पुरुष पात्रांना उच्चवर्गात प्रवेश करण्यासाठी अथवा आपले स्थान टिकवण्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो. उदाहरणार्थ, 'पेरे गोरियो'मधील यूजेन द रास्तिन्याक हा युवक ग्रामीण पार्श्वभूमीतून पॅरिसमध्ये येतो आणि उच्चभ्रू समाजात स्थान मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या संघर्षातून वर्गभेदाचे वास्तव समोर येते.

बाल्झाक यांच्या पुरुष पात्रांमध्ये महत्त्वाकांक्षा हा प्रमुख गुण आहे. सामाजिक प्रतिष्ठा, संपत्ती आणि सत्ता मिळविण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. रास्तिन्याक हे पात्र यश मिळविण्यासाठी समाजातील नियम, राजकारण आणि संबंध यांचा वापर करते. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून

आधुनिक समाजातील स्पर्धात्मक वृत्तीचे दर्शन घडते. बाल्झाक यांच्या साहित्यामध्ये मानवी स्वभावातील स्वार्थी प्रवृत्तीचेही वास्तववादी चित्रण आढळते. अनेक पुरुष पात्रे आर्थिक लाभ, सामाजिक प्रतिष्ठा किंवा वैयक्तिक यशासाठी नैतिक मूल्यांशी तडजोड करताना दिसतात. तथापि, बाल्झाक या स्वार्थाचे गौरवीकरण करत नाहीत; उलट त्यामधून समाजातील नैतिक अधःपतन आणि भांडवलशाही व्यवस्थेचे परिणाम दाखवतात.

बाल्झाक यांच्या पुरुष पात्रांमध्ये आदर्शवादापेक्षा वास्तववाद अधिक दिसतो. ही पात्रे गुण-दोषांनी युक्त आहेत. त्यांच्यामध्ये महत्त्वाकांक्षा, लोभ, प्रेम, करुणा, असुरक्षितता आणि आत्मविश्वास यांचे मिश्रण आढळते. म्हणूनच त्यांची पात्रे काल्पनिक न वाटता वास्तविक समाजातील व्यक्तींसारखी वाटतात. बाल्झाक यांच्या पुरुष पात्रांचे जीवन समाजाशी घट्ट जोडलेले आहे. त्यांचे यश-अपयश, नातेसंबंध आणि निर्णय हे सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात. त्यांच्या साहित्यामध्ये व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध अत्यंत प्रभावीपणे मांडलेले आहेत. त्यामुळे पुरुषप्रतिमांचा अभ्यास करताना त्या काळातील फ्रेंच समाजाचेही दर्शन घडते. बाल्झाक यांच्या अनेक पात्रांना आदर्शवादी मूल्यांपेक्षा व्यवहारज्ञान अधिक महत्त्वाचे वाटते. यश मिळविण्यासाठी ते परिस्थितीनुसार निर्णय घेतात. त्यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा आधुनिक भांडवलशाही समाजातील व्यवहारवादी मनुष्याचे प्रतिनिधित्व करतात.

हेन्रिक इब्सेन हे आधुनिक नाटकाचे जनक मानले जातात. त्यांच्या नाटकांमध्ये व्यक्ती आणि समाज यांच्यातील संघर्ष, नैतिक मूल्यांची

चिकित्सा, सामाजिक रूढींचे परीक्षण आणि मानवी स्वातंत्र्याचा शोध या विषयांना विशेष महत्त्व आहे. इब्सेन यांच्या पुरुषप्रतिमा या आदर्श नायकांच्या नसून सामाजिक, मानसिक आणि नैतिक संघर्षातून घडणाऱ्या वास्तववादी व्यक्तिमत्त्वांच्या आहेत.

इब्सेन यांच्या पुरुष पात्रांना समाजाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करावे लागते; परंतु अनेकदा त्यांची वैयक्तिक इच्छा आणि सामाजिक अपेक्षा यांच्यात संघर्ष निर्माण होतो. उदाहरणार्थ, 'अ डॉल्स हाऊस'मधील टॉर्वाल्ड हेल्मर हे पात्र समाजमान्य नैतिकतेचे प्रतिनिधित्व करते. त्याला आपल्या प्रतिष्ठेची आणि सामाजिक प्रतिमेची अधिक काळजी असते. त्याच्या माध्यमातून इब्सेन यांनी तत्कालीन समाजातील पुरुषसत्ताक विचारसरणी उघड केली आहे. इब्सेन यांच्या साहित्यामधील पुरुष पात्रे कुटुंबप्रमुख म्हणून जबाबदाऱ्या पार पाडतात; परंतु त्याचवेळी त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक कर्तव्य यांच्यामध्ये समतोल साधावा लागतो.

'घोस्ट्स'मधील पुरुष पात्रांच्या जीवनातून कौटुंबिक जबाबदारी, नैतिकता आणि वैयक्तिक निर्णय यांतील गुंतागुंत स्पष्ट होते. इब्सेन दाखवतात की समाजाच्या अपेक्षांनुसार जगताना व्यक्तीचे स्वातंत्र्य अनेकदा मर्यादित होते. इब्सेन यांच्या पुरुष पात्रांचे एक महत्त्वाचे कार्य म्हणजे समाजातील दांभिकता उघड करणे. बाह्यतः आदर्श, नैतिक आणि प्रतिष्ठित वाटणाऱ्या व्यक्तींच्या जीवनातील विसंगती ते दाखवतात. 'अन एनिमी ऑफ द पीपल'मधील थॉमस स्टॉकमन हे पात्र सत्यासाठी संघर्ष करते. समाजहितासाठी सत्य मांडल्यामुळे त्याला विरोध सहन करावा

लागतो. या पात्राद्वारे इब्सेन यांनी समाजातील स्वार्थ, दांभिकता आणि बहुसंख्यकांच्या दबावावर टीका केली आहे. इब्सेन यांच्या पुरुष पात्रांना स्वतःच्या कृतींचे परिणाम स्वीकारावे लागतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आत्मपरीक्षण आणि आत्मजाणीव दिसून येते. त्यांची पात्रे केवळ समाजाशी संघर्ष करत नाहीत, तर स्वतःच्या विचारसरणी, पूर्वग्रह आणि नैतिक भूमिकांशीही संघर्ष करतात. यामुळे त्यांची मानसिक गुंतागुंत अधिक प्रभावीपणे व्यक्त होते. इब्सेन यांच्या पुरुष पात्रांमध्ये गुण आणि दोष यांचे संतुलित चित्रण आढळते. ते पूर्णतः नायक किंवा खलनायक नसतात. त्यांच्यात प्रेम, जबाबदारी, अहंकार, भीती, असुरक्षितता आणि नैतिक द्वंद्व यांचे मिश्रण असते. यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा अत्यंत मानवी आणि वास्तववादी वाटतात.

- **१९९० नंतरच्या पाश्चात्त्य साहित्यातील लेखक**

१९९० नंतरच्या पाश्चात्त्य साहित्यात अनेक महत्त्वाचे लेखक उदयास आले. त्यांपैकी कॉर्मॅक मॅकार्थी हे अमेरिकन साहित्यातील अत्यंत प्रभावशाली लेखक मानले जातात. त्यांच्या 'ऑल द प्रिटी हॉर्सेस', 'नो कंट्री फॉर ओल्ड मेन' आणि 'द रोड' या कादंबऱ्यांमध्ये आधुनिक पुरुषाचे संकट, हिंसा, नैतिकता, एकाकीपणा आणि अस्तित्वाचा संघर्ष प्रभावीपणे चित्रित झाला आहे. त्यांच्या साहित्यामध्ये पुरुष पात्रे बहुधा कठोर वास्तवाशी झुंज देणारी, एकाकी आणि नैतिक प्रश्नांनी ग्रासलेली असतात.

मॅकार्थी यांच्या पुरुष पात्रांचे जीवन सतत संघर्षमय असते. ते सुरक्षित आणि स्थिर जगात राहत नाहीत; उलट हिंसा, अराजकता आणि

अनिश्चिततेने भरलेल्या जगात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी झगडतात. ‘द रोड’मधील वडील हे पात्र याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. जगाचा विनाश झाल्यानंतरही तो आपल्या मुलाचे रक्षण करण्यासाठी सर्वस्व पणाला लावतो. येथे पुरुषप्रतिमा ही रक्षक, जबाबदार आणि त्यागी व्यक्ती म्हणून उभी राहते.

मॅकार्थी यांच्या साहित्यामध्ये हिंसा आणि क्रौर्य असले तरी त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये नैतिकतेचा शोध दिसून येतो. अराजक जगातही योग्य-अयोग्य याचा विचार करणारा पुरुष हा त्यांच्या लेखनाचा महत्त्वाचा घटक आहे. ‘द रोड’मधील वडील आपल्या मुलाला "चांगुलपणा" जपण्याचा संदेश देतात. त्यामुळे पुरुषप्रतिमा केवळ शक्तिशाली नसून नैतिक मूल्यांचे संरक्षण करणारीही ठरते.

मॅकार्थी यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पितृत्वाची भावना. विशेषतः वडील-मुलाचे नाते हे पुरुषाच्या जबाबदारी, प्रेम आणि त्यागाचे प्रतीक बनते. येथे पुरुष हा केवळ कुटुंबप्रमुख नसून पुढील पिढीच्या अस्तित्वासाठी लढणारा संरक्षक म्हणून दिसतो.

मॅकार्थी यांच्या अनेक कादंबऱ्यांतील पुरुष पात्रे समाजापासून दूर गेलेली किंवा एकाकी असतात. ते स्वतःच्या विचारांशी, भीतींशी आणि वास्तवाशी झुंज देत असतात. त्यांच्या साहित्यामध्ये पुरुष अनेकदा सामाजिक नायक नसून अंतर्मुख व्यक्ती असतो. त्यामुळे त्याच्या मानसिक जगाचे सूक्ष्म चित्रण घडते. **‘नो कंट्री फॉर ओल्ड मेन’**मध्ये आधुनिक

समाजातील हिंसा आणि पुरुषत्वाचा प्रश्न केंद्रस्थानी आहे. शेरिफ बेल, ल्युवेलिन मॉस आणि अँटन शिगूर यांसारखी पात्रे पुरुषत्वाच्या वेगवेगळ्या रूपांचे प्रतिनिधित्व करतात. शेरिफ बेल हा नैतिकतेवर विश्वास ठेवणारा पुरुष, ल्युवेलिन मॉस धाडसी पण परिस्थितीचा बळी ठरणारा पुरुष, तर अँटन शिगूर हा अमानुष हिंसेचे प्रतीक आहे. या पात्रांद्वारे मॅकार्थी आधुनिक पुरुषाच्या नैतिक आणि सामाजिक संकटाचे चित्रण करतात.

- **भारतीय साहित्यातील पुरुषप्रतिमा**

भारतीय साहित्य ही जगातील सर्वांत प्राचीन, समृद्ध आणि वैविध्यपूर्ण साहित्यपरंपरांपैकी एक आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत यांसारख्या प्राचीन ग्रंथांपासून ते आधुनिक कथा, कादंबरी आणि नाटकांपर्यंत भारतीय साहित्याने मानवी जीवनाच्या विविध पैलूंचे प्रभावी चित्रण केले आहे. भारतीय समाज, संस्कृती, धर्म, परंपरा, नैतिक मूल्ये आणि सामाजिक परिवर्तन यांचे प्रतिबिंब साहित्यामध्ये सातत्याने दिसून येते. या साहित्यपरंपरेत पुरुष आणि स्त्री या दोन्ही प्रतिमांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असून त्यांद्वारे समाजाच्या बदलत्या मूल्यव्यवस्थेचे दर्शन घडते.

पुरुषप्रतिमा हा साहित्य-अभ्यासातील एक महत्त्वपूर्ण विषय आहे. भारतीय साहित्यामधील पुरुष पात्रे केवळ कुटुंबप्रमुख, राजा, योद्धा किंवा समाजनेते म्हणून चित्रित झालेली नाहीत, तर ती शेतकरी, कामगार, शिक्षक, विचारवंत, प्रेमी, पती, पिता, विद्रोही आणि संघर्षशील व्यक्ती म्हणूनही समोर येतात. या विविध पुरुषप्रतिमांमधून भारतीय समाजातील

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि नैतिक वास्तवाचे चित्र स्पष्ट होते. प्राचीन साहित्यामध्ये राम, कृष्ण, अर्जुन, कर्ण यांसारख्या आदर्श पुरुषप्रतिमा आढळतात; तर आधुनिक साहित्यात सामान्य माणसाच्या जीवनसंघर्षाचे वास्तववादी चित्रण दिसते. भारतातील अनेक राज्ये, अनेक भाषा आणि बहुसांस्कृतिकता लक्षात घेता व्यक्तीचे नमुनेही त्या त्या स्थळ, काळ, प्रदेश व परिसरानुसार बदललेले दिसतात. तरीही सर्वांच्या जडणघडणीत भारतीय समाज व धर्ममूल्ये सारखी असल्याने पुरुषत्त्व बऱ्याच अंशी समान पद्धतीने संस्कारित झालेले दिसून येते. अशावेळी भारतीय साहित्यातील पुरुषप्रतिमेचे स्वरूप पाहता येईल.

भारतीय साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृतींमधून पुरुषांच्या विविध रूपांचे प्रभावी दर्शन घडवले आहे. त्यांच्या साहित्यातील पुरुष कधी कर्तव्यनिष्ठ आणि त्यागी दिसतो, तर कधी सामाजिक अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारा, नैतिक द्वंद्व अनुभवणारा किंवा आधुनिक जीवनातील अस्तित्वाच्या प्रश्नांशी झुंजणारा मनुष्य म्हणून समोर येतो. समाजातील पुरुषांच्या भूमिका, जबाबदाऱ्या, मूल्ये, संघर्ष आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीतील त्यांचे स्थान यांचा सखोल वेध घेता येतो. तसेच पुरुषत्त्वाच्या पारंपरिक संकल्पना आणि आधुनिक काळातील त्यांचे रूपांतर यांचेही विश्लेषण करता येते.

शरदचंद्र चट्टोपाध्याय हे बंगाली आणि भारतीय साहित्यातील अत्यंत लोकप्रिय कादंबरीकार मानले जातात. त्यांनी भारतीय समाजातील मध्यमवर्गीय जीवन, प्रेम, सामाजिक रूढी, स्त्री-पुरुष संबंध आणि मानवी भावविश्व यांचे अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. त्यांच्या साहित्यामधील

पुरुषप्रतिमा या भावनाशील, संघर्षशील, प्रेमळ आणि सामाजिक बंधनांमध्ये अडकलेल्या व्यक्तिमत्त्वांच्या आहेत.

शरदचंद्र यांच्या पुरुष पात्रांचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची भावनिकता. ही पात्रे प्रेम, मैत्री, कुटुंब आणि नातेसंबंधांना अत्यंत महत्त्व देतात. उदाहरणार्थ, 'देवदास'मधील देवदास हा प्रेमभंगामुळे मानसिकदृष्ट्या खचून जाणारा संवेदनशील युवक आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून मानवी भावनांची तीव्रता व्यक्त होते. भावनाशील आणि संवेदनशील पुरुषप्रतिमा त्यांच्या साहित्यात आढळतात. शरतचंद्र यांच्या साहित्यामध्ये प्रेम ही केंद्रस्थानी असलेली भावना आहे. परंतु त्यांच्या पुरुष पात्रांना अनेकदा समाजाच्या रूढी, जातिभेद, कौटुंबिक अपेक्षा आणि परंपरांमुळे आपल्या प्रेमाचा त्याग करावा लागतो. 'देवदास' हे याचे सर्वांत प्रभावी उदाहरण आहे. देवदास आणि पारो यांचे प्रेम सामाजिक प्रतिष्ठा आणि कौटुंबिक अडथळ्यांमुळे पूर्णत्वास जाऊ शकत नाही. त्यामुळे पुरुषप्रतिमा ही प्रेम आणि समाज यांच्यात अडकलेली दिसते. प्रेम आणि सामाजिक बंधनांमध्ये अडकलेली पुरुषप्रतिमा त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने दिसून येते.

शरदचंद्र यांच्या काही पुरुष पात्रांमध्ये सामाजिक रूढींविरुद्ध बंड करण्याची वृत्ती दिसून येते. 'श्रीकांत'मधील श्रीकांत हा विद्रोही आणि स्वातंत्र्यप्रिय असून पारंपरिक जीवनपद्धतीपेक्षा स्वतंत्र विचारांना महत्त्व देणारा युवक आहे. तो समाजातील प्रस्थापित मूल्यांना प्रश्न विचारतो आणि स्वतःचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करतो. तसेच त्यांच्या पुरुष पात्रांना अनेकदा नैतिक आणि भावनिक संघर्षांचा सामना करावा लागतो. कर्तव्य

आणि प्रेम, समाज आणि व्यक्तिस्वातंत्र्य, परंपरा आणि आधुनिकता यांच्यामध्ये ते अडकलेले दिसतात. ही द्वंद्वात्मकता त्यांच्या पात्रांना अधिक वास्तववादी आणि मानवी बनवते.

शरदचंद्र यांच्या पुरुष पात्रांमध्ये आदर्शवादाबरोबरच मानवी दुर्बलताही दिसून येतात. ते कधी निर्णयक्षम असतात, तर कधी कमकुवत पडतात; कधी धैर्य दाखवतात, तर कधी परिस्थितीसमोर हार मानतात. 'देवदास' हा प्रेमळ आणि संवेदनशील असला तरी निर्णय घेण्यातील असमर्थता त्याच्या शोकांतिकेला कारणीभूत ठरते. त्यामुळे त्याची प्रतिमा अत्यंत वास्तववादी वाटते. यांशिवाय शरतचंद्र यांच्या साहित्यामधील पुरुष पात्रे समाजातील अन्याय, स्त्रियांची दुय्यम स्थिती आणि सामाजिक विषमता यांविषयी जागरूक असतात. अनेक पात्रे समाजसुधारणेच्या विचारांशी जोडलेली दिसतात. त्यांच्या पुरुषप्रतिमांमध्ये मानवी सहानुभूती आणि सामाजिक जबाबदारीची भावना आढळते.

सआदत हसन मंटो हे उर्दू साहित्यातील सर्वांत वास्तववादी आणि निर्भीड कथाकार मानले जातात. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू म्हणजे सामान्य माणूस. त्यांनी भारत-पाकिस्तान फाळणी, हिंसा, लैंगिकता, गरिबी, सामाजिक दांभिकता आणि मानवी मनातील क्रौर्य यांचे चित्रण केले. त्यामुळे त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा पारंपरिक नायकांच्या प्रतिमा नसून परिस्थितीशी झुंज देणाऱ्या, मानसिकदृष्ट्या विदीर्ण झालेल्या आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत.

मंटो यांच्या पुरुष पात्रांवर फाळणीचा सर्वाधिक प्रभाव दिसून येतो. फाळणीमुळे माणसाची ओळख, धर्म, राष्ट्र आणि अस्तित्व यांविषयी प्रश्न निर्माण होतात. 'टोबा टेक सिंह'मधील बिशनसिंग हे पात्र याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तो मानसिक रुग्णालयातील एक कैदी असला तरी फाळणीच्या राजकारणापेक्षा अधिक शहाणा वाटतो. "माझा देश कोणता?" हा त्याचा प्रश्न संपूर्ण विभाजनाच्या विसंगतीचे प्रतीक बनतो. ही केवळ एक व्यक्ती नसून फाळणीमुळे ओळख गमावलेल्या लाखो लोकांची सामूहिक पुरुषप्रतिमा आहे. फाळणीच्या हिंसाचारात सहभागी झालेल्या अनेक पात्रांना अपराधीपणा, पश्चात्ताप आणि मानसिक वेदना भोगाव्या लागतात. ही पात्रे पूर्णपणे दुष्ट नसतात. त्यांच्या मनामध्ये मानवी संवेदना जिवंत असतात. त्यामुळे त्यांच्यातील मानसिक द्वंद्व वाचकाला विचार करायला भाग पाडते.

मंटो यांच्या साहित्यामधील पुरुष अनेकदा गरिबी, बेरोजगारी, हिंसा आणि सामाजिक अन्यायाशी झुंज देताना दिसतात. सामाजिक वास्तवाशी संघर्ष करतात. त्यांची पात्रे आदर्शवादी नसून परिस्थितीची बळी असतात. समाजव्यवस्था त्यांना गुन्हेगार, दलाल किंवा हिंसक बनवते. त्यातून मानवी क्रौर्य आणि पशुत्वाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुरुषप्रतिमा साकार होतात. 'थंडा गोश्त'मधील पुरुष पात्र मानवी वासनांच्या आणि हिंसेच्या अतिरेकाचे प्रतीक असून, पुरुषाला आदर्श नायक म्हणून न दाखवता लेखक पुरुष मनातील दडलेली हिंसा, वासना आणि नैतिक अधःपतन उघड करतात. त्यामुळे त्यांची पुरुषप्रतिमा अत्यंत वास्तववादी वाटते. त्यांच्या साहित्यामधील पुरुष अनेकदा अशा समाजात जगतात, जो बाह्यतः नैतिकतेची भाषा बोलतो; परंतु प्रत्यक्षात हिंसा, शोषण आणि स्वार्थाने

भरलेला असतो. अशा पुरुषप्रतिमांद्वारे समाजातील ढोंगी नैतिकतेचे खरे स्वरूप उघड होते. त्यामुळे त्यांच्या कथा सामाजिक भाष्य बनतात.

मंटो यांच्या साहित्याचा नायक राजा, योद्धा किंवा महान व्यक्ती नसतो. तो सामान्य माणूस असतो. शेतकरी, कामगार, निर्वासित, छोटा व्यापारी किंवा मानसिक रुग्ण. या सामान्य माणसाच्या माध्यमातून मंटो मानवी वेदना, असुरक्षितता आणि अस्तित्वाचा संघर्ष व्यक्त करतात. त्यामुळे त्यांची पुरुषप्रतिमा अधिक मानवी आणि सार्वत्रिक वाटते. एकूणच त्यांनी पुरुषाच्या मानसशास्त्राचा, सामाजिक परिस्थितीचा आणि ऐतिहासिक वास्तवाचा सखोल वेध घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा या भारतीय उपखंडातील विसाव्या शतकातील मानवी संकटाचे प्रभावी साहित्यिक दस्तऐवज मानल्या जातात.

मुन्शी प्रेमचंद हे हिंदी आणि उर्दू साहित्यातील सर्वश्रेष्ठ वास्तववादी लेखक मानले जातात. त्यांनी भारतीय ग्रामीण समाज, गरिबी, शोषण, जातिभेद, सामाजिक विषमता आणि मानवी मूल्यांचे प्रभावी चित्रण केले आहे. त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा या भारतीय समाजातील सामान्य माणसाच्या जीवनसंघर्षाचे प्रतिनिधित्व करतात.

प्रेमचंद यांच्या पुरुष पात्रांचे जीवन गरिबी, कर्जबाजारीपणा आणि सामाजिक अन्यायाने वेढलेले असते. ते सतत संघर्ष करतात; परंतु परिस्थितीपुढे पूर्णपणे हार मानत नाहीत. उदाहरणार्थ, 'गोदान'मधील होरी महतो हा गरीब शेतकरी आपल्या कुटुंबासाठी आयुष्यभर कष्ट करतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून भारतीय शेतकऱ्याचे दुःख, सहनशीलता आणि

संघर्ष यांचे वास्तववादी चित्रण होते. त्यांच्या साहित्यामधील कर्तव्यनिष्ठ आणि कुटुंबवत्सल पुरुष कुटुंबाच्या जबाबदाऱ्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यासाठी कुटुंबाचे सुख हे स्वतःच्या सुखापेक्षा महत्त्वाचे असते. होरी महतो हा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगणारा पुरुष आहे. त्यामुळे प्रेमचंदांची पुरुषप्रतिमा भारतीय कुटुंबव्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारी ठरते.

प्रेमचंद यांनी समाजातील शोषण, जातीय भेदभाव आणि आर्थिक विषमता यांवर कठोर टीका केली आहे. त्यांच्या पुरुष पात्रांना या अन्यायकारक व्यवस्थेचा सामना करावा लागतो. 'रंगभूमी'मधील पात्रांद्वारे त्यांनी सामान्य माणूस आणि सत्ताधारी वर्ग यांच्यातील संघर्ष दाखवून सामाजिक अन्यायाविरुद्ध झगडणाऱ्या पुरुषप्रतिमा साकार केल्या आहेत. त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये प्रामाणिकपणा, सचोटी, कर्तव्यनिष्ठा आणि मानवी मूल्यांवर विश्वास दिसून येतो. आर्थिक अडचणी असूनही ते नैतिकतेचा मार्ग सोडत नाहीत. त्यांच्या पात्रांचा संघर्ष केवळ आर्थिक नसून नैतिकही असतो. योग्य-अयोग्य यांमधील निवड करताना त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. त्यांची पुरुष पात्रे पूर्णतः आदर्शवादी नाहीत. त्यांच्यामध्ये कमतरताही असतात. ते कधी सामाजिक दबावाला बळी पडतात, कधी चुकीचे निर्णय घेतात. होरी महतो हा आदर्श शेतकरी असला तरी तो सामाजिक रूढी आणि परंपरांच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त होऊ शकत नाही. तसेच काही पुरुष पात्रांमध्ये करुणा, सहानुभूती आणि मानवी संवेदना दिसून येतात. ते इतरांच्या दुःखाशी समरस होतात आणि सामाजिक सहजीवनाला महत्त्व देतात. यामुळे त्यांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा केवळ व्यक्तिकेंद्रित नसून समाजाभिमुख बनतात.

माणसाच्या जीवनातील संघर्षांचे हृदयस्पर्शी चित्रण केल्यामुळे प्रेमचंद यांची पुरुषप्रतिमा ही भारतीय समाजाच्या वास्तवाचे आणि मानवी मूल्यांचे प्रभावी प्रतीक मानली जाते.

कल्कि कृष्णमूर्ती हे तमिळ साहित्यातील श्रेष्ठ ऐतिहासिक कादंबरीकार मानले जातात. त्यांच्या साहित्यामध्ये इतिहास, राष्ट्रप्रेम, संस्कृती, नैतिकता आणि मानवी मूल्यांचे प्रभावी चित्रण आढळते. 'पोन्नियिन सेल्वन', 'शिवगामियिन सपथम्' आणि 'पार्थिबन कनवु' यांसारख्या कादंबऱ्यांमधील पुरुष पात्रे आदर्शवाद, शौर्य आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक आहेत. त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये राष्ट्र, राज्य आणि समाजाविषयी अपार निष्ठा दिसून येते. त्यांच्या दृष्टीने वैयक्तिक हितापेक्षा राष्ट्रहित अधिक महत्त्वाचे असते. 'पोन्नियिन सेल्वन'मधील अनेक पुरुष पात्रे चोल साम्राज्याच्या संरक्षणासाठी स्वतःचे सुख, प्रेम आणि वैयक्तिक इच्छा बाजूला ठेवतात. अर्थात आदर्श पुरुष हा केवळ स्वतःसाठी जगत नाही; तो समाज आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी कार्य करतो. त्यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा भारतीय राष्ट्रवादी विचारसरणीचे प्रतिनिधित्व करतात. त्यातून शूर, धाडसी आणि नेतृत्वक्षम पुरुषप्रतिमा साकार होतात. पुरुष पात्रे संकटांना धैर्याने सामोरे जातात. त्यांच्यामध्ये नेतृत्व, निर्णयक्षमता आणि पराक्रम आढळतो. वंदियतेवन हे पात्र याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. तो बुद्धिमान, साहसी आणि आत्मविश्वासपूर्ण आहे. अनेक संकटांमध्येही तो धैर्य गमावत नाही. येथे पुरुषत्वाचे मोजमाप केवळ शारीरिक शक्तीने होत नाही; तर धैर्य, बुद्धिमत्ता आणि नेतृत्वगुण यांद्वारे होते. त्यामुळे कल्कि यांच्या पुरुषप्रतिमा वीरपुरुषांच्या परंपरेशी जोडलेल्या दिसतात.

कल्कि यांच्या पुरुष पात्रांना अनेकदा वैयक्तिक प्रेम आणि सार्वजनिक कर्तव्य यांपैकी एकाची निवड करावी लागते. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायक प्रेमभावना जपत असले तरी राष्ट्र, समाज किंवा कुटुंबावरील कर्तव्याला प्राधान्य देतात. या संघर्षातून कल्कि यांनी आदर्श पुरुषाचे चित्र उभे केले आहे. त्यांच्या मते खरा पुरुष वैयक्तिक सुखापेक्षा व्यापक हिताचा विचार करतो. त्यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमांमध्ये त्याग आणि आत्मसंयम हे गुण ठळकपणे दिसतात.

कल्कि यांच्या साहित्यामधील पुरुष पात्रे प्रामाणिकपणा, निष्ठा, न्यायप्रियता आणि कर्तव्यनिष्ठा यांसारख्या मूल्यांचे पालन करतात. त्यांच्या नायकांचा विजय केवळ युद्धभूमीवर होत नाही, तर नैतिक मूल्यांच्या पालनामुळेही होतो. कल्कि यांच्या पुरुषप्रतिमा भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित आहेत. सत्य, धर्म आणि न्याय यांवर त्यांचा विश्वास असल्यामुळे त्यांची पात्रे आदर्शवादी वाटतात. त्यामुळे त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये सांस्कृतिक अस्मितेची जाणीव आढळते. त्यांची पात्रे राज्य, परंपरा आणि संस्कृतीच्या संरक्षणासाठी संघर्ष करतात. येथे पुरुष हा केवळ व्यक्ती राहत नाही; तो इतिहासाचा वाहक आणि संस्कृतीचा रक्षक बनतो. त्यामुळे कल्कि यांच्या पुरुषप्रतिमा राष्ट्रीय आणि सांस्कृतिक चेतनेचे प्रतीक ठरतात. जरी कल्कि यांच्या पुरुष पात्रांमध्ये आदर्शवाद अधिक दिसत असला तरी त्यांच्यामध्ये मानवी भावना, प्रेम, शंका, भीती आणि असुरक्षितताही आढळते. उदाहरणार्थ, वंदियतेवन धाडसी असला तरी तो भावनिक आणि मानवी गुणांनी युक्त आहे. यामुळे त्यांच्या पुरुषप्रतिमा केवळ पौराणिक किंवा काल्पनिक नायकांच्या प्रतिमा न राहता मानवी वास्तवाशी जोडलेल्या वाटतात. आदर्शवाद आणि वास्तववादाचा सुंदर

संगम आढळतो. त्यामुळे कल्कि यांच्या पुरुषप्रतिमा भारतीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक साहित्यपरंपरेतील आदर्श पुरुषत्वाचे प्रभावी प्रतीक मानल्या जातात.

सलमान रश्दी यांच्या साहित्यामध्ये इतिहास, राजकारण, स्थलांतर, ओळख आणि सांस्कृतिक संघर्ष हे प्रमुख विषय आहेत. त्यांच्या पुरुषप्रतिमा पारंपरिक नायकांच्या नसून बदलत्या जगात स्वतःची ओळख शोधणाऱ्या व्यक्तींच्या आहेत. 'मिडनाइट्स चिल्ड्रेन'मधील सलीम सीनाय हा भारताच्या स्वातंत्र्यानंतरच्या सामाजिक-राजकीय बदलांचे प्रतीक आहे. त्यांच्या पुरुष पात्रांना 'मी कोण?' हा प्रश्न सतत त्रास देतो. धर्म, राष्ट्र, भाषा आणि संस्कृती यांमधील संघर्ष त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. त्यांची पात्रे वैयक्तिक जीवनापेक्षा इतिहासाच्या मोठ्या प्रवाहात अडकलेली असतात. रश्दी यांच्या पुरुष पात्रांमध्ये स्थलांतर, निर्वासन आणि सांस्कृतिक विस्थापनाचे अनुभव दिसतात. त्यामुळे पुरुष आधुनिक, बहुसांस्कृतिक आणि ओळखीच्या संकटाशी झुंजणाऱ्या माणसाची प्रतिमा आहे.

अमिताव घोष यांच्या साहित्यामध्ये इतिहास, वसाहतवाद, स्थलांतर, पर्यावरण आणि सांस्कृतिक संवाद यांना महत्त्व आहे. 'द शॅडो लाइन्स'मधील पुरुष पात्रे इतिहास आणि राजकीय घटनांच्या प्रभावाखाली जगतात. त्यांच्या पुरुषप्रतिमा वैयक्तिक नसून सामाजिक आणि ऐतिहासिक संदर्भांनी घडलेल्या आहेत. त्यांच्या पात्रांमध्ये संवेदनशील आणि बौद्धिक पुरुष असून त्यांच्या ठिकाणी विचारशीलता, जिज्ञासा आणि ज्ञानाचा शोध दिसून येतो.

विक्रम सेठ यांच्या साहित्यामध्ये मानवी नातेसंबंध, प्रेम, कुटुंब आणि आधुनिक भारतीय समाजाचे वास्तव चित्रित केले आहे.'अ सूटेबल बॉय'मधील पुरुष पात्रे कुटुंब, विवाह आणि सामाजिक अपेक्षांशी जोडलेली आहेत. त्या पुरुष पात्रांच्या ठिकाणी भारतीय मध्यमवर्गीय जीवनातील जबाबदाऱ्या आणि सामाजिक मूल्ये दिसून येतात. त्यांची पात्रे प्रेम, अपयश, आशा आणि निराशा अनुभवतात. परंपरा आणि आधुनिकता यांमधील संघर्ष त्यांच्या पुरुष पात्रांमध्ये स्पष्ट दिसतो.

अरुंधती रॉय यांच्या साहित्यामध्ये सामाजिक विषमता, जातिव्यवस्था, सत्ता, राजकारण आणि मानवी स्वातंत्र्य यांचे चित्रण आहे. 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्स'मधील पुरुष पात्रे जात, वर्ग आणि सामाजिक व्यवस्थेच्या दबावाखाली जगतात. त्यांच्या पुरुषप्रतिमा समाजातील अन्यायकारक रचनेचे परिणाम भोगणाऱ्या व्यक्ती म्हणून समोर येतात. त्यांची पात्रे केवळ शक्तिशाली नसून असुरक्षित, दुःखी आणि मानसिक संघर्ष अनुभवणारी आहेत. काही पात्रे सामाजिक नियमांना आव्हान देतात आणि स्वातंत्र्याचा शोध घेतात.

अशाप्रकारे या चारही इंग्रजी लेखकांच्या साहित्यामधील पुरुषप्रतिमा पाहिल्यास, पारंपरिक वीरपुरुषाची प्रतिमा मागे पडून आधुनिक, संघर्षशील, भावनिक, सामाजिक आणि अस्तित्ववादी प्रश्नांशी झुंजणाऱ्या पुरुषाची प्रतिमा पुढे येते. हेच समकालीन भारतीय इंग्रजी साहित्यातील पुरुषप्रतिमांचे वैशिष्ट्य मानले जाते.

*** *** ***

ई. मराठी साहित्यातील पुरुषप्रतिमा

जागतिक साहित्य आणि भारतीय साहित्य यांचा विचार केला असता साहित्यप्रवाहांची विभागणी प्रामुख्याने कालखंड, साहित्यप्रकार, तत्त्वज्ञान किंवा वाङ्मयीन चळवळींच्या आधारे झालेली दिसते. आधुनिकता, उत्तरआधुनिकता, अस्तित्ववाद, स्त्रीवाद, वास्तववाद, रोमँटिसिझम अशा विविध प्रवाहांनी जागतिक साहित्य समृद्ध केले आहे. भारतीय साहित्यातही भक्तिकाल, रीतिकाल, आधुनिक साहित्य, राष्ट्रवादी साहित्य, प्रगतिवादी साहित्य अशा कालानुक्रमिक व वैचारिक प्रवाहांची परंपरा आढळते. परंतु मराठी साहित्याची जडणघडण सामाजिक वास्तवाशी अत्यंत निकट संबंध ठेवणारी असल्याने येथे साहित्यप्रवाहांची निर्मिती केवळ वाङ्मयीन निकषांवर न होता सामाजिक, सांस्कृतिक, जातीय, आर्थिक आणि प्रादेशिक अनुभवविश्वाच्या आधारे झालेली दिसते. हीच बाब मराठी साहित्याला जागतिक आणि भारतीय साहित्यापेक्षा वेगळी ओळख प्राप्त करून देते.

मराठी साहित्यात ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, भटक्या-विमुक्तांचे साहित्य, कामगार साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लीम साहित्य, ख्रिस्ती साहित्य, जनवादी साहित्य इत्यादी विविध प्रवाह उदयास आले. या प्रत्येक प्रवाहाने समाजातील विशिष्ट घटकांच्या अनुभवांना अभिव्यक्ती दिली आणि मुख्य प्रवाहातील साहित्याला नवी दृष्टी प्रदान केली. त्यामुळे मराठी साहित्य हे बहुआयामी सामाजिक अनुभवांचे सशक्त दस्तऐवजीकरण म्हणून उभे राहते. या विविध साहित्यप्रवाहांत स्त्रीप्रतिमेप्रमाणेच पुरुषप्रतिमाही वेगवेगळ्या स्वरूपात

आकार घेताना दिसते. ग्रामीण साहित्यातील कष्टकरी शेतकरी पुरुष, दलित साहित्यातील अन्यायाविरुद्ध संघर्ष करणारा पुरुष, आदिवासी साहित्यातील निसर्गाशी एकरूप असलेला पुरुष, शहरी साहित्यातील मध्यमवर्गीय पुरुष, तसेच बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीत आपल्या अस्तित्वाशी झुंज देणारा आधुनिक पुरुष अशा अनेक रूपांत पुरुषप्रतिमा व्यक्त झालेली दिसते. या प्रतिमा केवळ व्यक्तिचित्रणापुरत्या मर्यादित नसून त्या संबंधित समाजजीवन, मूल्यव्यवस्था, सत्तासंबंध, लैंगिक भूमिका आणि सांस्कृतिक परिवर्तन यांचेही प्रतिबिंब आहेत.

मराठी साहित्यप्रवाहांच्या संदर्भात पुरुषप्रतिमेचा अभ्यास करताना प्रत्येक प्रवाहातील पुरुषाची सामाजिक भूमिका, मानसिकता, संघर्ष, नातेसंबंध, मूल्यदृष्टी आणि बदलत्या काळानुसार झालेली त्याची रूपांतरे यांचा विचार करणे आवश्यक ठरते. अशा अभ्यासातून मराठी साहित्याने पुरुषत्वाच्या संकल्पनेकडे केवळ सत्ताधारी किंवा कुटुंबप्रमुख म्हणून नव्हे, तर विविध सामाजिक वास्तवांनी घडविलेल्या मानवी व्यक्तिमत्त्वाच्या रूपात पाहिले आहे, हे स्पष्ट होते. त्यामुळे मराठी साहित्यप्रवाहांतील पुरुषप्रतिमेचा अभ्यास हा केवळ साहित्यिक नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरतो.

- **ग्रामीण साहित्यातील पुरुषप्रतिमा**

ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्यप्रवाहातील महत्त्वाचा प्रवाह असून त्यामध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तव, शेती, श्रमसंस्कृती, निसर्ग, परंपरा आणि सामाजिक संबंध यांचे चित्रण आढळते. या साहित्यप्रवाहातील

पुरुषप्रतिमा ही कष्टकरी, जबाबदार, संघर्षशील आणि जीवनाशी निष्ठावान अशा स्वरूपाची आहे. तो प्रामुख्याने शेतकरी, शेतमजूर किंवा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ म्हणून समोर येतो.

ग्रामीण पुरुषाच्या जीवनावर दुष्काळ, कर्जबाजारीपणा, गरिबी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता यांचा मोठा परिणाम झालेला दिसतो. त्यामुळे तो सतत संकटांशी झुंज देणारा, कुटुंबाची जबाबदारी पेलणारा आणि परिस्थितीशी संघर्ष करणारा व्यक्ती म्हणून चित्रित केला जातो. त्याचवेळी पितृसत्ताक संस्कृतीचा प्रभाव, रूढी-परंपरा आणि सामाजिक संकेत यांमुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वातील मर्यादाही साहित्यकारांनी दाखवून दिल्या आहेत.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'मानदेशी माणसं' या कथासंग्रहातील पुरुषप्रतिमा ग्रामीण मानदेशातील जीवनाचे वास्तव, माणुसकी, दारिद्र्य, संघर्ष, स्वाभिमान आणि मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडून दाखवतात. या कथा काल्पनिक वाटत असल्या तरी त्यांतील पुरुष पात्रे प्रत्यक्ष ग्रामीण जीवनाशी जोडलेली आहेत. देवा सटवा महार हा संग्रहातील अत्यंत प्रभावी पुरुष आहे. तो गरीब आणि अस्पृश्य समाजातील असला तरी स्वाभिमानी, प्रामाणिक आणि कष्टाळू आहे. गावातील प्रत्येक काम तो निष्ठेने करतो. समाजाकडून अन्याय आणि अपमान सहन करूनही तो आपल्या कर्तव्यापासून मागे हटत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून दलित समाजाचे दु:ख, माणुसकी आणि आत्मसन्मान प्रकट होतो. तो कष्टाळू असून स्वाभिमानी, प्रामाणिक, सहनशील आणि माणुसकी जपणारा आहे. धर्मा रामोशी हा धाडसी, चपळ आणि निष्ठावान पुरुष आहे. रामोशी

समाजाचा प्रतिनिधी म्हणून तो गावाचे रक्षण करणारा, संकटसमयी धावून जाणारा आणि साहसी वृत्तीचा आहे. गरिबी असूनही तो स्वाभिमानाने जगतो. कोंडिबा गायकवाड हा कष्टकरी आणि साधा ग्रामीण माणूस आहे. गरिबी, दुष्काळ आणि प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत तो जगतो. परिस्थिती कितीही कठीण असली तरी तो श्रम आणि प्रामाणिकपणाचा मार्ग सोडत नाही. दादू बालट्या हा विनोदी, हजरजबाबी आणि मनमोकळ्या स्वभावाचा आहे. तो ग्रामीण जीवनातील आनंद, दुःख आणि साधेपणा यांचे प्रतीक आहे. त्याच्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण जीवनातील सहज विनोद आणि माणुसकी दाखवली आहे.

शंकर पाटील यांच्या 'वळीव' कथासंग्रहातील तात्या हा कष्टकरी, प्रामाणिक आणि शेतीनिष्ठ शेतकरी आहे. शेती, निसर्ग आणि कुटुंब यांभोवती त्याचे जीवन फिरते. दुष्काळ, कर्ज आणि गरिबी यांचा सामना करतानाही तो धैर्य सोडत नाही. पाटील हा गावातील प्रभावशाली व्यक्ती आहे. गावातील वाद मिटविणे, निर्णय घेणे आणि लोकांवर प्रभाव ठेवणे ही त्याची भूमिका आहे. काही ठिकाणी तो न्यायप्रिय दिसतो, तर काही कथांमध्ये सत्तेचा आणि प्रतिष्ठेचा अभिमानही दिसून येतो. 'वळीव' मधील अनेक पुरुष पात्रे सामान्य शेतकरी आहेत. ते निसर्गावर अवलंबून जगतात. पाऊस, दुष्काळ, शेती आणि जनावरांशी त्यांचे जीवन जोडलेले आहे. संकटे असूनही ते आशावादी राहतात. काही कथांमधील पुरुष पात्रे रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणारी आहेत. बदल स्वीकारण्यास त्यांची अनिच्छा दिसते. लेखकाने अशा पात्रांद्वारे ग्रामीण समाजातील अज्ञान आणि सामाजिक मर्यादा अधोरेखित केल्या आहेत.

रा. रं. बोराडे यांच्या 'मळणी' कथासंग्रहात मराठवाड्यातील कष्टकरी शेतकरी दिसतात. तेथील शेतकरी दिवसरात्र शेतात राबतो; परंतु दुष्काळ, कर्ज आणि नापिकीमुळे त्याचे जीवन सतत संघर्षमय असते. तरीही तो श्रमावर विश्वास ठेवतो आणि कुटुंबासाठी झटत राहतो. या कथांमधील पुरुष कुटुंबासाठी त्याग करणारे आहेत. पत्नी, मुलं आणि वृद्ध आई-वडील यांच्या जबाबदाऱ्या पेलताना ते स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवतात. आर्थिक संकटातही कुटुंब टिकवण्याचा प्रयत्न करतात. जबाबदार, त्यागी, प्रेमळ व कर्तव्यनिष्ठ ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये आहेत. काही कथांमध्ये बदलत्या काळातील युवक शिक्षण, रोजगार आणि आधुनिकतेकडे आकर्षित झालेला ग्रामीण युवक दिसतो. तो परंपरा आणि नव्या जीवनमूल्यांमध्ये अडकलेला आहे. त्याच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील संक्रमणाचे चित्र उभे राहते. या कथांतील काही पुरुष गावातील एकोपा, परस्पर सहकार्य आणि सामाजिक नाती जपणारे आहेत. संकटात ते एकमेकांना मदत करतात आणि गावाची सामूहिकता टिकवण्याचा प्रयत्न करतात.

बाबाराव मुसळे यांच्या कादंबऱ्यांतील पुरुषप्रतिमा या ग्रामीण समाजजीवन, सामाजिक विषमता, सत्तासंघर्ष, जातिव्यवस्था आणि मानवी मूल्यांचे प्रतिनिधित्व करतात. पुरुष पात्रे समाजहित, न्याय आणि मानवतेची मूल्ये जपतात (दशरथ पाटील, भगवान पाटील, बाबूराव सरपंच), तर काही पात्रे स्वार्थ, लोभ, हिंसा आणि सत्तेच्या गैरवापराचे प्रतीक आहेत सदानंद देशमुख यांच्या 'तहान' आणि 'बारोमास' या कादंबऱ्यांतील पुरुषप्रतिमा ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न, बदलती

मूल्यव्यवस्था, बेरोजगारी आणि सामाजिक संघर्ष यांचे वास्तववादी चित्रण करतात. लेखकाने प्रत्येक पुरुष पात्राला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व दिले आहे.

'तहान' कादंबरीतील राघोजी शेवाळे हा या कादंबरीचा केंद्रस्थानी असलेला पुरुष आहे. तो वृद्ध, कष्टाळू आणि पारंपरिक कृषिसंस्कृती जपणारा शेतकरी आहे. शेती, बैल आणि जमीन यांनाच तो आपले जीवन मानतो. बैलांना तो कुटुंबातील सदस्यांप्रमाणे प्रेम देतो. गावात पाण्याची टंचाई असली तरी पाणी विकणे हे त्याला पाप वाटते. मुलगा बबन पाण्याचा व्यवसाय सुरू करतो तेव्हा त्याला ते मान्य नसते. त्यामुळे पिढ्यांतील आणि मूल्यांतील संघर्ष निर्माण होतो. राघोजीच्या माध्यमातून लेखकाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्याचे दुःख, असहाय्यता आणि कृषिसंस्कृतीवरील निष्ठा प्रभावीपणे मांडली आहे.

बबन हा राघोजीचा मुलगा आहे. तो आधुनिक विचारांचा, महत्त्वाकांक्षी आणि पैशाला महत्त्व देणारा युवक आहे. गावातील पाण्याच्या टंचाईचा फायदा घेऊन तो पाणी विकण्याचा व्यवसाय सुरू करतो. आर्थिक प्रगतीसाठी तो नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष करतो. पैशामुळे त्याच्यात अहंकार आणि भौतिकवादी वृत्ती वाढते. प्रेमप्रकरण आणि आर्थिक व्यवहारांमुळे त्याचे जीवन गुंतागुंतीचे बनते. बबनच्या माध्यमातून लेखकाने बदलत्या ग्रामीण युवकाचे वास्तववादी चित्रण केले आहे.

'बारोमास' कादंबरीतील एकनाथ हा कादंबरीचा नायक आहे. तो सुशिक्षित असूनही बेरोजगारी, शेतीतील संकटे आणि आर्थिक अडचणींमुळे त्रस्त आहे. शिक्षण घेतल्यावरही योग्य नोकरी मिळत नाही.

शेती आणि संसार यांच्यात तो सतत संघर्ष करत राहतो. पत्नी अलकाच्या अपेक्षा आणि ग्रामीण वास्तव यामध्ये तो अडकलेला आहे. एकनाथच्या माध्यमातून लेखकाने शिक्षित ग्रामीण युवकाची शोकांतिका मांडली आहे.

मधुकर हा एकनाथचा धाकटा भाऊ आहे. तोही सुशिक्षित असून नोकरीच्या शोधात आहे. भ्रष्टाचारामुळे त्याला नोकरी मिळत नाही. त्यामुळे तो चुकीच्या मार्गाकडे वळतो आणि गुप्तधन शोधण्यासारख्या अवास्तव कल्पनांमध्ये अडकतो. त्याच्या माध्यमातून लेखकाने शिक्षित बेरोजगार युवकाचे वास्तव दाखवले आहे.

• दलित साहित्य

शंकरराव खरात हे दलित साहित्याचे अग्रगण्य लेखक होते. त्यांच्या 'बारा बलुतेदार' या कथासंग्रहातील कथांमध्ये महार, मांग, रामोशी, चांभार, तराळ अशा बलुतेदार समाजातील पुरुषांचे जीवन, त्यांचे श्रम, सामाजिक अपमान आणि माणुसकीचे दर्शन घडते. रामा महार हा गावातील बलुतेदार म्हणून विविध कामे करतो. गावाची सेवा करूनही त्याला अस्पृश्यतेची वागणूक मिळते. तरीही तो आपल्या कामाशी प्रामाणिक राहतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वात स्वाभिमान, श्रमशीलता आणि सहनशीलता दिसून येते. रामा महार हा दलित समाजाच्या आत्मसन्मानाचे प्रतीक आहे. बंडा मांग हा गरिबी, जातीय अन्याय आणि सामाजिक उपेक्षेविरुद्ध लढणारा पुरुष आहे. तो श्रम करून उदरनिर्वाह करतो; परंतु समाज त्याला समानतेची वागणूक देत नाही. अन्यायाविरुद्ध त्याच्या मनात असंतोष आहे; पण परिस्थितीमुळे तो अनेकदा असहाय ठरतो. या

कथासंग्रहातील अनेक पुरुष बलुतेदार समाजाचे प्रतिनिधित्व करतात. गावाची सर्व कामे ते प्रामाणिकपणे करतात; पण त्यांना सामाजिक सन्मान मिळत नाही. त्यांच्या जीवनात दारिद्र्य, उपेक्षा आणि अपमान असला तरी ते माणुसकी जपतात.

खरात यांच्या कथांतील स्वाभिमानी दलित पुरुष अन्याय सहन करतात; परंतु स्वाभिमान सोडत नाहीत. शिक्षण, आत्मसन्मान आणि सामाजिक परिवर्तनाची जाणीव त्यांच्यामध्ये दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव या प्रतिमांवर स्पष्ट जाणवतो. एकूणच श्रम आणि कष्ट यांना प्रतिष्ठा, सामाजिक अन्याय आणि अस्पृश्यतेचा अनुभव, स्वाभिमान आणि मानवी मूल्यांचा आग्रह, संघर्षातून उभे राहणारे व्यक्तिमत्त्व व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा, हे त्या पुरुषांचे गुणविशेष आहेत.

बाबुराव बागूल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहात दलित जीवन, जातीय शोषण, दारिद्र्य, विद्रोह आणि मानवी अस्मिता या अनुषंगाने पुरुषप्रतिमा रेखांकित केलेल्या आहेत. या कथासंग्रहातील नायक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारा दलित तरुण आहे. तो जातीय अपमान सहन करतो; पण तो गुलामी स्वीकारत नाही. स्वाभिमान आणि समानतेसाठी संघर्ष करतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. बागूल यांच्या कथांतील अनेक पुरुष मजूर, हमाल, गिरणी कामगार किंवा हातावर पोट असणारे कष्टकरी आहेत. ते प्रचंड श्रम करतात. तरीही दारिद्र्याशी झुंज

द्यावी लागते. त्यांना मान-सन्मान मिळत नाही. त्यांच्या श्रमाचे शोषण होते. तरीही ते जगण्यासाठी संघर्ष करत राहतात.

बागूल यांच्या कथेत जातीय व्यवस्थेचे बळी ठरलेले पुरुष असून त्यांना जन्मतः दलित म्हणून अपमान, बहिष्कार आणि सामाजिक अन्याय सहन करावा लागतो. अनेकदा ते स्वतःची जात लपवण्याचा प्रयत्न करतात, कारण जात उघड झाल्यावर त्यांना अपमानित केले जाते. तसेच संवेदनशील आणि माणुसकी जपणारे पुरुष आहेत. काही पुरुष पात्रांमध्ये केवळ विद्रोह नाही, तर माणुसकी, प्रेम, मैत्री आणि कुटुंबाबद्दलची जबाबदारीही दिसते. गरिबी असूनही ते मानवी मूल्ये जपण्याचा प्रयत्न करतात. काही कथांतील तरुण शिक्षण, रोजगार आणि समान हक्क मिळवण्यासाठी संघर्ष करतात. ते जुन्या रूढींना विरोध करतात आणि नव्या समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहतात. त्यांच्यामध्ये आत्मसन्मान आणि परिवर्तनाची तीव्र इच्छा असते. एकूणच या कथासंग्रहातील पुरुषप्रतिमा या केवळ व्यक्ती नसून संपूर्ण दलित समाजाच्या वेदना, संघर्ष आणि विद्रोहाचे प्रतीक आहेत.

अण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरीतील पुरुष हे दलित, वंचित आणि शोषित समाजाच्या संघर्षशील जीवनाचे प्रतिनिधित्व करतात. लेखकाने पुरुष पात्रांच्या माध्यमातून अन्यायाविरुद्धचा लढा, स्वाभिमान, धैर्य आणि सामाजिक समतेची भावना प्रभावीपणे व्यक्त केली आहे. फकिरा हा कादंबरीचा नायक आहे. तो मांग समाजातील असला तरी अत्यंत धाडसी, स्वाभिमानी आणि न्यायप्रिय आहे. इंग्रज सत्ता, सावकार आणि अन्यायी समाजव्यवस्था यांच्याविरुद्ध तो संघर्ष करतो. स्वतःच्या

समाजासाठी तो जीव धोक्यात घालतो. फकिरा हा केवळ एक व्यक्ती नसून दलित समाजाच्या विद्रोहाचे प्रतीक आहे.

राणोजी हा फकिराचा वडील आहे. तो शूर, निडर आणि स्वाभिमानी आहे. गावाच्या सन्मानासाठी तो स्वतःच्या प्राणांचीही पर्वा करत नाही. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव फकिरावर पडतो. विष्णूपंत कुलकर्णी हे उच्चवर्णीय असूनही मानवतावादी विचारांचे आहेत. ते फकिराला मदत करतात आणि जातिभेदापेक्षा माणुसकीला महत्त्व देतात. याउलट कादंबरीतील इंग्रज अधिकारी, सावकार आणि अन्यायी सत्ताधारी ही पुरुषप्रतिमांची दुसरी बाजू आहे. ते गरीब आणि दलित समाजाचे शोषण करतात. त्यांच्या माध्यमातून लेखकाने अन्यायी सत्तेचे चित्रण केले आहे.

उत्तम कांबळे यांचे 'वाट तुडवताना' हे आत्मकथन दलित समाजातील एका जिद्दी, संघर्षशील आणि विचारशील पुरुषाच्या जीवनप्रवासाचे चित्रण करणारे आहे. या आत्मकथनातील पुरुषप्रतिमा केवळ वैयक्तिक अनुभवांपुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या दलित समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक उन्नतीचे प्रतीक ठरतात. या आत्मकथनात नायकासोबत वडील, मित्र, शिक्षक आणि सहकारी यांच्या रूपाने पुरुषत्वाच्या विविध छटा दिसून येतात.

उत्तम कांबळे हे आत्मकथनातील नायक आहेत. बालपणापासून त्यांना दारिद्र्य, भूक, जातीय अपमान आणि सामाजिक विषमता यांचा सामना करावा लागतो. तरीही ते शिक्षणाचा ध्यास सोडत नाहीत. शेण गोळा करून पुस्तके घेणे, ऊसतोडणीची कामे करणे, 'कमवा आणि

शिका' योजनेत शिक्षण घेणे, पत्रकारिता स्वीकारणे आणि समाजप्रबोधनाचे कार्य करणे या सर्व टप्प्यांतून त्यांची जिद्द दिसून येते. आण्णा हे नायकाचे वडील असून ते गरीब असले तरी मुलांनी शिक्षण घेऊन मोठे व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. ते कष्टाळू, शिस्तप्रिय आणि जबाबदार पुरुष आहेत. आर्थिक अडचणी असूनही ते कुटुंबाचा आधार बनतात. त्यांच्या कठोर स्वभावामागे मुलांच्या भविष्याची काळजी दडलेली आहे.

वाघ्या हा नायकाचा जिवलग मित्र आहे. शिक्षणाच्या काळात तो नायकाला मानसिक आधार देतो. मैत्री, सहकार्य आणि समजूतदारपणा यांचे प्रतिनिधित्व करणारी ही पुरुषप्रतिमा आहे. जे. एच. पाटील सर, प्रा. एम. डी. नलावडे आणि इतर शिक्षक यांनी नायकाच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी शिक्षण, विचार आणि सामाजिक जाणीव यांचा संस्कार केला. या पात्रांमधून आदर्श शिक्षकाची पुरुषप्रतिमा उभी राहते. पत्रकारितेच्या क्षेत्रात नायकाला भेटणारे संपादक आणि सामाजिक कार्यकर्ते त्याला समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतात. सरकारी नोकरीचा मोह सोडून समाजहितासाठी पत्रकारिता करण्याचा निर्णय नायक घेतो. ही पुरुषप्रतिमा सामाजिक बांधिलकी आणि नैतिकतेचे प्रतीक आहे.

प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' मधील नायक (प्र. ई. सोनकांबळे) संघर्षशील आणि स्वाभिमानी पुरुष आहे. नायक हा आत्मकथनाचा केंद्रबिंदू आहे. बालपणापासून त्याला दारिद्र्य, जातीय भेदभाव आणि सामाजिक उपेक्षा सहन करावी लागते. अनेक अडचणी असूनही तो शिक्षणाचा ध्यास सोडत नाही. त्याच्यामध्ये आत्मविश्वास, जिद्द

आणि आत्मसन्मान दिसून येतो. नायकाचे वडील अत्यंत कष्टाळू असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अहोरात्र मेहनत करतात. दारिद्र्य असूनही मुलांच्या भवितव्यासाठी त्यांची धडपड सुरू असते. त्यांच्या माध्यमातून दलित कुटुंबप्रमुखाचे वास्तववादी चित्र उभे राहते.

आत्मकथनात मालोजी आजोबा हे व्यावहारिक, प्रामाणिक, विश्वासू आणि काबाडकष्ट करणारे म्हणून चित्रित झाले आहेत. शेतीच्या कामात ते दूरदृष्टीने वागतात. पावसाळ्यात अडचण येऊ नये म्हणून ते आधीच अन्नसामग्रीची व्यवस्था करून ठेवतात. धामणगावच्या शाळेतील सुधाकरराव कुलकर्णी सर हे उदारमतवादी आणि परिवर्तनवादी शिक्षक आहेत. ते जातिभेदापेक्षा माणुसकीला महत्त्व देतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आदर्श शिक्षकाची प्रतिमा उभी राहते. शिवसंबअप्पा हेही उदारमतवादी विचारांचे आहेत. त्यांनी अस्पृश्य शिक्षक यशवंतराव दौने यांना आपल्या घरी राहण्याची परवानगी दिली. त्यांच्या कृतीतून जातिभेदाला नाकारून मानवतेचा स्वीकार दिसतो. एकूणच दलित पुरुष हा एकीकडे जातिव्यवस्थेचा बळी असतो, तर दुसरीकडे पितृसत्ताक संस्कृतीचा वाहकही असू शकतो. पुरुष समजून घेताना त्याचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे.

• आदिवासी साहित्य

बाबाराव मडावी यांच्या 'टाहो' कादंबरीतील भीमा हे प्रमुख पुरुष पात्र असून तो आदिवासी समाजाच्या संघर्षशील आणि जागृत नेतृत्वाचे प्रतीक आहे. भीमा आपल्या समाजावर होणारा अन्याय, सावकारांचे

शोषण, वनअधिकाऱ्यांचा छळ आणि जंगलावरील हक्क हिरावून घेण्याचे प्रयत्न यांविरुद्ध ठामपणे उभा राहतो. तो केवळ स्वतःसाठी लढत नाही, तर संपूर्ण समाजाला संघटित करून त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा देतो.

भीमा स्वाभिमानी, धाडसी, कष्टाळू आणि न्यायप्रिय आहे. त्याला आपल्या समाजाच्या दुःखाची जाणीव असून त्यातून मार्ग काढण्यासाठी तो संघर्षाचा मार्ग स्वीकारतो. तो आदिवासींना शिक्षण, एकजूट आणि कायदेशीर हक्कांचे महत्त्व समजावून सांगतो. त्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्व, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची दृष्टी दिसून येते.

'टाहो' कादंबरीतील किशोर ही व्यक्तिरेखा आदिवासी स्त्रीच्या शोषणाचे प्रतिनिधित्व करते. तो शहरात राहणारा, शिक्षित आणि विवाहित असूनही मैना हिच्यावर प्रेमाचे खोटे आश्वासन देतो. तिच्या विश्वासाचा गैरफायदा घेतो आणि तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करतो. त्यानंतर तिची जबाबदारी स्वीकारण्याऐवजी तो तिला सोडून देतो. किशोरच्या या वर्तनामुळे मैनाचे सामाजिक आणि मानसिक जीवन उद्ध्वस्त होते. समाज तिलाच दोष देतो, तर किशोर मात्र कोणतीही शिक्षा किंवा सामाजिक निंदा न भोगता मोकळा राहतो. यामुळे समाजातील पुरुषसत्ताक आणि स्त्रीविरोधी मानसिकता अधोरेखित होते. प्यारेलाल ही व्यक्तिरेखा आदिवासी समाजाचे आर्थिक आणि सामाजिक शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे प्रतीक आहे. तो आदिवासींच्या अज्ञान, गरिबी आणि असहायतेचा फायदा घेऊन त्यांना कर्जाच्या जाळ्यात अडकवतो आणि

त्यांचे श्रम व संपत्ती यांचे शोषण करतो. त्याच्या वर्तनातून लोभ, स्वार्थ आणि अन्यायकारक वृत्ती दिसून येते. त्यातून गरिबांचे आर्थिक शोषण करणारी सावकारशाही, आदिवासींच्या अज्ञानाचा स्वार्थासाठी उपयोग, मानवी मूल्यांपेक्षा पैशाला अधिक महत्त्व देणारी मानसिकता, अन्यायकारी सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेचे प्रतिनिधित्व, अशी पुरुषी प्रवृत्ती दिसते.

माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' कादंबरीतील ग्यानबा पाटील हे प्रमुख पात्र असून तो श्रीमंत, सत्ताधारी, स्वार्थी, जुलमी व शोषक वृत्तीचा आहे. आदिवासी समाजाचे आर्थिक व सामाजिक शोषण करणारा म्हणून तो सामंती व्यवस्थेचे प्रतीक ठरतो. त्याचा 'वाडा' हा अन्याय आणि शोषणाची प्रतीकात्मक वास्तू आहे. कादंबरीत एकाच नायकाऐवजी संपूर्ण आंध आदिवासी समाजच नायकाच्या भूमिकेत दिसतो. हे पुरुष कष्टाळू, प्रामाणिक, निसर्गप्रेमी आणि स्वाभिमानी आहेत. दारिद्र्य, उपासमार व शोषण सहन करूनही ते जीवनाशी संघर्ष करतात. सावकार/शेठ हे पात्र आदिवासींच्या गरिबीचा फायदा घेऊन त्यांना कर्जाच्या जाळ्यात अडकवते. व्याजाच्या माध्यमातून त्यांचे आर्थिक शोषण करणाऱ्या व्यवस्थेचे ते प्रतिनिधित्व करते. सरकारी अधिकारी व कर्मचारी ही पात्रे आदिवासींच्या समस्या सोडवण्याऐवजी अनेकदा उदासीन आणि भ्रष्ट वृत्तीची दिसतात. त्यामुळे आदिवासींचे शोषण अधिक तीव्र होते. आदिवासी तरुण ही शिक्षण, जागृती आणि स्वाभिमानाची जाणीव असलेली प्रतिमा परिवर्तनाची आशा व्यक्त करते. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची आणि समाजात बदल घडवण्याची मानसिकता या पात्रांमध्ये दिसून येते.

• भटके-विमुक्तांचे साहित्य

भटके-विमुक्त साहित्यामधील पुरुषप्रतिमा ही केवळ कुटुंबप्रमुख किंवा उपजीविकेचे साधन शोधणारा व्यक्ती म्हणून मर्यादित राहत नाही; तर तो संघर्षशील, परंपरांचा वाहक, सामाजिक विषमतेविरुद्ध लढणारा, कुटुंबवत्सल, कधी रूढीवादी तर कधी परिवर्तनवादी अशा विविध रूपांत दिसून येतो. समाजव्यवस्थेतील अन्याय, आर्थिक असुरक्षितता, शिक्षणाचा अभाव आणि जातीय भेदभाव यांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर झालेला परिणाम साहित्यिकांनी संवेदनशीलतेने रेखाटला आहे.

लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' या आत्मकथनातील बापू कैकाडी हे प्रभावी पुरुष पात्र आहे. तो केकाडी समाजाचा प्रतिनिधी आहे. दारिद्र्य, भटकंती, अज्ञान आणि अन्याय यांच्यात आयुष्य काढत असला तरी मुलांनी शिकावे, समाजात उभे राहावे, अशी त्याची तीव्र इच्छा आहे. पोटासाठी कोणतेही काम करण्याची त्याची तयारी असते. अंधश्रद्धा आणि परंपरांच्या प्रभावाखाली असतानाही मुलांच्या शिक्षणाला तो पाठिंबा देतो. लेखकाने त्याच्यामधून भटक्या-विमुक्त समाजातील कष्टकरी, जबाबदार आणि संघर्षशील पुरुषाची प्रतिमा उभी केली आहे.

लक्ष्मण हा कथानायक असून शिक्षणासाठी झगडणारा, सामाजिक अन्यायाविरुद्ध लढणारा आणि परिवर्तनवादी विचारांचा युवक आहे. त्याचे वडील कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी सतत भटकंती करणारे, अत्यंत कष्टाळू; पण गरिबी आणि सामाजिक व्यवस्थेमुळे हतबल झालेले पुरुष आहेत. समाजातील पंच/ज्येष्ठ पुरुष हे जातपंचायतीचे निर्णय घेणारे,

परंपरा आणि रूढी जपणारे, समाजावर प्रभाव टाकणारे पुरुष आहेत. इतर भटके पुरुष मजुरी, जनावरे पाळणे, भटकंती आणि पारंपरिक व्यवसाय करणारे; दारिद्र्य, उपेक्षा आणि असुरक्षित जीवन यांचे प्रतीक म्हणून चित्रित झालेले आहेत.

लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या' आत्मकथनात लेखकच प्रमुख नायक असून उचल्या समाजात जन्मलेला, गरिबी, उपासमार, पोलिसांचा छळ आणि सामाजिक अपमान सहन करत शिक्षण व स्वाभिमानाच्या बळावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारा संघर्षशील आणि परिवर्तनवादी युवक आहे. वडील कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पारंपरिक व्यवसाय आणि मजुरी करणारे. गरिबी, सामाजिक अन्याय आणि पोलिसांच्या अत्याचारामुळे हतबल झालेले; पण कुटुंबासाठी सतत झटणारे कष्टाळू पुरुष. आजोबा समाजाच्या परंपरा, रूढी आणि जीवनपद्धती जपणारे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व. त्यांच्या माध्यमातून उचल्या समाजाचा इतिहास आणि सांस्कृतिक परंपरा उलगडतात. समाजातील पुरुष (उचल्या समाजातील तरुण व प्रौढ) उदरनिर्वाहासाठी चोरी करण्यास भाग पाडले गेलेले, पोलिसांच्या संशयाला सतत सामोरे जाणारे आणि समाजाच्या तिरस्काराचे बळी ठरलेले पुरुष. त्यांचे जीवन सामाजिक व्यवस्थेतील विषमतेचे प्रतीक आहे. जातपंचायतीतील ज्येष्ठ पुरुष समाजातील वाद सोडवणारे, रूढी-परंपरांचे पालन करणारे आणि समाजावर नियंत्रण ठेवणारे व्यक्ती. त्यांच्या माध्यमातून जातपंचायतीची रचना आणि प्रभाव स्पष्ट होतो.

गुलाब वाघमोडे यांनी 'रानभैरी' या आत्मकथनात भटक्या-विमुक्त समाजाचे, विशेषतः कैकाडी समाजाचे जीवन रेखाटताना त्या समाजातील माणसे निसर्गाशी जोडलेली आणि सतत स्थलांतर करणारी असल्याचे सांगितले आहे. लेखकाचे वडील कष्टाळू असून पारंपरिक व्यवसाय करणारे आणि सतत उपजीविकेसाठी भटकंती करणारे व्यक्तिमत्त्व आहे. कुटुंबाचा आधार असून गरिबीशी संघर्ष करणारे आहेत. आजोबा जमातीच्या परंपरा, रूढी आणि चालीरीती जपणारे ज्येष्ठ व्यक्ती आहेत. त्यांच्या माध्यमातून कैकाडी समाजाची जीवनपद्धती समजते. जमातीतील पंच/नायक समाजातील वाद मिटविणारे, रूढींचे पालन करवून घेणारे आणि सामाजिक निर्णय देणारे प्रमुख व्यक्ती आहेत. जमातीतील पुरुष सदस्य टोपल्या, सुपे, झाडू तयार करणे, गावोगावी फिरून वस्तू विकणे, मजुरी करणे आणि भिक्षा मागून उदरनिर्वाह करणारे आहेत. त्यांच्या जीवनातून दारिद्र्य, अस्थिरता आणि सामाजिक उपेक्षा दिसून येते. गावातील सवर्ण पुरुष भटक्या समाजाकडे तुच्छतेने पाहणारे, भेदभाव करणारे असून त्यांच्या वर्तनातून जातीय विषमता स्पष्ट होते.

वैजनाथ कळसे यांच्या 'ऐरणीच्या घना' या आत्मकथनात मुख्यतः लोहार (गाडी लोहार/घिसाडी परंपरेशी संबंधित) समाजाचे जीवन चित्रित केले आहे. लेखक (वैजनाथ) हा आत्मकथनाचा नायक आहे. लोहार समाजातील मुलगा म्हणून दारिद्र्य, जातीय भेदभाव, शिक्षणासाठीचा संघर्ष आणि आत्मसन्मानाची जिद्द यांचे प्रतिनिधित्व करणारे पात्र. वडील पारंपरिक लोहारकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे कष्टाळू व्यक्तिमत्त्व. आर्थिक संकट असूनही कुटुंबाची जबाबदारी पेलणारे. आजोबा लोहार समाजाच्या परंपरा, व्यवसाय आणि रूढी जपणारे ज्येष्ठ.

त्यांच्या माध्यमातून समाजाची सांस्कृतिक पार्श्वभूमी उलगडते. भाऊ कुटुंबातील संघर्षात सहभागी होणारे आणि लेखकाच्या आयुष्यात आधार देणारे पात्र. लोहार समाजातील पुरुष ऐरण, घन, भाता आणि हातोड्याच्या साहाय्याने शेतीची अवजारे, लोखंडी साधने तयार करणारे मेहनती कारागीर. त्यांच्या जीवनात दारिद्र्य, अस्थिर उत्पन्न आणि सामाजिक उपेक्षा दिसून येते. गावातील सवर्ण पुरुष जातीय श्रेष्ठत्वाच्या भावनेतून लोहार समाजाकडे दुय्यम नजरेने पाहणारे; त्यांच्या वर्तनातून सामाजिक विषमता आणि भेदभाव स्पष्ट होतो.

दादासाहेब मोरे यांच्या 'गबाळ' आत्मकथनातील मल्हारी हे लेखक दादासाहेब मोरे यांचे वडील असून अत्यंत महत्त्वाचे पुरुष पात्र आहे. भटक्या-विमुक्त समाजातील लाचारी, दारिद्र्य आणि दैन्य यांना न जुमानता स्वाभिमानाने जगण्याची वृत्ती त्यांच्यात आहे. स्वतः निरक्षर असले तरी मुलांनी शिकून मोठे व्हावे, ही त्यांची तीव्र इच्छा असते. मुलाच्या शिक्षणासाठी ते भीक मागतात, पैसे जमवतात, गरज पडल्यास घरातील कोंबड्या विकून पुस्तके व शालेय साहित्य आणतात. मुलाला चांगले संस्कार देतात, समजावून सांगतात आणि त्याच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्न करतात.

नागू आजोबा हे लेखकाच्या आयुष्यातील प्रेमळ आणि जिव्हाळ्याचे ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व आहे. ते लेखकाच्या शिक्षणाची काळजी घेतात आणि त्याला भटक्या जीवनापासून दूर ठेवून चांगले भविष्य घडावे, अशी इच्छा बाळगतात. नातवावर अपार प्रेम करणारे, अनुभवसंपन्न आणि कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून त्यांचे चित्रण केले आहे.

आबास या मुलाच्या जीवनातील हालअपेष्टा आणि त्याची शिक्षणाची ओढ प्रभावीपणे मांडली आहे. आबास भिक्षा मागून पोट भरतो, अपमान आणि मार सहन करतो; तरीही त्याच्यात शिकण्याची जिद्द कायम असते. त्याची दयनीय परिस्थिती समाजातील वंचित मुलांच्या वास्तवाचे प्रतिनिधित्व करते. याशिवाय लेखकाने आबासच्या शिक्षणासाठी मदत करणाऱ्या दादासाहेब, लाड गुरुजी, पाटील गुरुजी आणि बाबजी मामू यांसारख्या व्यक्तींचेही चित्रण केले आहे. या व्यक्तिचित्रणातून शिक्षणाचे महत्त्व, माणुसकी, सहकार्य आणि समाजातील दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता हा संदेश दिला आहे.

अशोक पवार यांच्या 'बिराड'मधील लेखक (अशोक पवार) आत्मकथनाचा नायक. दारिद्र्य, उपासमार, जातीय भेदभाव आणि भटक्या जीवनातील संघर्ष यांचा सामना करतो. शिक्षणाच्या माध्यमातून जीवन बदलण्याचा प्रयत्न करतो. स्वाभिमानी, जिद्दी आणि परिवर्तनवादी विचारांचा प्रतिनिधी आहे. लक्ष्मण (लेखकाचे वडील) हे भटक्या-विमुक्त बेलदार समाजातील कुटुंबप्रमुख आहेत. दगड फोडणे, विहिरी बांधणे, मातीची कामे करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दारूचे व्यसन असल्यामुळे पत्नी व मुलांना त्रास देतात, परंतु कुटुंबावर त्यांचे प्रेमही दिसते. शिक्षणापेक्षा परंपरागत जीवनपद्धतीवर त्यांचा विश्वास आहे. सतत गावोगाव भटकून काम शोधणारा, परिस्थितीने पिचलेला आणि व्यवस्थेचा बळी ठरलेला पुरुष म्हणून त्यांचे चित्रण केले आहे.

बुढा (आजोबा) लेखकाचे आजोबा व लक्ष्मण यांचे वडील. देवी, नवस, अंगारे-धुपारे, भूतबाधा अशा अंधश्रद्धांवर त्यांचा दृढ विश्वास आहे.

वृद्ध असूनही कुटुंबाची काळजी घेतात. समाजातील अंधश्रद्धा आणि धार्मिक समजुतींचे प्रतिनिधित्व करणारे पात्र आहे. श्रीरंग सलार बेलदार समाजातील जातपंचायतीतील प्रभावशाली व्यक्ती. धूर्त, स्वार्थी, कारस्थानी व परंपरावादी स्वभावाचा. जातपंचायतीच्या माध्यमातून लोकांवर वर्चस्व गाजवतो. स्वतःच्या फायद्यासाठी लोकांची दिशाभूल करतो आणि समाजावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतो.

संपत लेखकाचा जिवाभावाचा मित्र. शिक्षणाला महत्त्व देणारा आणि लेखकाला सतत मदत करणारा. संकटाच्या काळात आर्थिक व मानसिक आधार देतो. विचारशील, समंजस आणि मैत्री जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्याचे चित्रण केले आहे. धोंडीराम मामा हे लेखकाचे मामा असून अत्यंत कष्टाळू, सरळ आणि धाडसी स्वभावाचे. पोलिसांच्या अन्यायाला सामोरे जातात. भटक्या समाजावर होणाऱ्या अत्याचारांचे प्रतीक म्हणून त्यांचे चित्रण केले आहे.

लक्ष्मण गायकवाड यांनी 'वडार वेदना' कादंबरीत वडार समाजाच्या तीन पिढ्यांचे जीवन चित्रित केले आहे. शंकर, तुकाराम (तुक्या) आणि पोपटलाल ही प्रमुख पुरुष पात्रे असून त्यांच्याभोवती कथा फिरते. याशिवाय तायप्पा, संत्या, रामा जाधव, साहेबराव पाटील, धनंजय देशमुख, गुंडूराव पाटील, कडू पाटील, कोतवाल, अंकुश, कदम मास्तर, संभ्या, गंग्या, श्रीधर अशी अनेक पुरुष पात्रे आहेत. या कादंबरीत लेखकाने वडार समाजातील पुरुषांचे जीवन अत्यंत वास्तववादी पद्धतीने रेखाटले आहे. तुकाराम (तुक्या) हा कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. तो गरिबी, अपमान आणि सामाजिक उपेक्षा सहन करत शिक्षणाच्या जोरावर स्वतःचे स्थान

निर्माण करतो. त्याच्या आयुष्यातील संघर्ष, यश, प्रेम, नोकरी, संपत्ती आणि नंतर आलेले नैतिक अधःपतन यांचे चित्रण प्रभावीपणे केले आहे.

शंकर हा कष्टाळू व दूरदृष्टी असलेला पिता आहे. स्वतःची फसवणूक झाल्यानंतर मुलाला शिक्षण देण्याचा निर्णय घेतो. शिक्षणामुळेच समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहता येते, हा विचार त्याच्या पात्रातून व्यक्त होतो. कादंबरीतील रामा जाधव, साहेबराव पाटील, गुंडूराव पाटील, धनंजय देशमुख, कडू पाटील यांसारखी पात्रे वडार समाजाचे आर्थिक, सामाजिक आणि मानसिक शोषण करणाऱ्या सत्ताधारी वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. तर कदम मास्तर हे तुक्याला शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारे आदर्श शिक्षक म्हणून समाजपरिवर्तनाची दिशा दाखवतात. कादंबरीच्या उत्तरार्धात तुकाराम मेहनतीने मोठा अधिकारी आणि व्यवस्थापक बनतो; मात्र संपत्ती, सत्तेचा मोह आणि अनैतिक संबंध यांमुळे तो आपल्या समाजापासून व कुटुंबापासून दूर जातो. त्यामुळे लेखकाने संघर्षातून यश मिळवणाऱ्या व्यक्तीचे यशानंतर होणारे मूल्यभ्रष्ट रूपही दाखवले आहे.

• नागरी / महानगरीय साहित्य

वामन मल्हार जोशी यांच्या 'रागिणी' कादंबरीतील पुरुष एका बाजूला सुशिक्षित आणि विचारवंत असला, तरी स्त्रीकडे श्रेष्ठत्वाच्या भावनेने पाहणारा आहे. स्त्रीला समान हक्क देण्याबाबत त्याच्या मनात संकोच आहे. काही पुरुष पात्रे स्त्रीच्या शिक्षणाला पाठिंबा देतात, तर काही परंपरावादी मानसिकतेत अडकलेली आहेत. त्यामुळे येथे द्वंद्वात्मक

पुरुषप्रतिमा दिसते. एकीकडे उदारमतवाद, तर दुसरीकडे पुरुषसत्ताक अहंकार. स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न या कादंबरीत ठळकपणे मांडला आहे.

'आश्रमहरिणी' या कादंबरीतील पुरुषप्रतिमा अधिक उदारमतवादी आहे. आश्रमातील पुरुष स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा आदर करतात. स्त्रीला स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वीकारण्याची तयारी काही पात्रांमध्ये दिसते. तथापि, समाजातील रूढी आणि नैतिकतेच्या चौकटी त्यांनाही मर्यादित करतात. या कादंबरीत पुरुष हा संवाद करणारा, विचार करणारा आणि आत्मपरीक्षण करणारा आहे.

'नलिनी' या कादंबरीत काही पुरुष स्त्रीच्या भावनांकडे दुर्लक्ष करतात. प्रेम, विवाह आणि नैतिकतेच्या प्रश्नांमध्ये पुरुषाचा स्वार्थ आणि अधिकारभाव दिसून येतो. त्याचबरोबर काही पुरुष आत्मपरीक्षणही करतात. त्यामुळे पुरुषप्रतिमा पूर्णपणे नकारात्मक नसून बदलाची क्षमता असलेली आहे.

'सुशीलेचा देव' या कादंबरीतील पुरुष धर्म, श्रद्धा आणि नैतिक मूल्यांभोवती फिरतो. काही पुरुष अंधश्रद्धेला बळी पडतात, तर काही विवेकवादी विचार मांडतात. लेखकाने पुरुषाच्या धार्मिक मानसिकतेचे चिकित्सक चित्रण केले आहे. तसेच 'इंदू काळे व सरला भोळे' या कादंबरीतील पुरुष शिक्षित, बुद्धिनिष्ठ आणि सामाजिक प्रश्नांवर विचार करणारा आहे; परंतु वैयक्तिक नातेसंबंधांत त्याच्यात पुरुषी अहंकार, मालकीभाव आणि निर्णयाधिकाराची भावना दिसते. लेखकाने अशा पुरुषांच्या मर्यादा दाखवून स्त्री-पुरुष समतेची बाजू घेतली आहे.

महानगरीय कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणात मोठ्या प्रमाणावर विविधता आढळते. ही विविधता का आढळते, याची कारणे सांगण्यापूर्वी काही बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. महानगरीय समाजात विविध सामाजिक स्तर अस्तित्वात आहेत. पूर्वीच्या काळी समाजरचना प्रामुख्याने वारसाहक्कावर आधारित होती. जन्माने प्राप्त झालेल्या जात-धर्मावर व्यक्तीचे समाजातील स्थान अवलंबून असे. जसजशी समाजातील परिस्थिती बदलत गेली, तसतशी जुनी अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था ढासळत गेली व बदलत गेली. औद्योगिकीकरण, दोन्ही महायुद्धे आणि औद्योगिक क्रांती यांमुळे नगरांचा चेहरामोहरा बदलून गेला. समाजरचनेतही आमूलाग्र परिवर्तन झाले आणि त्यातून महानगरांची निर्मिती झाली.

महानगरातील समाजरचना प्रामुख्याने आर्थिक स्तरांवर आधारित असल्यामुळे तिचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनले. कारखानदार, उद्योगपती, नोकरदार, राजकारणी, सत्ताधारी, व्यापारी वर्ग आणि कामगार वर्ग अशा नव्या समाजरचनेच्या उदयामुळे महानगरीय जीवनात व्याप, विविधता आणि गुंतागुंत वाढली. स्वाभाविकच, महानगरीय जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांतील व्यक्तिचित्रणातही ही विविधता आढळते. तिचा विचार करणे प्रस्तुत अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

महानगरीय समाजजीवनात आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाचे विविध स्तर आढळतात. त्यानुसार येथे व्यक्तीरेखांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करून विचार केला आहे—

१. महानगरातील उच्चभ्रू संस्कृतीतील व्यक्तीरेखा – उच्चपदस्थ अधिकारी, उद्योगपती, कंपनीमालक, राजकारणी इत्यादी.

२. महानगरातील उच्चभ्रू आणि मध्यमवर्गीय वातावरणातील महत्त्वाकांक्षी स्त्री-व्यक्तीरेखा.

३. महानगरीय जीवनातील चाकरमानी मध्यमवर्गीय व्यक्तीरेखा व त्यांची स्वभाववैशिष्ट्ये.

४. महानगरातील एकाकी व्यक्तीरेखा.

५. महानगरीय जीवनपद्धतीच्या रेट्यामुळे झिजलेल्या तसेच भोगवादी प्रवृत्तीमुळे मनोविकल झालेल्या व्यक्तीरेखा.

६. दलित कार्यकर्ते आणि अभिजनवर्गाकडे जाण्याची धडपड करणाऱ्या व्यक्तीरेखा.

७. कनिष्ठ वर्गातील व्यक्तीरेखा आणि झोपडपट्टीतील समूहचित्रण.

महानगरीय जीवनातील सर्वांत वरचा आर्थिक स्तर म्हणजे उच्चभ्रू संस्कृती. या स्तरात समाजातील उद्योगपती, उच्चपदस्थ अधिकारी, कंपनीमालक, राजकीय नेते, मंत्री आणि कामगार नेते यांचा समावेश होतो. महानगराच्या अर्थकारणाच्या, समाजकारणाच्या आणि राजकारणाच्या नाड्या या लोकांच्या हातात असतात. पैसा आणि सत्ता ही त्यांच्या जीवनातील केंद्रवर्ती मूल्ये असतात. त्यांच्या दैनंदिन जीवनातून महानगरीय समाजरचनेचे अनेक पैलू स्पष्ट होतात.

एकूणच मराठी साहित्यप्रवाहांतील पुरुष व्यक्तिरेखा ही एकसाची किंवा सार्वत्रिक स्वरूपाची नसून ती त्या त्या साहित्यप्रवाहाच्या सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वास्तवातून घडत जाते. त्यामुळे पुरुषाची प्रतिमा ही केवळ जैविक अस्तित्व म्हणून न येता समाजरचना, संस्कृती, परंपरा, सत्तासंबंध, आर्थिक परिस्थिती आणि जीवनमूल्ये यांच्या परस्परसंवादातून आकार घेतलेली बहुआयामी व्यक्तिरेखा म्हणून साहित्यामध्ये व्यक्त होते. याचा अर्थ असा की, पुरुष जन्मतः जैविकदृष्ट्या पुरुष असला, तरी त्याचे व्यक्तिमत्त्व, विचारसरणी, वागणूक, मूल्यव्यवस्था, जबाबदाऱ्या आणि सामाजिक भूमिका या जन्माने निश्चित होत नाहीत. त्या त्याच्या सभोवतालच्या समाज, संस्कृती, इतिहास आणि आर्थिक परिस्थिती यांच्या प्रभावातून घडत जातात. म्हणूनच एका साहित्यप्रवाहातील पुरुषप्रतिमा दुसऱ्या साहित्यप्रवाहातील पुरुषप्रतिमेपेक्षा भिन्न स्वरूपाची दिसते.

*** *** ***

फ- पुरुषवादी दृष्टिकोण आणि साहित्यनिर्मिती

मराठी साहित्य हे समाजजीवनाचे प्रतिबिंब मानले जाते. समाजातील बदलती मूल्यव्यवस्था, स्त्री-पुरुष संबंध, सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि मानवी जीवनातील विविध पैलू साहित्याच्या माध्यमातून प्रभावीपणे व्यक्त होत आले आहेत. दीर्घकाळ साहित्यचर्चेत स्त्रीवादाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असले, तरी आधुनिक काळात पुरुषांच्या अनुभवविश्वाचा, त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संघर्षांचा अभ्यास करणाऱ्या पुरुषवाद (Masculinism) या संकल्पनेकडेही अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले आहे. पुरुष हा केवळ सत्ताधारी किंवा वर्चस्वाचे प्रतीक म्हणून न पाहता, विविध सामाजिक अपेक्षा, सांस्कृतिक बंधने, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि मानसिक ताणतणाव, यांना सामोरे जाणारा मानवी व्यक्ती म्हणूनही अभ्यासला जाणे आवश्यक आहे, असे अलीकडे चर्चा केली जाते. त्यामुळे पुरुषवादी दृष्टिकोनातून साहित्याचा अभ्यास करणे, ही आजच्या काळाची आवश्यकता ठरते.

डॉ. मनोहर सुरवाडे हे समकालीन मराठी साहित्यविश्वातील महत्त्वाचे लेखक, विचारवंत आणि सामाजिक भान जपणारे साहित्यकार म्हणून परिचित आहेत. त्यांच्या साहित्यामध्ये समाजातील उपेक्षित घटक, मानवी नातेसंबंध, सामाजिक विषमता, मूल्यसंघर्ष तसेच स्त्री-पुरुषांच्या जीवनातील वास्तववादी अनुभवांचे प्रभावी चित्रण आढळते. त्यांच्या साहित्यकृतींमध्ये पुरुष पात्रांचे विविध पैलू, त्यांचे मानसिक द्वंद्व, कौटुंबिक जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा, आत्मसंघर्ष आणि बदलत्या सामाजिक

परिस्थितीतील त्यांची भूमिका अत्यंत सूक्ष्म आणि संवेदनशील पद्धतीने व्यक्त झाली आहे. 'पुरुषाच्या व्यथा' या काव्यसंग्रहाच्या मनोगतात यांनी लिहिले आहे की, "समकालीन समाजात सर्वच स्त्रिया आळशी, बेफिकीर व अहमी नाहीत; पण बऱ्याच शिक्षित गृहिणी तशा दिसून येतात. त्यामुळे अशा बायका ज्यांच्या नशिबात आल्या असतील त्याला हे 'पुरुषवादी' काव्य त्याच्या जीवनाचे प्रतिरूप वाटेल, असे अनुभव प्रस्तुत संग्रहात काव्यात्म पद्धतीने सांगितलेले आहेत." याची उदाहरणे समाजमाध्यमावर अनेक वेळा दिसून येतात.

'डॉ. मनोहर सुरवाडे यांच्या साहित्यामध्ये व्यक्त झालेल्या पुरुषवादी जाणिवा, पुरुष पात्रांची मानसिकता, सामाजिक स्थान, कौटुंबिक नातेसंबंध, स्त्री-पुरुष समतेविषयीचा दृष्टिकोन आणि आधुनिक समाजातील पुरुषाच्या बदलत्या भूमिकेचे विश्लेषण करणे अपेक्षित आहे. तसेच त्यांच्या साहित्यामधील पुरुषवाद हा स्त्रीविरोधी नसून मानवी मूल्यांवर आधारित, समतावादी आणि संवेदनशील विचारसरणीचा एक भाग आहे का, याचाही चिकित्सक विचार या अभ्यासात करण्यात येणार आहे. त्यांच्या साहित्यविश्वातील पुरुषवादी विचारांचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि सामाजिक संदर्भ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे मराठी साहित्यामधील पुरुषवादाच्या चिकित्सक अध्ययनाला नवी दिशा मिळण्यास मदत होईल, तसेच समकालीन साहित्यचर्चेमध्ये पुरुषवादी दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित होईल.

➢ पुरुषनामा

डॉ. मनोहर सुरवाडे यांचा 'पुरुषनामा' हा समकालीन मराठी साहित्यात पुरुषाच्या भावविश्वाला केंद्रस्थानी ठेवणारा वैशिष्ट्यपूर्ण काव्यसंग्रह आहे. मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्यप्रवाहाने स्त्रीच्या अनुभवविश्वाला अभिव्यक्ती दिली, त्याचप्रमाणे 'पुरुषनामा'मध्ये पुरुषाच्या भावनिक, मानसिक आणि सामाजिक अनुभवांना स्वतंत्र साहित्यिक अभिव्यक्ती प्राप्त झाली आहे. या संग्रहातील पुरुषवाद ही संकल्पना पुरुषाचे वर्चस्व सिद्ध करणारी नसून त्याच्या भावविश्वाला, आत्मसन्मानाला आणि मानवी अस्तित्वाला मान्यता देणारी आहे. त्यामुळे हा संग्रह स्त्रीवादाच्या विरोधात उभा राहत नाही; उलट स्त्री-पुरुष समानता, परस्पर सन्मान आणि संवाद यांचा पुरस्कार करतो.

लेखकाच्या मनोगतानुसार हा संग्रह पुरुषाच्या न बोलल्या गेलेल्या वेदना, भावनिक घुसमट, अपूर्ण प्रेम आणि सामाजिक अनुभवांचा जाहीरनामा आहे. समाजात पुरुषाला नेहमीच कठोर, भावनारहित आणि कणखर मानले जाते; मात्र त्यालाही प्रेम, विश्वास, संवाद आणि समजून घेण्याची आवश्यकता असते. या दडपल्या गेलेल्या भावविश्वाला काव्यरूप देण्याचा प्रयत्न पुरुषनामामध्ये दिसून येतो. त्यामुळे हा संग्रह केवळ वैयक्तिक अनुभवांपुरता मर्यादित राहत नाही; तर व्यापक सामाजिक वास्तवाशी संवाद साधतो.

१. पुरुषाचे भावविश्व : वेदना, उपेक्षा आणि भावनिक घुसमट : या संग्रहाच्या प्रारंभीच्या कवितांमध्ये पुरुषाच्या भावनिक वेदना, उपेक्षा,

नातेसंबंधांतील असुरक्षितता आणि मानसिक एकाकीपणाचे अत्यंत संवेदनशील चित्रण केले आहे. प्रेमसंबंधातील दुरावा, संवादाचा अभाव आणि अपेक्षाभंग, यांमुळे पुरुषाच्या मनात निर्माण होणाऱ्या भावनिक तणावाचे प्रभावी दर्शन घडते. कवी पुरुषाला कठोर किंवा वर्चस्ववादी म्हणून चित्रित करत नाही. उलट तो प्रेम करणारा, नातेसंबंध जपणारा आणि संवादाची अपेक्षा ठेवणारा संवेदनशील मनुष्य म्हणून समोर आणतो. भावनिक जखमा असूनही तो जीवनातील संघर्षांचा धैर्याने सामना करण्याचा प्रयत्न करतो. नात्यांतील विसंवादामुळे निर्माण होणारी मानसिक घुसमट, असुरक्षितता आणि तुटलेपण यांचे वास्तववादी चित्रण या कवितांमध्ये प्रकर्षाने दिसून येते. जसे -

"मला, पोहायचे होते गं

तुझ्या पुराचा जोर ओसरल्यावर

खळखळ वाहणाऱ्या नदीच्या पाण्यात

पण रौद्ररूप पाहून भीती होती मनात."

नाते टिकण्यासाठी उत्कटतेपेक्षा भावनिक समतोल, संयम आणि विश्वास अधिक महत्त्वाचे आहेत. प्रेमाचे सौंदर्य आवेगात नसून परस्पर सुरक्षिततेच्या अनुभूतीत आहे. या कविता पुरुषाच्या वेदनेतून स्त्रीविरोध मांडत नाहीत; तर पुरुषाच्या भावनिक अस्तित्वालाही सामाजिक मान्यता मिळावी, अशी भूमिका मांडतात. त्यामुळे या संग्रहातील पुरुषवाद

संघर्षातून नव्हे, तर संवेदनशीलता, आत्मसन्मान आणि मानवी भावनांच्या स्वीकारातून विकसित होताना दिसतो.

२. स्त्रीचे स्वातंत्र्य आणि पुरुषाचा आत्मसन्मान

पुरुषनामामधील चौथी कविता स्त्री-पुरुष नातेसंबंधांकडे पाहण्याचा समतावादी दृष्टिकोन स्पष्ट करते. कवी स्त्रीच्या स्वातंत्र्याचा पूर्ण स्वीकार करतो. स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार जगण्याचा, निर्णय घेण्याचा आणि स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जपण्याचा अधिकार आहे, ही भूमिका तो स्पष्टपणे मांडतो. याचबरोबर कवी पुरुषाच्या आत्मसन्मानालाही तितकेच महत्त्व देतो. नातेसंबंध परस्पर आदर, समजूतदारपणा आणि विश्वास यांच्या आधारावर उभे राहिले पाहिजेत, अशी त्याची भूमिका आहे. पुरुषाने स्त्रीवर अपेक्षांचे ओझे लादू नये, तसेच स्त्रीनेही पुरुषाच्या भावनिक गरजांची जाणीव ठेवावी, असे तो सुचवितो. जर एखादा संबंध परस्पर सन्मान, विश्वास आणि मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यात अपयशी ठरत असेल, तर अशा नात्यातून बाहेर पडण्याचा अधिकार पुरुषालाही आहे. ही भूमिका स्त्रीद्वेषावर आधारित नसून आत्मसन्मान, मानसिक आरोग्य आणि मानवी प्रतिष्ठेच्या जाणीवेवर आधारलेली आहे. त्यामुळे या संग्रहातील पुरुषवाद स्त्रीवादाचा विरोध न करता समानता, प्रतिष्ठा आणि मानवी मूल्यांशी सुसंवादी संवाद साधणारा विचारप्रवाह ठरतो.

३. संवाद, विश्वास आणि नातेसंबंधांची पुनर्बांधणी

कविता क्रमांक २० ते २६ मध्ये कवीचा दृष्टिकोन अधिक परिपक्व झालेला दिसतो. येथे पुरुष केवळ स्वतःच्या वेदना व्यक्त करत नाही; तर

संवाद, समजूतदारपणा आणि परस्पर विश्वास यांच्या आधारे नातेसंबंध टिकविण्याचा आग्रह धरतो. संशय, गैरसमज आणि आरोप-प्रत्यारोप यांमुळे नाती कमकुवत होतात; तर संवाद आणि विश्वास त्यांना दृढ करतात, असे कवी स्पष्ट करतो. समजून घेणे ही एकतर्फी प्रक्रिया नसून दोन्ही बाजूंनी प्रामाणिक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे तो अधोरेखित करतो. कवीच्या दृष्टीने स्त्री ही केवळ पत्नी किंवा प्रेयसी नसून जीवनसाथी, मैत्रीण आणि सहप्रवासी आहे. परस्पर विश्वास, भावनिक जवळीक आणि प्रामाणिक संवाद यांच्या आधारेच सहजीवन सुदृढ बनते. त्यामुळे या विभागातील पुरुषवाद संघर्षवादी नसून संवादवादी, समंजस आणि समतामूलक विचारसरणीचा पुरस्कार करणारा ठरतो.

४. श्रम, प्रतीके आणि पुरुषाचे रूपक

पुरुषनामाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण जीवनातील प्रतीके आणि रूपकांचा प्रभावी वापर. बैल, नदी, पाऊस, शेती, बीज, माती, झाड, रोप आणि ऋतू यांसारख्या प्रतिमांद्वारे कवी पुरुषाच्या मानसिक आणि भावनिक अवस्थेचे प्रभावी चित्रण करतो. बैलाचे रूपक पुरुषाच्या श्रमसंस्कृती, त्याग, सहनशीलता आणि अदृश्य भावनिक ओझ्याचे प्रतीक म्हणून कार्य करते. समाज पुरुषाकडून सतत जबाबदाऱ्या पार पाडण्याची अपेक्षा करतो; मात्र त्याच्या भावनिक गरजांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे बैल ही प्रतिमा त्याच्या निःशब्द श्रमांचे आणि अंतर्मनातील वेदनांचे प्रभावी प्रतीक बनते.

नदी आणि पाऊस या प्रतिमा प्रेम, आशा, विश्वास आणि सहजीवनाचे प्रतीक म्हणून वापरल्या आहेत.

संवादाचा अभाव निर्माण झाल्यास हाच पाऊस विनाशकारी पुरात रूपांतरित होतो, हे रूपक मानवी नात्यांतील बदलत्या वास्तवाचे सूचक ठरते. शेती, बीज आणि पेरणी या प्रतिमांमधून प्रेमातील गुंतवणूक, विश्वास, आशा आणि अपेक्षाभंग यांचे प्रभावी चित्रण केले आहे. ग्रामीण प्रतीकांच्या वापरामुळे संग्रहातील आशय अधिक जीवनानुभवसंपन्न आणि वास्तवाशी निगडित वाटतो. अशाप्रकारे 'पुरुषनामा' हा समकालीन मराठी साहित्यातील पुरुषाच्या भावविश्वाचा महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह आहे. पुरुषालाही भावना, वेदना आणि मानसिक संघर्ष असतात, याची जाणीव त्यातून करून दिलेली आहे.

डॉ. मनोहर सुरवाडे यांनी ग्रामीण प्रतिमा, संवेदनशील भाषा आणि जीवनानुभव यांच्या साहाय्याने पुरुषाच्या भावनिक विश्वाला साहित्यिक अभिव्यक्ती दिली आहे. त्यामुळे पुरुषनामा हा केवळ पुरुषाच्या वेदनांचा दस्तऐवज राहत नाही; तर स्त्री-पुरुष समानता, परस्पर आदर, सहजीवन आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारा महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह म्हणून समोर येतो. जसे-

"तुझं, काय ते सांगून पाहतो

पौर्णिमेच्या रात्रीला चंद्र भेटतो,

चांदणीला हसवून जातो."

या ओळींमध्ये कवी आपल्या मनातील प्रेमभावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. तो म्हणतो की, जशी पौर्णिमेच्या रात्री चंद्र आकाशात येऊन चांदण्यांना उजळवतो आणि त्यांना आनंद देतो, त्याचप्रमाणे मला तुझ्याशी माझ्या मनातील भावना व्यक्त करायच्या आहेत. चंद्राच्या आगमनाने जसा सर्वत्र प्रसन्नता आणि सौंदर्य निर्माण होते, तसाच तुझ्या सहवासाने माझ्या जीवनातही आनंद आणि समाधान निर्माण होते. या प्रतिमेतून कवी असे सूचित करतो की खरे पुरुषत्व हे वर्चस्वात नसून सहवासातून आनंद निर्माण करण्याच्या संवेदनशीलतेत आहे. नात्यातील प्रेम हे परस्पर आनंद, विश्वास आणि भावनिक समृद्धीवर आधारलेले असते. म्हणूनच या ओळींमधील पुरुषवाद हा प्रेम, सौंदर्य, समता आणि भावनिक सहअस्तित्वाचा पुरुषवाद म्हणून समोर येतो. यामुळे 'पुरुषनामा' हा समकालीन मराठी साहित्यामधील पुरुषवादी जाणिवांचा संवेदनशील, समतावादी आणि चिकित्सक दस्तऐवज म्हणून अभ्यासकांसाठी विशेष महत्त्वाचा ठरतो.

अशाप्रकारे पुरुषनामामध्ये स्त्री-पुरुष नातेसंबंधांचा पाया परस्पर आदर, विश्वास, समानता आणि संवाद यांवर आधारित असावा, अशी भूमिका सातत्याने मांडली जाते. ग्रामीण प्रतिमा, रूपके आणि संवेदनशील भाषेच्या माध्यमातून कवीने मानवी नात्यांतील गुंतागुंत, प्रेमातील आशा-निराशा आणि भावनिक वास्तव प्रभावीपणे व्यक्त केले आहे. त्यामुळे हा संग्रह केवळ पुरुषाच्या अनुभवांचा दस्तऐवज नसून स्त्री-पुरुष समानता, मानवी प्रतिष्ठा, मानसिक आरोग्य आणि सहजीवनाच्या मूल्यांचा पुरस्कार करणारा सामाजिक आशय असलेला काव्यसंग्रह ठरतो. तसेच अधिक मानवी, न्याय्य आणि समंजस समाजाची संकल्पना मांडणारी महत्त्वपूर्ण साहित्यकृती म्हणून लक्ष वेधून घेतो.

➢ तो-ती-ते मधील पुरुषवाद

‘तो-ती-ते’ हा डॉ. मनोहर सुरवाडे यांचा स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे तत्त्वज्ञान मांडणारा चिंतनप्रधान काव्यसंग्रह आहे. या संग्रहात 'तो' (पुरुष), 'ती' (स्त्री) आणि 'ते' (त्यांचे सहजीवन, कुटुंब व समाज) या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आदर्श सहजीवनाची संकल्पना व्यक्त केली आहे. या कविता प्रेम, विश्वास, समर्पण, जबाबदारी, संवाद, समता आणि नैतिक मूल्यांवर आधारलेल्या आहेत. त्यामुळे हा संग्रह केवळ भावकवितांचा न राहता स्त्री-पुरुष नातेसंबंधांचे सामाजिक व तात्त्विक विश्लेषण करणारा काव्यसंग्रह ठरतो.

कवीच्या मते, संसार हा एका व्यक्तीच्या त्यागावर किंवा वर्चस्वावर उभा राहत नसून स्त्री आणि पुरुष यांच्या समान सहभाग, परस्पर सहकार्य आणि सामायिक जबाबदारीतून घडत असतो. त्यामुळे प्रस्तुत पुरुषवादाचा पाया अधिकार, नियंत्रण किंवा वर्चस्व यांवर नसून कर्तव्य, संवेदनशीलता, समंजसपणा आणि सहकार्य या मूल्यांवर आधारलेला आहे. या काव्यसंग्रहातील नातेसंबंध मालकीच्या भावनेवर नव्हे, तर मैत्री, आत्मीयता, विश्वास आणि परस्पर समजुतीवर आधारलेले आहेत. जसे-

“ साध्यासुध्या घरात

तिने राजमहल सजवावा

जगण्याच्या लढाईत

राजवाडा टिकवून ठेवावा.” (पृ.११)

या काव्यपंक्तींमध्ये कवीने आदर्श वैवाहिक सहजीवनाची संकल्पना मांडली आहे. या काव्यपंक्तींमधून कवीचा विश्वास स्पष्ट होतो की, सुखी संसार एका व्यक्तीच्या त्यागावर उभा राहत नाही; तो दोघांच्या प्रेम, परिश्रम आणि सहकार्यानेच ‘राजमहल’ बनतो आणि संघर्षाच्या काळात ‘राजवाडा’ म्हणून टिकून राहतो. हेच या कवितेचे आणि कवीच्या समतामूलक पुरुषवादाचे मुख्य तत्त्व आहे. संसारातील प्रत्येक जबाबदारी स्त्री आणि पुरुष या दोघांनीही समानतेने स्वीकारावी, हा विचार प्रभावीपणे व्यक्त झाला आहे.

१. सहजीवनातील समान जबाबदारी : पुरुषवादाचा मूलाधार

या काव्यसंग्रहात संसारातील समान जबाबदारी ही पुरुषवादाची मूलभूत संकल्पना म्हणून मांडलेली आहे. कवीच्या मते आर्थिक, सामाजिक, भावनिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या केवळ एका व्यक्तीवर टाकणे योग्य नाही. स्त्री आणि पुरुष यांनी जीवनातील प्रत्येक सुख-दुःख, संघर्ष, निर्णय आणि जबाबदारी समानतेने स्वीकारली पाहिजे. प्रस्तुत विचारसरणीमध्ये संसार हा अधिकार गाजविण्याचा विषय नसून परस्पर सहकार्य, विश्वास आणि समन्वय यांवर आधारलेला सहजीवनाचा प्रवास आहे.

“साऱ्या नात्यांची गोट बांधून

तिने घराला घरपण द्यावे

तो राहीन तटभिंत बनून

तिनं जबाबदारीनं वागायचं.”

या काव्यपंक्तींमध्ये कवीने स्त्री-पुरुष सहजीवनाची परस्परपूरक संकल्पना मांडली आहे. ‘साऱ्या नात्यांची गोट बांधून’ या प्रतिमेत स्त्री ही कुटुंबातील विविध नात्यांना प्रेम, संवाद आणि आपुलकीच्या धाग्यांनी जोडणारी शक्ती म्हणून चित्रित झाली आहे. "घराला घरपण द्यावे" या ओळीत घराचे खरे सौंदर्य हे भौतिक वैभवात नसून नात्यांतील जिव्हाळा, ममता आणि भावनिक ऊब यांत आहे, असा आशय व्यक्त होतो.

घर सांभाळणे ही पत्नीची जबाबदारी मानून पती तिच्याकडून घरकामाच्या अपेक्षा करतो, मात्र त्याकडे ती दुर्लक्ष करते. इतरांच्या दृष्टीने ती चांगली वाटते. घरात तिचे वागणे कसे असते, हे फक्त तिच्या पतीला माहिती असते. त्यामुळे तिचे कोणी कौतुक केले तर त्याची विसंगती त्याला जाणवते. तो तिचे दोष सांगताना खाजगीत त्यांच्या भावना व्यक्त करतो की,

“ती कामचुकार आळशी

फोनवर असते मावशी

बोलत नाही नवऱ्याशी” (पृ.४९)

या काव्यपंक्तींमध्ये कवीने वैवाहिक जीवनातील एका नकारात्मक वास्तवाचे चित्रण केले आहे. येथे ‘कामचुकार’ आणि ‘आळशी’ ही

विशेषणे केवळ व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यांकडे निर्देश करत नाहीत, तर वैवाहिक नात्यातील जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या वृत्तीचे प्रतीक म्हणून वापरली आहेत. 'बोलत नाही नवऱ्याशी' या ओळीत अशा वर्तनाचा परिणाम पुरुषाच्या मानसिक आणि भावनिक जीवनावर होतो, हे सूचित केले आहे. याशिवाय कवी सांगतो की,

संसाराच्या दंगलीमध्ये

ती कुस्त्याच खेळत राहिली

धोबी पछाड मारून

त्याला मुकपणे जिंकत गेली (१५)

पती आपल्या वैवाहिक जीवनातील अनुभव आणि मनातील वेदना व्यक्त करतो. संसाराचे 'दंगल' आणि 'कुस्ती' हे रूपक वापरून तो वैवाहिक नात्यातील सततचा संघर्ष, मतभेद आणि मानसिक ताण यांचे चित्रण करतो. 'धोबी पछाड', 'डावपेच', 'आखाडा' आणि 'पहिलवान' या प्रतिमांद्वारे पत्नीने नात्यामध्ये वर्चस्व गाजविले किंवा आपल्यावर मानसिक दडपण आणल्याची भावना तो व्यक्त करतो. कवीच्या मते, पत्नीने संसाराला सहजीवन म्हणून न पाहता स्पर्धा किंवा संघर्षाचे मैदान बनवले आहे. त्यामुळे पतीला सतत पराभूत झाल्यासारखे, गप्प राहावे लागल्यासारखे आणि मानसिकदृष्ट्या दबलेले वाटते.

पत्नीने समजुतीपेक्षा वर्चस्व, संवादापेक्षा डावपेच आणि सहकार्यापेक्षा संघर्षाचा मार्ग स्वीकारल्याची तक्रार तो या कवितेत करतो. तेव्हा ही कविता पतीच्या दृष्टीकोनातून व्यक्त झालेली वैवाहिक तक्रार आहे. पत्नीच्या वागणुकीमुळे स्वतःला झालेली मानसिक घुसमट, पराभवाची भावना आणि भावनिक वेदना यांचे रूपकात्मक चित्रण यात केले आहे. त्यामुळे ही कविता पुरुषाच्या अनुभवांना आणि भावविश्वाला अभिव्यक्ती देण्याचा प्रयत्न करते; मात्र पत्नीच्या त्याग आणि समर्पणाबरोबरच तिच्या वागणुकीमुळे पतीवर होणाऱ्या मानसिक परिणामांचाही विचार केला पाहिजे, असे त्याला वाटते.

२. पुरुषाच्या भावनिक अस्तित्वाची मान्यता

कवी पुरुषाच्या भावनिक जगाला सामाजिक मान्यता देण्याचा प्रयत्न करतो. भारतीय समाजात पुरुषाला कठोर, भावनाशून्य आणि संकटांचा सामना करणारा व्यक्ती म्हणून पाहिले जाते. त्यामुळे त्याच्या दुःखाकडे, मानसिक ताणाकडे किंवा भावनिक अपेक्षांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. डॉ. मनोहर सुरवाडे या सामाजिक समजुतीला प्रश्न विचारतात आणि लिहितात की,

तो म्हणेल ते ते

तिने नाकारायचं नाही.

हौस तिचीही फिटेल,

नाटक करायचं नाही.(पृ. ४३)

या कवितेत पती आपल्या वैवाहिक नात्यातील भावनिक आणि शारीरिक निकटतेविषयीची अपेक्षा व्यक्त करतो. त्याच्या मते, पती-पत्नीच्या नात्यात प्रेम, आत्मीयता आणि परस्पर संमतीने व्यक्त होणारी इच्छा यांना महत्त्व असले पाहिजे. पतीची अपेक्षा अशी आहे की, पत्नीने त्याच्या प्रेमभावना किंवा सहजीवनातील इच्छांना सतत नकार देऊ नये. कारण पती-पत्नी दोघांच्याही इच्छा आणि भावनिक गरजा नैसर्गिक आहेत; त्यामुळे कृत्रिम संकोच किंवा दिखाऊ नकार न ठेवता त्या प्रामाणिकपणे व्यक्त व्हाव्यात.

पुढे याच कवितेत 'हौसेनंच हौसेला मोल द्यायचं असतं' या प्रतिमेतून कवी परस्पर इच्छांचा आदर करण्याचा विचार मांडतो. 'धरती-आभाळा'च्या नात्याचे रूपक वापरून तो पती-पत्नीचे नाते परस्परपूरक, नैसर्गिक आणि एकमेकांना प्रतिसाद देणारे असावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच 'पाऊस आणि वेल' यांची प्रतिमा परस्पर प्रतिसाद, स्नेह आणि निकटतेचे प्रतीक म्हणून वापरली आहे.

३. संवादाचा अभाव आणि मानसिक छळ

कवीने वैवाहिक नात्यातील आक्रमक, नियंत्रणवादी आणि असंतुलित वर्तनाचे रूपकात्मक चित्रण केले आहे. नियंत्रणाबाहेर गेलेल्या पत्नीमुळे पती-पत्नीमधील सततचा संघर्ष, आक्रमक संवाद आणि भावनिक तणाव याची काव्यात्म मांडणी केलेली आहे. जसे-

ती शेरास सव्वाशेर,

खूप झाले तिचे थेर.

त्याला रोज मरणयातना,

फाशीच बरी वाटली म्हण (पृ.२५)

या कवितेत कवी पतीच्या दृष्टीकोनातून वैवाहिक जीवनातील तीव्र मानसिक छळ, सततचे वाद आणि त्यातून निर्माण झालेली निराशा व्यक्त करतो. पत्नीला स्वतःपेक्षा अधिक आक्रमक, वर्चस्व गाजवणारी आणि प्रत्युत्तर देणारी व्यक्ती म्हणून चित्रित करतो. पतीच्या मनातील वैताग, असहायता आणि नाराजी व्यक्त होते. प्रत्यक्ष मृत्यूची इच्छा नसून, सततच्या मानसिक त्रासामुळे पतीला होत असलेल्या असह्य वेदनेचे अतिशयोक्तिपूर्ण चित्रण करतात. कवी येथे मानसिक छळाची तीव्रता अधोरेखित करतो. अर्थात या कवितेत कवी पतीच्या अनुभवविश्वातून वैवाहिक नात्यातील मानसिक छळ, भावनिक वेदना आणि असहायतेची भावना व्यक्त करतो. पत्नीच्या सततच्या वादग्रस्त आणि आक्रमक वागणुकीमुळे पतीचे मानसिक संतुलन, आत्मविश्वास आणि जगण्याचा उत्साह ढासळल्याची जाणीव या कवितेतून मांडली आहे. त्यामुळे ही कविता पतीच्या अंतर्मनातील वेदना आणि मानसिक संघर्षाला अभिव्यक्ती देणारी ठरते.

४. हक्क, समान जबाबदारी आणि समान सन्मान

कवी प्रियकराच्या अनुभवातून प्रेमसंबंध आणि समाजव्यवस्था यांतील विसंगती व्यक्त करतो. समाजातील प्रस्थापित जेव्हा स्वतः संकटात, वेदनेत किंवा अन्यायाच्या परिस्थितीत असतात, तेव्हा ते लोकशाही, नैतिकता आणि मूल्यांची भाषा करतात. सत्ता आणि पैसा मिळवण्यासाठी लोकशाहीमूल्ये सांगतात, पण स्वतः पाळायची वेळ आली की, त्यांची भूमिका भूमिका वास्तवापासून दूर आणि औपचारिक वाटते, असे दुटप्पी लोकांचे मुखवटे कवितेत दाखविले आहे. जसे-

'स्त्री समानतेच्या आणि

न्यायाच्या गप्पा मारतानाही

त्याला ते दुय्यम दिसले.'(६९)

कवी प्रियकराच्या नजरेतून समाजावर टीका करतो. समाज स्त्री-समानता आणि न्याय यांची चर्चा करतो; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात तेच तत्त्व सर्वांवर समानपणे लागू होत नाहीत, अशी भावना प्रियकर व्यक्त करतो. त्यामुळे त्याला समाजाच्या बोलण्यात आणि कृतीत विसंगती जाणवते. तेव्हा प्रियकराच्या मनातील निरागस प्रेमभावना व्यक्त होतात. शिक्षणाच्या काळात त्याने प्रेयसीसोबत प्रेम, सहजीवन आणि भावनिक नात्याची स्वप्ने पाहिली होती. 'रेशीमगाठ' हे रूपक प्रेमातील कोमलता, विश्वास आणि आयुष्यभर टिकणाऱ्या भावनिक बंधाचे प्रतीक आहे. या कवितेत कवी प्रियकराच्या दृष्टीकोनातून समाजव्यवस्थेतील दुटप्पीपणा आणि प्रेमसंबंधातील अपेक्षा यांचा संबंध जोडतो. प्रियकराला असे वाटते की, समाज समानता आणि न्याय यांची भाषा करतो; परंतु त्याच्या स्वतःच्या

अनुभवात त्याला त्या मूल्यांचा समान प्रत्यय येत नाही. त्याच वेळी, प्रेयसीसोबतचे प्रेम आणि सहजीवन यांची त्याने पाहिलेली स्वप्नेही या वास्तवामुळे विस्कळीत झाल्याची भावना कवितेत व्यक्त होते.

अशाप्रकारे डॉ. मनोहर सुरवाडे यांचा तो-ती-ते हा काव्यसंग्रह समकालीन मराठी साहित्यातील पुरुषवादाला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह आहे. या संग्रहात पुरुषाला केवळ कर्ता, कमावता किंवा अधिकार गाजविणारा व्यक्ती म्हणून चित्रित केलेले नाही; तर भावनिक गरजा असलेला, प्रेमाची अपेक्षा करणारा, जबाबदाऱ्या पेलणारा आणि आत्मसन्मान जपणारा संवेदनशील माणूस म्हणून उभे केले आहे. या संग्रहातील पुरुषवादाचे प्रमुख आधारस्तंभ म्हणजे समान जबाबदारी, सहजीवन, संवाद, विश्वास, भावनिक सुरक्षितता, श्रमांचा सन्मान आणि मानवी प्रतिष्ठा हे होत. मात्र कवी पुरुषाच्या दृष्टीकोनातून त्याला जाणवलेल्या वेदना, मानसिक छळ, उपेक्षा किंवा भावनिक अपेक्षा व्यक्त करतो.

*** *** ***

➢ पुरुषाच्या व्यथा

डॉ. मनोहर सुरवाडे यांचा 'पुरुषाच्या व्यथा' हा कवितासंग्रह समकालीन मराठी कवितेत वेगळा ठरतो. मराठी साहित्यात स्त्रीवादी कवितेने स्त्रीच्या वेदना, शोषण, अन्याय आणि आत्मसंघर्ष यांना मोठ्या प्रमाणात अभिव्यक्त केले; परंतु पुरुषाच्या भावनिक वेदना, त्याची मानसिक घुसमट, वैवाहिक जीवनातील उपेक्षा आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत त्याच्या मनात निर्माण होणारे असुरक्षिततेचे भाव फार कमी प्रमाणात व्यक्त झाले आहेत. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न या संग्रहातून दिसतो. कवीने स्वतःच्या मनोगतात स्पष्ट केले आहे की, हा स्त्रीद्वेषाचा ग्रंथ नसून आधुनिक सहजीवनात पुरुषाच्या मनात निर्माण होणाऱ्या व्यथांचे भावविश्व मांडण्याचा प्रयत्न आहे.

या संग्रहातील कविता पती-पत्नीच्या नात्याभोवती फिरतात. विवाह ही केवळ सामाजिक संस्था नसून भावनिक, मानसिक आणि नैतिक जबाबदाऱ्यांची भागीदारी आहे, अशी कवीची धारणा आहे; परंतु आधुनिक काळात स्त्रीच्या स्वातंत्र्याबरोबर तिच्या कर्तव्यांविषयीची जाणीव कमी होत चालल्याचा अनुभव कवी अनेक कवितांमधून मांडतो. तरीही या संग्रहातील पुरुष हा कुठेही अधिकार गाजवणारा नसून, सहजीवनात प्रेम, समजूतदारपणा आणि भावनिक आधार शोधणारा व्यक्ती म्हणून उभा राहतो. संग्रहाच्या प्रारंभीच्या कवितांमध्येच वैवाहिक नात्यातील दुरावा प्रकर्षाने व्यक्त होतो.

जन्माचे जोडीदार

दोन हात दूर

नात्याची घरघर

वेगळे त्यांचे बिस्तर (पृ.८)

या चार ओळी संपूर्ण संग्रहाचा आशयसूत्रच ठरतात. एकाच घरात राहूनही मानसिकदृष्ट्या दूर गेलेल्या पती-पत्नीचे चित्र यातून उभे राहते. सहजीवनातील संवाद हरवल्यावर नाते केवळ औपचारिक उरते, ही जाणीव कवीला सतत अस्वस्थ करते. पुरुषाच्या भावनिक गरजांकडे समाज फारसे लक्ष देत नाही, ही भावना अनेक कवितांतून व्यक्त होते.

जगभराच्या जुनाट रीती

तिच्या डोक्यात भिनलेल्या.

भूतकाळात जाऊन बसते,

त्याला उदास बनवते. (पृ. ३५)

या कवितेत कवी पतीच्या दृष्टीकोनातून पत्नीच्या स्वभावाचा आणि तिच्या सामाजिक दृष्टिकोनाचा विचार मांडतो. पतीची भावना अशी व्यक्त होते की, पत्नी पारंपरिक सामाजिक रूढी, जुन्या समजुती आणि पूर्वग्रह यांच्या प्रभावाखाली वागते. तिच्या विचारांवर या परंपरांचा इतका प्रभाव

आहे की, ती वर्तमान परिस्थितीकडे मोकळ्या आणि सकारात्मक दृष्टीने पाहू शकत नाही. त्यामुळे पतीची तक्रार अशी आहे की, पत्नी वारंवार भूतकाळातील घटना, चुका किंवा कटू अनुभव यांचा उल्लेख करते. त्यामुळे वर्तमानातील नात्यात तणाव निर्माण होतो आणि पती मानसिकदृष्ट्या खिन्न होतो, त्यामुळे 'राबायचं कोणासाठी? कमवायचं कशासाठी?' या प्रश्नांमधून पती आपल्या परिश्रमामागील प्रेरणा हरवत चालल्याची भावना व्यक्त करतो. पत्नीकडून अपेक्षित भावनिक आधार, आनंद आणि सहकार्य मिळत नसल्यामुळे त्याच्या श्रमांचे सार्थकत्व त्याला प्रश्नांकित वाटू लागते. 'डोंगर पोखरून उंदीर हाती' ही म्हण त्याच्या अपेक्षाभंगाचे आणि प्रयत्नांनंतरही समाधान न मिळाल्याचे प्रतीक म्हणून वापरली आहे. या कवितेच्या शेवटच्या कडव्यात पती पत्नीकडून अपेक्षा व्यक्त करतो. तेव्हा 'तिने गढूळ पाण्याच्या अमृतधारा बनवावे' या रूपकातून तो असे सुचवितो की, पत्नीने कटुता, तणाव आणि नकारात्मकता यांचे रूपांतर प्रेम, शांतता आणि आनंदात करावे. 'नुसते शतायुष्य नको, आनंदाचे क्षण वाढवावे' या ओळींमध्ये पतीची भूमिका स्पष्ट होते की, त्याला केवळ दीर्घ सहजीवन नको आहे, तर त्या सहजीवनात आनंद, आत्मीयता आणि भावनिक समाधानही हवे आहे.

एकूणच कवी पतीच्या अनुभवातून पत्नीच्या स्वभावाविषयी अशी भावना व्यक्त करतो की, जुन्या सामाजिक समजुती आणि भूतकाळातील कटू अनुभव यांमुळे वैवाहिक नात्यात आनंद कमी होतो. त्यामुळे पत्नीने सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारून सहजीवनात प्रेम, उत्साह आणि भावनिक समाधान निर्माण करावे, अशी पतीची अपेक्षा या कवितेत व्यक्त

झाली आहे; परंतु त्याची अपेक्षेप्रमाणे पत्नी वागत नाही. तेव्हा त्याला वाटते की,

खेळ असू दे कोणताही,

ठरलेला असतो जय-पराजय.

जिंकण्यासाठीच खेळण्याची

नको मनाला सवय (पृ. ६५)

या कवितेत कवी पतीच्या दृष्टीकोनातून वैवाहिक नात्याविषयी एक महत्त्वाचा विचार व्यक्त करतो.संसारातील मतभेद, वाद किंवा प्रसंग यांची तुलना खेळाशी करतो. प्रत्येक मतभेदात एखाद्याचा विजय आणि दुसऱ्याचा पराभव असा विचार नैसर्गिक असला, तरी तो सहजीवनासाठी हितकारक नसल्याचे पतीला वाटते. त्याच्या मते, पती-पत्नीच्या नात्याकडे स्पर्धा किंवा वर्चस्व सिद्ध करण्याचे माध्यम म्हणून पाहू नये. प्रत्येक प्रसंगात स्वतःच जिंकण्याची मानसिकता नात्यात दुरावा, अहंकार आणि संघर्ष निर्माण करते, अशी त्याची भावना आहे. या कवितेत कवी पतीच्या अनुभवातून असे प्रतिपादन करतो की, वैवाहिक नाते हे विजय-पराजय ठरविण्याचे क्षेत्र नसून सहजीवनाचे नाते आहे. नात्यात सतत स्वतःच जिंकण्याची वृत्ती स्वीकारल्यास परस्पर समज, आत्मीयता आणि सहकार्य कमी होते, अशी पतीची भावना या कवितेतून व्यक्त झाली आहे. त्यामुळे पतीच्या दृष्टीने सहजीवनात स्पर्धेपेक्षा नाते टिकविणे अधिक महत्त्वाचे आहे.

वैवाहिक नात्यात केवळ शारीरिक सहवास पुरेसा नसतो; भावनिक जवळीक, एकमेकांच्या मनाचा विचार आणि आत्मीय संवादही तितकाच आवश्यक असतो. पत्नी भावनिकदृष्ट्या दूर गेल्याची जाणीव झाल्यावर पती स्वतःला एकाकी आणि पोरका अनुभवतो. हीच त्याच्या अंतर्मनातील वेदना अत्यंत संयत आणि प्रभावी प्रतिमांद्वारे व्यक्त केलेल्या आहेत. याशिवाय तिने मुलांवर चांगले संस्कार टाकावे, असेही कुटूंबकर्त्या पुरुषाला वाटते. जसे-

जगण्याच्या लढाईत

मुले संघर्ष करतील असे,

त्यांना बनवावे कणखर,

धडे शिकवावे हळुवार (पृ. ७०)

या कवितेत कवी शिक्षित स्त्रीच्या मातृत्वाची सामाजिक जबाबदारी अधोरेखित करतो. याच कवितेत शिक्षित स्त्रीच्या मातृत्त्वाची जबाबदारी आणखी अधोरेखित केलेली आहे. तिने शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक आकर्षण किंवा बाह्य व्यक्तिमत्त्वापुरता मर्यादित न राहता समाजोपयोगी कार्यासाठी व्हावा. म्हणून या कवितेत 'नटणे-थटणे' ही प्रतिमा बाह्य गोष्टींमध्ये अधिक गुंतण्याचे प्रतीक म्हणून वापरली आहे. तसेच शिक्षित आईने आपल्या ज्ञान, अनुभव आणि कर्तृत्वाची ऊर्जा मुलांच्या व्यक्तिमत्त्वात रुजवावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो. त्यासाठी 'बारूद' आणि 'सुरुंग' ही प्रतिमा येथे विध्वंसासाठी नसून सामर्थ्य, जिद्द

आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याच्या क्षमतेचे प्रतीक म्हणून वापरली आहे. कठोर संस्कारांबरोबर माया, संयम आणि संवेदनशीलतेलाही महत्त्व दिले आहे.

मुलांसमोर उच्च आदर्श ठेवण्याचा आग्रह धरतो. मुलांनी आदर्श व्यक्तिमत्त्वांचे अनुकरण करून चारित्र्य, कर्तृत्व आणि मूल्यनिष्ठा अंगीकारावी, अशी अपेक्षा तो व्यक्त करतो. या कवितेत कवी शिक्षित आईकडून केवळ कुटुंबाची जबाबदारी नव्हे, तर भावी पिढी घडविण्याची सामाजिक भूमिका अपेक्षित करतो. तिच्या शिक्षण, संस्कार आणि जीवनमूल्यांच्या माध्यमातून मुलांमध्ये संघर्षशीलता, चारित्र्य, कर्तृत्व आणि आदर्श जीवनदृष्टी निर्माण व्हावी, हीच या कवितेतून व्यक्त झालेली कवीची भूमिका आहे.

कवीच्या मते पत्नी ही गृहलक्ष्मी, अर्धांगिनी आणि संस्कारक्षम माता असावी. तिने घराला घरपण द्यावे. या अपेक्षा पारंपरिक भारतीय कुटुंबव्यवस्थेतून आलेल्या आहेत. आधुनिक स्त्रीच्या बदलत्या भूमिकेकडे कवी संशयाने पाहतो. टीव्ही, मोबाईल, करिअर, माहेर, कायदे, अधिकार, यांमुळे घर आणि कुटुंब दुय्यम ठरत असल्याची त्याची भावना आहे. याच संदर्भात कवी मुलांच्या संगोपनावर विशेष भर देतो. 'शिकलेली आई, घर पुढे नेई.' आणखी पुढे तो म्हणतो, 'देवापेक्षाही आईबाप महान' धार्मिक कर्मकांडांपेक्षा मुलांचे संस्कार, शिक्षण आणि पालकांचा सन्मान यांना अधिक महत्त्व देण्याचा संदेश या कवितांमधून व्यक्त होतो. त्यामुळे संग्रह

केवळ पती-पत्नीच्या नात्यावर न थांबता कुटुंबसंस्थेच्या व्यापक प्रश्नांवरही भाष्य करतो. सासर–माहेर संबंधही संग्रहातील एक महत्त्वाचा विषय आहे. ‘त्या उपकारकर्त्यांना सुख द्यावं’ या ओळींमध्ये पतीच्या आई-वडिलांविषयी कर्तव्यभाव व्यक्त होतो. विवाहानंतर दोन्ही कुटुंबांना समान सन्मान मिळावा, अशी कवीची भूमिका आहे. त्यामुळे त्याच्या कवितेत संयुक्त कुटुंबव्यवस्थेची मूल्ये जपण्याचा प्रयत्न दिसतो.

संग्रहातील अनेक कविता स्त्रीच्या अधिकार जाणिवेवर टीका करतात. "तिला कायद्याची खुराक... सांगते ३९८ची सजा." तसेच, "त्याच्यावर दादागिरी करू नये." या ओळींतून आधुनिक कायद्यांचा गैरवापर होतो, अशी कवीची भावना व्यक्त होते. हा दृष्टिकोन स्पष्टपणे पुरुषवादी आहे. त्यामुळे संग्रह वाचताना कवीच्या अनुभवविश्वाला समजून घेणे आवश्यक ठरते.

भाषिक दृष्टीने या कविता अत्यंत सहज, बोलक्या आणि लोकभाषेच्या जवळ आहेत. ग्रामीण जीवनातील प्रतिमा—रान, पाऊस, मोर, चातक, मळा, पिके, बीज, वटवृक्ष—यांचा विपुल वापर आढळतो. त्याचबरोबर आधुनिक जीवनातील एसी, कुलर, मोबाईल, टीव्ही, बँकबॅलन्स, फ्यूज, करंट, स्टेअरिंग अशा प्रतिमाही आढळतात. त्यामुळे परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम कवितेत दिसतो. मात्र या संग्रहाच्या काही मर्यादाही आहेत. कवी संपूर्ण अनुभव पुरुषाच्या दृष्टीने मांडतो. स्त्रीच्या मनातील संघर्ष, तिच्या सामाजिक-मानसिक अडचणी किंवा बदलत्या वास्तवातील तिची बाजू फारशी व्यक्त होत नाही. अनेक कवितांमध्ये पत्नीकडून अपेक्षांची पुनरावृत्ती दिसते. त्यामुळे काही

ठिकाणी आशयात एकसुरीपणा जाणवतो. तसेच स्त्रीची भूमिका मुख्यतः गृहिणी, माता आणि समर्पित पत्नी या चौकटीतच पाहिली जाते.

आधुनिक स्त्रीच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा विचार तुलनेने कमी आढळतो. या मर्यादा लक्षात घेतल्या, तरी 'पुरुषाच्या व्यथा' हा संग्रह समकालीन मराठी पुरुषवादी कवितेचा एक वेगळा दस्तऐवज म्हणून महत्त्वाचा ठरतो. या कवितांमध्ये पुरुषाचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न नसून, त्याच्या भावनिक जखमा, सहजीवनातील अपेक्षा, मानसिक घुसमट आणि बदलत्या कौटुंबिक वास्तवाचे चित्रण आहे; म्हणूनच या कविता स्त्रीविरोधी न मानता, पुरुषाच्या मनातील वेदनांचे काव्यात्मक निवेदन म्हणून वाचणे अधिक योग्य ठरेल. कारण हा संग्रह आधुनिक वैवाहिक जीवनातील पुरुषाच्या अनुभवविश्वाचा काव्यात्मक दस्तऐवज आहे. स्त्रीवादी साहित्याच्या समांतर पुरुषाच्या भावविश्वालाही अभिव्यक्ती मिळू शकते, हे या संग्रहाने दाखवून दिले आहे. त्यामुळे समकालीन मराठी साहित्यात पुरुषवादी कवितेच्या अभ्यासासाठी हा संग्रह निश्चितच लक्षवेधी आणि चर्चास्पद ठरतो.

*** *** ***

➢ बाप : नाण्याच्या दोन बाजू

'बाप' ही केवळ एक व्यक्ती नसून भारतीय कुटुंबव्यवस्थेतील एक बहुआयामी सामाजिक संस्था आहे. तो एकाच वेळी पती, पिता, कर्ता, कमावता, रक्षक, तसेच अनेकदा स्वतःच्या गुण-दोषांशी झगडणारा माणूसही असतो. त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व एकरेषीय नसून नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे द्वंद्वात्मक आहे. एक बाजू त्याग, प्रेम, जबाबदारी आणि कष्टांची असते; तर दुसरी बाजू स्वार्थ, व्यसन, संशय, वासना, भ्रष्टाचार, बेफिकिरी आणि मानसिक दुर्बलतेची असू शकते.

'बाप : नाण्याच्या दोन बाजू' हा काव्यसंग्रह या दोन्ही प्रवृत्तींचा वास्तववादी आणि सामाजिक संदर्भात घेतलेला काव्यात्मक वेध आहे. प्रस्तुत लेखात या संग्रहातील 'दोषी बाप' या प्रतिमांचा केवळ नैतिक न्याय न करता, त्यांच्या सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक संदर्भांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हा लेख कवितांचा अर्थ उलगडण्याबरोबरच आजच्या पुरुषत्वाच्या आणि पितृत्वाच्या बदलत्या वास्तवाचाही विचार करतो.

• पहिल्या वीस कवितांतील पितृत्वाचा अंतर्मुख प्रवास

प्रस्तुत काव्यसंग्रहाच्या पहिल्या वीस कविता 'बाप' या व्यक्तिरेखेच्या सकारात्मक, संघर्षशील आणि मानवी बाजू उलगडून दाखवतात. या कविता केवळ एका व्यक्तीचे वर्णन करत नाहीत, तर भारतीय कुटुंबव्यवस्थेत जगणाऱ्या सामान्य पुरुषाच्या मानसिक, भावनिक आणि सामाजिक अवस्थेचे दस्तऐवजीकरण करतात. या कवितांतील बाप

देवत्व प्राप्त केलेला आदर्श पुरुष नाही; तो चुका करणारा, अपयश पचवणारा, वेदना लपवणारा आणि पुन्हा उभा राहणारा सामान्य माणूस आहे; म्हणूनच या कविता वास्तवाशी अधिक जवळच्या वाटतात.

संग्रहाची सुरुवात 'बाप' या कवितेने होते. येथे बाप म्हणजे केवळ कुटुंबाचा आर्थिक आधार नसून, संपूर्ण कुटुंबाला जोडून ठेवणारा अदृश्य धागा आहे. त्याच्या कष्टांचे मूल्य अनेकदा कोणालाच दिसत नाही; मात्र घराची चूल, मुलांचे शिक्षण आणि कुटुंबाची सुरक्षितता यामागे त्याचे निःशब्द श्रम उभे असतात. ही कविता पितृत्वाच्या मूलभूत संकल्पनेचा पाया रचते. जसे-

चालता चालता बाप ठेचकाळतो

आणि बऱ्याचदा रक्तबंबाळ होतो

याचा अर्थ फक्त शारीरिक ठेच नाही. आयुष्यातील संघर्ष, अपयश, आर्थिक संकटे, मानसिक वेदना, अपमान आणि जबाबदाऱ्यांचे ओझे यामुळे बाप वारंवार जखमी होतो. 'तरी तो कधीच रडत नसतो,

धावतच असतो.' अर्थात स्वतःच्या वेदना बाजूला ठेवून तो कुटुंबासाठी सतत झटत राहतो. त्याला थांबण्याची किंवा दुःख व्यक्त करण्याची मुभा नसते. कारण त्याच्यासाठी कुटुंबाची जबाबदारी स्वतःच्या दुःखापेक्षा मोठी असते; म्हणून 'मुलांचे अश्रू पुसण्याचे शर्थीचे प्रयत्न करतो.' ही सर्वात हृदयस्पर्शी ओळ आहे. स्वतः जखमी असतानाही, स्वतःचे अश्रू दाबून ठेवून, मुलांच्या डोळ्यात अश्रू येऊ नयेत किंवा आले

तर ते पुसण्यासाठी तो जीवापाड प्रयत्न करतो. स्वतःच्या वेदनांपेक्षा मुलांचे सुख त्याच्यासाठी अधिक महत्त्वाचे असते. एकूणच

'बाप' ही कविता सांगते की, बाप स्वतःच्या जखमा, वेदना आणि संघर्ष लपवून ठेवतो; पण मुलांच्या चेहऱ्यावर हसू टिकवण्यासाठी शेवटपर्यंत झगडत राहतो. त्याचे प्रेम मोठ्या शब्दांत व्यक्त होत नाही, तर त्याच्या निःशब्द त्यागात आणि अखंड धावपळीत दिसून येते.

त्यानंतरच्या 'उपेक्षित बाप', 'अपमानित बाप' आणि 'लाचार बाप' या कविता समाज आणि कुटुंबातील पुरुषाच्या अदृश्य दुःखाकडे लक्ष वेधतात. घरासाठी आयुष्य घालवणाऱ्या बापालाच वृद्धत्वात किंवा आर्थिक अडचणीच्या काळात उपेक्षा, अवमान आणि असहायता स्वीकारावी लागते. या कविता पुरुषाच्या भावनिक जखमा उघड करतात. समाजात स्त्रीच्या वेदनांवर चर्चा होते; पण पुरुषाच्या मौनातील वेदनांकडे फारसे लक्ष दिले जात नाही, हा प्रश्न या कवितांतून समोर येतो.

'स्वप्नाळू बाप' आणि 'कर्जबाजारी बाप' या कविता भारतीय मध्यमवर्गीय वास्तवाचे प्रभावी चित्रण करतात. मुलांचे शिक्षण, घर, भविष्य, प्रतिष्ठा यासाठी बाप सतत स्वप्ने पाहतो. त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी तो कर्जाच्या ओझ्याखाली दबतो; पण स्वतःच्या इच्छांना कायम बाजूला ठेवतो. येथे कवीने बापाच्या त्यागाला भावनिक गौरव न देता वास्तववादी पद्धतीने मांडले आहे.

'कमजोर बाप', 'भंगलेला बाप' आणि 'कोलमडलेला बाप', या कविता विशेष लक्षवेधी ठरतात. समाज पुरुषाकडून सतत कणखर

राहण्याची अपेक्षा करतो; परंतु प्रत्येक पुरुष मानसिकदृष्ट्या अभेद्य असतोच, असे नाही. अपेक्षाभंग, आर्थिक ताण, नात्यांतील तुटणं आणि अपयश, यामुळे तोही आतून कोसळतो. या कवितांमध्ये पुरुषाच्या मानसिक आरोग्याचा अत्यंत महत्त्वाचा विषय अप्रत्यक्षपणे पुढे येतो. हे चित्रण मराठी कवितेत तुलनेने दुर्मीळ आहे; परंतु हा संग्रह केवळ दुःखात अडकून राहत नाही. 'सावरलेला बाप', 'बदलणारा बाप' आणि 'समजून घेणारा बाप' या कविता आशावादाची दिशा दाखवतात. अनुभवातून शिकणारा, चुका स्वीकारणारा, स्वतःमध्ये बदल घडवणारा आणि कुटुंबाला समजून घेणारा पुरुष येथे दिसतो. ही परिवर्तनाची प्रक्रिया कृत्रिम नसून जीवनानुभवातून आलेली वाटते. त्यामुळे या कविता प्रेरणादायी ठरतात. जेसे, 'सावरलेला बाप' या कवितेतील ओळी फारच बोलक्या आहेत. त्यातून कवीने भूमिका मांडली हे की,

कुटुंबासाठी जगताना स्वतःचे अस्तित्व, मानसिक स्वास्थ्य आणि वैयक्तिक मर्यादा यांची जाणीव असणे आवश्यक आहे. सर्वांना आनंदी ठेवण्याच्या प्रयत्नात स्वतःला विसरण्यापेक्षा, भावनांवर संयम ठेवून विवेकाने निर्णय घेणे आणि स्वतःच्या आयुष्याची जबाबदारी स्वीकारणे हीच बापाच्या व्यक्तिमत्त्वातील परिपक्वता आहे. त्याची काव्यात्मक मांडणी केलेली आहे. या कवितेत कवी बापाच्या जीवनानुभवातून झालेल्या मानसिक परिवर्तनाचे चित्रण करतो. कुटुंबासाठी जगणारा, सर्वांना सांभाळण्याचा प्रयत्न करणारा आणि भावनांना प्राधान्य देणारा बाप जीवनातील अनुभवांमुळे वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारतो.

"बापाच्या ध्यानात आलं, जग भावनेच्या पायावर न्यायाच्या कॉलमवर चालत नसतं म्हणे कधी" या ओळींमध्ये बापाला जीवनातील एक कटू जाणीव होते. त्याच्या मते, जग नेहमी भावना किंवा न्यायाच्या तत्त्वांनुसार चालत नाही; अनेकदा व्यवहार, स्वार्थ आणि परिस्थिती यांनाच अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे तो केवळ भावनिक विचारांवर अवलंबून न राहता वास्तव समजून घेऊ लागतो. "सगळ्यांचेच मनं राखता-राखता बाप एकदम भानावर आला" या ओळीत बापाच्या स्वभावाचे चित्रण आहे. सर्वांना आनंदी ठेवण्याच्या प्रयत्नात त्याने स्वतःच्या भावना आणि गरजांकडे दुर्लक्ष केले होते. परंतु या प्रयत्नांची मर्यादा त्याला जाणवते आणि तो स्वतःच्या आयुष्याचाही विचार करू लागतो. "ज्याचे-त्याचे एक स्वतंत्र विश्व आहे, आपण उगीच का त्यात नाक खुपसायचं" या ओळींमधून बापाच्या विचारांमध्ये झालेला बदल स्पष्ट होतो. प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र जीवन, विचार आणि निर्णय असतात; त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात सतत हस्तक्षेप करण्याऐवजी त्यांना त्यांच्या मार्गाने जगू द्यावे, अशी भूमिका तो स्वीकारतो.

"आपणच आपली बॉण्ड्री सेट करायला हवी" या ओळीत कवी बापाच्या आत्मजागृतीचे चित्रण करतो. भावनिक नातेसंबंध जपत असतानाही स्वतःच्या मर्यादा निश्चित करणे, स्वतःच्या मनाचा आदर करणे आणि प्रत्येक जबाबदारी स्वतःवर घेऊ नये, ही जाणीव त्याला होते. "आतल्या आवाजाला साथ द्यावी, स्थिर भूमिका घ्यावी" या ओळींमध्ये बाप स्वतःच्या विवेकाला महत्त्व देण्याचा निर्णय घेतो. इतरांच्या अपेक्षांपेक्षा स्वतःच्या विचारांनुसार जगण्याचा आत्मविश्वास त्याच्यात निर्माण होतो. "सगळ्यांना खुश करण्याच्या नादात प्रेमाने धडपडणारा भावनाशील बाप

उगीच करून घेतो डोक्याला ताप" या ओळींमधून कवी बापाच्या स्वभावातील भावनिक ओढ स्पष्ट करतो. सर्वांना आनंदी ठेवण्याच्या प्रयत्नात तो स्वतःच मानसिक तणाव आणि दुःख ओढवून घेतो, ही त्याची जाणीव या कवितेत व्यक्त होते. शेवटच्या 'अखेर एका वळणावर शांत झाला आणि भावनांवर नियंत्रण ठेवू लागला' या ओळींमध्ये बापाच्या व्यक्तिमत्त्वातील परिपक्वता दिसून येते. तो भावनांना नाकारत नाही; परंतु त्यांच्यावर नियंत्रण ठेवून अधिक संतुलित आणि स्थिर जीवन जगण्याचा निर्णय घेतो, म्हणजे भावनाशील न होता लोकांप्रमाणे तो वागू लागतो.

'रहस्यमय बाप' या कवितेत पुरुषाच्या अंतर्मनाचा वेगळा पैलू समोर येतो. पुरुष अनेकदा स्वतःच्या भावना व्यक्त करत नाही. त्याचे प्रेम, चिंता, असुरक्षितता आणि भीती यांना शब्द नसतात. तो स्वतःभोवती मौनाचे कवच उभे करतो. त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व इतरांना गूढ वाटते. कवीने या मौनालाच कवितेचा आशय बनवले आहे. 'रडलेला बाप' आणि 'हसलेला बाप' या परस्परविरोधी कविता मानवी भावविश्वाचा सुंदर समतोल साधतात. समाज पुरुषाच्या अश्रूंना कमजोरी मानतो; पण येथे बाप रडतोही आणि मनापासून हसतोही. त्याच्या भावना दाबून न ठेवता त्या मानवी स्वरूपात स्वीकारल्या जातात.

'आंधळा बाप' या कवितेतील 'आंधळेपणा' हा शारीरिक नसून मानसिक आहे. अंधश्रद्धा, परंपरा, सामाजिक पूर्वग्रह किंवा चुकीच्या समजुतींमुळे माणूस वास्तवाकडे डोळसपणे पाहू शकत नाही. त्यामुळे ही कविता केवळ एका व्यक्तीची न राहता समाजाचीही समीक्षा बनते. 'संयमी बाप' आणि 'बाप : सच्चा दोस्त' या कवितांत पितृत्वाचे आधुनिक रूप

दिसते. पूर्वी अधिकार गाजवणारा बाप आता मुलांचा मित्र बनतो. संवाद, समजूतदारपणा आणि विश्वास यांच्या आधारावर नाते उभे राहत असल्याचे चित्र येथे दिसते. बदलत्या सामाजिक मूल्यांचे हे प्रभावी प्रतिबिंब आहे.

'थकलेला बाप' ही कविता शारीरिक थकव्यापेक्षा मानसिक थकव्याचे चित्रण करते. आयुष्यभर जबाबदाऱ्या पेलणारा माणूस एका टप्प्यावर थकतो; पण त्याला विश्रांतीची संधी मिळत नाही. त्याचा हा निःशब्द थकवा अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतीने व्यक्त झाला आहे. या विभागातील शेवटची 'बापाचा बळी' ही कविता संपूर्ण प्रवासाचा परिपाक ठरते. कुटुंब, समाज, परंपरा, आर्थिक जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या अपेक्षा यांच्यामध्ये अडकून शेवटी बळी पडणारा पुरुष येथे दिसतो. ही कविता पुरुषाचे उदात्तीकरण करत नाही; परंतु त्याच्या अस्तित्वातील शोकात्म वास्तव समोर आणते.

अशाप्रकारे या सर्व कवितांचा विचार केला असता असे लक्षात येते की, कवीने 'बाप' या व्यक्तिरेखेला एकसाची प्रतिमा दिलेली नाही. तो कधी स्वप्नाळू आहे, कधी अपमानित; कधी तुटलेला आहे, तर कधी पुन्हा उभा राहणारा. या कवितांचा केंद्रबिंदू पुरुषाचे गौरवीकरण नसून त्याचे मानवीकरण आहे. त्यामुळे हा संग्रह पितृत्वाच्या सामाजिक, मानसिक आणि भावनिक अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरतो.

भाषेच्या दृष्टीने पाहिले, तर कविता अत्यंत सरळ, बोलभाषेतील आणि संवादप्रधान आहेत. अनेक ठिकाणी म्हणी, रूपके, उपमा आणि दैनंदिन जीवनातील प्रतिमा वापरल्यामुळे आशय सहज पोहोचतो. प्रत्येक

कविता स्वतंत्र असली तरी सर्व कविता मिळून एका सामान्य भारतीय बापाच्या जीवनप्रवासाचे सलग कथानक उभे करतात. म्हणून हा संग्रह केवळ कवितांचा संच राहत नाही, तर पितृत्वाच्या अनुभवविश्वाचे समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय दस्तऐवज म्हणूनही महत्त्व प्राप्त करतो.

- **पुरुषप्रवृत्तीच्या अंधाऱ्या बाजूंचे वास्तवदर्शन**

प्रस्तुत संग्रहातील दुसरी बाजू ही 'वाईट बाप' दाखवण्यासाठी नाही; तर पुरुषाच्या नकारात्मक प्रवृत्ती, मानसिक दुर्बलता आणि सामाजिक विकृतींचा अभ्यास आहे. त्यामुळे हा भाग व्यक्तिनिंदेचा नसून मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय वाचन म्हणून पाहिले आहे. काव्यसंग्रहाचा उत्तरार्ध वाचताना प्रथमदर्शनी असे वाटते की, कवीने 'वाईट बापांची यादी' मांडली आहे; परंतु या कवितांचा आशय इतकाच नाही. या कविता प्रत्यक्षात पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वातील नकारात्मक प्रवृत्तींचे मानसशास्त्रीय दस्तऐवज आहेत. प्रत्येक कविता एका दोषावर बोट ठेवते; मात्र त्या दोषामागील सामाजिक, मानसिक, जैविक आणि सांस्कृतिक कारणांचाही विचार करायला भाग पाडते.

उदाहरणार्थ, 'बेइज्जत बाप' ही कविता केवळ अपमानित पुरुषाची कथा नाही. सन्मान गमावलेल्या व्यक्तीच्या आत्मविश्वासाचे विघटन कसे होते, हे ती दाखवते. सततचा अपमान माणसाला आतून पोखरतो. त्याचा परिणाम त्याच्या वर्तनावर, नातेसंबंधांवर आणि निर्णयक्षमतेवर होतो. जसे-

"मनं मारून जगणाऱ्या, दुसऱ्याच्या आयुष्यात इंटरेस घेणाऱ्या

मूर्खांच्या नादाला, बाप नाही लागला, सावरून धरले स्वतःला."

जे लोक स्वतःच्या इच्छा, विचार आणि स्वप्ने दडपून जगतात, सतत दुसऱ्यांच्या आयुष्यात डोकावतात, टीका-टिप्पणी करतात, अशा लोकांच्या प्रभावात बाप अडकत नाही. स्वतःला सावरुन स्वतःचे भान राखतो आणि त्यांच्या नकारात्मकतेपासून दूर राहण्याचा निर्णय घेतो आणि "धुतल्या तांदळाचे इथे कोण आहे? बापाच्या मनाला प्रश्न पडला." अर्थात या जगात कोणीही पूर्णपणे निर्दोष किंवा निष्कलंक नाही. प्रत्येकाकडून चुका होतात. मग इतरांच्या चुका काढणारे स्वतः किती परिपूर्ण आहेत? हा आत्मपरीक्षणाचा प्रश्न बापाला पडतो. "दिव्याखाली अंधार, मग प्रकाशाची हौस कशाला." ही एक रूपकात्मक ओळ आहे.

जे स्वतःचे घर, मन किंवा आयुष्यच उजळवू शकत नाहीत, ते बाहेर प्रकाश पाडण्याच्या किंवा मोठेपणा मिरवण्याच्या गोष्टी करतात. अशा दिखाऊपणाचा काय उपयोग, असा प्रश्न येथे उपस्थित केला आहे. तसेच "त्यांचं तसं आपलं आणि ऑनलाईनचं भूत काढून फेकलं.", असे कवी सांगतो. लोक काय म्हणतील, सोशल मीडियावरील दिखावा, सततची तुलना, इतरांच्या आयुष्यातील अनावश्यक रस आणि आभासी जगाचे आकर्षण या सर्वांपासून बापाने स्वतःला मुक्त केले. त्याने वास्तव आयुष्याला प्राधान्य दिले.

एकूणच या कवितेत बाप हा इतरांच्या मतांमध्ये, दिखाव्यात आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात अडकत नाही. तो स्वतःला सावरतो, जगातील अपूर्णता स्वीकारतो आणि वास्तव, स्वाभिमान व आत्मभान

यांची निवड करतो आणि तो 'स्टोइक बाप' म्हणून उभा राहतो. जीवनातील आघात स्वीकारून भावनिक संतुलन राखण्याचा त्याचा प्रयत्न हा पाश्चात्त्य ‘Stoicism’ या तत्त्वज्ञानाशी साधर्म्य दाखवतो. येथे कवी आदर्श पुरुष घडवत नाही; तर दुःखाला सामोरे जाण्याची मानसिक ताकद दाखवतो.

'युनिक बाप' या कवितेत प्रत्येक व्यक्तीची वेगळी ओळख अधोरेखित होते. समाजाच्या साच्यात न बसणारा माणूस स्वतःच्या विचारांनी जगतो. ही कविता व्यक्तिमत्त्वाच्या स्वतंत्रतेचा पुरस्कार करते; परंतु त्यानंतरच्या कविता हळूहळू व्यक्तिमत्त्वाच्या अंधाऱ्या प्रदेशात घेऊन जातात.'बाहेरख्याली बाप', 'देहासक्त बाप', 'वासनांध बाप' आणि 'कामुक बाप' या चार कविता केवळ लैंगिक विषय हाताळत नाहीत. त्या अनियंत्रित इच्छाशक्तीच्या परिणामांचा लेखाजोखा सांगतात. कवी या ठिकाणी स्पष्टपणे दाखवतो की,

"बाप मोहात अडकला

इच्छेचा दास बनला."

या दोन ओळींमध्ये संपूर्ण मानसशास्त्र दडलेले आहे. इच्छा जेव्हा विवेकावर मात करते, तेव्हा व्यक्ती स्वतःच्या मूल्यांनाही विसरते. त्यामुळे या कविता वासनेचा प्रचार करत नाहीत; तर तिच्या विध्वंसक परिणामांवर भाष्य करतात. 'संशयी बाप' मध्ये विश्वास हरवलेल्या मनाची शोकांतिका दिसते. संशय हा बाह्य परिस्थितीपेक्षा अंतर्मनातील असुरक्षिततेतून जन्म घेतो. त्यामुळे तो कुटुंबातील प्रेम, संवाद आणि विश्वास यांना पोखरतो.

'व्यसनी बाप' ही कविता संग्रहातील सर्वाधिक प्रभावी कवितांपैकी एक वाटते. कवी लिहितो—

"पण, मेंदूतल्या डोपामाईनने

बाटलीत बुडविले."

ही ओळ विशेष उल्लेखनीय आहे. व्यसनाला केवळ नैतिक अपयश न मानता त्यामागील जैविक प्रक्रिया (डोपामाइन) सूचित करण्याचा प्रयत्न येथे दिसतो. त्यामुळे कविता उपदेशात्मक राहत नाही; ती आधुनिक मानसशास्त्राशी संवाद साधते. तसेच—

"शुद्धीतल्यापेक्षा, पिल्यावर खरं बोलतात,

मनातलं सारं ओकून टाकतात."

या ओळी व्यसनाधीन व्यक्तीच्या दडपलेल्या भावविश्वाकडे लक्ष वेधतात. तर 'चिडखोर बाप' ही कविता रागाच्या मानसशास्त्राचे चित्रण करते. बाहेरचा ताण घरात उतरतो. पत्नीवर होणारी चिडचिड ही केवळ स्वभावदोष नसून भावनिक व्यवस्थापनातील अपयश आहे. 'भित्रा बाप' मध्ये कवी आधुनिक मानसिक ताणाचे वास्तव पकडतो.

"व्हॅलिडेशन, अटेंशनचे भूत,

बापाला झपाटते."

सोशल मीडियाच्या युगात इतरांच्या मान्यतेवर अवलंबून राहणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे हे अत्यंत समकालीन चित्रण आहे. 'दरिद्री बाप' या कवितेतील दारिद्र्य आर्थिक नसून वैचारिक आहे.

"रिकामेच असते बापाचे डोके,

गरिबीचे पत्करतो धोके."

कवी येथे विचारांच्या दारिद्र्यालाच सर्वात मोठे दारिद्र्य मानतो. 'स्वार्थी बाप' आधुनिक उपभोगवादी संस्कृतीवर कठोर भाष्य करते.

"बाप घेण्यात पटाईत असतो,

देतांना पळ काढतो."

हे केवळ एका व्यक्तीचे चित्र नाही; तर संबंधही व्यवहार बनलेल्या समाजाचे चित्र आहे. तसेच 'आळशी बाप' आणि 'बेफिकीर बाप' या कविता निष्क्रियतेचे दुष्परिणाम दाखवतात. कवी आळसाला केवळ शारीरिक सवय मानत नाही; तो जीवनदृष्टीचा दोष ठरतो. 'भ्रष्ट बाप' मध्ये व्यक्ती आणि व्यवस्था यांचे नाते उलगडते.

"पैशांशिवाय फायली

साफ होत नसतात."

एका प्रतिमेत संपूर्ण प्रशासकीय भ्रष्टाचार उभा राहतो. 'आंधळा बाप' आणि 'बहिरा-मुका बाप' या कविता प्रतीकात्मक आहेत. येथे आंधळेपणा म्हणजे विवेकाचा अभाव, तर बहिरेपणा म्हणजे सामाजिक प्रश्नांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणे.

"डोळे दोन आणि बुद्धी एक,

करत नाही चेक."

ही ओळ व्यक्तीच्या चिकित्सक विचारशक्तीवर प्रश्न उपस्थित करते. 'खुदपसंत बाप' मध्ये आत्ममग्नतेचे दर्शन घडते.

"बेस्ट व्हर्जनचा मुखवटा,

त्याला फार थकवतो."

आधुनिक व्यक्तिमत्त्वविकासाच्या दिखाऊ संस्कृतीवर ही अत्यंत सूक्ष्म टीका आहे. शेवटची 'कामुक बाप' ही कविता सोशल मीडियाच्या युगातील भावनिक आणि लैंगिक शोषणाचे वास्तव मांडते.

"प्रेम समजून स्वतःला विसरला,

तिच्या जाळ्यात अडकला."

ही कविता केवळ पुरुषाच्या वासनेची नाही; तर डिजिटल युगातील भावनिक फसवणुकीचीही कथा आहे. या बावीस कविता वाचताना हे स्पष्ट

होते की कवीचा उद्देश पुरुषाला दोषी ठरवणे नाही. उलट, पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वात दडलेल्या अंधाऱ्या कोपऱ्यांकडे समाजाचे लक्ष वेधणे हा आहे. व्यसन, संशय, स्वार्थ, भ्रष्टाचार, वासना, आळस, आत्ममग्नता, भीती आणि वैचारिक दारिद्र्य या सर्व प्रवृत्तींचे मूळ मानवी मनात आहे; म्हणून या कविता एका व्यक्तीच्या नव्हे, तर समकालीन समाजाच्या मानसिक आरशाच्या कविता ठरतात. याच अर्थाने 'बाप : नाण्याच्या दोन बाजू' हा संग्रह व्यक्तीचे चरित्र लिहीत नाही; तो पुरुषप्रवृत्तीचे मानसशास्त्र लिहितो. हीच या काव्यसंग्रहाची वैशिष्ट्यपूर्ण आणि साहित्यदृष्ट्या महत्त्वाची देणगी आहे.

अशाप्रकारे 'बाप : नाण्याच्या दोन बाजू' हा काव्यसंग्रह केवळ बाप या नात्याचा गौरव किंवा निषेध करणारा नाही; तर पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण वेध घेणारा संग्रह आहे. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध या दोन टोकांच्या प्रतिमा प्रत्यक्षात दोन वेगळ्या व्यक्तींच्या नसून, एका पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वातील दोन संभाव्य प्रवृत्तींचे दर्शन घडवतात; म्हणूनच हा संग्रह कोणत्याही एका बाजूचा पुरस्कार करत नाही. तो वाचकाला स्वतःच्या वर्तनाचा आरसा दाखवतो. कवीने 'बाप' या व्यक्तिरेखेचा उपयोग करून केवळ कौटुंबिक जीवनच नव्हे, तर आधुनिक समाजातील नैतिक, मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचेही प्रभावी चित्रण केले आहे. प्रस्तुत काव्यसंग्रह पितृत्वाचे गौरवगान किंवा दोषारोप न ठरता, पुरुषप्रवृत्तीच्या प्रकाश आणि अंधाराचा संतुलित काव्यदस्तावेज म्हणून मराठी साहित्यात वेगळे स्थान निर्माण करतो.

*** *** ***

➢ 'जन्मपत्र' कादंबरीतील पुरुषवादी दृष्टिकोन

मराठी कादंबरीच्या परंपरेत प्रेम हा विषय नवा नाही; परंतु बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक वास्तवामुळे प्रेमाच्या अभिव्यक्तीचे स्वरूप सातत्याने बदलत गेले आहे. पूर्वीच्या प्रेमकथांमध्ये प्रेमाचा शेवट प्रामुख्याने मिलन, विरह किंवा त्याग या चौकटीत होत असे; परंतु समकालीन साहित्यामध्ये प्रेम ही केवळ भावनिक अनुभूती न राहता आत्मशोध, मानसिक संघर्ष, अस्तित्ववादी प्रश्न आणि सामाजिक मूल्यांच्या संघर्षाचा विषय बनले आहे. आधुनिक माणसाच्या नातेसंबंधांमध्ये भावनिक जवळीक, व्यक्तिस्वातंत्र्य, नैतिकता, लैंगिकता, आत्मसन्मान आणि वैयक्तिक ओळख, या सर्वांचा परस्परसंबंध अधिक गुंतागुंतीचा झाला आहे. त्यामुळे आधुनिक प्रेमकथा ही केवळ दोन व्यक्तींची कथा राहत नाही; ती मानवी मनाच्या गुंतागुंतीचा शोध घेणारे साहित्यरूप ठरते. त्यातून पुरुषाची प्रतिमा उजागर होते.

'जन्मपत्र' ही अशाच प्रकारची एक वैशिष्ट्यपूर्ण पत्रात्मक कादंबरी आहे. तिचे कथानक बाह्य घटनांपेक्षा अंतर्मनातील प्रवासावर अधिक आधारलेले आहे. संपूर्ण कादंबरीत नायकाने 'प्रिय फ्रेशर' या संबोधनाने लिहिलेली बेचाळीस पत्रे आहेत. ही पत्रे प्रत्यक्ष संवादापेक्षा अधिक आत्मसंवादी स्वरूपाची आहेत. पत्रामध्ये एकतर्फी संवाद असणे स्वाभाविक आहे. त्यामध्ये एका प्रोजेक्ट मॅनेजर आणि त्याच्यासोबत काम करणाऱ्या तरुण इंजिनिअर मुलीमधील भावनिक नात्याचा क्रमशः उलगडा होत जातो. या नात्याची सुरुवात मार्गदर्शन, विश्वास आणि जिव्हाळ्यापासून होते; त्यानंतर आकर्षण, प्रेम, अपेक्षा, गैरसमज, नैतिक

द्वंद्व, शारीरिक जवळीकविषयीचे मतभेद, विरह आणि अखेरीस आत्मजागृतीपर्यंत त्याचा प्रवास पोहोचतो.

या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ती केवळ प्रेमभंगाची कहाणी सांगत नाही; तर प्रेमाच्या अनुभवाचे मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय आणि तत्त्वज्ञानात्मक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करते. नायक स्वतःच्या अनुभवांकडे केवळ भावनिक दृष्टीने पाहत नाही, तर त्यांचा अर्थ लावण्यासाठी विविध विचारवंतांच्या संकल्पनांचा आधार घेतो. फ्रॉईड, कार्ल जंग, ओशो, शोपेनहावर, नीत्शे, कामू, गुर्जिएफ, जॉन बोल्बी, एस्थर पेरेल, एमिल दुर्खीम, अशा विविध विचारवंतांचे संदर्भ कथानकात येतात. त्यामुळे ही कादंबरी कथानक आणि चिंतन यांचा संगम साधण्याचा प्रयत्न करते.

कादंबरीतील सर्व कथन नायकाच्या दृष्टीकोनातून घडते. त्यामुळे वाचकाला फ्रेशरचे मन थेट समजत नाही; तिचे व्यक्तिमत्त्व नायकाच्या स्मृती, अनुभव आणि अर्थलावण्याच्या प्रक्रियेतूनच उभे राहते. ही एकतर्फी कथनरचना या कादंबरीचे एक महत्त्वाचे शैलीवैशिष्ट्य आहे. परिणामी, वाचकास प्रत्येक विधान हे अंतिम सत्य म्हणून नव्हे, तर कथनकर्त्याच्या अनुभूती आणि त्याच्या मानसिक प्रवासाचा भाग म्हणून स्वीकारावे लागते. पत्ररूपामुळे या कादंबरीला आत्मकथनाची सहजता प्राप्त झाली आहे. प्रत्येक पत्र स्वतंत्र अनुभव मांडत असले, तरी सर्व पत्रे एकत्रितपणे वाचल्यास नायकाच्या भावविश्वातील क्रमिक परिवर्तन स्पष्ट होते. सुरुवातीच्या पत्रांमध्ये प्रेमाची उत्कटता, मध्यभागी भावनिक व मानसिक संघर्ष आणि उत्तरार्धात आत्मपरीक्षण, स्वाभिमान, अलिप्तता आणि

आत्ममुक्ती यांचा प्रवास दिसून येतो. त्यामुळे 'जन्मपत्र' ही केवळ प्रेमकथा राहत नाही; ती स्वतःला समजून घेण्याच्या प्रक्रियेची कथा बनते.

या कादंबरीत स्त्री-पुरुष संबंधांकडे पाहताना लेखकाने मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय चौकटींचा वारंवार आधार घेतला आहे. स्त्रीच्या भावनिक गरजा, सामाजिक संस्कार, विवाहसंस्था, लैंगिकतेविषयीचे दृष्टिकोन, पुरुषाची अपेक्षा, आत्मसन्मान, नैतिकता आणि वैयक्तिक स्वातंत्र्य या विषयांवर नायक चिंतन करतो. अनेक ठिकाणी तो स्वतःच्या चुकांची कबुलीही देतो; तर काही ठिकाणी फ्रेशरच्या वर्तनाचा अर्थ मानसशास्त्रीय सिद्धांतांच्या आधारे लावण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे ही कादंबरी भावनिक अनुभव आणि बौद्धिक चिंतन यांचा समांतर प्रवास घडवते.

'जन्मपत्र'चा उद्देश केवळ आशयसार सांगणे हा नाही. या कादंबरीचे रचनाशास्त्र, कथनतंत्र, पात्रनिर्मिती, मानसशास्त्रीय आशयसूत्रे, तत्त्वज्ञानात्मक संदर्भ, भाषा-शैली, प्रतीकात्मकता, तसेच तिची साहित्यिक सामर्थ्ये आणि मर्यादा, या अंगाने पुरुषवादी दृष्टीकोन तपासून पाहायचा आहे. यात जीवनात तुटलेला, फाटलेला उदासीन माणूस, त्याचा तोच जन्मावा लागतो, असे लेखक म्हणतो; म्हणून त्याने पत्राच्या रुपाने पुरुषाच्या जन्माची कहाणी तिच्या नावाने केलेली आहे. त्याचा जन्म असा-तसा नसतो. तो फार आगळावेगळा असतो. स्वतः स्वतःसाठी केलेला तो स्वीकार असतो. त्यामुळे 'जन्मपत्र'कडे केवळ एका अपूर्ण प्रेमकथेच्या रूपात न पाहता, आधुनिक मानवी नातेसंबंध, आत्मसंवाद आणि

आत्मजागृती यांचा शोध घेणारी एक वैचारिक आणि मानसशास्त्रीय स्वरुपाची पुरुषवादी कादंबरी म्हणून पाहणे अधिक समर्पक ठरेल.

➢ 'जन्मपत्र'चे स्वरूप आणि पत्रात्मक रचना

मराठी साहित्यात पत्रात्मक कादंबरीचा प्रकार नवीन नाही. हरिभाऊ आपटे, वि. स. खांडेकर, गंगाधर गाडगीळ यांच्यापासून ते समकालीन साहित्यापर्यंत पत्ररूपाचा उपयोग भावविश्व अधिक निकटतेने व्यक्त करण्यासाठी होत आलेला आहे. मात्र 'जन्मपत्र' या कादंबरीत पत्रात्मक रचनेचा उपयोग केवळ कथनतंत्र म्हणून केलेला नसून तो आत्मसंवाद, आत्मविश्लेषण आणि स्मृतींच्या पुनर्रचनेचे माध्यम म्हणून केला आहे. त्यामुळे ही कादंबरी पारंपरिक पत्रकादंबऱ्यांपेक्षा वेगळी ठरते.

संपूर्ण कादंबरी 'प्रिय फ्रेशर' या एकाच संबोधनाने सुरू होणाऱ्या बेचाळीस पत्रांमध्ये विभागलेली आहे. प्रत्येक पत्र स्वतंत्र अनुभव, प्रसंग किंवा चिंतन मांडते; परंतु सर्व पत्रे एकत्र वाचल्यास ती एका सलग मानसिक प्रवासाची नोंद असल्याचे स्पष्ट होते. या पत्रांचा कालानुक्रमिक क्रम जरी जाणवत असला, तरी कथन पूर्णपणे सरळ रेषेत पुढे जात नाही. वर्तमानातील अनुभवातून नायक वारंवार भूतकाळात जातो, एखाद्या छोट्याशा प्रसंगाचे नव्याने पुनर्वाचन करतो आणि त्या अनुभवाचा वर्तमानाशी संबंध जोडतो. त्यामुळे कथानकाची रचना स्मृतीप्रधान स्वरूपाची आहे.

या पत्रांची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे ती प्रत्यक्ष संवादासाठी लिहिलेली वाटत नाहीत. प्रत्येक पत्राचे संबोधन फ्रेशरकडे

असले, तरी प्रत्यक्षात नायक स्वतःशीच संवाद साधत असल्याचे जाणवते. अनेक ठिकाणी तो स्वतःच्या भावनांचा, चुकांचा, अपेक्षांचा आणि भ्रमांचा शोध घेतो. उदाहरणार्थ, प्रारंभीच्या पत्रांमध्ये तो तिच्या हसण्याचा, बोलण्याचा आणि विश्वासाचा अर्थ प्रेम म्हणून घेतो; पुढील पत्रांमध्ये त्या अर्थ लावण्यावरच प्रश्न उपस्थित करतो; तर उत्तरार्धात तो स्वतःच कबूल करतो की, काही निष्कर्ष हे त्याच्या अपेक्षांमधून निर्माण झाले होते. त्यामुळे ही पत्रे स्वतःच्या मनाचा आरसा बनतात.

पत्रात्मक शैलीमुळे लेखकाला भावनिक प्रामाणिकता प्राप्त झाली आहे. अनेक प्रसंगांमध्ये औपचारिक कथनाऐवजी थेट मनोगत व्यक्त होते. उदाहरणार्थ, सुरुवातीच्या पत्रांमध्ये नायक फ्रेशरविषयीचे आकर्षण व्यक्त करतो; मध्यभागी तिच्या मौनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न करतो; तर शेवटच्या पत्रांमध्ये स्वतःच्या स्वाभिमानाचा आणि आत्मजागृतीचा विचार करतो. त्यामुळे प्रत्येक पत्र हा मानसिक उत्क्रांतीचा एक टप्पा ठरतो. या पत्रांची रचना पाहिली असता कादंबरीचे साधारण तीन टप्पे लक्षात येतात.

पहिल्या टप्प्यात (प्रारंभीची पत्रे) ओळख, जिव्हाळा, विश्वास आणि भावनिक जवळीक निर्माण होत जाते. दुसऱ्या टप्प्यात (मध्यभागातील पत्रे) प्रेम, अपेक्षा, शारीरिक जवळीक, नैतिकता, सामाजिक बंधने आणि गैरसमज यांमुळे संघर्ष निर्माण होतो. तिसऱ्या टप्प्यात (उत्तरार्धातील पत्रे) नायक प्रेमापेक्षा आत्मपरीक्षण, आत्मसन्मान आणि आत्ममुक्तीकडे प्रवास करतो. या रचनेमुळे पत्रांची मालिका केवळ घटनांची नोंद न राहता व्यक्तिमत्त्वाच्या परिवर्तनाचा आलेख बनते.

या कादंबरीतील पत्रे दिनांकवार नाहीत. त्यामुळे वाचकाचे लक्ष कालगणनेपेक्षा अनुभवांच्या सलगतेकडे जाते. एखाद्या पत्रात वर्तमानातील विचार मांडले जातात, तर त्याच पत्रात अनेक वर्षांपूर्वीचा संवाद उद्धृत केला जातो. नायक वारंवार व्हॉट्सॲपवरील संवाद, कार्यालयातील प्रसंग आणि फ्रेशरने व्यक्त केलेली वाक्ये उद्धृत करून त्यांचा नंतरच्या अनुभवांच्या प्रकाशात अर्थ लावतो. अशाप्रकारे भूतकाळाचे पुनर्वाचन ही या कादंबरीच्या पत्ररचनेची मध्यवर्ती शैली ठरते.

कादंबरीतील प्रत्येक पत्राला स्वतंत्र शीर्षक नसून केवळ क्रमांक दिलेले आहेत. ही बाबही महत्त्वाची आहे. कारण त्यामुळे वाचकाचे लक्ष शीर्षकाकडे न जाता आशयाकडे केंद्रित राहते. प्रत्येक पत्र मागील पत्राचा विस्तार असल्यासारखे वाटते. त्यामुळे क्रमांक हे केवळ विभागसूचक राहत नाहीत; ते नायकाच्या भावनिक प्रवासातील टप्पे ठरतात. या पत्ररचनेतील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे एकदिशात्मक कथन. संपूर्ण कादंबरीत फ्रेशरचा स्वतंत्र आवाज ऐकू येत नाही. तिची वाक्ये, तिचे संदेश किंवा तिच्या प्रतिक्रिया याही नायकाच्या स्मृतीतूनच वाचकापर्यंत पोहोचतात. जसे, “एकदा व्हाट्सअपवर आपण बोलत असतांना मी तुला म्हटलं होतं, 'You are not eligible for friendship. You are only good at gossip and chatter. त्यावेळी तुला राग आला होता; पण त्यामुळे तू गैरसमज करून घेऊ नकोस.”(पृ.१२)

इथे नायक हा फ्रेशरच्या वागण्याविषयीचे स्वतःचे निरीक्षण व्यक्त करून तिला सांगतो. तिला रागावणे किंवा तिच्या चुका सांगणे, हा त्याचा हेतू नसतो; म्हणून तिने त्याच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढू नये किंवा

त्यातून कायमचा गैरसमज करून घेऊ नये, असेही तो सांगतो. म्हणजे भूतकाळातून वर्तमान काळात तिला घेऊन येतो आणि मैत्रीची जाणीव करून देतो. त्यामुळे वाचकाला उपलब्ध असलेले वास्तव हे नायकाच्या अनुभूतीतून गाळलेले वास्तव आहे. ही रचना साहित्यदृष्ट्या महत्त्वाची आहे, कारण त्यामुळे कादंबरीचा केंद्रबिंदू प्रेमसंबंध नसून त्या प्रेमाचा अनुभव घेणाऱ्या मनाचे विश्लेषण बनतो.

पत्रांमध्ये वारंवार उद्धरणांचा वापरही आढळतो. ओशो, फ्रॉईड, जंग, नीत्शे, शोपेनहावर, कामू, गुर्जिएफ, जॉन बोल्बी, एस्थर पेरेल यांसारख्या विचारवंतांचे संदर्भ नायक स्वतःच्या अनुभवांचे स्पष्टीकरण करण्यासाठी देतो. उदाहरणार्थ- "तुला सांगतो, 'सिग्मंड फ्रॉईडने महिलांच्या इच्छेचं काळं रहस्य शोधलं होतं. ते जगापासून लपवण्यात आलं होतं. स्त्रियांची इच्छा केवळ भावना नसते, तर एक मानसिक कूटनीती असते. हेतू साध्य करण्यासाठी विवेकी योजना त्या वापरतात. भावनेच्या आहारी जात नाहीत."(पृ.१९) असा स्त्रीचा स्वभाव सांगितला आहे. त्यामुळे पत्रांचे स्वरूप अनेक ठिकाणी वैयक्तिक अनुभव आणि वैचारिक चिंतन यांच्या संमिश्र रूपात बदलते.

पत्रात्मक रचनेचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे वाचक नायकाच्या भावनिक बदलांचा प्रत्यक्ष साक्षीदार बनतो. सुरुवातीच्या उत्कटतेपासून ते शेवटच्या अलिप्ततेपर्यंतचा प्रवास कोणत्याही बाह्य निवेदकाच्या हस्तक्षेपाशिवाय घडतो. त्यामुळे कथनात कृत्रिमता येत नाही; उलट त्याला आत्मस्वीकाराची प्रामाणिकता प्राप्त होते. याच कारणामुळे

'जन्मपत्र'ची पत्रात्मक रचना ही केवळ तांत्रिक निवड नसून कादंबरीच्या आशयाशी अभिन्नपणे जोडलेली आहे.

➢ नायकाचा भावनिक व मानसिक प्रवास : आत्मगुंतवणुकीपासून आत्ममुक्तीकडे

'जन्मपत्र' ही केवळ एकतर्फी प्रेमाची कथा नाही; ती एका व्यक्तीच्या भावनिक, मानसिक, वैचारिक आणि अस्तित्ववादी प्रवासाची नोंद आहे. पत्र क्रमांक १ ते ४२ पर्यंतचा नायक जसाजसा पुढे सरकतो, तसतसे त्याचे प्रेम, त्याच्या अपेक्षा, त्याची वेदना, त्याचे तत्त्वज्ञान आणि शेवटी त्याचा आत्मस्वीकार बदलत जातो. त्यामुळे या कादंबरीचा केंद्रबिंदू फ्रेशर नसून नायकाचे अंतर्मन आहे. हा प्रवास साधारणपणे चार टप्प्यांत विभागता येतो - (१) आकर्षण व भावनिक गुंतवणूक, (२) अपेक्षा, द्वंद्व व भ्रम, (३) आत्मपरीक्षण व वैचारिक परिवर्तन आणि (४) आत्ममुक्ती व स्वीकृती.

१ प्रारंभीचा टप्पा : आकर्षणातून भावनिक गुंतवणुकीकडे

पहिल्या पत्रांमध्ये नायक एका वरिष्ठ प्रोजेक्ट मॅनेजरच्या भूमिकेत दिसतो. फ्रेशर ही त्याच्या टीममध्ये नुकतीच आलेली अभियंता असते. सुरुवातीला तिच्या व्यक्तिमत्त्वातील निरागसता, प्रामाणिकपणा, मेहनती वृत्ती आणि विश्वासू स्वभाव यांचे त्याला आकर्षण वाटू लागते. मात्र हे आकर्षण केवळ शारीरिक स्वरूपाचे राहत नाही; ते हळूहळू भावनिक

गुंतवणुकीत रूपांतरित होते. तो तिच्या करिअरविषयी स्वतःची जबाबदारी कशी स्वीकारतो, याचे वर्णन करताना लिहितो, "तुझ्या चुका होऊ नयेत आणि काम नीट शिकता यावं, यासाठी मदत करून तुला पगारवाढीसाठी अर्थात प्रमोशनसाठी संरक्षण देत होतो." या विधानातून नायकाचे प्रेम सुरुवातीला काळजी आणि मार्गदर्शन या स्वरूपात व्यक्त होत असल्याचे दिसते. त्याला तिचे यश हे स्वतःच्या यशाइतकेच महत्त्वाचे वाटते.

२ भावनिक जवळीक आणि अपेक्षांचा विस्तार

जसजशी दोघांमध्ये मैत्री वाढते, तसतशी नायकाच्या अपेक्षाही वाढू लागतात. तो त्यांच्या नात्याला केवळ मैत्री म्हणून न पाहता आयुष्यभराच्या सहजीवनाच्या शक्यतेत रूपांतरित करू लागतो. तो स्पष्टपणे लिहितो, "मला वाटत होतं की, आपण लग्न नाही केलं, तरी कुठल्या ना कुठल्या कारणाने आपण एकत्र राहणार." ही ओळ नायकाच्या भावनिक गुंतवणुकीची पराकाष्ठा दर्शवते. येथे वास्तवापेक्षा आशा अधिक प्रभावी ठरते. याच पत्रात तो फ्रेशरच्या मौनाचा अर्थ स्वतःच्या अपेक्षांनुसार लावत असल्याचे कबूल करतो की, "'Hmm... I wish' असे सांगून 'बघू या काय होतं ते...' अशी तू पुष्टी केली होती. त्यावेळी तुझा होकार गृहीत धरला होता. आता वाटते, तो माझा एक वेडेपणा होता." ही कबुली महत्त्वाची आहे. कारण नायक प्रथमच स्वतःच्या अर्थ लावण्यातील चूक स्वीकारतो.

३ प्रेमातील द्वंद्व, नकार आणि मानसिक संघर्ष

नात्यातील सर्वात मोठा तणाव शारीरिक जवळीकीच्या प्रश्नावर निर्माण होतो. फ्रेशर सातत्याने भावनिक मैत्री मान्य करते; परंतु विवाहबाह्य

शारीरिक संबंधांना स्पष्ट नकार देते. ती म्हणते, "मला खरंच नाही आवडत तो नाश्ता... बाकी सगळं मान्य आहे; पण ती गोष्ट नाही." या नकारानंतर नायक स्वतःच्या मानसिकतेचे आत्मपरीक्षण करतो. तो लिहितो की, "मला वाटलं, तुझा नकार म्हणजे होकार आहे. हा समाजात पसरलेला गैरसमज माझ्याही ठिकाणी रुजलेला होता." ही ओळ संपूर्ण कादंबरीतील अत्यंत महत्त्वाच्या आत्मस्वीकृतींपैकी एक आहे. कारण येथे नायक स्वतःच्या विचारांची प्रामाणिक चिकित्सा करतो. तो नायिकेवर दोषारोप करत नाही; उलट पुरुषप्रधान संस्कृतीत रुजलेल्या त्या समजुतीवर प्रश्न उपस्थित करतो, ज्यानुसार स्त्रीचा 'नाही' हा अनेकदा 'हो' समजला जातो. प्रेम, आकर्षण आणि संमती यांविषयी समाजाने पुरुषांच्या मनात निर्माण केलेल्या चुकीच्या कल्पनांचा परिणाम स्वतःवरही झाला होता, याची तो स्पष्ट कबुली देतो. ही कबुली त्याच्या भावनिक परिपक्वतेचे आणि आत्मपरीक्षणाचे द्योतक आहे. त्यामुळे हा प्रसंग केवळ प्रेमभंगाचा राहत नाही, तर 'संमती, गैरसमज आणि सामाजिक संस्कार, यांवरील गंभीर भाष्य बनतो. नायकाची ही आत्मस्वीकृती त्याला दोष दुसऱ्यावर ढकलणाऱ्या व्यक्तीपासून स्वतःच्या चुकांची जबाबदारी स्वीकारणाऱ्या व्यक्तीमध्ये रूपांतरित करते; म्हणूनच ही ओळ केवळ कथानकासाठी नव्हे, तर संपूर्ण कादंबरीच्या वैचारिक आशयासाठीही मध्यवर्ती ठरते.

४ मानसशास्त्रीय स्पष्टीकरणांचा शोध

नकार स्वीकारताना नायक फ्रेशरच्या व्यक्तिमत्त्वाचा मानसशास्त्रीय अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो. तिच्या वर्तनामागे सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक आणि जैविक घटक कार्यरत असू

शकतात, असा तो विचार करू लागतो. तो लिहितो, "स्त्रीची कामेच्छा ही मानसिक, भावनिक, जैविक आणि सामाजिक घटकांचा मिश्र परिणाम आहे." पुढे तो तिच्या ताणतणावांचा उल्लेख करतो, "आई-वडिलांची जबाबदारी, भावाचे शिक्षण, बहिणीचे लग्न... त्यात तुझ्या कामेच्छा मरून गेल्या होत्या." येथे नायक तिच्या नकाराला वैयक्तिक अपमान न मानता जीवनस्थितीचा परिणाम म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न करतो. ही त्याच्या विचारातील परिपक्वता दर्शवणारी पायरी आहे.

५ आत्मपरीक्षणाचा टप्पा

प्रेमातील अपयशानंतर नायक बाह्य जगापेक्षा स्वतःच्या मनाकडे वळतो. तो स्वतःच्या इच्छांचा, अपेक्षांचा आणि आसक्तीचा शोध घेऊ लागतो. तो लिहितो, "प्रत्येक सवय तुटल्यावर माणसात बदल घडतो. मी तुझ्याविषयीच्या विचारांची सवय तोडून टाकली." त्याच पत्रात पुढे तो म्हणतो, "भ्रम आणि मायेतून बाहेर पडून वास्तव समजून घेतले." येथे प्रेमभंग हा केवळ वैयक्तिक दुःख न राहता आत्मपरिवर्तनाचा प्रारंभबिंदू ठरतो. त्यातूनच तो तिला सांगतो, “तू नाकारले खरे; पण मी स्वतःला तुटू दिले नाही. तुला सोडून पुढे-पुढे जाण्याची उर्जा निर्माण करीत गेलो. त्यावरून ‘मी दगड किंवा संवेदनशून्य बनलो.’, असे समजू नको.” अर्थात ‘भूतकाळात अडकून न राहता स्वतःच्या आयुष्याचा नवा मार्ग स्वीकारण्याचा तो प्रयत्न करतो. त्यासाठी भावनांवर नियंत्रण ठेवतो, तो काही तिच्याबद्दल राग नसतो.

६ तत्त्वज्ञानाच्या आधाराने आत्मपरिवर्तन

पत्रांच्या उत्तरार्धात नायक फ्रॉईड, कार्ल जंग, जॉन बोल्बी, एमिल दुर्खीम, एस्थर पेरेल, ओशो, नीत्शे, कामू, शोपेनहावर, गुर्जिएफ अशा विविध विचारवंतांच्या संकल्पनांचा आधार घेतो. मात्र तो त्यांचा वापर शास्त्रीय विवेचनासाठी करत नाही; तर स्वतःच्या अनुभवांचे स्पष्टीकरण करण्यासाठी तो लिहितो, "तुम्ही तुरुंगात आहात. जर बाहेर पडायचे असेल, तर आधी हे मान्य करा की, तुम्ही तुरुंगात आहात." ही कल्पना त्याच्या अंतर्गत आसक्तीच्या स्वीकृतीशी जोडली जाते. त्याचप्रमाणे तो ओशोचा संदर्भ देत म्हणतो, “जिथे पकड असते, तिथे प्रेम नसतं, तर तिथे असुरक्षितता असते.’ हे ओशोकडूनच शिकलो; म्हणून मला तुझ्याबाबत काही राग नाही.” असे तो सांगतो. म्हणजे तो फ्रेशरविषयी कटुता न ठेवता स्वतःच्या मुक्तीचा मार्ग निवडतो.

७ स्वाभिमान आणि आत्ममुक्ती

कादंबरीच्या उत्तरार्धात नायकाची भूमिका पूर्णपणे बदललेली दिसते. सुरुवातीचा प्रेमात आकंठ बुडालेला व्यक्ती आता स्वतःच्या स्वाभिमानाला अधिक महत्त्व देतो. तो लिहितो की, "आपल्याकडे जे आहे त्याचा उपयोग करावा; जे नाही त्याची आशा करू नये." तसेच "मी तुझा नाद सोडून स्वतःच्याच नादी लागलो होतो." ही ओळ नायकाच्या पराभवाची नव्हे, तर त्याच्या अंतर्गत विजयाची नोंद करते. प्रेमातून मिळालेल्या वेदनेला तो सूडात किंवा कटुतेत रूपांतरित करत नाही; उलट त्या वेदनेचे रूपांतर स्वतःला घडविण्याच्या ऊर्जेत करतो आणि

आत्मसन्मान, आत्मविकास, भावनिक स्वावलंबन आणि स्वतःशी पुन्हा जोडले जाणे, हे त्याला महत्त्वाचे वाटते. विशेषतः “तू मला नाकारले ते चांगलेच झाले. कारण मला कंपनीच्या सर्वोच्च पदावर जाऊन पोहचायचे होते. तुझ्या मागे लागून भिकारी व्हायचे नव्हते.” असे तो तिच्या तुटक वागण्याकडे पाहतो, म्हणजे तिच्या नकारामुळे तो स्वतःचे ध्येय सोडत नाही. उलट आत्मसन्मान जपतो.

८ समीक्षात्मक निरीक्षण

नायकाचा हा प्रवास साहित्यिक दृष्ट्या प्रभावी असला, तरी त्याचे कथन पूर्णपणे एकतर्फी आहे. फ्रेशरचे मन, तिच्या भावना किंवा तिच्या निर्णयांचे अंतिम सत्य वाचकापुढे येत नाही. त्यामुळे तिच्याविषयी नायकाने केलेली अनेक मानसशास्त्रीय स्पष्टीकरणे ही वस्तुनिष्ठ निष्कर्ष नसून कथनकर्त्याची अर्थरचना म्हणून स्वीकारावी लागतात. मात्र या मर्यादेसहही 'जन्मपत्र'चा नायक एका अपयशी प्रेमिकापासून स्वतःचे परीक्षण करणाऱ्या, स्वतःच्या भ्रमांची कबुली देणाऱ्या आणि आत्ममुक्तीकडे वाटचाल करणाऱ्या व्यक्तीमध्ये रूपांतरित होताना दिसतो. म्हणूनच या कादंबरीचा केंद्रबिंदू प्रेमप्राप्ती नसून स्वतःला ओळखण्याचा आणि स्वीकारण्याचा प्रवास हा आहे. हा प्रवासच 'जन्मपत्र'ला सामान्य प्रेमकथांपेक्षा अधिक वैचारिक आणि मानसशास्त्रीय स्वरूप प्रदान करतो.

➢ फ्रेशर : पात्र, प्रतीक आणि मौनाचे मानसशास्त्र

'जन्मपत्र'मधील फ्रेशर हे पात्र प्रत्यक्ष उपस्थित असले, तरी संपूर्ण कादंबरीत तिचा आवाज थेट ऐकू येत नाही. तिचे अस्तित्व नायकाच्या

स्मृती, उद्धरणे, व्हॉट्सॲपवरील संवाद आणि त्याच्या अर्थलावण्यामधून उभे राहते. त्यामुळे ती पूर्ण विकसित स्वतंत्र पात्र म्हणून नव्हे, तर नायकाच्या भावविश्वातील प्रतिबिंब, आधुनिक स्त्रीचे प्रतीक आणि मौनाच्या मानसशास्त्राची अभिव्यक्ती म्हणून समोर येते. या दृष्टीने फ्रेशर हे 'जन्मपत्र'चे सर्वाधिक गुंतागुंतीचे पात्र आहे. तिला पत्र लिहून झाल्या गेल्या गोष्टी आणि त्या दोघांमधील भावसंबंधाचे रूप त्याला सांगायचे आहे आणि तो तिच्या उत्तराची वाट न पाहता तो सांगतच असतो.

१ फ्रेशर : एक व्यक्ती की एक प्रतीक?

कादंबरीच्या प्रारंभी फ्रेशर एका नवोदित अभियंता म्हणून समोर येते. ती मेहनती, कर्तव्यदक्ष, कुटुंबाभिमुख आणि शिकण्याची तयारी असलेली तरुणी आहे. नायक तिच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना तिच्या व्यावसायिक प्रगतीसाठी स्वतः कशी मदत केली, याचा उल्लेख करतो. तो लिहितो, "तुझ्या चुका होऊ नयेत आणि काम नीट शिकता यावं, यासाठी मदत करून तुला पगारवाढीसाठी अर्थात प्रमोशनसाठी संरक्षण देत होतो." तसेच पुढे तो म्हणतो, "एक-दीड वर्षातच तुझे प्रमोशन होऊ शकले होते. तुला बारा लाखाचे पॅकेज मिळवून देण्यात मी यशस्वी झालो होतो." या संदर्भांमधून फ्रेशर ही केवळ प्रेमिका नसून स्वतःचे करिअर घडविणारी आधुनिक, सुशिक्षित स्त्री म्हणून उभी राहते.

२ मौनाची भाषा : नकार, संकोच आणि अपूर्ण संवाद

फ्रेशरच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे तिचे मौन. ती अनेकदा स्पष्ट उत्तर देण्याऐवजी मौन, संकोच किंवा अर्धवट

विधानांचा आधार घेते. नायक लिहितो, "'होकार' किंवा 'नकार' काहीच न देता मौन पाळले होते." पुढे तो तिच्या संदेशाचा उल्लेख करतो की, "कळतच नाही, का असे होते... बऱ्याचदा वाटते बोलावे; पण माहित नाही ना समोरचा कसे घेईल ते?" या वाक्यांमधून तिच्या व्यक्तिमत्त्वातील भावनिक संकोच, आत्मसंरक्षण आणि संवादातील असुरक्षितता व्यक्त होते. मात्र नायक या मौनाचा अर्थ स्वतःच्या अनुभवांनुसार लावतो. वाचकाला फ्रेशरची स्वतंत्र बाजू ऐकायला मिळत नाही. त्यामुळे तिचे मौन हे गूढ नसून एकतर्फी कथनामुळे निर्माण झालेली अर्थाची पोकळी ठरते.

३ भावनिक जवळीक आणि नैतिक मर्यादा

फ्रेशर नायकाविषयी आत्मीयता व्यक्त करते; पण ती त्या नात्याला ठरावीक मर्यादेपलीकडे जाऊ देत नाही. ती म्हणते, "माझे प्रमोशन होवो अथवा न होवो, तुमच्याशी माझे संबंध असेच शेवटपर्यंत स्वच्छ आणि निर्मळ राहतील." तसेच पुढे ती सांगते की, "तुम्ही समजून घेतात, हीच खूप मोठी गोष्ट आहे सध्या माझ्यासाठी." या विधानांमधून ती नायकाला महत्त्व देते; पण त्या नात्याला भावनिक मैत्रीच्या चौकटीतच ठेवू इच्छिते. आणि नैतिकतेच्या दृष्टीने "'तू दुसऱ्याला बदलू शकत नाहीस, फक्त स्वतःला कंट्रोल करू शकतोस.' हे समजलं. तेव्हापासून मी तेच करीत आलो आहे. माझं मन शांत करून आपले नातेही शांत ठेवले." त्याची ही भूमिका त्याच्या बदलण्यासाठी त्याने केलेली त्याच्या मनाची तयारी असते.

४ विवाह, निष्ठा आणि सामाजिक संस्कार

फ्रेशरच्या निर्णयांवर भारतीय सामाजिक मूल्यांचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. नायक तिच्या भूमिकेचे वर्णन करताना लिहितो, "तू तर त्या गोष्टी पाप समजत होती. पतीनिष्ठा मानून त्यांना धोका देऊ नये, असे सांगत होती." पुढे तिचे उत्तर उद्धृत करताना तो म्हणतो, "माणसाला कोणी बोलत नाही. त्याला सगळं माफ असतं. आम्ही काही केलं की शिक्षा मिळते." या संवादातून फ्रेशरच्या व्यक्तिमत्त्वातील लैंगिक दुहेरी निकषांविषयीची जाणीव दिसते. ती समाजातील स्त्री-पुरुषांवरील वेगवेगळ्या नैतिक अपेक्षांचा अनुभव व्यक्त करते आणि त्याच्या इच्छा पूर्ण करण्यास असमर्थता व्यक्त करते.

५ कुटुंबकेंद्री व्यक्तिमत्त्व

फ्रेशरच्या भावविश्वात प्रेमापेक्षा कुटुंबाची जबाबदारी अधिक प्रभावी आहे. नायक लिहितो, "आई-वडिलांची जबाबदारी, भावाचे शिक्षण आणि बहिणीचे लग्न... हे सगळं ओझं उतरावयाचं होतं." तसेच तो सांगतो, "तुझा भाऊ डॉक्टर झाला म्हणून समज... त्यासाठी आणखी प्रमोशनची तयारी करू." यावर फ्रेशरचे उत्तर आहे, "तसे झाले न सर, तर तुम्ही म्हणाल ते देईन मी. या संवादात प्रेमापेक्षा कौटुंबिक जबाबदारीचे प्राधान्य अधोरेखित होते. त्यामुळे तिच्या निर्णयांचे केंद्र वैयक्तिक इच्छा नसून कर्तव्यभावना आहे. तेव्हा ती नायकासाठी काहीही करायला तयार होते. त्याचे अर्थ त्याला लावता येत नाही.

६ फ्रेशरचे मानसशास्त्र : नायकाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न

उत्तरार्धातील पत्रांमध्ये नायक तिच्या व्यक्तिमत्त्वाचे मानसशास्त्रीय विश्लेषण करतो. तो लिहितो—

"स्त्रीची कामेच्छा ही मानसिक, भावनिक, जैविक आणि सामाजिक घटकांचा मिश्र परिणाम आहे." पुढे तो तिच्याविषयी म्हणतो की, "तुझ्या कामेच्छा मरून गेल्या होत्या." तसेच "तू चेतनाहीन राहायची... ती ऊर्जा तू दाबून ठेवल्याने तुला शारीरिक प्रॉब्लेमही निर्माण झाले होते." येथे नायक फ्रेशरच्या गतकालीन भावना तिला पत्रातून कळवतो. नंतर तो असेही सांगतो की, “नैतिकतेच्या नावाखाली दमन होऊन मानसिक स्वास्थ्य बिघडत असेल, तर तूच सांग, ‘ती नैतिकता काय कामाची आहे?” , परंतु तिच्या मनात काही वेगळेच असते, ते त्याला ती कळू देता नाही. तरीही तो भावनिक समतोल राखत जातो.

७ मौनाचे मानसशास्त्र

फ्रेशरचे सर्वात प्रभावी वैशिष्ट्य म्हणजे तिचे मौन. ती अनेकदा स्पष्ट उत्तर न देता वेळ मागते— "बघू या काय होतं ते..." किंवा "काही गोष्टींना वेळ लागतो; पण जेव्हा जे होतं ते बऱ्यासाठीच होतं." पुन्हा एका ठिकाणी ती म्हणते, "आता माझे लग्न झाले. मी कंपनी सोडणार आहे. तेव्हा आपण केवळ जास्त जवळ न आलेले बरे." ही वाक्ये स्पष्ट नकार नसून संयत अंतर राखण्याचा प्रयत्न आहेत. यामुळे फ्रेशरचे मौन हे निष्क्रिय नसून स्वतःच्या मर्यादा जपण्याचे साधन ठरते. त्यास त्याची भूमिकाही महत्त्वाची ठरते, ते त्याच्या म्हणण्याप्रमाणे की, “तू जशी आहे, तसा मी तुझा स्वीकार

केलेला आहे. तू बदलावं आणि माझ्या मनासारखं वागावं, असा फोर्स कधी केला नव्हता आणि करणारही नाही. स्वतः बदलणे माझ्या हातात आहे आणि मी बदलत जाणार आहे.” इथे तोही काही हट्ट धरत नाही. तिच्यावर सोपवून देतो.

८ प्रतीकात्मक अर्थ

साहित्यिक पातळीवर फ्रेशर ही एक व्यक्ती राहात नाही. ती अनेक स्तरांवर प्रतीक बनते. जसे, आधुनिक सुशिक्षित, करिअरकेंद्री स्त्रीचे प्रतीक. भारतीय सामाजिक मूल्यांशी बांधिल राहणाऱ्या स्त्रीचे प्रतीक. भावनिक जवळीक स्वीकारणाऱ्या; पण नैतिक सीमा ओलांडण्यास नकार देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक. पुरुषी अपेक्षा आणि स्त्रीच्या स्वायत्ततेतील संघर्षाचे प्रतीक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नायकाच्या आत्मशोधाची प्रेरक शक्ती. नायक स्वतः शेवटी लिहितो, "मी स्वतःच तुझ्यापासून दूर होणे पसंत केले." आणि पुढे म्हणतो की, "मी तुझा नाद सोडून स्वतःच्याच नादी लागलो होतो." यामुळे फ्रेशर हे पात्र नायकाच्या जीवनात प्राप्त प्रेमाचे नव्हे, तर आत्मजागृतीचे माध्यम ठरते.

- **मानसशास्त्रीय संकल्पनांचा वापर : अनुभव, आत्मविश्लेषण आणि अर्थनिर्मिती**

'जन्मपत्र'चे एक वैशिष्ट्य म्हणजे ही कादंबरी केवळ भावनांवर आधारलेली राहत नाही; तर प्रेम, आकर्षण, नकार, आसक्ती, अपराधभाव, स्वाभिमान आणि आत्ममुक्ती, यांसारख्या अनुभवांचे स्पष्टीकरण करण्यासाठी विविध मानसशास्त्रीय संकल्पनांचा उपयोग

करते. पत्र क्रमांक १ ते ४२ मध्ये नायक फ्रॉईड, कार्ल जंग, जॉन बोल्बी, एस्थर पेरेल, ओशो, गुर्जिएफ आदींच्या विचारांचा संदर्भ घेत स्वतःच्या अनुभवांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे कादंबरीतील मानसशास्त्र हे शुद्ध शैक्षणिक विवेचन नसून आत्मविश्लेषणाचे साधन बनते.जसे, अल्बर्टने माणसाच्या जगण्यातील 'अर्थहीनता' स्पष्ट केलेली आहे, त्याचे उदाहरण देऊन नायक फ्रेशरला सांगतो की, "'जीवन अर्थहीन असलं, तरी त्याला अर्थपूर्ण बनवणं आपल्याच हातात आहे.' हेही त्याचं मत महत्त्वाचं आहे. तुला तेच सांगत होतो की, अर्थपूर्ण जगून घे; पण भलत्याच खुळचट कल्पनांचे किडे तुझ्या डोक्यात साठले होते." असे तिला अनेक परीने समजावून सांगतो; परंतु ती तिच्या मताशी ठाम असते; म्हणून तो तिच्यापासून दूर जातो. तेही तिला सांगून जातो.

१ प्रेमाचे मानसशास्त्र : आकर्षणापासून भावनिक गुंतवणुकीपर्यंत

कादंबरीच्या सुरुवातीच्या पत्रांमध्ये प्रेम ही सहज निर्माण झालेली भावना म्हणून येते; मात्र पुढे नायक तिच्या मानसशास्त्रीय प्रक्रियेचा शोध घेतो. त्याच्या मते प्रेम केवळ शारीरिक आकर्षणावर उभे राहत नाही; तर विश्वास, सुरक्षितता आणि भावनिक जवळीक यांवर आधारलेले असते. तो फ्रेशरविषयी लिहितो—"तू जे जे सांगितले, ते ते सर्व समजून घेतलं होतं. त्यामुळे तू माझ्यावर खूप विश्वास ठेवला होता... तुला एक सुरक्षित भावना निर्माण होण्यासाठी प्रत्यक्ष कामंही केली होती." पुढे तो म्हणतो, "कोणत्याही शारीरिक स्पर्शापेक्षा तुला ते नातं खोल वाटलं होतं." या विधानांमधून नायक प्रेमाचा पाया भावनिक सुरक्षिततेमध्ये शोधतो. नंतर

त्याला तिची आसक्ती वाटते आणि भावनेकडून शरीराकडे त्याचे मन धाव घेते.

२ आसक्ती (Attachment) आणि जॉन बोल्बीचा संदर्भ

नायक जॉन बोल्बीच्या 'Attachment Theory'चा आधार घेत फ्रेशरच्या निर्णयांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. तो लिहितो, "स्त्रियांना सुरक्षित आधार हवा असतो. विवाह हे नाते बहुतेक वेळा हा सुरक्षित आधार देत असते. विवाहबाह्य संबंधामुळे हा आधार तुटू शकतो. त्यामुळे स्त्रिया अशा संबंधांपासून दूर राहतात." या संदर्भातून नायक फ्रेशरचा नकार हा स्वतःवरील अविश्वास नसून सुरक्षित नात्याच्या गरजेचा परिणाम असल्याचे मानतो. मात्र समीक्षकाच्या दृष्टीने येथे लक्षात येते की, बोल्बीचा सिद्धांत मूळतः बालपणीच्या भावनिक बंधांबाबत आहे; नायक त्याचा उपयोग स्वतःच्या प्रेमसंबंधाच्या स्पष्टीकरणासाठी करतो. त्यामुळे हा सिद्धांताचा वैयक्तिक अर्थविस्तार आहे.

३ फ्रॉईड आणि दडपलेल्या इच्छा

नायकावर फ्रॉईडचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. तो लिहितो, "फ्रॉईड यांच्या मते, स्त्रियांमध्येही या इच्छा असतात; पण त्या समाजामुळे दडपल्या जातात." तसेच पुढे तो म्हणतो, "फ्रॉईडने कामऊर्जा ही माणसाच्या वर्तनाची मुख्य शक्ती मानली होती." यातून नायक फ्रेशरच्या लैंगिक संकोचाचे स्पष्टीकरण दडपलेल्या इच्छांमधून करण्याचा प्रयत्न करतो. पुढे तो लिहितो, "ती ऊर्जा तू दाबून ठेवल्याने तुला शारीरिक प्रॉब्लेमही निर्माण झाले होते." समीक्षात्मक दृष्टीने पाहिले तर हा निष्कर्ष वैद्यकीय किंवा

मानसशास्त्रीय निदान म्हणून स्वीकारता येत नाही. तो नायकाच्या निरीक्षणातून निर्माण झालेला अर्थ आहे.

४ कार्ल जंग आणि भावनिक एकात्मता

फ्रॉईडनंतर नायक कार्ल जंगचा संदर्भ देतो. तो लिहितो, "कार्ल जंगच्या मते, ‘स्त्रीची कामवासना ही केवळ शारीरिक नसून आत्म्याशी आणि भावनिक जगाशी जोडलेली असते." तसेच "आधी भावनिक संबंध, मग आराम आणि सुरक्षितता, मग हळूहळू इच्छा निर्माण होते." या संदर्भातून नायक स्त्रीच्या भावनिक प्रतिसादाला क्रमिक मानसप्रक्रिया मानतो. त्यामुळे प्रेमाचे स्वरूप केवळ जैविक न राहता भावनिक बनते.

५ सामाजिक मानसशास्त्र आणि नैतिक नियंत्रण

नायक एमिल दुर्खीमचा आधार घेत सामाजिक संस्कारांचे मानसशास्त्र स्पष्ट करतो. तो लिहितो, "भारतीय समाजात स्त्रियांसाठी 'निष्ठा' आणि 'पावित्र्य' या मूल्यांना जास्त महत्त्व दिले जाते." यावरून तो निष्कर्ष काढतो की, "स्त्रियांचे वर्तन हे केवळ वैयक्तिक नसून समाजाच्या नियमांवर, नैतिक मूल्यांवर आणि सामाजिक नियंत्रणावर अवलंबून असते." येथे नायक फ्रेशरच्या निर्णयामागील कारण वैयक्तिक इच्छेपेक्षा सामाजिक संरचनेत शोधतो. त्यामुळे तो तिच्यावर धोकेबाजपणाचे आरोप करीत नाही. तिला समजून घेतो.

६ एस्थर पेरेल आणि नात्यातील अपराधभाव

नायक एस्थर पेरेल यांच्या विवाहबाह्य संबंधांविषयीच्या विचारांचा संदर्भ देऊन फ्रेशरच्या नकारामागील मानसिकतेचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. तो लिहितो की, "विवाहबाह्य संबंधांमुळे नात्यात विश्वासघात, अपराधीपणा आणि तणाव निर्माण होतो. या भावनिक गुंतागुंतीपासून वाचण्यासाठी स्त्रिया अशा संबंधांपासून दूर राहतात." या विधानाच्या आधारे नायक फ्रेशरच्या वर्तनाकडे केवळ नकार म्हणून पाहत नाही; तर तिच्या निर्णयामागील भावनिक आणि नैतिक कारणांचा शोध घेतो. या प्रसंगातून लेखक नायकाच्या संवेदनशील आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या स्वभावाचे चित्रण करतो. नायक फ्रेशरच्या नकाराचे कारण केवळ स्वतःच्या अपयशात शोधत नाही; तर तिच्या मनःस्थिती, सामाजिक वास्तव आणि नैतिक द्वंद्व यांच्या संदर्भात त्याचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

७ आत्मपरीक्षण आणि ओशोचे मानसदर्शन

उत्तरार्धातील पत्रांमध्ये ओशोचे विचार नायकाच्या आत्मपरिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावतात. तो लिहितो,"तुम्ही तुरुंगात आहात. जर बाहेर पडायचे असेल, तर आधी हे मान्य करा की, तुम्ही तुरुंगात आहात." त्यानंतर "वासनांच्या तुरुंगातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला." असे सांगून पुढे तो म्हणतो,"राग आणि सूडभावना यामुळे आणखी समस्या निर्माण होतात." या विचारांमुळे नायक प्रेमभंगाला सूडाने नव्हे, तर

आत्मजागृतीच्या प्रक्रियेत रूपांतरित करतो. तेव्हा ती त्याची सर्वात मोठी उर्जा ठरते.

८ आत्मनियंत्रण आणि स्व-विकास

मानसशास्त्रीय प्रवासाचा शेवट नायकाच्या आत्मनियंत्रणात होतो. तो लिहितो, "प्रत्येक सवय तुटल्यावर माणसात बदल घडतो. मी तुझ्याविषयीच्या विचारांची सवय तोडून टाकली. तसेच "आपल्याकडे जे आहे त्याचा उपयोग करावा; जे नाही त्याची आशा करू नये." आणि शेवटी "मी तुझा नाद सोडून स्वतःच्याच नादी लागलो होतो." या विधानांमधून नायकाच्या मानसप्रवासाचा अंतिम टप्पा आसक्तीपासून आत्मविकासाकडे झालेला दिसतो.

अशाप्रकारे 'जन्मपत्र'*मधील मानसशास्त्रीय संकल्पनांचा उपयोग ही कादंबरीची एक महत्त्वाची जमेची बाजू आहे. प्रेमभंग, आकर्षण, नकार, अपराधभाव, स्वाभिमान आणि आत्ममुक्ती यांचा विचार करताना नायक विविध मानसशास्त्रीय सिद्धांतांचा आधार घेतो. त्यामुळे कथनाला वैचारिक परिमाण प्राप्त होते. मात्र समीक्षकाच्या दृष्टीने एक मर्यादा स्पष्टपणे जाणवते. नायक फ्रॉईड, जंग, बोल्बी, दुर्खीम किंवा एस्थर पेरेल यांच्या संकल्पनांचा शास्त्रीय विश्लेषणासाठी नव्हे, तर स्वतःच्या अनुभवांचे समर्थन करण्यासाठी वापर करतो. त्यामुळे अनेक ठिकाणी मानसशास्त्रीय सिद्धांतांचे स्वरूप वैयक्तिक अर्थनिर्मितीचे साधन बनते. परिणामी, कादंबरीतील मानसशास्त्र हे संशोधनपर मांडणीपेक्षा आत्मसंवाद आणि आत्मपरीक्षणाची प्रक्रिया म्हणून अधिक प्रभावी ठरते.

याच कारणामुळे 'जन्मपत्र' ही मानसशास्त्र शिकवणारी कादंबरी नाही; तर मानवी मन, आपल्या भावना, नातेसंबंध, निर्णय आणि जीवनातील गुंतागुंती समजून घेण्यासाठी मानसशास्त्रीय संकल्पनांचा कसा आधार घेते, याचे प्रभावी चित्रण करणारी कादंबरी आहे.

➢ तत्त्वज्ञानाचा कथानकातील उपयोग :

आत्मवेदनेपासून आत्मजागृतीपर्यंतचा वैचारिक प्रवास

'जन्मपत्र' ही केवळ प्रेमभंगाची कथा नाही; ती तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने स्वतःच्या जीवनाचा अर्थ शोधणाऱ्या व्यक्तीची कथा आहे. पत्र क्रमांक १ ते ४२ मध्ये नायक वारंवार विविध तत्त्वज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि विचारवंतांचा आधार घेतो. हे संदर्भ सजावटीसाठी आलेले नाहीत; तर प्रत्येक विचार नायकाच्या भावनिक अवस्थेशी जोडलेला आहे. त्यामुळे या कादंबरीत तत्त्वज्ञान हे कथेबाहेरील ज्ञान न राहता कथानकाचा अविभाज्य घटक बनते. महत्त्वाचे म्हणजे, नायक कोणत्याही तत्त्वज्ञाचा सिद्धांत जसाच्या तसा स्वीकारत नाही; तो त्याचा स्वतःच्या जीवनानुभवाशी संबंध जोडून अर्थ लावतो. त्यामुळे 'जन्मपत्र' हे आत्मसंवादाचे साधन बनते. कारण नायकाला उमगते की, कोणत्याही व्यक्तीवर आपले संपूर्ण अस्तित्व अवलंबून ठेवणे ही स्वतःशी केलेली अन्यायकारक गोष्ट आहे. त्यामुळे तो आत्मसन्मान, आत्मविकास, ध्येय, वेळेचे व्यवस्थापन, ज्ञान, विचार आणि स्वावलंबन यांना केंद्रस्थानी ठेवतो; म्हणून प्रेमातून मिळालेली वेदना त्याच्यासाठी विनाशाचे कारण न ठरता स्वतःला घडविण्याची ऊर्जा बनते.

१ प्रेमाच्या अनुभवातून तत्त्वज्ञानाकडे वाटचाल

कादंबरीच्या प्रारंभी नायक भावनिक अनुभव जगतो; पण जसजसा नकार आणि अपेक्षाभंग वाढतो, तसतसा तो विचारवंतांकडे वळतो. तो लिहितो,"जो जाणतो त्याच्याकडून शिकले पाहिजे, असे मी ऐकले आणि विचारवंत लोकांचे धडे गिरविले." ही ओळ महत्त्वाची आहे. कारण येथे प्रथमच नायक स्वतःच्या अनुभवांचे उत्तर स्वतःमध्ये न शोधता विचारपरंपरेत शोधू लागतो. कारण “आपण अंधार, दुःख आणि नुकसान याचाच विचार करत बसलो, तर चांगले जगण्याला वेळच कुठे मिळणार सांग ?” हे त्याला विचारवंतांकडून कळलेले असते; म्हणून तो तिच्या प्रेमभंगाने कोलमडून जात नाही. तसेच “त्या वेदना उर्जा आणि प्रेरणेत रुपांतरित करण्याची अक्कल मला आली होती. त्यामुळे मी काही माझे आयुष्य डिस्टर्ब होऊ दिले नव्हते. ऐन वेळेला ओशोसारखे अनेक भेटले म्हणून ठीक झाले.” अशी कबुलीही देतो.

२ ओशो : प्रेमातून जागरूकतेकडे

'जन्मपत्र'मध्ये सर्वाधिक प्रभाव ओशोच्या विचारांचा दिसून येतो. नायक लिहितो, "जेव्हा एखाद्या पुरुषाचं वागणं स्त्रीच्या भावनांशी जोडतं, तेव्हा ती त्याच्यासमोर स्वतःला लपवू शकत नाही." हा विचार उद्धृत करून तो स्वतःच्या नात्याचा अर्थ लावतो. पुढे तो लिहितो, "तुम्ही तुरुंगात आहात. जर बाहेर पडायचे असेल, तर आधी हे मान्य करा की, तुम्ही तुरुंगात आहात." याचा संदर्भ देत तो म्हणतो, "वासनांच्या तुरुंगातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला." येथे ओशोचा विचार नायकासाठी

आत्मजागृतीचा मार्ग बनतो. तो पुन्हा लिहितो, "राग आणि सूडभावना यामुळे आणखी समस्या निर्माण होतात." त्यामुळे तो सूड न घेता क्षमाशीलतेची भूमिका स्वीकारतो.

३ स्टोइक (Stoic) जीवनदृष्टीचा प्रभाव

जरी नायक 'स्टोइक' हा शब्द थेट वापरत नाही, तरी त्याच्या विचारांमध्ये स्टोइक तत्त्वज्ञानाशी साधर्म्य असलेली जीवनदृष्टी दिसून येते. तो म्हणतो, "मनुष्याकडे जे आहे त्याचा उपयोग करावा, जे नाही त्याची आशा करू नये." तसेच "मृत्यू निश्चित आहे. मृत्यूची भीती बाळगण्यात काही अर्थ नाही." या विधानांतून जीवनातील अपरिहार्य वास्तवाचा स्वीकार करण्याची वृत्ती व्यक्त होते. तो त्याच्या नियंत्रणाबाहेरील घटना, परिस्थिती आणि मृत्यू यांविषयी अनावश्यक चिंता करण्याऐवजी, उपलब्ध वास्तव स्वीकारून त्यानुसार जगण्याचा विचार करून हातात असलेल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो.

४ अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव

नायकाच्या आत्मसंवादात अस्तित्ववादी विचारांचा प्रभावही जाणवतो. तो लिहितो, "आपण कोणावर राज्य करू शकत नाही; तेव्हा स्वतःवरच राज्य करायचे ठरविले." ही भूमिका व्यक्तीच्या स्वतःच्या अस्तित्वाची जबाबदारी स्वीकारण्याची आहे. पुढे तो म्हणतो, "भ्रम आणि मायेतून बाहेर पडून वास्तव समजून घेतले." येथे जीवनातील भ्रमांचा त्याग करून वास्तवाचा स्वीकार करण्याची अस्तित्ववादी जाणीव दिसते.

५ तत्त्वज्ञान आणि आत्मनियंत्रण

कादंबरीत तत्त्वज्ञानाचा उपयोग भावनिक समाधानासाठी नव्हे, तर स्वतःवर नियंत्रण मिळवण्यासाठी केला जातो. तो लिहितो, "स्वतःचे स्किल वाढवत गेलो." प्रेमभंगानंतर आत्मविनाश न करता स्व-विकासाचा मार्ग स्वीकारणे, हा तत्त्वज्ञानाचा कथानकातील महत्त्वाचा परिणाम आहे.

६ तत्त्वज्ञान आणि नैतिक परिपक्वता

प्रारंभीचा नायक फ्रेशरकडून प्रतिसादाची अपेक्षा करतो; पण उत्तरार्धात तो तिच्या स्वातंत्र्याचा स्वीकार करतो. तो लिहितो, "मी मुकाट्याने तुला तुझे पूर्ण स्वातंत्र्य बहाल केले." पुढे "तुला माफ करून मी पुढे जायचे ठरविले होते." ही त्याची भूमिका प्रेमातील मालकीहक्कापासून नैतिक परिपक्वतेकडे झालेल्या प्रवासाचे दर्शन घडवते. त्यामुळे त्या प्रेमभंगातून जन्माला आलेला नवा मनुष्य समोर येतो

७ तत्त्वज्ञान आणि आत्ममुक्ती

उत्तरार्धातील पत्रांमध्ये नायकाच्या विचारांचा अंतिम निष्कर्ष आत्ममुक्तीत दिसतो. त्यामुळे ही कादंबरी केवळ भावनांवर आधारलेली प्रेमकथा राहत नाही; ती तत्त्वज्ञानाच्या आधारावर आत्ममुक्तीचा शोध घेणारी कादंबरी बनते. नायकाला आलेले प्रेमभंग, भावनिक तुटणं आणि अस्तित्वाचे प्रश्न यांची उत्तरे तो केवळ भावनांमध्ये शोधत नाही, तर विचारांच्या विश्वात शोधतो. म्हणूनच कादंबरीत ओशो, नित्शे, फ्रॉईड, बुद्ध, जीवनमूल्ये, आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य यांचा वारंवार संदर्भ येतो. हे

संदर्भ केवळ बौद्धिक सजावट म्हणून आलेले नाहीत, तर नायकाच्या अंतर्मनातील परिवर्तनाचे साधन बनतात.

एकूणच 'जन्मपत्र'मधील तत्त्वज्ञानाचा उपयोग हा या कादंबरीचा एक महत्त्वाचा कलात्मक गुण आहे. फ्रॉईड, ओशो, जॉन बोल्बी, कार्ल जंग, एस्थर पेरेल, दुर्खीम इत्यादींच्या विचारांचा उपयोग नायक आपल्या अनुभवांचे स्पष्टीकरण करण्यासाठी करतो. त्यामुळे कथानकाला वैचारिक आधार प्राप्त होतो. मात्र समीक्षकाच्या दृष्टीने एक महत्त्वाची मर्यादा नोंदवावी लागते. नायक अनेकदा या विचारवंतांच्या संकल्पनांचा शास्त्रीय संदर्भात वापर न करता वैयक्तिक अनुभवांच्या समर्थनासाठी उपयोग करतो. परिणामी, काही ठिकाणी तत्त्वज्ञान वस्तुनिष्ठ विवेचन न राहता आत्मसमर्थनाचे साधन बनते. तरीही साहित्यिक दृष्टिकोनातून हीच बाब 'जन्मपत्र'चे वेगळेपण अधोरेखित करते. कारण येथे तत्त्वज्ञान हे स्वतंत्र प्रकरण म्हणून येत नाही, ते नायकाच्या मानसिक उत्क्रांतीचा भाग बनते. प्रेमातील आकर्षण, नकार, वेदना, आत्मपरीक्षण आणि आत्ममुक्ती या प्रत्येक टप्प्यावर तत्त्वज्ञान त्याला नवा अर्थ देते. म्हणून 'जन्मपत्र'मध्ये तत्त्वज्ञान हे कथेबाहेरचे ज्ञान नसून कथानक पुढे नेणारी अंतःप्रेरक शक्ती म्हणून कार्यरत असल्याचे दिसून येते.

➢ 'जन्मपत्र' : सामर्थ्ये आणि मर्यादा

कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन तिच्या आशय, रचना, भाषा, पात्रचित्रण आणि वैचारिक दृष्टिकोन यांच्या आधारे केले जाते. 'जन्मपत्र' या पत्रात्मक कादंबरीचेही मूल्यमापन करताना तिच्या साहित्यिक

सामर्थ्यांबरोबरच तिच्या मर्यादांकडेही चिकित्सक नजरेने पाहणे आवश्यक ठरते. विशेष म्हणजे या कादंबरीची सामर्थ्ये आणि मर्यादा दोन्हीही तिच्या एकाच पुरुषकेंद्री कथनरचनेतून निर्माण होतात.

१. पुरुषाच्या भावविश्वाचे दुर्मीळ चित्रण

मराठी साहित्यात प्रेमकथा मोठ्या प्रमाणात लिहिल्या गेल्या; परंतु पुरुषाच्या भावनिक असुरक्षिततेचे इतके विस्तृत आत्मकथन क्वचितच आढळते. पत्र क्रमांक १ ते १० मध्ये नायक स्वतःच्या आकर्षणाची कबुली देतो. पत्र क्रमांक १७ ते २७ मध्ये तो नकार, अपेक्षाभंग, लैंगिक इच्छा आणि भावनिक संघर्ष यांचा प्रामाणिक स्वीकार करतो. पत्र क्रमांक ३१ नंतर तो स्वतःच्या परिवर्तनाचा मागोवा घेतो. म्हणून ही कादंबरी पुरुषाच्या अंतर्मनाचा दस्तऐवज म्हणून वेगळी ठरते.

२. आत्मपरीक्षणाची प्रामाणिकता

या कादंबरीतील सर्वात मोठे सामर्थ्य म्हणजे नायक स्वतःलाही प्रश्न विचारतो. तो लिहितो,"आता वाटते, तो माझा एक वेडेपणा होता." नंतर तो म्हणतो,"प्रेमाचा हट्ट सोडल्यावर स्वतःला शोधायला सुरुवात झाली. तो स्वीकारतो की "तू माझ्या आयुष्याचा अध्याय होतीस; संपूर्ण पुस्तक नव्हतीस." ही आत्मस्वीकृती नायकाला विश्वासार्ह बनवते.

३. मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञानाचा प्रभावी वापर

या कादंबरीचे आणखी एक मोठे सामर्थ्य म्हणजे अनुभव समजून घेण्यासाठी लेखकाने विविध विचारवंतांचा आधार घेतला आहे. फ्रॉईड, जॉन बोल्बी, एमिल दुर्खीम आणि एस्थर पेरेल यांच्या संकल्पना येतात. ओशो, नीत्शे, शोपेनहावर, कामू, गुर्जिएफ, जे. कृष्णमूर्ती यांचे विचार येतात. या संदर्भांमुळे कादंबरीचा आशय केवळ वैयक्तिक राहत नाही; तो मानवी अनुभवाचे विश्लेषण बनतो.

४. पत्रात्मक रचनेचे यश

पत्ररूप निवडल्यामुळे नायकाचे मन थेट वाचकापर्यंत पोहोचते.व्हॉट्सॲप संवाद, आठवणी, आत्मसंवाद, प्रश्नोत्तरे आणि चिंतन यांच्या मिश्रणामुळे प्रत्येक पत्र स्वतंत्र असूनही एकमेकांशी जोडलेले राहते. त्यामुळे संपूर्ण कादंबरी भावनिक डायरी आणि वैचारिक आत्मचरित्र यांच्या सीमारेषेवर उभी राहते.

५. भाषा आणि प्रतीकांची ताकद

"कोरडी विहीर", "सोनं", "आग", "तुरुंग", "आरसा", "चार्जेबल लॉकर", "राख", "प्रवास" यांसारखी रूपके संपूर्ण कादंबरीत सतत येतात. विशेषतः "आपल्याजवळ सोनं आहे; पण आभूषण म्हणून वापरता आलं नाही." हे रूपक अपूर्ण प्रेमाचे अत्यंत प्रभावी साहित्यिक प्रतीक ठरते.

६. पुरुषवादी दृष्टिकोन : या कादंबरीचे सामर्थ्य आणि मर्यादा

'जन्मपत्र'चे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा पुरुषकेंद्री दृष्टिकोन. संपूर्ण कथानक नायकाच्या अनुभवातून उलगडत असल्यामुळे प्रेम, आकर्षण, नकार, लैंगिक इच्छा, आत्मसन्मान, अपराधबोध आणि आत्मपरिवर्तन या सर्व भावनिक प्रक्रियांचे चित्रण पुरुषाच्या अंतर्मनातून घडते. मराठी साहित्यात स्त्रीच्या भावविश्वावर विपुल लेखन झाले असले, तरी पुरुषाच्या भावनिक असुरक्षिततेचे, नकारामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक तणावाचे आणि त्यातून घडणाऱ्या आत्मपरीक्षणाचे इतके विस्तृत आणि सलग चित्रण तुलनेने कमी आढळते. या अर्थाने 'जन्मपत्र' पुरुषाच्या न बोलल्या जाणाऱ्या भावविश्वाला साहित्यिक अभिव्यक्ती देते. नायक स्वतःच्या चुकीची कबुली देतो,"आता वाटते, तो माझा एक वेडेपणा होता." ही कबुली महत्त्वाची आहे. कारण येथे पुरुष स्वतःला सर्वज्ञ किंवा सर्वार्थाने योग्य ठरवत नाही; उलट स्वतःच्या भावनिक चुकीचा स्वीकार करतो आणि हरवलेल्या नात्याची पुरुषी वेदना व्यक्त करतो. सामान्यतः समाज पुरुषाकडून भावनिक स्थैर्याची अपेक्षा करतो; दुःख, हताशा किंवा असुरक्षितता व्यक्त करण्यास प्रोत्साहन देत नाही. अशा पार्श्वभूमीवर नायक स्वतःच्या तुटलेपणाचा उघड स्वीकार करतो

तो प्रेमभंगानंतर स्वतःला दोष देतो, स्वतःचे विश्लेषण करतो, विविध मानसशास्त्रीय आणि तात्त्विक संकल्पनांच्या साहाय्याने स्वतःच्या वर्तनाचा अर्थ लावतो आणि शेवटी आत्मविकासाकडे वळतो. त्यामुळे ही कादंबरी पुरुषाच्या आत्मपरिवर्तनाची प्रक्रियाही नोंदवते.यामुळे 'जन्मपत्र'चे एक मोठे सामर्थ्य असे म्हणता येईल की, ती पुरुषाला केवळ प्रेम करणारा, लैंगिक इच्छा बाळगणारा किंवा निर्णय घेणारा व्यक्ती म्हणून दाखवत नाही; तर भावनिकदृष्ट्या जखमी होणारा, नकारामुळे

कोलमडणारा, स्वतःला प्रश्न विचारणारा आणि शेवटी स्वतःचे पुनर्निर्माण करणारा माणूस म्हणून चित्रित करते. मात्र हाच पुरुषवादी दृष्टिकोन कादंबरीची मर्यादाही ठरतो. कारण संपूर्ण कथन नायकाच्या अनुभवातून घडत असल्यामुळे फ्रेशरचे व्यक्तिमत्त्व त्याच्या नजरेतूनच उभे राहते. तिचे मौन, तिचा नकार, तिची मूल्यव्यवस्था किंवा तिचे अंतर्मन यांचे स्वतंत्र कथन उपलब्ध होत नाही. त्यामुळे वाचकाला तिच्या भूमिकेचा संपूर्ण संदर्भ मिळत नाही. कारण कोणत्याही पत्रात लिहिणाराच बोलत असतो, तसेच या पत्ररूप कादंबरीचे झाले आहे. नायकच बोलतो.

अनेक ठिकाणी नायक तिच्या वर्तनाचे मानसशास्त्रीय किंवा सामाजिक स्पष्टीकरण देतो; परंतु ती स्पष्टीकरणे तिची स्वतःची नसून त्याच्या अर्थलावण्याचा भाग आहेत; म्हणून 'जन्मपत्र'मधील पुरुषवाद हा स्त्रीविरोधी विचारसरणी नसून पुरुषाच्या अनुभवाला केंद्रस्थानी ठेवणारा कथनदृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनामुळे पुरुषाच्या भावविश्वाचे सूक्ष्म चित्रण घडते; परंतु त्याच वेळी स्त्रीचा स्वतंत्र आवाज मर्यादित राहतो; म्हणूनच हा दृष्टिकोन या कादंबरीचे सर्वांत मोठे सामर्थ्य आणि त्याचवेळी सर्वांत मोठी मर्यादा ठरतो. संशोधनग्रंथासाठी हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण याच आधारावर 'जन्मपत्र'ला "समकालीन मराठीतील पुरुषवादी पत्रात्मक कादंबरी" म्हणून स्वतंत्र स्थान देता येऊ शकते.

➢ मर्यादा

१. एकदिशात्मक कथन

संपूर्ण कादंबरी नायकाच्या दृष्टीने सांगितली गेली आहे. फ्रेशरचे स्वतंत्र कथन वाचकाला उपलब्ध होत नाही. तिची भूमिका केवळ नायकाच्या आठवणींमधून समोर येते. त्यामुळे वाचकाला तिच्या अंतर्मनाचा स्वतंत्र अर्थ लावण्याची संधी मर्यादित राहते. ते समजून घेण्यासाठी पत्रातील त्याचे मनोगत किंवा फ्रेशरला उद्देशून त्याने केलेले भाष्य समजून घ्यावेलागते.

२. स्त्रीविषयीचे काही सामान्यीकरण

नायक स्त्रियांच्या लैंगिक मानसशास्त्राबद्दल अनेक व्यापक निष्कर्ष मांडतो. उदाहरणार्थ, "बाईच्या जातीचं असंच अधांतरी असतं." "स्त्री फार थंडपणे पुरुषाकडे पाहते." अशी विधाने ही समाजाच्या अनुभवातून निर्माण झालेली मतं आहेत; ती सार्वत्रिक सत्य म्हणून स्वीकारता येत नाहीत. लेखकाने नंतर "प्रत्येक स्त्री वेगळी असते" असेही म्हटले आहे. या गोष्टी सामान्य म्हणून त्याकडे पाहिले जाते.

३. मानसशास्त्रीय संकल्पनांचा व्यक्तिनिष्ठ वापर

फ्रॉईड, बोल्बी, दुर्खीम, पेरेल, ओशो अशा अनेक विचारवंतांच्या संकल्पना नायक स्वतःच्या अनुभवाचे स्पष्टीकरण करण्यासाठी वापरतो; परंतु काही ठिकाणी त्या शास्त्रीय विश्लेषणापेक्षा वैयक्तिक अनुभवाला

वैचारिक आधार देण्यासाठी वापरलेल्या दिसतात. त्यामुळे त्या साहित्यिकदृष्ट्या प्रभावी असल्या, तरी संशोधनात्मक अचूकतेच्या निकषांवर त्यांचे स्वतंत्र परीक्षण आवश्यक ठरते.

५. आत्मन्यायाची छटा

नायक स्वतःच्या चुका मान्य करतो; परंतु अनेकदा तो स्वतःच्या कृतींचे समर्थनही करतो. उदाहरणार्थ, फिजिकल जवळीकीची इच्छा व्यक्त करताना तो ती जैविक गरज म्हणून स्पष्ट करतो; तर फ्रेशरच्या नकाराचे स्पष्टीकरण सामाजिक संस्कार, अपराधबोध, हार्मोनल समस्या, ताण इत्यादींमध्ये शोधतो. यामुळे काही ठिकाणी कथन आत्मन्याय करण्याकडे झुकते. म्हणजे एकाच वेळी तो तिला आणि स्वतःला न्याय देण्याचा प्रयत्न करतो.

अशाप्रकारे या सर्व मर्यादा असूनही त्या कादंबरीच्या अपयशाचे लक्षण नाहीत; उलट त्या एका व्यक्तीच्या आत्मकथनाच्या स्वाभाविक मर्यादा आहेत. कारण ही कादंबरी वस्तुनिष्ठ सामाजिक सर्वेक्षण नसून एका पुरुषाच्या भावनिक स्मृतींचे साहित्यिक पुनर्निर्माण आहे. 'जन्मपत्र' ही समकालीन मराठीतील एक वैशिष्ट्यपूर्ण पत्रात्मक कादंबरी म्हणून लक्ष वेधून घेते. वरवर पाहता ती एका प्रोजेक्ट मॅनेजर आणि त्याच्या सहकाऱ्याच्या अपूर्ण प्रेमाची कथा वाटते; परंतु तिच्या अंतःरचनेत ती प्रेम, आकर्षण, नकार, आत्मसन्मान, पुरुषी भावविश्व, मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान यांच्या संगमातून उभी राहिलेली आत्मशोधाची कादंबरी आहे.

या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे पुरुषाच्या भावनिक अनुभवाला केंद्रस्थानी आणणे. मराठी साहित्यात स्त्रीच्या भावविश्वावर मोठ्या प्रमाणात लेखन झाले असले, तरी पुरुषाच्या असुरक्षितता, भावनिक अवलंबित्व, नकाराची वेदना आणि आत्मपुनर्निर्मिती यांचा इतका विस्तृत मागोवा क्वचितच घेतला गेला आहे. या अर्थाने 'जन्मपत्र' ही पुरुष-अनुभवाच्या साहित्यपरंपरेत महत्त्वाची भर घालणारी कृती ठरते. त्याचवेळी ही कादंबरी पूर्णतः एकदिशात्मक कथनावर आधारलेली असल्याने तिच्या निष्कर्षांकडे वस्तुनिष्ठ सत्य म्हणून न पाहता एका कथनकर्त्याच्या अनुभवविश्वाच्या रूपात पाहणे आवश्यक आहे. फ्रेशरचे मौन, तिची संकोची भूमिका आणि नायकाचे तिच्यावरील अर्थलावणे यांमधून वाचकाला स्वतःचा अर्थ निर्माण करण्याची संधी मिळते. हाच या कादंबरीचा साहित्यिक गुण आहे. ती एका पुरुषाच्या आत्मसंवादातून घडणाऱ्या मानसिक, भावनिक आणि वैचारिक पुनर्जन्माची कथा आहे. तिचे मूल्य प्रेमकथा म्हणून जितके आहे, तितकेच पुरुष-अभ्यास मानसशास्त्रीय साहित्यसमीक्षा, पत्रात्मक कादंबरी आणि आत्मकथनपर मराठी साहित्य या अभ्यासक्षेत्रांसाठीही आहे. म्हणूनच 'जन्मपत्र'कडे केवळ वैयक्तिक अनुभव म्हणून नव्हे, तर समकालीन मराठीतील पुरुषवादी अनुभवविश्वाचा साहित्यिक दस्तऐवज म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.

➢ पुरुषवादी अनुभवविश्वाचा साहित्यिक दस्तऐवज

'जन्मपत्र' या कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती स्त्रीविरोधी किंवा स्त्रीसमर्थक अशा कोणत्याही एका चौकटीत अडकत

नाही; उलट ती एका पुरुषाच्या भावनिक, मानसिक आणि वैचारिक अनुभवविश्वाचा प्रामाणिक साहित्यिक दस्तऐवज म्हणून समोर येते. मराठी साहित्यात स्त्रीच्या अनुभवविश्वावर मोठ्या प्रमाणावर लेखन झाले आहे; परंतु पुरुषाच्या अंतर्मनातील वेदना, भावनिक असुरक्षितता, नाकारले जाण्याची भीती, आत्मसन्मानाची झुंज आणि प्रेमभंगानंतरची आत्मपुनर्रचना यांचे इतक्या सातत्याने आणि तपशीलवार चित्रण तुलनेने कमी दिसते. त्या दृष्टीने ही कादंबरी वेगळी ठरते.

या कादंबरीतील नायक सतत स्वतःच्या भावनांशी झगडतो. तो प्रेम करतो, अपेक्षा ठेवतो, गैरसमज करून घेतो, स्वतःला दोष देतो, नायिकेवर रागावतो, पुन्हा स्वतःचे आत्मपरीक्षण करतो आणि शेवटी स्वतःला नव्याने घडविण्याचा निर्णय घेतो. या संपूर्ण प्रक्रियेत तो पुरुष असल्यामुळे समाज त्याच्याकडून जी भावनिक ताकद, संयम आणि स्थैर्य अपेक्षित धरतो, त्यालाही प्रश्न विचारतो. "पुरुष रडत नाही", "पुरुषाने पुढे जात राहावे", "भावना लपवाव्यात" अशा सामाजिक संकेतांमुळे त्याच्या मनात निर्माण होणारा ताण अनेक प्रसंगांत व्यक्त होतो. विशेष म्हणजे लेखक पुरुषाला निर्दोष ठरवत नाही. उलट नायक स्वतःच्या अनेक भ्रमांची कबुली देतो. "मला वाटलं, तुझा नकार म्हणजे होकार आहे," किंवा "मी तुझा नाद सोडून स्वतःच्याच नादी लागलो होतो," अशा आत्मस्वीकृतींमधून तो स्वतःच्या विचारांची चिकित्सा करतो. त्यामुळे ही कादंबरी पुरुषाच्या वेदनेचे उदात्तीकरण करत नाही; तर त्याच्या चुका, सामाजिक संस्कार आणि भावनिक अपरिपक्वतेलाही तितक्याच प्रामाणिकपणे सामोरे जाते.

*** *** ***

बाप : द ग्रेट हिरो : पुरुषत्वाच्या बदलत्या संकल्पना

आधुनिक मराठी कादंबरीने बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाबरोबरच स्त्री-पुरुष संबंध, कुटुंबसंस्था, व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवी मूल्यांच्या बदलत्या स्वरूपाचा सखोल वेध घेतला आहे. विशेषतः जागतिकीकरणानंतर भारतीय मध्यमवर्गीय समाजात पुरुषाच्या पारंपरिक भूमिकेत झालेला बदल, पितृत्वाची नव्याने आकार घेणारी जाणीव, वैवाहिक नात्यांतील संवादाचे प्रश्न, नैतिक नेतृत्व आणि जबाबदार नागरिकत्व या विषयांनी समकालीन मराठी कादंबरीला नवे वैचारिक परिमाण प्राप्त करून दिले आहे. 'मात्र बाप : द ग्रेट हिरो' ही अशाच बदलत्या सामाजिक वास्तवाचे चित्रण करणारी मूल्यप्रधान सामाजिक कादंबरी असून, तिच्या केंद्रस्थानी पुरुषत्वाच्या नव्या संकल्पनेचा शोध आहे. या कादंबरीत पित्याचे व्यक्तिमत्त्व, त्याग, जबाबदारी, भावनिक संवेदनशीलता आणि नैतिक मूल्ये यांच्या माध्यमातून पुरुषत्वाचे वर्चस्ववादी नव्हे, तर उत्तरदायी आणि मूल्यनिष्ठ रूप प्रभावीपणे उलगडले जाते.

कादंबरीचा केंद्रबिंदू सखाराम ही व्यक्तिरेखा असली, तरी शिरोळे, सुमेध, रोहण, सुरुची आणि इतर पात्रांच्या माध्यमातून लेखकाने आधुनिक समाजातील पुरुषाच्या विविध भूमिकांचे वास्तववादी चित्रण केले आहे. आर्थिक असुरक्षितता, रोजगारातील स्पर्धा, गुणवत्तेवर आधारित यश, वैवाहिक नात्यांतील संवादाचा अभाव, स्त्रीच्या स्वायत्ततेचा स्वीकार आणि नैतिक नेतृत्व या प्रश्नांच्या संदर्भात पुरुषत्वाची बदलती रूपे कादंबरीत प्रकर्षाने व्यक्त होतात. त्यामुळे ही कादंबरी केवळ एका पित्याच्या

संघर्षाची कथा राहत नाही; ती आधुनिक भारतीय मध्यमवर्गीय समाजातील पुरुषाच्या बदलत्या सामाजिक, नैतिक आणि मानसशास्त्रीय अस्तित्वाचा साहित्यिक दस्तऐवज ठरते.

या कादंबरीचे वैशिष्ट्य असे की, लेखकाने कोणत्याही पुरुष व्यक्तिरेखेचे एकांगी उदात्तीकरण केलेले नाही किंवा तिला पितृसत्ताक व्यवस्थेचा एकमेव प्रतिनिधी म्हणूनही रंगवलेले नाही. सखारामच्या माध्यमातून जबाबदार पितृत्व, शिरोळे यांच्या माध्यमातून नैतिक नेतृत्व, सुमेधच्या माध्यमातून गुणवत्ता, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरता, तर रोहणच्या माध्यमातून आधुनिक पुरुषाच्या अंतर्विरोधांचे आणि संवादाच्या अपयशाचे वास्तववादी चित्रण केले आहे. त्यामुळे कादंबरीतील पुरुष पात्रे प्रतीकात्मक न राहता बदलत्या सामाजिक वास्तवाशी निगडित मानवी व्यक्तिमत्त्वे म्हणून उभी राहतात. लेखक पुरुषत्वाला सत्ता, अधिकार किंवा वर्चस्वाच्या चौकटीत न पाहता, जबाबदारी, नैतिकता, संवेदनशीलता आणि आत्मपरीक्षण यांच्या आधारे पुनर्परिभाषित करतो.

बाप : द ग्रेट हिरो ही मूल्यप्रधान सामाजिक कादंबरी असून तिचा गाभा पुरुषत्वाच्या पुनर्व्याख्येत आहे. लेखकाचा उद्देश केवळ कथानक मांडणे हा नसून बदलत्या समाजात पुरुषाच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करणे हा आहे; म्हणूनच कादंबरीत पितृत्व, मैत्री, स्वाभिमान, नैतिक नेतृत्व, कर्तव्य, भावनिक प्रामाणिकता आणि स्त्रीच्या स्वायत्ततेचा आदर या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे लेखकाने पुरुषत्वाविषयी कोणतेही तात्त्विक भाष्य न करता व्यक्तिरेखांच्या कृती, संवाद आणि जीवनानुभवांच्या माध्यमातून आपली भूमिका व्यक्त केली

आहे. त्यामुळे कादंबरीतील पुरुषवाद हा घोषणात्मक न राहता अनुभवाधिष्ठित आणि अधिक विश्वासार्ह ठरतो.

'पुरुषवाद' या सैद्धांतिक चौकटीतून विचार करतांना या कादंबरीतील प्रमुख पुरुष व्यक्तिरेखा, त्यांचे परस्परसंबंध, पितृत्व, नैतिक नेतृत्व, भावनिक अभिव्यक्ती, स्त्री-पुरुष संबंध आणि मूल्यव्यवस्था यांचे चिकित्सक विश्लेषण करून लेखकाने पुरुषत्वाची कोणती नवी संकल्पना मांडली आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे करण्यात येईल.

- **कादंबरीचे कथानक**

बाप : द ग्रेट हिरो ही कादंबरी पुरुषाच्या जीवनातील जबाबदाऱ्या, त्याग, मानसिक संघर्ष आणि सामाजिक अपेक्षांचे वास्तववादी चित्रण करणारी समकालीन सामाजिक कादंबरी आहे. कादंबरीचा केंद्रबिंदू सखाराम हा कष्टाळू, कर्तव्यदक्ष आणि मूल्यनिष्ठ पिता आहे. कुटुंबाचा आर्थिक भार, मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी आणि सामाजिक प्रतिष्ठा टिकवून ठेवण्याचा संघर्ष, हे त्याच्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट बनते. स्वतःच्या इच्छा-आकांक्षांना बाजूला ठेवून कुटुंबासाठी जगणाऱ्या पुरुषाचे प्रतिनिधित्व सखारामच्या व्यक्तिरेखेतून प्रभावीपणे घडते. पुरुषवादाच्या दृष्टीने ही व्यक्तिरेखा पुरुषावर समाजाने लादलेल्या 'कर्तव्यनिष्ठ पालक' या भूमिकेचे प्रतीक ठरते. कारण पुरुषसत्ताक कुटूंबपद्धतीमुळे ती त्याची सर्वात मोठी जबाबदारी असते. त्यानुसार तो त्याच्या जीवनव्यवहाराचे सगळे सूत्र त्या पद्धतीने वापरत असतो.

कथानकाचा दुसरा महत्त्वाचा धागा सुमेधच्या शिक्षणापासून रोजगारापर्यंतच्या प्रवासाशी जोडलेला आहे. गुणवत्तेच्या आधारे नोकरी मिळविण्याचा त्याचा संघर्ष हा आधुनिक तरुण पुरुषाच्या असुरक्षिततेचा आणि स्पर्धात्मक वातावरणातील मानसिक दडपणाचा अनुभव व्यक्त करतो. ऑफर लेटर मिळण्यास झालेला विलंब त्याच्या आत्मविश्वासाला धक्का देतो; परंतु संयम, चिकाटी आणि स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवून तो संकटावर मात करतो. या प्रवासातून पुरुषाच्या यशाशी जोडल्या गेलेल्या सामाजिक अपेक्षा आणि त्या अपेक्षांमुळे निर्माण होणारा मानसिक ताण अधोरेखित होतो.

कादंबरीत शिरोळे ही व्यक्तिरेखा पुरुष नेतृत्वाचा आदर्श म्हणून उभी राहते. वरिष्ठ अधिकारी असूनही ते मैत्रीपेक्षा गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि नैतिकतेला प्राधान्य देतात. त्यांच्या वर्तनातून अधिकाराचा गैरवापर न करता तत्त्वनिष्ठ नेतृत्व कसे असावे, याचे उदाहरण लेखकाने मांडले आहे. त्यामुळे पुरुष नेतृत्व म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर नैतिक जबाबदारी आणि न्यायनिष्ठा असल्याचे कथानक स्पष्ट करते.

रोहणच्या व्यक्तिरेखेतून आधुनिक विवाहित पुरुषाचे मानसिक द्वंद्व समोर येते. वैवाहिक नात्यातील मतभेद, करिअर, संवादाचा अभाव आणि बदलत्या स्त्री-पुरुष संबंधांमुळे निर्माण होणारा ताण यांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. पुरुषवादाच्या दृष्टीने पाहता, पुरुषालाही भावनिक वेदना, असुरक्षितता आणि नातेसंबंध टिकविण्याचा संघर्ष अनुभवावा लागतो, हे या कथानकातून प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे कादंबरी

पुरुषाला केवळ अधिकारसंपन्न व्यक्ती म्हणून न दाखवता संवेदनशील, भावनिक आणि परिस्थितीशी झुंजणारा माणूस म्हणून साकारते.

कादंबरीच्या उत्तरार्धात सुमेधला नोकरी मिळाल्यानंतर सखारामच्या आयुष्यभराच्या संघर्षाचे सार्थक होते. मुलाच्या यशात स्वतःचे यश पाहणाऱ्या पित्याचे समाधान, त्यागाचे मोल आणि कुटुंबासाठी जगण्याची वृत्ती या प्रसंगातून प्रभावीपणे व्यक्त होते. कादंबरीचा शेवट पुरुषाच्या आर्थिक यशापेक्षा त्याची कर्तव्यनिष्ठा, नैतिकता, स्वाभिमान, पितृत्व आणि मानवी मूल्ये अधिक महत्त्वाची असल्याचा संदेश देतो.

अशाप्रकारे बाप : द ग्रेट हिरो ही कादंबरी पुरुषवादाच्या दृष्टीने केवळ एका पित्याची कथा राहत नाही; ती आधुनिक भारतीय पुरुषाच्या जबाबदाऱ्या, मानसिक संघर्ष, पितृत्व, नैतिक नेतृत्व आणि सामाजिक अपेक्षांच्या ओझ्याचे वास्तववादी चित्रण करणारी महत्त्वपूर्ण सामाजिक कादंबरी म्हणून समोर येते.

१. कादंबरीत पुरुषत्वाचा अर्थ वर्चस्व नसून जबाबदारी म्हणून मांडला आहे.

संपूर्ण कादंबरीत पुरुषत्वाची संकल्पना सत्ता, अधिकार किंवा कुटुंबावर नियंत्रण या पारंपरिक चौकटीत न मांडता जबाबदारी, भावनिक परिपक्वता आणि नैतिक नेतृत्व या मूल्यांच्या आधारे उलगडली जाते. या विचाराचा केंद्रबिंदू शिरोळे यांच्या व्यक्तिरेखेत दिसून येतो. कॅम्पस प्लेसमेंटमध्ये निवड होऊनही ऑफर लेटर मिळण्यास विलंब झाल्याने सुमेध अस्वस्थ होतो. घरची आर्थिक परिस्थिती, वडिलांवरील कर्ज आणि

स्वतःच्या भविष्याबद्दलची अनिश्चितता यामुळे त्याच्या मनात अपराधभाव निर्माण होतो. त्या वेळी शिरोळे त्याला सांगतात, "अरे, मुलाने कुठे बापाचा ताण घ्यायचा असतो का? ताण घेणं बापाचं काम असतं." हे वाक्य केवळ सुमेधला धीर देणारे नाही; तर पुरुषत्वाची लेखकाने स्वीकारलेली संकल्पना स्पष्ट करणारे आहे. कारण सुविधा पुरवून सुरक्षितता प्रदान करणे, हे बापाचे काम असते, असे समाज मानून चालतो.

येथे पुरुष हा इतरांवर जबाबदाऱ्या टाकणारा नाही, तर त्या स्वतःच्या खांद्यावर घेणारा आहे. शिरोळे सुमेधच्या मनावर अपेक्षांचे ओझे वाढवत नाहीत; उलट त्याच्या मनातील अपराधभाव दूर करून त्याला मानसिक स्थैर्य देतात. त्यामुळे पुरुषत्वाचा अर्थ आर्थिक सामर्थ्य नसून मानसिक आधार देण्याची क्षमता असा विस्तारतो. याच विचाराची पुनरुक्ती मुलाखतीपूर्वी शिरोळे सुमेधला आत्मविश्वास देताना करतात, "आत्मविश्वास असला की लढाई सुरू होण्याआधीच अर्धी जिंकलेली असते." या विधानातही लेखकाचा भर विजयावर नसून मनःस्थितीवर आहे. शिरोळे सुमेधला इतरांपेक्षा श्रेष्ठ ठरण्याची प्रेरणा देत नाहीत; तर स्वतःच्या भीतीवर मात करण्याची ताकद देतात. यामुळे पुरुषत्वाचा संबंध बाह्य शक्तीपेक्षा आत्मिक स्थैर्याशी जोडला जातो.

पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वातील खरी ताकद त्याच्या निर्णयक्षमतेत, संयमात आणि आत्मविश्वासात असल्याचे लेखक अधोरेखित करतो. नोकरीच्या प्रतीक्षेमुळे सुमेध पुन्हा खचतो. त्या वेळी शिरोळे निक व्हुजिसिकचे उदाहरण देत म्हणतात, "परिस्थितीमुळे आपली ओळख ठरत नाही; तर तुमचा दृष्टिकोन, जिद्द आणि चिकाटीमुळे तुमचं भविष्य

घडतं." या विधानातून लेखक पुरुषत्वाला संकटांवर मात करण्याच्या मानसिक क्षमतेशी जोडतो. परिस्थितीला दोष देणे किंवा अपयशामुळे स्वतःला संपलेले मानणे हा पुरुषार्थ नाही; प्रतिकूलतेतही जिद्दीने उभे राहणे हीच खरी पुरुषी वृत्ती आहे, असे लेखक सूचित करतो. त्यामुळे पुरुषत्वाचा केंद्रबिंदू संघर्ष नसून संघर्षात टिकून राहण्याची नैतिक शक्ती ठरतो.

या तिन्ही प्रसंगांतून शिरोळे केवळ मार्गदर्शक म्हणून उभे राहत नाहीत; ते पुरुषत्वाचा एक पर्यायी आदर्श निर्माण करतात. त्यांच्याकडे अधिकार आहे, अनुभव आहे, वरिष्ठ पद आहे; तरी ते त्याचा वापर दडपण निर्माण करण्यासाठी करत नाहीत. उलट ते दुसऱ्याला सक्षम बनवण्यासाठी करतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखेत पुरुषत्वाचे रूप संरक्षक, प्रेरक आणि उत्तरदायी नेतृत्वाचे बनते.

या संपूर्ण प्रसंगाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने पुरुषत्वाविषयी कोणतेही तात्त्विक भाष्य केलेले नाही; त्याऐवजी संवादप्रधान कथनतंत्रातून ही संकल्पना साकार केली आहे. शिरोळे यांच्या संवादांमध्ये उपदेशाचा आविर्भाव नाही; ते जीवनानुभवातून आलेले वाटतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक वाक्याला कथानकाच्या संदर्भातून अर्थ प्राप्त होतो. लेखकाने विचार मांडण्यासाठी स्वतंत्र भाष्य न करता व्यक्तिरेखांच्या संवादांचा उपयोग केला आहे, ही त्याच्या लेखनशैलीची महत्त्वाची ताकद आहे. याशिवाय शिरोळे, सखाराम आणि सुमेध या तीन पुरुष व्यक्तिरेखा एकाच मूल्यसाखळीच्या तीन टप्प्यांप्रमाणे उभ्या राहतात. सखाराम जबाबदारीचे ओझे वाहणारा पिता आहे; सुमेध ती जबाबदारी

स्वीकारण्याच्या उंबरठ्यावर असलेला युवक आहे; तर शिरोळे त्या दोघांना मानसिक बळ देणारा मार्गदर्शक आहे. त्यामुळे पुरुषत्व एका व्यक्तीच्या गुणधर्मापुरते मर्यादित राहत नाही; ते पिढ्यांपिढ्या हस्तांतरित होणारे नैतिक मूल्य म्हणून विकसित होते.

पुरुषवादाच्या संदर्भात हा प्रसंग विशेष महत्त्वाचा ठरतो. लेखक पारंपरिक पितृसत्ताक पुरुषत्वाचा पुरस्कार करत नाही. तो पुरुषाला घराचा स्वामी, निर्णयकर्ता किंवा कर्ता म्हणून श्रेष्ठ ठरवत नाही. उलट दुसऱ्याच्या भीतीला समजून घेणारा, तिचे रूपांतर आत्मविश्वासात करणारा आणि संकटाच्या काळात भावनिक आधार देणारा पुरुष ही आदर्श प्रतिमा निर्माण करतो. त्यामुळे या कादंबरीतील पुरुषवाद हा वर्चस्ववादी नसून उत्तरदायित्ववादी आहे. यातील जुन्या आणि नव्या पिढीतील पुरुष आणि तरुण यांच्या विचार करण्याच्या, जगण्याच्या वेगवेगळ्या पद्धती पहिल्या तर सहज लक्षात येते. सखाराम, शिरोळे, ज्ञानोबा शिपाई, हे एका मूल्यनिष्ठ पिढीचे प्रतिनिधित्त्व करतात. तर रोहण, हेमंत, संकेत पाटील, क्लार्क काळे हे नोकरी व पैसा याला महत्त्व देणारी पिढी आहे.

२. शिरोळे हे पुरुषसत्तेचे प्रतिनिधी नसून नैतिक नेतृत्वाचे प्रतीक आहेत.

कादंबरीतील शिरोळे ही व्यक्तिरेखा अधिकाराच्या स्थानावर असली, तरी ती अधिकाराचा उपभोग घेणारी नसून त्यावर नैतिक नियंत्रण ठेवणारी आहे. त्यामुळे लेखक पुरुषत्वाची व्याख्या सत्तेच्या आधारे करत नाही; तर मूल्यनिष्ठ नेतृत्वाच्या आधारे करतो. तर सुमेध हा शिरोळे यांच्या जिवलग मित्र सखारामचा मुलगा असतो. त्याच्या शिक्षणासाठी शिरोळे

यांनी आर्थिक मदतही केलेली असते. त्यामुळे मुलाखतीत त्याला विशेष सवलत मिळेल, अशी अपेक्षा सहज निर्माण होते; परंतु मुलाखतीत शिरोळे त्याच्याशी इतर उमेदवारांप्रमाणेच वागतात आणि उलट सर्वांत कठीण प्रश्न त्यालाच विचारतात. मुलाखतीनंतर एच.आर. अधिकारी आश्चर्य व्यक्त करतात, तेव्हा शिरोळे म्हणतात, "उद्या कोणी असं म्हणू नये की, शिरोळेंनी त्यांच्या मित्राच्या मुलाला नोकरी दिली." या विधानातून लेखकाने केवळ एका अधिकाऱ्याचा प्रामाणिकपणा दाखवलेला नाही; तर पुरुषत्वाच्या नैतिक परिमाणाची मांडणी केली आहे. अधिकार असताना त्याचा वैयक्तिक संबंधांसाठी वापर करणे ही पितृसत्ताक व्यवस्थेची सामान्य प्रवृत्ती असते.

